
# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वार्षिक प्रकाशन २०२४





छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचा जुहू येथील पुतळा

बृहन्मुंबई महानगरपालिका

# वार्षिक प्रकाशन
# २०२४

बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता श्रीम. शुभांगी वि. सावंत, महानगरपालिका सचिव ह्यांनी हे प्रकाशन संपादित करून, महानगरपालिका मुख्य कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१ येथे प्रसिध्द केले.

मुद्रक : व्यवस्थापक,
महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई-४०००११.

# बृहन्मुंबई महानगरपालिकेचे

# बोधचिन्ह

चार भाग असलेल्या आकृतीबंधासभोवार सोनेरी रंगाची फुलाफुलांची वेलबुट्टी आहे. शुचिता व सौंदर्याचे प्रतीक असे पूर्ण विकसित कमलपुष्प वेलबुट्टीच्या खालच्या बाजूला असून, शिरोभागी सामर्थ्यशाली वनराज विराजमान झालेला आहे. बोधचिन्हाच्या चौकटीमध्ये खालीलप्रमाणे कोरीव काम आहे :-

: मुंबई म्हणजे भारताचे प्रवेशद्वार. त्याचे प्रतीक म्हणून गेटवे ऑफ इंडियाची प्रतिकृति.

: गतिमान चक्र म्हणजे प्रतिकात्मक कारखाना, त्यावरून मुंबईचे औद्योगिक महत्त्व व महात्म्य ध्वनित होते.

: हाकारलेल्या तीन जहाजांचे रेखाचित्र म्हणजे मुंबईचे बंदर व औद्योगिक केंद्र म्हणून असलेल्या महत्त्वाचे द्योतक.

: स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासकीय केंद्र म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे रेखाचित्र.

उपरोक्त आकृतीबंधाच्या पायथ्याशी '**यतो धर्मस्ततो जयः**' हे ब्रीदवाक्य सुवर्णाक्षरांत कोरलेले आहे.

# अनुक्रमणिका


**भूषण गगराणी, प्रशासक ह्यांचे प्रास्ताविक**

**श्रीमती शुभांगी वि. सावंत, महानगरपालिका सचिव ह्यांची प्रस्तावना**

**महानगरपालिका अधिकाऱ्यांची नांवे व छायाचित्रे.**

**महत्त्वपूर्ण घटना व सांख्यिकी माहिती :** १ ते २२

**शहर प्रशासन :** २३ ते ४२

१) शहर प्रशासन प्रस्तावना २३
२) नागरी सचिवालय २४
३) वैधानिक महानगरपालिका लेखापरीक्षा (महानगरपालिका मुख्या लेखापरीक्षक ह्यांचे खाते) २५
४) सामान्य प्रशासन विभाग २७
५) कामगार खाते २९
६) लेखापरीक्षा आणि लेखा ३०
७) माहिती तंत्रज्ञान विभाग ३४
८) पाणी पुरवठा व मलनिःसारण खात्याचा अर्थ व प्रशासन कक्ष ३५
९) करवसुली (करनिर्धारण व संकलन खाते) ३६
१०) जनसंपर्क विभाग ३७
११) विधि खाते ३८
१२) मध्यवर्ती खरेदी खाते ३९
१३) प्रमुख अधिकारी (चौकशी) विभाग ३९
१४) महानगरपालिका सुरक्षा दल ४०
१५) महानगरपालिका मुद्रणालय ४२
१६) मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष ४२

**पाणी पुरवठा :** ४३ ते ४४

जल अभियंता खाते

**शिक्षण विभाग** ४५ ते ५६

**आरोग्य सेवा :** ५७ ते ७०

१) कुष्ठ रुग्णांसाठी ॲक्वर्थ महानगरपालिका रुग्णालय ५७
२) संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रुग्णालय ५८

**वैद्यकीय सहाय्य व शिक्षण :** ७१ ते १०८

१) राजे सातवे एडवर्ड स्मारक रुग्णालय व सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय ७१
२) बा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालय आणि टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय ८१
३) नायर रुग्णालय दंत महाविद्यालय ८९
४) लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, शीव ९४
५) सेठ आत्मासिंग जेसासिंग बांकेबिहारी महानगरपालिका कान, नाक व घसा रुग्णालय, फोर्ट १०७
६) बृहन्मुंबई महानगरपालिकेची क्षयरोग नियंत्रण सेवाकार्ये १०७

**अभियांत्रिकी सेवा :** १०९ ते १३६

१) नगर अभियंता ह्यांचे खाते १०९
२) पर्यावरण खाते ११०
३) प्रमुख अभियंता ह्यांनी करावयाची कामे :
(१) प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) ११४
(२) प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) ११७
(३) प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) ११८
(४) प्रमुख अभियंता (मुंबई मलनि:सारण / विल्हेवाट प्रकल्प) १२०
(५) प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) १२१
(६) प्रमुख अभियंता (पूल) १२४
(७) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) १२४
(८) घन कचरा व्यवस्थापन खाते १२५

(९) विकास नियोजन १३१
(१०) नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, १३२
(११) मालमत्ता आणि भूमी व्यवस्थापन, १३४
(१२) महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्र १३६

**अग्निशमन दल** १३७ ते १४०

**आपत्कालिन नियंत्रण** १४१ ते १४६

**परवाना नियंत्रण** १४७ ते १५४

१) अनुज्ञापन खाते १४७
२) दुकाने व आस्थापना १४९
३) मंडया १४९
४) देवनार पशुवधगृह १५०

**मनोरंजनपर सुविधा :** १५५ ते १६०

१) उद्याने आणि प्राणिसंग्रहालय १५५
२) डॉ. भाऊ दाजी लाड (मुंबई शहर) वस्तुसंग्रहालय १५५
३) महानगरपालिकेचे जलतरण तलाव १५६
४) क्रीडा संकुले १५८
५) महानगरपालिकेची नाट्यगृहे १५९

**लोकोपयुक्त सेवाकार्ये :** १६१ ते १६८

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम



## श्री. भूषण गगराणी, प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका

भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या वार्षिक प्रकाशन २०२४ ची प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासक म्हणून मला प्रथमच लाभले, ह्याचा मला अतिशय आनंद होत आहे.

जागतिक स्तरावर देशाची औद्योगिक व आर्थिक राजधानी म्हणून मुंबई शहराचा नावलौकिक आहे. वैविध्यपूर्ण संस्कृतीमध्ये अनेक जाती, धर्मांचे नागरिक या मुंबापुरीमध्ये गुण्यागोविंदाने वास्तव्य करीत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका ही भारतातील एक सर्वोत्तम अशी स्वायत्त संस्था आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, तिच्या स्थापनेपासून शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणी पुरवठा, अग्निसुरक्षा, नागरी सोयी सुविधा, कला आणि संस्कृती, पुरातन वास्तु जतन या क्षेत्रांमध्ये आणि नागरिकांना कार्यक्षम व उत्कृष्ट सेवा देण्याचे ध्येय गाठण्याकरिता भरीव स्वरुपाचे काम करीत आहे.

या मुंबापुरीतील सव्वाशे कोटीहून अधिक नागरिकांच्या पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्ते, मलनिःसारण वाहिन्या, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, मनोरंजन मैदाने, क्रिडांगणे इत्यादी गरजा पूर्ण करण्याचे दायित्व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आहे. पाणी टंचाई दूर करण्यासाठी स्वच्छ पाण्याचा वापर मर्यादीत करणे आणि पुनर्वापर सक्षम करणे हयावर भर देणे आवश्यक आहे. मुंबईतील बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित सागरी किनारी रस्ता प्रकल्पातील बिंदू माधव ठाकरे चौकापासून नरिमन पॉइंट पर्यंतच्या भागाचे लोकार्पण करण्यात आले आहे. त्यामुळे, वाहतूक कोंडीच्या जटील समस्येचा सामना करावा लागणाऱ्या लाखो मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे घन कचऱ्याचे एकत्रीकरण व त्याची विल्हेवाट लावणे ही बृहन्मुंबई महानगरपालिकेपुढे फार मोठी समस्या बनली आहे. लोक सहभागाने या समस्येवर तोडगा काढणे ही काळाची गरज आहे. हे शहर स्वच्छ, हरित, सुंदर, प्लास्टिक मुक्त आणि पर्यायाने प्रदूषणविरहीत ठेवण्याची जबाबदारी केवळ महानगरपालिकेचीच नसून आपणा सर्वांची आहे. त्यासाठी समाजातील सर्व घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

वार्षिक प्रकाशन हे नागरी प्रशासनाने राबविलेल्या विविध उपक्रमांच्या विकासाच्या निरनिराळ्या टप्प्यांचा इतिहास संक्षिप्तपणे विशद करते.

सन २०२४ चे डिजिटल वार्षिक प्रकाशन हे माहितीने परिपूर्ण असून त्याकरिता, महानगरपालिका सचिव, जनसंपर्क अधिकारी, व्यवस्थापक, महानगरपालिका मुद्रणालय, संचालक, माहिती तंत्रज्ञान आणि त्यांचा कर्मचारी वर्ग ह्यांनी घेतलेल्या परिश्रमांबद्दल मी त्यांना खास धन्यवाद देतो.

**भूषण गगराणी,**
**प्रशासक**

# प्रस्तावना

प्रतिवर्षी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून प्रकाशित होणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वार्षिक प्रकाशनाची प्रस्तावना लिहिताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे प्रकाशन मराठी आणि इंग्रजी ह्या दोन्ही भाषांमध्ये प्रकाशित करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नागरी प्रशासन, त्याचा इतिहास आणि ह्या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील नागरिकांच्या विविध नागरी गरजा पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका बजावत असलेली महत्त्वाची भूमिका ह्याबाबतची सुस्पष्ट रुपरेखा उपलब्ध करुन देणे, हे प्रस्तुत वार्षिक प्रकाशन प्रसिद्ध करण्यामागचे प्रयोजन व उद्दीष्ट आहे. महानगरपालिकेच्या बहुविधसेवांचे अंतरंग थोडक्यात प्रस्तुत करण्याबरोबरच महानगरपालिकेच्या काही महत्त्वाच्या खात्यांतील सेवा कार्यांची ठळक वैशिष्ट्ये दर्शविणारी अलिकडची छायाचित्रे प्रकाशनात समाविष्ट केल्यामुळे त्याचे महत्त्व आणखी वाढले आहे. अशातऱ्हेने हे प्रकाशन अधिक बोधप्रद, शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त व माहितीप्रद झाले आहे.

करोडो मुंबईकरांना अविरतपणे नागरी सेवा सुविधा बहाल करणारी बृहन्मुंबई महानगरपालिका ही भारतातीलच नव्हे तर, आशिया खंडातील एक अग्रगण्य महानगरपालिका ठरली आहे. गतवर्षी दि. ०४सप्टेंबर २०२३ रोजी या बृहन्मुंबई महानगरपालिकेला तसेच, महानगरपालिका सचिव कार्यालयालादेखील १५० वर्षे पूर्ण झाली. कोणत्याही संस्थेच्या इतिहासात दिडशे वर्षांचा निरंतर सेवेचा कालावधी पूर्ण करणे ही खरोखरच सार्थ अभिमान वाटावी अशीच घटना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपल्या शिस्तबध्द प्रशासकीय कारभारामुळे लोकशाही प्रशासन पद्धतीच्या सर्वोत्तम प्रथा स्वीकारुन त्या समृध्द केल्या आहेत. भारतातील सर्वोत्तम शहर म्हणून आपले मानाचे स्थान कायम राखण्याच्या कामी शहर प्रशासन सतत प्रयत्नशील आहे.

हे प्रकाशन प्रसिद्ध करण्याच्या कामी सहकार्य केल्याबद्दल मी सर्व खातेप्रमुखांचे मनापासून आभार मानते. ह्या प्रकाशनाची मांडणी अत्यंत सुबक व आकर्षक करण्याकरिता जनसंपर्क अधिकारी आणि व्यवस्थापक, महानगरपालिका मुद्रणालय ह्यांनी जे सहकार्य केले त्याचा मी येथे खास उल्लेख करु इच्छिते. तसेच, ह्या वर्षापासून प्रथमच वार्षिक प्रकाशनाचे उदघाटन डिजीटल पद्धतीने ('क्यु आर कोड' च्या माध्यमातून) होत आहे. त्याकरिता संचालक (माहिती तंत्रज्ञान) व त्यांच्या कर्मचारीवृंदाने जे बहुमोल सहकार्य दिले, त्यांनाही मी येथे विशेष धन्यवाद देऊ इच्छिते. ह्या प्रकाशनाचे काम वेळेत व चोखपणे पूर्ण करण्याकरिता माझ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचेही मी मनापासून आभार मानते.

**शुभांगी वि. सावंत,**
**महानगरपालिका सचिव.**

**मुंबई, दि.१५ ऑगस्ट २०२४**

बृहन्मुंबई महानगरपालिका

# महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका



श्री. भूषण गगराणी

## अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त व महानगरपालिका सचिव



डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी,
अतिरिक्त महानगरपालिका
आयुक्त (शहर)



डॉ. अमित सैनी,
अतिरिक्त महानगरपालिका
आयुक्त (पूर्व उपनगरे)



श्री. अभिजीत बांगर,
अतिरिक्त महानगरपालिका
आयुक्त (प्रकल्प)



श्रीमती शुभांगी वि. सावंत,
महानगरपालिका सचिव

## बृहन्मुंबई महानगरपालिका

# महानगरपालिका सह-आयुक्त



**श्री. गंगाथरण डी,**
सह आयुक्त (दक्षता)



**श्री. मिलिन द. सावंत,**
सह आयुक्त
(सामान्य प्रशासन)



**श्री. सुनिल मु. धामणे**
सह आयुक्त
(क. व सं)



**श्री. चंद्रशेखर वे. चोरे,**
सह आयुक्त
(महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय)



**श्री. विजय एम. बालमवार,**
सह आयुक्त म.ख.खा. व
समन्वय अधिकारी (PM SVANIDHI)
व संपर्क अधिकारी (मार्गदर्शन कक्ष) तसेच
नियमपूक नियोजन इ.



**श्री. विश्वास व्यं. शंकरवार,**
सह आयुक्त (परि. ४)

बृहन्मुंबई महानगरपालिका

# महानगरपालिका उप-आयुक्त



**श्री. देविदास क्षीरसागर,**
उप-आयुक्त (परि. ५)



**श्री. संजोग कबरे,**
उप-आयुक्त (सुधार) व
(घन कचरा व्यवस्थापन)
(अतिरिक्त कार्यभार)



**डॉ. (श्रीमती) भाग्यश्री कापसे,**
उप-आयुक्त (परि. ७)



**श्री. संजय कुऱ्हाडे,**
उप-आयुक्त
(सार्वजनिक आरोग्य),
प्रकल्प संचालक
मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्था



**डॉ.(श्रीमती) संगीता हसनाळे,**
उप-आयुक्त (परि. १)



**श्रीमती चंदा जाधव,**
उप-आयुक्त
(शिक्षण)



**श्री. किशोर गांधी,**
उप-आयुक्त (उद्याने)



**श्री. प्रशांत सपकाळे,**
उप-आयुक्त (परि. २)



**श्री. प्रशांत गायकवाड,**
उप-आयुक्त (वित्त)

बृहन्मुंबई महानगरपालिका

# महानगरपालिका उप-आयुक्त आणि संचालक



**श्री. विश्वास पांडुरंग मोटे,**
उप-आयुक्त (परि.-३)
(अतिरिक्त कार्यभार)



**श्री. किरण दिघावकर,**
उप-आयुक्त (विशेष)
(अतिरिक्त कार्यभार)



**श्री. संतोषकुमार धोंडे,**
उप-आयुक्त (परि.-६)
(अतिरिक्त कार्यभार)



**श्री. मिनेष दामोदर पिंपळे,**
उप-आयुक्त (पर्यावरण)



**श्री. सतिश चव्हाण,**
उप-आयुक्त
(अभियांत्रिकी)



**श्री. शशांक भोरे,**
संचालक (अ. से. व प्र.)
(अतिरिक्त कार्यभार)



**श्री. यतिन दळवी,**
उप-आयुक्त
(विशेष अभियांत्रिकी)

बृहन्मुंबई महानगरपालिका

## रुग्णालयांचे अधिष्ठाते



**डॉ. (श्रीमती) नीलम अंद्राडे**
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालय व
अधिष्ठात्री, नायर रुग्णालय दंत महाविद्यालय



**डॉ. मोहन जोशी**
अधिष्ठाता,
लो. टि. म. स. रुग्णालय व
वैद्यकीय महाविद्यालय



**डॉ. शैलेश मोहिते**
अधिष्ठाता
हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
वैद्यकीय महाविद्यालय व
डॉ. आर. एन. कूपर रुग्णालय



**डॉ. (श्रीमती) संगीता रावत**
अधिष्ठात्री,
राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय
व सेठ गोर्धनदास सुंदरदास
वैद्यकीय महाविद्यालय



**डॉ. सुधीर मेढेकर,**
अधिष्ठाता,
बा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालय व
टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय



**डॉ. चंद्रकांत पवार**
प्रमुख वैद्यकीय अधिक्षक (प्र.)
व खातेप्रमुख
माध्यमिक आरोग्य सेवा



**श्री. तानाजी कांबळे**
जनसंपर्क अधिकारी

# बृहन्मुंबई महानगरपालिकेसंबंधातील
# महत्त्वाची माहिती

| प्रगतीदर्शक आलेख | विभाग - १ |
|---|---|
| १८०७ | कोर्ट ऑफ पेटी सेशन्सची स्थापना – दोन मॅजिस्ट्रेटस् आणि एक जस्टिस ऑफ पीस. |
| १८४५ | नागरी सप्तप्रधान मंडळ. |
| १८५८ | त्रिसदस्य आयुक्त मंडळ. |
| १८६५ | एक महापालिका आयुक्त आणि जस्टिसेस् ऑफ पीस मिळून बनलेले मंडळ. |
| १८७२ | ६४ सदस्य असलेल्या महापालिकेची रीतसर स्थापना. करदात्यांना मतदानाचा अधिकार (मुंबई अधिनियम क्र. ३-१८७२). |
| १८७३ | लोकशाही पद्धतीवर आधारित महानगरपालिकेची पहिली सभा, दिनांक ४ सप्टेंबर १८७३ रोजी भरली. |
| १८८८ | तीन समन्वय प्राधिकरणे निर्माण करण्यात आली ती म्हणजे, १) महानगरपालिका, २) स्थायी समिति आणि ३) महानगरपालिका आयुक्त (कार्यकारी अधिकार महानगरपालिका आयुक्तांमध्ये निहित करण्यात आले.) (मुंबई अधिनियम क्र. ३) |
| १९०७ | प्राथमिक शिक्षणविषयक संपूर्ण जबाबदारी महापालिकेकडे सोपविण्यात आली. |
| १९२२ | फक्त करदात्यांऐवजी, भाडेकरूंनाही मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. (मुंबई अधिनियम क्र. ४). |
| १९३१ | अध्यक्ष हे नामाभिधान महापौर ह्याप्रमाणे बदलण्यात आले. (मुंबई अधिनियम क्र. २१). |
| १९३३ | दि. १ ऑक्टोबर १९३३ रोजी सुधार विश्वस्त मंडळ हे मुंबई महानगरपालिकेत विलीन करण्यात आले. (मुंबई अधिनियम क्र. १३-१९३३). |
| १९४७ | दि. ७ ऑगस्ट १९४७ रोजी 'बेस्ट' कंपनी लिमिटेड महानगरपालिकेत विलीन झाली. |
| १९४८ | प्रौढ मतदान पद्धतीनुसार निवडणूक घेण्यात आली. |
| १९५० | उपनगर विभाग महानगरपालिकेत विलीन करण्यात आले. (मुंबई अधिनियम क्र. ७-१९५०). |
| १९५२ | ह्या वेळेपर्यंत महानगरपालिकेवर काही खास प्रतिनिधि पदसिद्ध सदस्य म्हणून काम करीत असत. (म्हणजे पोलीस आयुक्त, बी.पी.टी. चे अध्यक्ष, कार्यकारी अभियंता, इलाखा विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, मुंबई शासन, इ.) ही पद्धत बंद करण्यात आली आणि अशाप्रकारे मुंबई महानगरपालिका खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींची संस्था बनली. (मुंबई अधिनियम क्र. ४८-१९५०). |

## महत्त्वाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १९५७ | | विस्तारित उपनगरे महानगरपालिकेत विलीन करण्यात आली. (मुंबई अधिनियम क्र. ५८-१९५६). |
| १९६३ | | १४० एकसदस्य मतदार संघांची स्थापना करण्यात आली आणि महानगरपालिकेची मुदत ४ वर्षांवरून ५ वर्षे अशी वाढविण्यात आली. |
| १९६८ | | तद्नुसार, पहिली निवडणूक घेण्यात आली. (महाराष्ट्र अधिनियम क्र. ३३-१९६६). |
| १९७२ | | महानगरपालिकेच्या कामकाजाची अधिकृत भाषा म्हणून मराठीस (राज्यभाषा) मान्यता देण्यात आली. (महानगरपालिकेचा दिनांक ३०-३-१९७२ चा ठराव क्र. १९५९). |
| १९७३ | | महानगरपालिकेची शताब्दी साजरी करण्यात आली. |
| १९७६ | | अनुसूचित जातींच्या नगरसेवकांकरिता मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले. (महाराष्ट्र अधिनियम क्र. ४२-१९७६). |
| १९८२ | (१) | दि. २५ मार्च १९८२ रोजी महापौरपदाचा सुवर्णमहोत्सव संपन्न झाला. |
| | (२) | सदस्यसंख्या १४० वरून १७० इतकी वाढविण्यात आली. (महाराष्ट्र अधिनियम क्र. २५-१९८२). |
| १९८३ | (१) | सुधार समितीचा सुवर्णमहोत्सव दि. ७ नोव्हेंबर १९८३ रोजी संपन्न झाला. |
| | (२) | महाराष्ट्र शासनाने, आपल्या दि. ३ मार्च १९८३ च्या अधिसूचनेनुसार, नगरसेवकांच्या निवृत्तीचा कालावधी एक वर्षाने म्हणजेच, दि. १ एप्रिल १९८४ रोजी, दुपारी १२-०० वाजेपर्यंत वाढविला. |
| | (३) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त म्हणून एक अथवा अधिक व्यक्तींची नियुक्ती करण्याची तरतूद. (महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३-१९८३). |
| १९८४ | | दि. १ एप्रिल १९८४ पासून प्रशासकाची नियुक्ती. (महाराष्ट्र अधिनियम क्र. ७-१९८४). |
| १९८५ | (१) | प्रशासकाची नियुक्ती चालू ठेवण्यात आली. (महाराष्ट्र अधिनियम क्र. ३-१९८५). |
| | (२) | दि. २५ एप्रिल १९८५ रोजी १७० जागांसाठी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या व त्यानंतर दि. १० मे १९८५ पासून नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली. |
| १९८७ | | मुंबई अग्निशमन दलाचा शताब्दी सोहळा संपन्न. |
| १९८९ | (१) | स्थायी समिति, सुधार समिति व शिक्षण समिति ह्यांवरील सदस्यसंख्येत १६ वरून २० आणि बेस्ट समितीवरील सदस्यसंख्येत ९ वरून १२, ह्याप्रमाणे वाढ (महाराष्ट्र अधिनियम क्र. २१-१९८९). |
| | (२) | राज्य शासनाने मतदानासाठी अधिसूचित केलेल्या तारखेला वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तींना महानगरपालिका निवडणूक यादीत नांव नोंदविण्याचा अधिकार प्राप्त झाला (महाराष्ट्र अधिनियम क्र. २८-१९८९). |

## महत्त्वाची माहिती

१९९० (१) कोणतीही सर्वसाधारण निवडणूक किंवा पोटनिवडणूक ह्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत वयाची २१ वर्षे पूर्ण करणाऱ्या मतदारास विभागीय निवडणुका लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. (महाराष्ट्र अधिनियम क्र. १२-१९९०).

(२) एकूण जागांपैकी ३० टक्के जागा (अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारांकरिता राखून ठेवलेल्या जागांसहित), महिलांसाठी राखून ठेवण्यात आल्या (महाराष्ट्र अधिनियम क्र. १३-१९९०).

---

१९९१ (१) एकसदस्य मतदारसंघांची संख्या २२१ इतकी निश्चित करण्यात आली (असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झालेली दि. २८ फेब्रुवारी१९९१ ची अधिसूचना क्रमांक बीएम्सी /१०९१/ सीआर -२८ / ९१/-न.वि.-२०).

(२) दि. १ एप्रिल १९९१ पासून वडाळा येथील ॲक्वर्थ लेप्रसी रुग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेतले (महानगरपालिकेचा दि. २७ नोव्हेंबर १९९१ चा ठराव क्र. ८८१ पहा) आणि सदर रुग्णालयाचे नांव 'कुष्ठरोग्यांकरिता ॲक्वर्थ महानगरपालिका रुग्णालय' असे बदलण्यात आले.

---

१९९२ (१) २२१ जागांसाठी (महिलांकरिता राखून ३० टक्के जागांसाठी) नववी सार्वत्रिक निवडणूक, दि. २५ फेब्रुवारी १९९२ रोजी घेण्यात आली आणि दि. ७ मार्च १९९२ पासून नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

(२) दि. १२ मार्च १९९२ रोजी, संसर्गजन्य रोगांकरिता असलेल्या कस्तुरबा रुग्णालयाचा शताब्दी सोहळा संपन्न झाला.

(३) दि. २९ मार्च १९९२ रोजी तानसा येथे तानसा धरण शताब्दी सोहळा संपन्न झाला.

(४) स्थायी समिति, सुधार समिति, शिक्षण समिति ह्यांवरील सदस्य संख्येत अनुक्रमे, २०वरून २७, २० वरून २६, २० वरून २६ आणि 'बेस्ट' समितीवरील सदस्यसंख्येत १२ वरून १७, ह्याप्रमाणे वाढ (महाराष्ट्र अधिनियम क्र. २१-१९९२).

---

१९९३ (१) दि. १६ जानेवारी १९९३ रोजी महानगरपालिका सभागृहाची आणि दि. ३१ जुलै १९९३रोजी महानगरपालिका मुख्यालयाच्या जुन्या इमारतीची शताब्दी साजरी करण्यात आली.

(२) मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३८-अ (१) अन्वये नियुक्त केलेल्या विशेष समित्यांवरील सदस्यसंख्या २४ वरून ३६ ह्याप्रमाणे वाढविण्यात आली (महानगरपालिकेचा दि. १७-१२-१९९३ चा ठराव क्र. १०६६).

---

१९९४ ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने, १९९४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ अन्वये, मुंबई महानगरपालिका अधिनियमात पुढील महत्त्वाच्या दुरुस्त्या करण्यात आल्या :–

(१) महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती.

(२) अनुसूचित जाती/जमाती, इत्यादींमधील आरक्षणासहित महिलांसाठी एक तृतीयांश जागांचे आरक्षण.

(३) एकूण सदस्यसंख्येपैकी २७ टक्के जागा मागासवर्गीय नागरिकांसाठी आरक्षित.

## महत्त्वाची माहिती

(४) महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांमधील महापौरपदाकरिता अनुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय नागरिक आणि महिला ह्यांच्याकरिता आळीपाळीने आरक्षण.

(५) महानगरपालिका निवडणुकीच्या बाबतीत पर्यवेक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रण हे अधिकार महानगरपालिका आयुक्तांऐवजी राज्य निवडणूक आयुक्तांना देण्यात आले.

(६) प्रभाग समित्यांची प्रस्थापना.

१९९६ (१) बाई यमुनाबाई ल. नायर धर्मादाय रुग्णालय आणि टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय ह्यांनी दि. ४ सप्टेंबर १९९५ पासून दि. ३ सप्टेंबर १९९६ पर्यंत आपले अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केले.

(२) मागासवर्गीय नागरिकांसाठी महापौरपदाच्या केलेल्या आरक्षणानुसार प्रथमच महापौरांची नियुक्ती.

(३) 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे पुनर्नामकरण (महाराष्ट्र अधिनियम क्र. २५-१९९६).

१९९७ (१) महानगरपालिका निवडणूक प्रभागांची संख्या आणि सीमा ह्यांची पुनर्निश्चिती.

(२) राज्य निवडणूक आयुक्त ह्यांच्या पर्यवेक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली दि. २३ फेब्रुवारी १९९७ रोजी दहावी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली आणि दि. १० मार्च १९९७ पासून नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

(३) दि. १० मार्च १९९७ रोजी प्रथमच पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली.

१९९८ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये सुधारणा करून, दि. १९ एप्रिल १९९८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये 'महापौरांसह परिषद पद्धती' लागू करण्यात आली. (१९९८चा महाराष्ट्र अधिनियम क्र. दहा आणि तेरा).

१९९९ (१) महापौरांसह परिषद पद्धती रद्द करून, मुंबई महानगरपालिकेत जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्यात आले (महाराष्ट्र अधिनियम क्र. २७-१९९९). त्या अनुषंगाने दि. २९ एप्रिल १९९९ रोजी महापौरपदाकरिता निवडणूक घेण्यात आली.

(२) उप-महापौर आणि विरोधी पक्षनेता, ह्या पदांची तरतूद करण्यात आली (महाराष्ट्र अधिनियम क्र. २७-१९९९).

(३) महापौरांस विवक्षित अधिकार देण्यात आले (महाराष्ट्र अधिनियम क्र. २७-१९९९).

२००० (१) महापौर आणि उप-महापौर ह्यांच्या पदांचा कालावधी २$\frac{१}{२}$ वर्षापर्यंत वाढविण्यात आला (महाराष्ट्र अध्यादेश क्र. ७-२०००).

(२) सोळा प्रभाग समित्यांची स्थापना दि. ७ जानेवारी २००० पासून करण्यात आली (अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ५०टट).

२००२ (१) सदस्यांची संख्या २२१ वरून २२७ करण्यात आली (महाराष्ट्र अध्यादेश क्र. २८-२००१).

(२) राज्य निवडणूक आयुक्त ह्यांच्या पर्यवेक्षण,मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली दिनांक १० फेब्रुवारी २००२ रोजी ११ वी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली आणि दिनांक १० मार्च २००२ पासून नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

## महत्त्वाची माहिती

(३) सभागृह नेता ह्या पदाची तरतूद करण्यात आली (महाराष्ट्र अधिनियम क्र. ११-२००२).

(४) सन २००२-२००३ हे वर्ष राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले.

---

२००७ (१) महानगरपालिका निवडणूक प्रभागांची संख्या आणि सीमा ह्यांची पुनर्निश्चिती करण्यात आली.

(२) राज्य निवडणूक आयुक्त ह्यांचे पर्यवेक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली दि. १ फेब्रुवारी २००७ रोजी बारावी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. महानगरपालिकेच्या ह्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतनोंदणी यंत्राचा प्रथमच वापर करण्यात आला. दि.१० मार्च २००७ रोजी नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

(३) महापौर आणि उप-महापौर ह्या पदांकरिताच्या निवडणुकीच्या नियमात फेरफार करण्यात आला आणि सदर निवडणूक हात वर करून दर्शविलेल्या मतानुसार घेण्याचा नवीन नियम अंतर्भूत करण्यात आला (दि. १५ फेब्रुवारी २००७ ची अधिसूचना क्र. बीएनएम ५००५/४६/प्र.क. ७/भाग चार/ न.वि.-३२.)

(४) वैधानिक समित्या आणि विशेष समित्या ह्यांच्या अध्यक्षांच्या निवडणुकीच्या नियमात फेरफार करण्यात आला आणि सदर निवडणूक हात वर करून दर्शविलेल्या मतानुसार घेण्याचा नवीन नियम अंतर्भूत करण्यात आला. (दि. २१ फेब्रुवारी २००७ ची अधिसूचना क्र. बीएमसी ४००७/५९/प्र.क. १९/न.वि.-३२.)

(५) महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन आणि सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता आणि अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता ह्यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात समित्यांवरील सदस्यांचे नामनिर्देशन करता येईल अशा रीतीने, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये सुधारणा करण्यात आली (दि. २७ फेब्रुवारी २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २).

(६) महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन नामनिर्देशित महानगरपालिका सदस्यांची नेमणूक करता येईल अशारीतीने सदर नियम आणि कार्यपद्धती ह्यांमध्ये सुधारणा करण्यात आली (दि.२१फेब्रुवारी २००७ची अधिसूचना क्र. बीएनएम /५००७/६०/प्र.क.२०/न.वि.-३२ आणि दि. २१ एप्रिल २००७ ची अधिसूचना क्र. बीएनएम/५००७/७२/प्र.क. २२/न.वि.-३२).

---

२०११ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एकूण जागांपैकी ५० टक्के जागा महिलांकरिता आरक्षित (महाराष्ट्र अधिनियम क्र.२०-२०११).

---

२०१२ दिनांक १६/२/२०१२ रोजी १३ वी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली आणि दिनांक ९/३/२०१२ रोजी नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

# महत्त्वाची माहिती

२०१३ एम/पूर्व आणि एम/पश्चिम प्रभाग समितीचे विभाजन करून, अद्ययावत् सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ५० टट अन्वये, एम/पूर्व विभागाकरिता एक व एम/पश्चिम विभागाकरिता एक अशा दोन स्वतंत्र प्रभाग समित्या स्थापन करण्यात आल्या.

(महानगरपालिकेचा दि. २८ मार्च २०१३ चा ठराव क्र. १७९९).

२०१७ (१) महानगरपालिका निवडणूक प्रभागांच्या सीमांची पुनर्निश्चिती करण्यात आली.

(२) दिनांक २१/२/२०१७ रोजी १४ वी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली आणि दिनांक ८/३/२०१७ रोजी नवीन महानगरपालिका अस्तित्वात आली.

(३) मुंबई महानगरपालिका मुख्यालयाची वास्तू १२५ व्या वर्षात पदार्पण करीत असल्याबाबतचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी शुभारंभ सोहळा, मुख्यालय इमारतीवर सप्तरंगी विद्युत रोषणाई करुन दि. १/८/२०१७ रोजी पार पाडण्यात आला. अशाप्रकारे मुख्यालय इमारतीची रोषणाई करणारी मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिली व एकमेव महानगरपालिका ठरली आहे.

२०२१ (१) मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारत दर्शन (हेरिटेज वॉक) दि. २८ जानेवारी २०२१ पासून पर्यटकांकरिता खुले करण्यात आले.

(२) महानगरपालिका चिटणीस हया पदाचे नामाभिधान महानगरपालिका सचिव असे आणि तदनुषंगाने महानगरपालिका चिटणीस कार्यालयातील विविध संवर्गातील पदांचे नामाभिधान बदलण्यास महानगरपालिकेने तिच्या दि. ४ मार्च २०२१ चा ठराव क्र. ४८० अन्वये मंजूरी दिली आहे.

२०२२ (१) 'पी / उत्तर' विभागाचे 'पी / पूर्व' व 'पी /पश्चिम' असे विभाजन करण्यास महानगरपालिकेले तिचा दि. २७ जानेवारी २०२२ चा ठराव क्र. १५१३ अन्वये मंजुरी दिली.

(२) दि. ०८ मार्च २०२२ पासून प्रशासकाची नियुक्ती. (महाराष्ट्र अधिनियम क्र. २-२०२२)

(३) 'के / पूर्व' विभागाचे 'के /उत्तर' व 'के / दक्षिण' असे विभाजन करण्यास आणि 'के / उत्तर' विभागाकरिता स्वतंत्र प्रभाग समिति निर्माण करण्यास प्रशासक (महानगरपालिका) ह्यांनी दि. १० मे २०२२ चा ठराव क्र. २० अन्वये मंजुरी दिली.

२०२३ (१) जी-२० शिखर परिषदेच्या आपत्ती जोखीम सौम्यीकरण कार्यगटाच्या शिष्टमंडळाने दि. २३ मे २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयास भेट दिली.

(२) दि. ०४ सप्टेंबर २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेला व महानगरपालिका सचिव कार्यालयाला १५० वर्ष पूर्ण झाली.

# महत्त्वाची माहिती

**महत्त्वाची अद्ययावत सांख्यिकी माहिती** **विभाग - २**

| | | |
|---|---|---|
| क्षेत्रफळ | : | ४८३.१४ चौ.कि.मी. |
| लोकसंख्या (जनगणना २०११) | : | १,२४,४२,३७३ |
| लोकसंख्या प्रक्षेपित २०२१ | : | १,२९,२१,६०५ |
| मक्ता तत्वावरील भूभाग | : | ४,१७७ |
| भाडेत्त्वावरील एकूण मालमत्ता | : | ३,५०५ |
| रिक्त भूभाग | : | ३,६६८ |
| कर्मचारी निवासस्थाने | : | २,८६० |
| रस्त्यांची एकूण लांबी (कि.मी. मध्ये) | : | २,०५० कि. मी. |
| उड्डाण पूल | : | ४८ |
| पादचारी भुयारी मार्ग | : | ३६ |
| रेल्वेला छेदणारा रस्त्यावरील पूल (वाहतूकीसाठी) | : | ४१ |
| रेल्वे पादचारी पूल | : | २४ |
| नाला किंवा नदी वरील पूल (वाहतूकीसाठी) | : | २९९ |
| वाहतूक भुयारी मार्ग | : | १७ |
| पादचारी पूल | : | १०५ |
| आकाश मार्गिका | : | २१ |
| पूर्व मुक्त मार्ग | : | ०३ |
| वाहतूक नियंत्रक (सिग्नल्स) | : | ६६७ |
| रस्त्यांवरील दिव्यांची एकूण संख्या | : | १,४१,१४५ |
| एकूण लुकलुकणारे दीपस्तंभ | : | २०८ |
| अग्निशमन दलाच्या शाखा (बंबखाने) | : | ३५ |
| दर हजारी जनन प्रमाण | : | १०.०३ (अस्थायी) |
| दर हजारी मृत्यु प्रमाण | : | ७.१७ (अस्थायी) |
| कर्मचाऱ्यांची संख्या | : | ९०,८०६ (अंदाजे) |

# उद्यान खाते

## मनोरंजनपर सोयी

| अनु. क्र. | तपशिल | शहर | पश्चिम उपनगरे | पूर्व उपनगरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्याने (हरित पट्टेव्यतिरिक्त) / पार्क | २१ | १६८ | ११२ | **३०१** |
| २ | मनोरंजन मैदाने | १८३ | २०४ | ९७ | **४८४** |
| ३ | क्रिडांगणे | ४९ | १९३ | ११६ | **३५८** |
| ४ | शिल्पग्राम | ०० | ०१ | ०० | **०१** |
| ५ | कारंजी | १७ | १७ | ०८ | **४२** |
| ६ | वाद्यवृंद | ०१ | ०१ | ०१ | **०३** |
| ७ | पुतळे | ५६ | १० | १४ | **८०** |

# महत्त्वाची माहिती



**अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' (निधी संकेतांक -११,१२,६०,७०),**
**'ब' (निधी संकेतांक -२१,२२,२३), 'ई'(निधी संकेतांक -३०),**
**'ग' (निधी संकेतांक -४०) आणि**
**'वृक्ष प्राधिकरण' (निधी संकेतांक -५०) चे आकारमान**
**( प्रशासक (महानगरपालिका) यांनी स्वीकारल्याप्रमाणे )**

(रुपये कोटीत)

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ | |
|---|---|---|
| | उत्पन्न / प्राप्ती | खर्च |
| महसुली उत्पन्न | ३५,७४९.०३ | --- |
| महसुली खर्च | --- | २८७६३.९४ |
| भांडवली प्राप्ती | २९४३१.७६ | --- |
| भांडवली खर्च | --- | ३६३५८.६३ |
| एकूण | ६५१८०.७९ | ६५१२२.५७ |
| खचपिक्षा जास्त प्राप्ती | --- | ५८.२२ |
| अर्थसंकल्पीय अंदाजांचे आकारमान | ६५१८०.७९ | ६५१८०.७९ |

**अर्थसंकल्प 'क' (बेस्ट उपक्रम)**

(रुपये लाखात)

| | अर्थसंकल्प २०२३-२४ | अर्थसंकल्प २०२४-२५ |
|---|---|---|
| उत्पन्न | ९०४२४७.७१ | ९३८७७१.०१ |
| खर्च | ९०४२४६.७१ | ९३८७७०.०१ |
| शिल्लक/तूट | १.०० | १.०० |
| भांडवली खर्च | १७७७२८.३८ | १४५८५२.९८ |

## महत्त्वाची माहिती

### महसुली लेखा – अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

### (प्रशासक (महानगरपालिका) यांनी स्वीकारल्याप्रमाणे)

(रुपये कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ |
|---|---|---|
| **महसुली उत्पन्न** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | २६९७७.९५ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ४५०.५२ |
| २१ | सुधार योजना | ११९.२० |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | १.८५ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | ४५.३५ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १०६७.१६ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनिःसारण | ६९९७.८५ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ८९.१५ |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ... |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | .... |
| | **नक्त उत्पन्न** | **३५७४९.०३** |
| **महसुली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | * ११७०१.८० |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ५४७४.२८ |
| २१ | सुधार योजना | २३८.५३ |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ७.४४ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १५७.१६ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | २१३१.८० |
| ४० | पाणी पुरवठा व मलनिःसारण | ३३९३.४५ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ८९.६० |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ८.८८ |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | ५५६१.०० |
| | **नक्त खर्च** | **२८७६३.९४** |
| | वर्षभरातील महसुली वर्ताळा | **६९८५.०९** |

* इतर अर्थसंकल्पांना वर्ग केलेली रक्कम वगळून

# महत्त्वाची माहिती

**भांडवली लेखा – अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि**

**'वृक्ष प्राधिकरण'**

**(प्रशासक (महानगरपालिका) यांनी स्वीकारल्याप्रमाणे)**

(रुपये कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ |
|---|---|---|---|
| **भांडवली प्राप्ती** | | | |
| | तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | | १६८५३.५८ |
| | अनुदाने | | २४३.३५ |
| | जमीन आणि इमारतींची विक्री/ अधिमूल्य (अर्थसंकल्प ब) | | ५५०.०० |
| | विशेष निधी/ राखीव निधीमधून काढलेल्या नक्त रक्कमा | | ११७७३.३३ |
| | इतर | | ११.५० |
| | | **एकूण** | **२९४३१.७६** |
| **भांडवली खर्च** | | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | | २३९५९.२७ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | | १७१६.८५ |
| २१ | सुधार योजना | | ३४५.२७ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | | १८५.६० |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | | ३३०.१९ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | | ९८२०.०० |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | | १.४५ |
| | | **एकूण** | **३६३५८.६३** |
| | नक्त महसुली उत्पन्न + नक्त भांडवली उत्पन्न | | **६५१८०.७९** |
| | नक्त महसुली खर्च + नक्त भांडवली खर्च | | **६५१२२.५७** |
| | वर्षभरातील वर्ताळा | | **५८.२२** |

# महत्त्वाची माहिती

**(प्रशासक (महानगरपालिका) यांनी स्वीकारल्याप्रमाणे)**

(रुपये कोटीत)

| उत्पन्नाचे मार्ग | स्वरुप | दर (करपात्र मूल्याच्या टक्केवारीने) | उत्पन्न (अर्थसंकल्पाप्रमाणे) |
|---|---|---|---|
| मालमत्ता कर | सर्वसाधारण कर<br>अग्निशमन कर | ०.११०% ते ०.८०० % | १२९१.९५<br>२०४.०९ |
| (निवासी व अनिवासी भांडवली मूल्यावर दि. ०१-०४-२०१०) | पाणीपट्टी (मीटर शिवाय) (जल कर) | ०.२५३ % ते १.८३७ % | १५८.६९ |
| | जललाभ कर | ०.०६९ % ते ०.५०४ % | १००८.०१ |
| | मलनिःसारण कर | ०.१६३ % ते १.१८५ % | ३४४.०१ |
| | मलनिःसारण लाभ कर | ०.०४३ % ते ०.३११ % | ६५२.०३ |
| | शिक्षण उपकर | ०.०४१ % ते ०.२९६ % | ५४४.६८ |
| | पाणीपट्टी (जल आकार)<br>(मोजणी पध्दतीने) | रु.३.२४ ते रु. ६४.८०<br>(दि. १६-०६-१३ पासून)<br>प्रती १००० लिटर करिता | ११९२.७५ |
| | मलनिः सारण आकार (मोजणी पध्दतीने) | जल आकाराच्या ६०% | ७३०.४४ |
| | मीटर भाडे | रु. १५/- ते रु. २,३००/-<br>(दर मह्य जलमापकाच्याआकारमानानुसार) | ५.०० |
| | वृक्ष उपकर | ०.००२% ते ०.०१५% | ४२.०० |
| | पथ कर | ०.०५१ % ते ०.३७० % | ७०४.५३ |

## महत्त्वाची माहिती

**(प्रशासक (महानगरपालिका) यांनी स्वीकारल्याप्रमाणे)**

(रुपये कोटीत)

| उत्पन्नाचे मार्ग | स्वरुप | दर (करपात्र मूल्याच्या टक्केवारीने) | उत्पन्न (अर्थसंकल्पाप्रमाणे) |
|---|---|---|---|
| जकात (नक्त) | | | ० |
| चाकपट्टी | | | ०.०३ |
| रस्ते अनुदान (चाकपट्टीऐवजी दिनांक १-४-१९९९ पासून) | | | ३१०.०० |
| रंगभूमी कर | | | २.५० |
| श्वान कर | | | ०.३० |
| परवाना शुल्क, हक्कांची विक्री इ. आणि अर्थसंकल्प 'अ' खालील संकीर्ण प्राप्ती | | | ११५०३.४४ |
| जकाती पोटी करावयाच्या भरपाईसाठी अनुदान सहाय्य | | | १३३३१.६३ |
| अर्थसंकल्प 'ब' ची संकीर्ण प्राप्ती (अंशदान वगळून) | | | १६६.४१ |
| अर्थसंकल्प 'इ' ची संकीर्ण प्राप्ती (अंशदान वगळून) | | | ५२२.४८ |
| | | | **२९०६.९२** |
| अर्थसंकल्प 'ग' ची संकीर्ण प्राप्ती | दंड<br>इतर उपयोगकर्ता आकार | १६३.७२ | |
| | पर्यवेक्षण आकार | २११.५१ | |
| | इतर संकीर्ण प्राप्ती | ११९८.०७ | |
| | ठेवींवरील व्याज | ६१३.६२ | |
| वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्पाची संकीर्ण प्राप्ती (अंशदान वगळून) | | | ४७.१४ |
| | **एकूण** | | **३५७४९.०३** |

## महत्त्वाची माहिती

**अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प :** **विभाग -४**

### घन कचरा व्यवस्थापन खाते (साफसफाई सेवा) :

| | | |
|---|---|---|
| १. दररोज गोळा करण्यात येणारा सरासरी घनकचरा | : | (१) सरासरी ६५०० मे. टन कचरा (कांजूर व देवनार क्षेपणभूमी)<br>(२) सरासरी ५०० ते ६०० मे. टन कचरा (देवनार क्षेपणभूमी)<br>(३) सरासरी १२०० ते १४०० मे. टन डेब्रीज (देवनार क्षेपणभूमी) |
| २. कर्मचारी वर्ग | : | ३३,७५३ |
| ३. एकूण खर्चाची अर्थसंकल्पीय तरतूद | : | एकूण भांडवल खर्चाची अर्थसंकल्पीय तरतूद — रु. १४११.५० (कोटी)<br>एकूण महसूल खर्चाची अर्थसंकल्पीय तरतूद — रु.२९९७.८४ (कोटी)<br>आस्थापना खर्च — रु. १८११.६७ (कोटी)<br>प्रशासकीय खर्च — रु. ४०.१२ (कोटी)<br>प्रचालन आणि परिरक्षण खर्च — रु. ११७.०५ (कोटी)<br>कार्यक्रम खर्च — रु. १४०.०० (कोटी)<br>महसुली अनुदाने, अंशदान आणि सवलती — रु. १.०० (कोटी)<br>एकूण खर्चाची अर्थसंकल्पीय तरतूद (२०२३-२०२४) — रु.४४८९.३४ (कोटी) |
| ४. दैनंदिन कचरा, गाळ आणि दगडमाती गोळा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या एकूण वाहनांची संख्या | : | महापालिकेची वाहने – २१९<br>ठेकेदारांची वाहने – १,२६४ |
| ५. उगमस्थानी घन कचऱ्याचे संकलन आणि वर्गीकरण | : | ९४९ सामुदायिक कचरा संकलन केंद्रे व ४७ सुका कचरा वर्गीकरण केंद्रे |
| ६. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या पद्धती | : | (१) जैविक प्रक्रियेद्वारे खत निर्मिती<br>(२) गांडूळ खत निर्मिती<br>(३) भूमी भराव पध्दती<br>(४) ज्वलन भट्टी (जैविक वैद्यकीय कचरा) |
| ७. क्षेपणभूमी | : | (अ) देवनार क्षेपणभूमी<br>(ब) कांजूर- घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प |
| ८. स्थानांतरण केंद्रे | : | (१) महालक्ष्मी स्थानांतरण केंद्र<br>(२) वर्सोवा स्थानांतरण केंद्र<br>(३) गोराई स्थानांतरण केंद्र<br>(४) कुर्ला स्थानांतरण केंद्र |
| ९. झाडलोट क्षेत्र: | | (१) दैनंदिन सुमारे १७५० किलोमीटर रस्त्यांची झाडलोट करण्यात येते.<br>(२) यांत्रिकी झाडू पध्दतीने रस्त्याची स्वच्छता जवळपास २५३ किमी एवढी करण्यात येते. |

## महत्त्वाची माहिती

**आरोग्यविषयक सेवाकार्य** **विभाग - ५**

| | | |
|---|---|---|
| १. सर्वसाधारण दवाखाने | : | अ) १९० (पैकी ४ आयुर्वेदिक व २ युनानी पध्दतीचे)<br>ब) आपला दवाखाना २३९ (पॉलिक्लिनिक -३३ व क्लिनिक -२०६) |
| २. सर्वसाधारण रुग्णालये | : | १६ |
| ३. प्रसूतिगृहे | : | ३० प्रसुतिगृहे (०२ प्रसुतीगृहांची दुरुस्ती करण्यात येत आहे) |
| ४. दंत रुग्णालय/महाविद्यालय | : | १ |
| ५. क्षयरोग रुग्णालय | : | १ |
| ६. संसर्गजन्य रोगांकरिता रुग्णालय | : | १ |
| ७. कान, नाक, घसा रुग्णालय | : | १ |
| ८. नेत्र रुग्णालय | : | १ |
| ९. कुष्ठरोग रुग्णालय | : | १ |
| १०. उपनगरीय रुग्णालये | : | १८ |
| ११. क्षयरोग चिकित्सालये | : | ५ (२ चिकित्सालयांची दुरुस्ती करण्यात येत आहे.) |
| १२. गुप्तरोग चिकित्सालय | : | १ |
| १३. वैद्यकीय महाविद्यालये | : | ४ |
| १४. रुग्णवाहिका | : | ८१ |
| १५. शववाहिका | : | १२ |
| १६. प्राथमिक आरोग्य केंद्रे | : | २११ |
| १७. व्यसनमुक्ती केंद्रे | : | १ |
| १८. सशुल्क खाटा : | | |
| अ) लोकमान्य टिळक महानगर-पालिका सर्वसाधारण रुग्णालय | : | ५७ |
| ब) बाई यमुनाबाई ल. नायर धर्मादाय रुग्णालय | : | ४१ |
| क) राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय | : | १६८ |
| ड) कूपर रुग्णालय | : | १५ |
| इ) कस्तुरबा रुग्णालय | : | ४० |
| फ) उपनगरीय रुग्णालये | : | २०३ |
| १९. महानगरपालिका वैद्यकीय संस्थांमधील एकूण खाटा : १२,४६२ | | |

सार्वजनिक आरोग्य खात्याचा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता झालेला खर्च रु.१३५.८१ कोटी इतका आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता सार्वजनिक आरोग्य खात्याकरिता महसूली अर्थसंकल्पात रु. १५१९.५२ कोटी इतकी तर भांडवली कामाकरिता रु. ३९५.६० कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

## परवाना नियंत्रण — विभाग - ६

**(ए) बाजार :**

| | | |
|---|---|---|
| १) सन २०२३-२४ मधील वार्षिक उत्पन्न | : रु. | १९,५१,४६,५५९.०० |
| २) सन २०२३-२४ मधील वार्षिक खर्च | | |
| १. बाजार खात्यातील आस्थापना खर्च | : रु. | ३३,४४,५९,३११.०० |
| २. महसूली खर्च | : रु. | १४,१२,४०,२५४.०० |
| ३. भांडवली खर्च (बाजार विभाग) | : रु. | १०,१३,२६,०२६.०० |
| ४. भांडवली खर्च नगर अभियंता (नविन मंडयांचे बांधकाम) व प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) मंड्यांची दुरुस्ती | : रु. | ६४.०५.५६.९८५.०० |
| **एकूण** | : **रु.** | **१,२१,७५,८२,५७६.००** |
| ३) अ ) महानगरपालिका मंडया | | |
| १. महानगरपालिका मंडया | : | ९२ |
| २. समायोजन आरक्षणांतर्गत ताब्यात आलेल्या मंडया | : | १०८ |
| **एकूण** | : | **२००** |
| ब) खाजगी मंडया (महानगरपालिकेचे परवाना प्राप्त) | : | १६ |
| **एकूण (अ + ब)** | : | **२१६** |
| ४. मंडयांतील एकूण दुकाने/गाळे मास व्यतिरीक्त अनुज्ञापत्रधारक | : | १३,५४४ |
| ५. महानगरपालिका मंडयांतील मांस दुकाने अनुज्ञापत्रधारक | : | ४,३८८ |
| ६. मंडयांतील शीतगृह अनुज्ञापत्रधारक | : | ११ |
| ७. एकूण बाह्यमांस दुकाने (चिकन, मटण, बीफ, पोर्क, शीतगृहे) | : | १,१२० |
| ८. एकूण अनुज्ञापत्रधारक | : | १९,०६३ |

जनावरांची अनधिकृत कत्तल आणि मांस विक्री यांना आळा घालण्यासाठी तीन विशेष दक्षता पथके प्रत्येकी शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे येथे कार्यरत आहेत. ह्या विशेष पथकांनी सन २०२३-२४ या वर्षात पकडलेली जनावरे आणि वसूल केलेली रक्कम ह्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. एकूण घातलेल्या धाडींची संख्या | : | १,९४५ |
| २. जप्त करण्यात आलेले प्राणी | | |
| अ) शेळ्या मेंढ्या | : | २,४६० |
| ब ) डुक्करे | : | १७ |
| क) कोंबडया | : | ४८,०६९ |
| ड) शृंगी जनावरे | : | ०५ |
| **एकूण** | : | **५०,५५१** |

## महत्त्वाची माहिती

३. जप्त व नष्ट करण्यात आलेले मांस

| | | |
|---|---|---|
| अ) बीफ | : | ३५,८९७ कि. ग्रॅ. |
| ब ) मटण | : | ११०२ कि. ग्रॅ. |
| क) पोर्क | : | ४९५ कि. ग्रॅ. |
| ड) कोंबडी (चिकन) | : | २८८ कि. ग्रॅ. |
| इ )जप्त करण्यात आलेली मासळी | : | ८,७९७ कि. ग्रॅ. |
| फ )जप्त व नष्ट करण्यात आलेली कातडी व मुंडी | : | निरंक |
| **एकूण** | **:** | **४६,५७९ कि. ग्रॅ.** |

| | | |
|---|---|---|
| ४. पकडण्यात आलेल्या मासळी टोपल्या | : | निरंक |
| ५. पकडण्यात आलेला भाजीपाला व अंडी | : | १,५७८ अंडी |
| ६. लिलावाद्वारे प्राप्त महसूल – | | |
| अ) मासळी, भाजीपाला व अंडे | : | रु. ५,३५,७९८.०० |
| ब) जिवंत कोंबड्यांद्वारे | : | रु, ३२,६०,७०२.०० |
| **लिलावाद्वारे प्राप्त एकूण महसूल** | **:** | **रु. ३७,९६,५००.००** |
| ७. गुन्हेगारांकडून न्यायालयीन जमा केलेली दंडाची रक्कम | : | रु. ८,७२,५००.०० |
| ८. इतर दंड (प्रशासकीय शुल्क) | : | निरंक |
| ९. पकडण्यात आलेले गुन्हेगार व्यक्ती | : | ३४७ |

### (बी) देवनार पशुवधगृह

| | | |
|---|---|---|
| वार्षिक उत्पन्न (वर्ष २०२३-२४) - | : | रु. २५,४८,५०,०००.०० |
| वार्षिक खर्च (वर्ष २०२३-२४) - | : | रु. ७१,७८,४४,०००.०० |

### विविध विभागातील पशुवधक्षमता -

| | | |
|---|---|---|
| १. गुरे-ढोरे विभाग | : | ८ तासांच्या प्रत्येक पाळीत ३०० प्राणी (म्हैसवर्गीय प्राणी) |
| २. शेळ्या व मेंढ्या विभाग हलाल पध्दतीने | : | ८ तासांच्या प्रत्येक पाळीत ६,००० शेळ्या व मेंढ्या |
| ३. वराह विभाग | : | ८ तासांच्या प्रत्येक पाळीत २०० वराह |

सन २०२३-२४ मध्ये पशुवधगृहात वध करण्यात आलेल्या जनावरांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. म्हैसवर्गीय प्राणी | : | १,३५,५३४ |
| २. शेळ्या व मेंढ्या | : | ४,१२,४२६ |
| ३. वराह | : | १९,०५३ |

देवनार पशुवधगृह सुमारे चार दशकांपूर्वीचे आहे आणि जुन्या मोडकळीस आलेल्या संरचनेत बदल व त्याचे उन्नतीकरण करणे गरजेचे असल्याने, बृहन्मुंबई महानगरपालिकेने देवनार पशुवधगृहाचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविले आहे.

# महत्त्वाची माहिती



बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग
समग्र शिक्षा
U-DISE+2023-24 सांख्यिकी माहिती ३०.०९.२०२३

| अ.क्र. | माध्यम | शाळा संख्या | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | २६२ | ३३,७३९ | १,०११ |
| २ | हिंदी | २२० | ६७,४१७ | २,०३१ |
| ३ | उर्दू | १८८ | ६४,३९१ | १,७६० |
| ४ | गुजराती | ३९ | १,४८५ | १०४ |
| ५ | तामिळ | २६ | २,७३६ | १०९ |
| ६ | तेलुगु | ११ | ४२२ | २२ |
| ७ | कन्नड | २४ | ९२० | ७३ |
| ८ | इंग्रजी | ५२ | ३८,८८४ | ९७६ |
| ९ | आव्हानात्मक शाळा | १९ | ८७६ | ७८ |
| १० | मुंबई पब्लिक स्कूल इ.१ली ते १०वी | ८० | ४५,४०८ | १,१२७ |
| ११ | सी. बी. एस. ई./आय. सी. एस. ई. /केंब्रिज/आय.बी | १७ | ४,००३ | १०७ |
| | **एकूण प्राथमिक (अ)** | **९३८** | **२,६०,२८१** | **७,३९८** |
| १२ | जुन्या अनुदानित माध्यमिक शाळा | ४९ | १५,४७० | ५८४ |
| १३ | नवीन विनाअनुदानित माध्यमिक शाळा | १४२ | २२,९८० | ६६० |
| | **एकूण माध्यमिक शाळा (ब)** | **१९१** | **३८,४५०** | **१,२४४** |
| १४ | क) महानगरपालिका एकूण शाळांपैकी पूर्व प्राथमिक वर्ग असणाऱ्या शाळा | | २९,६१७ | |
| | **एकूण प्राथमिक व माध्यमिक (अ + ब )** | **११२९** | **२,९८,७३१** | **८,६४२** |
| | **एकूण प्राथमिक, माध्यमिक व पूर्व प्राथमिक ड = (अ+ब+क)** | **१,१२९** | **३,२८,३४८** | **९,०४८** |
| | **खाजगी प्राथमिक शाळा** | | | |
| १५ | खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा | ३८५ | १,०६,४४८ | २,५९५ |
| १६ | खाजगी प्राथमिक विना अनुदानित शाळा | ६७८ | २,६४,१८५ | ६,५८५ |
| | **एकूण (इ)** | **१,०६३** | **३,७०,६३३** | **९,१८०** |
| १७ | रेल्वे | ०१ | ५९ | ०३ |
| १८ | मान्यता नसलेल्या शाळा | १२७ | २१,७५४ | ८८५ |
| १९ | समाज कल्याण | ५२ | २,९८६ | ४५३ |
| | **एकूण (फ)** | **१८०** | **२४,७९९** | **१,३४१** |
| | **एकूण (ड + इ+ फ)** | **२,३७२** | **६,९४,१६३** | **१९,१६३** |

## महत्त्वाची माहिती

**बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग**

**सर्व शिक्षा अभियान**

**सन २०२३-२४ मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत विविध शीर्षाखाली केलेल्या खर्चाचा तपशील**

**(रक्कम लाखात)**

| अनु. क्र. | लेखाशीर्ष | प्राप्त अनुदान | खर्च अनुदान | खर्च टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | संयुक्त शाळा अनुदान (प्राथमिक) | ३५५.१७ | २३२.७६ | ६५.५३ |
| २ | संयुक्त शाळा अनुदान (माध्यमिक) | १०९.४८ | ६१.२१ | ५५.९१ |
| ३ | गट साधन केंद्र / शहर साधन केंद्र अनुदान | ३३६.७५ | ३२३.४६ | ९६.०५ |
| ४ | समुह साधन केंद्र अनुदान | २१.९० | १३.९७ | ६३.७९ |
| ५ | मोफत पाठ्यपुस्तके | ९.९३ | ९.९ | ९९.७० |
| ६ | समावेशित शिक्षण (प्राथमिक) | १९४.४७ | १३९.२७ | ७१.६२ |
| ७ | समावेशित शिक्षण (माध्यमिक) | २८.०७ | ५.३५ | १९.०६ |
| ८ | व्यवस्थापन | ५५.४६ | ३२.४४ | ५८.४९ |
| ९ | वाहतूक भत्ता | १.८६ | १.६ | ८६.०२ |
| १० | निपुणोत्सव | २.९० | २.३३ | ८०.३४ |
| ११ | व्यवसाय प्रशिक्षण (माध्यमिक) | ९७.८६ | ३५.१५ | ३५.९० |
| १२ | राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत राज्यातील सहल (प्राथमिक) | १.०० | १.०० | १००.०० |
| १३ | राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत राज्यातील सहल (माध्यमिक) | २.५० | १.३३ | ५३.२० |
| १४ | राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत परराज्यातील सहल (प्राथमिक) | १.०० | ०.८९ | ८९.०० |
| १५ | राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत परराज्यातील सहल (माध्यमिक) | २.५० | २.२२ | ८८.८० |
| | **एकूण** | **१२२०.८५** | **८६२.८६** | **७०.६८** |

## महत्त्वाची माहिती

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम** **विभाग - ८**

बेस्ट उपक्रमातर्फे एकूण ४२५ बसमार्गांचे प्रवर्तन करण्यात येत आहे. यापैकी ३८५ बसमार्ग मुंबई महानगरपालिका हद्दीत प्रवर्तित होतात. १८ बसमार्ग मुंबई आणि नवी मुंबई परिसरादरम्यान , १३ बसमार्ग मुंबई आणि मिरा-भाईंदर परिसरादरम्यान व ०९ बसमार्ग मुंबई आणि ठाणे परिसरादरम्यान प्रवर्तित करण्यात येतात.

**वाहतूक प्रवर्तनाची आकडेवारी : (दि. ३१ मार्च २०२४ अखेर)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बसगाड्यांची एकूण संख्या<br>(स्व:मालकीच्या - १,०९८, भाडेतत्वावरील - १,९१५) | - | ३,०१३ |
| २. | अनुसूचीनुसार दररोज सेवेत सरासरी असलेल्या बसगाड्या | - | ३,०१३ |
| ३. | बसमार्गांची एकूण लांबी (कि.मी.) | - | ५,५९३.३ |
| ४. | सर्व बसगाड्या मिळून दररोज होणारा प्रवास (कि.मी.मध्ये) | - | ४.६८लाख |
| ५. | प्रवाशांची संख्या (दररोज सरासरी) | - | २९.३६ लाख |
| ६. | प्रवासी उत्पन्न (दररोज सरासरी) | - | १.९३ कोटी |
| ७. | बसथांबे / बस आश्रय स्थानके | | |
| | (अ) विशेष स्तंभावरील बसथांबे | - | ३,४५३ |
| | (ब) बस आश्रयस्थानके | - | ३,२६६ |
| | एकूण | - | ६,७१९ |
| ८. | बसआगारांची संख्या | - | २७ |
| ९. | कर्मचा-यांची एकूण संख्या | - | २०,६८० |

**विद्युत पुरवठा :**

( दि. ३१ मार्च २०२४ रोजीची सांख्यिकी आकडेवारी )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वीज वितरणातील क्षेत्रफळ | - | ७२ चौ.कि.मी. |
| २ | वीजेची कमाल मागणी | - | ९४६ एम.डब्ल्यू. |
| ३ | संग्राही केंद्रे | - | ६५ |
| ४ | रोहित्रांची संख्या | - | १५५ |
| ५ | रोहित्रांची क्षमता (एम.व्ही.ए.) | - | २,३२७ एम.व्ही.ए. |
| ६ | वितरण उपकेंद्रांची संख्या | - | २,५३८ |
| ७ | वितरण रोहित्रांची संख्या | - | ३,४७० |
| ८ | वितरण रोहित्रांची क्षमता ट्रान्सफार्मर (एम.व्ही.ए.) | - | २,८९२ एम.व्ही.ए. |

# महत्त्वाची माहिती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | ३३/२२ के.व्ही. तारखंडाची लांबी कि.मी. | - | ५७८ | कि.मी |
| १० | ११/६.६ के.व्ही. तारखंडाची लांबी कि.मी. | - | २,२५७ | कि.मी. |
| ११ | निम्न दाबाच्या तारखंडाची लांबी कि.मी. | - | ९,४९५ | कि.मी. |
| १२ | सहाय्यकारी वितरण स्तंभ | - | ९,२५४ | |
| १३ | वीज ग्राहकांची संख्या | - | १०,५२,७२५ | |
| १४. | निवासी वीज ग्राहकांचे एकूण ग्राहकांसापेक्ष प्रमाण (%) | - | ७३% | |
| १५. | एकूण संधारणा संख्या | - | ७८,५१२ | |
| १६. | मार्गप्रकाश दिव्यांची संख्या | - | ४४,२९४ | |
| १७. | रोख वीजदेयक भरणा खिडक्यांची संख्या | - | ४४ | |
| १८. | बँका तसेच पोस्ट येथील रोख वीजदेयक भरणा केंद्राची संख्या | - | ७३ | |
| १९. | सेवा पुरवठादार | - | ०९ | |

# महत्त्वाची माहिती

## नागरी प्रशासनाची रचना :

**विचारविनिमयात्मक घटक :**

**महानगरपालिका*:**

**वैधानिक समित्या*:**

(अ) स्थायी समिति
(ब) सुधार समिति
(क) 'बेस्ट' समिति
(ड) शिक्षण समिति
(इ) प्रभाग समित्या

**विशेष समित्या*:**

(अ) स्थापत्य समिति (शहर)
(ब) स्थापत्य समिति (उपनगरे)
(क) सार्वजनिक आरोग्य समिति
(ड) बाजार व उद्यान समिति
(इ) विधि समिति
(फ) महिला व बाल कल्याण समिति

**सल्लागार समित्या :***

(खास विषयावर विचारविनिमय करून अहवाल सादर करण्याकरिता आवश्यकतेनुसार वेळोवेळी नेमण्यात येतात).

(१) अनुदान सहाय्य समिति
(२) महाराष्ट्र संस्कृती दर्शन समिति
(३) आश्वासन समिति
(४) नियोजन समिति
(५) पुनर्विलोकन समिति (शहर)
(६) पुनर्विलोकन समिति (पूर्व उपनगरे)
(७) पुनर्विलोकन समिति (पश्चिम उपनगरे)
(८) छाननी समिति
 १) मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्था
 २) मुंबई जिल्हे क्षयरोग नियंत्रण संस्था आणि
 ३) स्त्री केंद्रित आरोग्य प्रकल्प हयासंबंधी छाननी समिति
(९) जुन्या इमारतींची पुनर्बांधणी आणि पुनर्विकास समिति
(१०) प्रभाग समिति समस्या निवारण व समन्वय समिति

**कार्यकारी घटक :**

**महानगरपालिका आयुक्त :**

चार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प), सह-आयुक्त, उप-आयुक्त आणि अन्य खातेप्रमुख ह्यांच्या सहाय्याने प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून आयुक्त काम करतात.

प्रशासकीय यंत्रणा, सात-परिमंडळांचा अंतर्भाव असलेल्या २४ विभागांमध्ये विभागण्यात आली असून, प्रत्येक परिमंडळ एक सह आयुक्त / उप आयुक्तांच्या अखत्यारित असते.

**महाव्यवस्थापक :**

'बेस्ट' उपक्रमाचे महाव्यवस्थापक हे अतिरिक्त महाव्यवस्थापक आणि इतर खातेप्रमुख ह्यांच्या सहाय्याने काम करतात.


**वृक्ष प्राधिकरण*:**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष जतन अधिनियम, १९७५ मध्ये १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ७ अन्वये केलेल्या दुरुस्तीनुसार महानगरपालिका आयुक्त हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत.

**टीप :** महानगरपालिका सचिव आणि महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व त्यांच्या खात्यातील कर्मचारी स्थायी समितीच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली काम करतात.

* दि. ०३ मार्च २०२२ चा शासन आदेश क्र. एमसीओ- २०२० /प्र.क्र.७१(भाग-२) /नवि-१४ अन्वये, दि. ०७ मार्च, २०२२ रोजी मुदत संपलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका येथे प्रशासक पदी, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) व (२) मधील तरतुदीनुसार, सदर अधिनियमांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका हयांची नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, महानगरपालिका आणि तिच्या वैधानिक समित्या, विशेष समित्या व प्रभाग समित्या दि. ०८ मार्च २०२२ पासून अस्तित्वात नाहीत आणि त्यांचे सर्व अधिकार, कार्ये व कर्तव्ये प्रशासक,बृहन्मुंबई महानगरपालिका हयांजमार्फत पार पाडण्यात येत आहेत.

# शहर प्रशासन





सागरी किनारी रस्त्याचे विहंगम दृश्य



'पी/पूर्व' विभाग कार्यालयाची नवीन इमारत

# शहर प्रशासन

**प्रस्तावना :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्र ४८३.१४ चौरस किलोमीटर्सहून अधिक असून, तिच्यामार्फत १,२९,६७,९९६ पेक्षा अधिक नागरिकांच्या नागरी गरजा भागविण्यात येतात. निरनिराळ्या प्रवर्गामध्ये मिळून, अंदाजे ९०,२०६ कर्मचारी आहेत.

महानगरपालिका आयुक्त हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रचनेतील महत्वाचे पद असून, ते कार्यकारी प्रमुख असतात. वस्तुतः नागरिकांची, नगरसेवकांची आणि राज्य शासनाची सुध्दा त्यांच्यावर नजर असते. प्रशासनातील परिणामकारकतेसाठी प्रत्येक गट त्यांच्याकडे अपेक्षेने पहात असतो. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ ने विचारविमर्शाची कामे आणि कार्यकारी कामे ह्यांमधील अधिकारांची स्वतंत्रता दृष्टीसमोर ठेवून, महानगरपालिका आयुक्तांना तत्वतः सर्वच बाबतीत शक्तीशाली कार्यकारी प्रमुख बनविले आहे.

महत्त्वाची बाब ही आहे की, एका बाजूला वैधानिक व धोरण तयार करणारे निगम आणि दुसऱ्या बाजूला कार्यकारी व प्रशासकीय यंत्रणा ह्यांच्यामधील संबंध हे शहर प्रशासनाचे प्रमुख वैशिष्टय आहे. लोकशाहीची तत्त्वे आणि गटबाजीविरहित कार्यक्षम नागरी प्रशासनाची गरज ह्यांमधील स्वास्थ्यपूर्ण समायोजन ह्याचा ह्यांमध्ये समावेश आहे. हे शहर प्रशासन खालील तीन तत्त्वांवर अवलंबून आहे :-

अ) धोरण तयार करणारे आणि धोरणाची अंमलबजावणी करणारे ह्यामधील भिन्नतेला मान्यता.

ब) धोरण तयार करण्याचे काम निवडून आलेल्या निगमाकडे सोपवून, धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम एकाच व्यक्तीकडे म्हणजेच महानगरपालिका आयुक्तांकडे आहे, आणि

क) दोघेही जरी निकट सहकार्याने काम करीत असले तरी कमी/अधिक प्रमाणात आयुक्तांना महानगरपालिका निगमामध्ये स्वतंत्र अस्तित्व आहे.

महानगरपालिकेत चार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त व महानगरपालिका सह आयुक्त / उप आयुक्त, संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) असून ते हया महानगरपालिकेतील प्रशासनाचे एकूण व्यवस्थापन व त्यावरील पर्यवेक्षणासाठी आयुक्तांना मदत करतात.

सन १९६४ मध्ये मध्यवर्ती प्रशासकीय पध्दतीची पुनर्रचना करण्यात आली व कागदपत्रे निकालात काढण्याचा वेग वाढविणे, कार्यक्षमतेत सुधारणा करणे व आर्थिकदृष्टया काटकसरीने कारभार करणे हया उपाययोजना अंगिकारणे हया उद्देशाने प्रथमच विकेंद्रित प्रशासकीय पध्दती सुरु करण्यात आली. ह्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने संपूर्ण शहराची २४ विभागांसह ७ प्रशासकीय परिमंडळांमध्ये विभागणी करण्यात आली. ह्या सात परिमंडळांवर आपल्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या काही सहाय्यक आयुक्तांसह महानगरपालिका सह आयुक्त / महानगरपालिका उप आयुक्त पर्यवेक्षण करतात. एकूण २४ महानगरपालिका उप आयुक्त असून त्यामध्ये संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) ह्यांचे एक पद समाविष्ट आहे. उर्वरित २३ पदांपैकी ७ पदे परिमंडळीय व १६ पदे कर्तव्यानुरुप आहेत.

दि. ०३ मार्च २०२२ चा शासन आदेश क्र. एमसीओ- २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) /नवि-१४, अन्वये, दि. ०७ मार्च २०२२ रोजी मुदत संपलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका येथे प्रशासक पदी, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) व (२) मधील तरतुदीनुसार, सदर अधिनियमांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका हयांची नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, महापालिका आणि तिच्या वैधानिक समित्या, विशेष समित्या व प्रभाग समित्या दि. ०८ मार्च २०२२ पासून अस्तित्वात नाहीत आणि त्यांचे सर्व अधिकार, कार्ये व कर्तव्ये प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका हयांजमार्फत पार पाडण्यात येत आहेत.

## १. नागरी सचिवालय :

## (महानगरपालिका सचिव ह्यांचे कार्यालय) :

बृहन्मुंबई महानगरपालिकेची विचारविनिमयात्मक बाजू ही प्रातिनिधिक मंडळाचा एक अव्दितीय नमुना आहे. सन १८७३ मध्ये तत्कालीन शासनाने, महानगरपालिका, स्थायी समिति आणि महानगरपालिका आयुक्त ह्या तीन प्राधिकरणांची निर्मिती केली आणि त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या सोपविल्या. महानगरपालिका सचिव प्रमुख पदी असलेले नागरी सचिवालय देखिल सप्टेंबर १८७३ मध्ये अस्तित्वात आले. हे कार्यालय स्थायी समितीच्या थेट नियंत्रणाखाली काम करते. महानगरपालिकेच्या व तिच्या विविध समित्यांच्या सभांच्या कार्यक्रमपत्रिका व त्यांचे सभावृत्तांत तयार करण्याची सर्वस्वी जबाबदारी नागरी सचिवालयावर असते आणि विचारविनिमयात्मक घटकांशी निगडीत बाबींसंबंधात नगरसेवकांना ते मार्गदर्शन करते. महानगरपालिकेची सामान्य मुद्रा (कॉमन सील) महानगरपालिका सचिव ह्यांच्या ताब्यात असते.

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, कलम ७७ (२) (ब) अन्वये महानगरपालिकेच्या सचिवांकडे महानगरपालिका व कलम ३८ किंवा ३८ (अ) याखाली महानगरपालिकेने नेमलेली कोणतीही समिति, स्थायी समिति व तिची कोणतीही उप-समिति, सुधार समिति व तिची कोणतीही उप-समिति, शिक्षण समिति व तिची कोणतीही उप-समिति आणि प्रभाग समित्या ह्यांच्या कामकाजाशी संबंधीत असलेली व सभावृत्तांतासंबंधीची सर्व अधिकृत कागदपत्रे व दस्तऐवज ह्यांचा ताबा असतो. महानगरपालिका त्याचप्रमाणे इतर वैधानिक आणि विशेष समित्या ह्यांनी आपल्या सभांमध्ये घेतलेल्या निर्णयांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी ह्याकरिता दि. ३१ मे २०११ पासून महानगरपालिका व तिच्या विविध समित्यांच्या कार्यक्रमपत्रिका व निर्णय इत्यादी माहिती संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येत आहे.

महापौरांना महानगरपालिका सभांचे अध्यक्षस्थान भूषविण्याबरोबरच मुंबईचे प्रथम नागरिक ह्या नात्याने अनेक कार्यक्रमास उपस्थित रहावे लागते. ह्या सर्वच बाबतीत त्यांना महानगरपालिका सचिवांच्या कार्यालयाकडून सचिवीय सहाय्य देण्यात येते. महापौरांप्रमाणे, उप-महापौर, सर्व समित्यांचे अध्यक्ष, सभागृह नेता आणि विरोधी पक्ष नेता ह्यांनाही अशा प्रकारचे सचिवीय सहाय्य देण्यात येते.

महानगरपालिका मुख्यालयाच्या विस्तारित इमारतीच्या पहिल्या मजल्यावर नव्याने नूतनीकरण केलेल्या प्रशस्त ग्रंथालयामध्ये नगरसेवकांकरिता विविध विषयांवरील संदर्भ पुस्तके आता उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

'महानगरपालिका चिटणीस' या नामाभिधानामध्ये 'महानगरपालिका सचिव' असा बदल करण्यास आणि महानगरपालिका सचिव कार्यालयातील विविध संवर्गातील पदांचे नामाभिधान व आस्थापना अनुसूची ह्यामध्ये तदनुसार आवश्यक ते बदल करण्यास महानगरपालिकेने तिच्या दिनांक ०४ मार्च २०२१ चा ठराव क्रमांक ४८० अन्वये मंजुरी दिली असून, त्याप्रमाणे नामाभिधानात बदल करण्यात आले आहेत.

## भगिनी शहर स्नेहभाव:

भगिनी शहर संबंधाची संकल्पना ही नागरी सेवा आणि पायाभूत सुविधा ह्यांच्या विकासासाठी दोन शहरांचा सहभाग असावा अशी आहे. असे संबंध प्रस्थापित करण्यामागे मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय पातळीवर परस्परांतील स्नेहभाव व सहकार्य वृध्दिंगत करणे हा आहे. अशा संबंधांमध्ये भगिनी शहरे आपल्याकडे असलेल्या अभियांत्रिकी सेवा, घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा व मलनि:सारण बाबतच्या पायाभूत सुविधा, तसेच उद्याने व प्राणी संग्रहालये, साहित्य, संस्कृती इ. सारख्या विविध क्षेत्रातील ज्ञान व साधने ह्यांची परस्परांकडे देवाण-घेवाण करतात. असे संबंध स्थापन करण्यामागे शहरांमधील सामाईक समस्या सोडविणे व संबंधित शहरांच्या जीवनमानाचा स्तर उंचविणे ह्यासाठी एकत्रितपणे काम करणे हा मुख्य हेतू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रथमतः सन १९६५ मध्ये लॉस एंजेलिस (अमेरिका) ह्या शहराशी भगिनी शहर स्नेहभाव नाते प्रस्थापित केले. तेव्हापासून, जगातील अशा विविध शहरांशी भगिनी शहर स्नेहभावाचे नाते प्रस्थापित झाले आहे. त्यामध्ये विशेषतः योकोहामा (जपान), लेनिनग्राड आणि ओडेसा पोर्ट (जुनी सोव्हिएत गणराज्ये), स्टुटगार्ट (जर्मनी), प्लेन्स जॉर्जिया, होनोलुलू आणि न्यूयॉर्क (अमेरिका), झाग्रेब (युगोस्लाव्हिया), बार्सिलोना (स्पेन), बुसान आणि सेऊल (दक्षिण कोरिया), नादी (फिजी), जकार्ता (इंडोनेशिया), एन्टोनानारीओ (मादागास्कर) इज्मीर

(तुर्की) आणि शांघाय (चीन) ह्यांचा समावेश आहे.

मुंबई शहराच्या भगिनी शहर संबंधांतर्गत समन्वयाची आणि संबंधित कार्यक्रमांचे नियोजन महानगरपालिका आयुक्त कार्यालयाच्या राजशिष्टाचार व आंतरराष्ट्रीय संपर्क विभागाकडून आयोजित केली जातात.

**वृक्ष प्राधिकरण :**

महाराष्ट्र राज्यामध्ये वेगाने होत असलेले शहरीकरण व औद्योगिकीकरण हयामुळे मोठया प्रमाणावर वृक्षतोड होत आहे. सदर बाब लक्षात घेता व शहरी भागातील पर्यावरणविषयक समतोल राखण्यासाठी वृक्षतोडीचे नियमन करुन पुरेशा प्रमाणात नवीन झाडे लावून राज्यातील नागरी क्षेत्रातील झाडांचे संरक्षण व जतन करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने सन १९७५ मध्ये 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम, १९७५' (अधिनियम क्र. ४४) अस्तित्वात आणला. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन १९७६ मध्ये वृक्ष प्राधिकरणाची स्थापना केली. सन १९९६ मध्ये सदर अधिनियमात दुरुस्ती (अधिनियम क्र. ७) करण्यात आली असून, तो आता 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५' म्हणून ओळखला जातो. सदर अधिनियमातील हया दुरुस्तीनुसार वृक्ष प्राधिकरणाच्या सभेचे अध्यक्ष हे, महापौरांऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त असतील.

दि. ७ मार्च २०२२ रोजी लगतपूर्व महानगरपालिकेची मुदत संपुष्टात आली आहे व दि. ८ मार्च २०२२ पासून ह्या महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण पुनर्घटीत करण्यात आले नाही.

सदर अधिनियमाच्या कलम ५ (१) अन्वये, महानगरपालिकेचा दि. २२ मार्च २००७ चा ठराव क्रमांक ११४२ अन्वये, सदर अधिनियमाच्या प्रयोजनाच्या अंमलबजावणीकरिता विभागांचे 'सहाय्यक आयुक्त' ह्यांना त्यांच्या अखत्यारीतील विभागासाठी व 'उद्यान अधिक्षक' ह्यांना संपूर्ण मुंबईसाठी 'वृक्ष अधिकारी' म्हणून नेमण्यात आले आहे.

**२. वैधानिक महानगरपालिका लेखापरीक्षा :**

**(महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांचे खाते) :**

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे स्वतंत्र खाते निर्माण करण्याकरीता अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये अशी सुधारणा करण्यात आली, ज्यामध्ये अधिनियमाच्या योजनेखाली महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकांचा दर्जा भारत सरकारच्या अधिनियम १९३५ च्या कलम १६९ खाली नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या समान केला होता. ही बाब नंतर भारतीय संविधानाच्या चौकटीतही सामिल करण्यात आली आहे.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वैधानिक लेखापरीक्षक आहेत. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ७८-अ खालील तरतूदीनुसार राज्य शासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ च्या कलम २ च्या प्रारंभाचा म्हणजेच दि. १० मार्च २०११ रोजी व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सह संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करते. परंतु राज्य शासनाने दि. २६.०९.२०२२ रोजी पासून महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक पदाची सह संचालक संवर्गातून संचालक संवर्गात श्रेणीवाढ केली असून संचालक संवर्गातील अधिकारी यांची पदस्थापना केली. परिणामी, श्री. सिताराम शंकर काळे ह्यांची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातून दि. २६.०९.२०२२ पासून प्रथम पदस्थापना करण्यात आली. या अधिनियमाच्या कलम ७८ ब (१) (अ) खाली स्थायी समिति महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास निकट व अधीन असणारे, तिला योग्य वाटतील इतके सहाय्यक लेखापरिक्षक, लिपिक व कर्मचारी नेमते उक्त नियमाच्या कलम ७८ब (क) अन्वये सहाय्यक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची कर्तव्ये विहित करणे किंवा ती विहित करण्याचे अधिकार महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकांकडे प्रत्यायोजित करणे तसेच कलम ७८ ब (२) अन्वये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक स्थायी समितीच्या आदेशाच्या अधिनतेने सदर सहाय्यक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची कृत्ये व कार्यवाहया यांवर पर्यवेक्षण करतात व नियंत्रण ठेवतात.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाची कर्तव्ये व प्रदान केलेले अधिकार मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १३५, १३६, अनुसूची 'ईई' तसेच १३७ खाली विनिर्दिष्ट केली आहेत. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामध्ये चालवलेल्या वाणिज्यिक सेवांच्या संबंधातील लेख्यांच्या विवरणांची तपासणी व लेखापरीक्षा करील. त्यामध्ये उदीम, वस्तुनिर्माण आणि नफा व तोटा विषयक लेखे आणि जर असे लेखे (महानगरपालिका), (स्थायी समिति किंवा बृहन्मुंबई विजपुरवठा आणि परिवहन उपक्रम समिति) यांच्या आदेशाखाली ठेवण्यात येत असतील तर ताळेबंद यांचा समावेश असेल आणि तो हे लेखे प्रमाणित करील व त्यावरील अहवाल देईल. महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षक महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रक्कमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत ज्या कोणत्याही महत्वाच्या अनियमितता आढळून येतात, त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीला सादर करतात. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेच्या लेख्यांची मासिक तपासणी व लेखापरीक्षा करील आणि त्यावरील अहवाल स्थायी समितीकडे पाठवील व ती समिति तिच्या सदस्यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने सही केलेला, निकटपूर्वीच्या महिन्यातील जमेचा व खर्चाचा गोषवारा दर महिन्यास प्रसिध्द करील. तसेच, स्थायी समितीस वेळोवेळी व तिला योग्य वाटेल इतक्या कालावधीच्या संबंधात महानगरपालिकेच्या लेख्यांची स्वतंत्रपणे तपासणी व लेखापरीक्षा करता येईल.तसेच, या प्रयोजनाकरिता (स्थायी समितीस) व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेचे सर्व लेखे व त्यासंबंधातील सर्व अभिलेखे व पत्रव्यवहार पाहता येईल आणि (स्थायी समिति) किंवा महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षक हा जमा रक्कमा व खर्च यासंबंधी जो कोणताही खुलासा मागविल तो (आयुक्त) त्यांना ताबडतोब देईल. तसेच महानगरपालिका निधी, पाणी व मलनिःसारण निधी आणि पाणीपुरवठा व एकत्रित कर्ज यांच्या लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिकेने किंवा स्थायी समितीने जी इतर कर्तव्ये पार पाडण्यास फर्माविले असेल ती कर्तव्ये आणि बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या लेखापरीक्षेसंबंधी जी कर्तव्ये ते पार पाडण्यास फर्मविले असेल ती कर्तव्ये ते पार पाडतात. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण (निधी संकेतांक - ११, २१, २२, २३, ५०, ६० व ७०), आरोग्य (निधी संकेतांक - १२), शिक्षण (निधी संकेतांक - ३०) आणि पाणी पुरवठा आणि मलनिःसारण (निधी - ४०) सह बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम यांच्या संपूर्ण लेख्याचे वैधानिक लेखापरीक्षण करुन मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १३७(३) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण महानगरपालिका लेख्यांवरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करील. वार्षिक लेखापरीक्षा अहवाल महापालिकेच्या बाबतीत स्थायी समितीस व बेस्ट उपक्रमाच्या बाबतीत बेस्ट समितीस सादर करतात. अधिनियमाखालील तरतुदींचे पालन करतांना मुख्य लेखापरीक्षकांनी स्थायी समितीस जो अहवाल सादर केला असेल व जो महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी सांगितला असेल, असा प्रत्येक अहवाल तसेच अधिनियमाखालील कर्तव्ये पार पाडण्याच्या व अधिकारांचा वापर करण्याच्या बाबतीत जे निवेदन तयार केले असेल व जे महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी विनंती केली असेल असे प्रत्येक निवेदन स्थायी समिति तिच्या अभिप्रायासह महानगरपालिकेपुढे ठेवण्याची तजवीज करेल जेणेकरुन, महानगरपालिकेस आवश्यक वाटेल अशी उपाययोजना त्याबाबतीत करता येईल.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे महानगरपालिका आयुक्तांपासून स्वतंत्र आहेत आणि मुख्य लेखापरिक्षक विभाग थेट स्थायी समितीच्या अधिनस्थ आहे. या विभागाने कर्मचारीवृंदांच्या भरती संदर्भात उच्च दर्जा ठेवला आहे. लेखापरीक्षा कामाकरीता कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक या पदाची अर्हता वित्तीय लेखांकन व लेखापरीक्षण किंवा प्रगत लेखांकन आणि लेखापरीक्षण या विषयासह उत्तीर्ण अथवा लेखा व वित्त (बी.ए.एफ.) किंवा बँकिंग व विमा व्यवसाय (बी.बी.आय.) किंवा व्यवस्थापन अभ्यास (बी.एम.एस.) किंवा वित्तीय व्यवस्थापन (बी.एफ.एम.) किंवा वित्तसह व्यवसाय प्रशासन (एम.बी.ए. फायनान्ससह) वाणिज्य पदवीसह उत्तीर्ण अशी आहे.

अन्य संकेतमान्य वैधानिक लेखापरीक्षेप्रमाणे, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक केवळ महानगरपालिकेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करीत नसून महानगरपालिकेच्या विविध कामकाजांच्या व्यवहाराचीदेखील लेखापरीक्षा पार पाडतात. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १३७(१)(अ) अन्वये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत ज्या कोणत्याही महत्त्वाच्या अनुचितता किंवा नियमबाह्यता त्यास कोणत्याही वेळी आढळून येतील त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीस पाठविल अशी तरतूद आहे. आढळून आलेल्या नियमबाह्यतांसह लेखापरीक्षेचे

निष्कर्ष, सूचना व निरीक्षण यांबाबत संबंधित प्राधिकाऱ्यांना स्वतंत्र लेखापरीक्षा टिपण्यांद्वारे कळविण्यात येतात. त्यांचे एकत्रित परिणाम वार्षिक लेखापरीक्षा अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येतात जे जनतेला विस्तृतपणे खुले आहेत.

असे असले तरी, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षा विभाग थेट जनतेशी अथवा जनतेच्या कामकाजाशी संबंधित नाही. तथापि, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या विभागाशी संबंधित असलेले जनतेचे काही गाऱ्हाणे असल्यास माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रकरणांसंबंधी कार्यवाही करण्याकरीता नेमलेल्या प्रभारी अधिकाऱ्यांद्वारे हाताळण्यात येते.

## ३. सामान्य प्रशासन विभाग

### (रचना व कार्यपद्धती विभागासह)

कर्मचारीवृंद आणि प्रशासकीय सुधारणा खात्याचे नामाभिधान सामान्य प्रशासन विभाग असे करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग हा महानगरपालिका सह आयुक्त (सामान्य प्रशासन) ह्यांच्या नियंत्रण आणि पर्यवेक्षणाखाली काम करतो.

**<u>सामान्य प्रशासन विभागाची प्रमुख कामे :</u>**

(एक) परिणामकारक नियंत्रण ठेवणे आणि कर्मचारीवर्ग ह्या संज्ञेखाली येणाऱ्या सर्व प्रकरणांबाबत धोरणात्मक स्वरुपाचा साचा आणि नियम व कार्यपध्दती विहित करणे, (दोन) विविध विकेंद्रीकृत पातळ्यांवर सदर नियम आणि कार्यपध्दती ह्यांची अंमलबजावणी समानतेने होते की नाही हे पाहणे, (तीन) उत्पादकता वाढविण्याच्या हेतूने कर्मचाऱ्यांना प्रवृत्त करणे आणि प्रशासनाला जास्तीत जास्त जनताभिमुख करणे आणि (चार) प्रचलित पध्दती व कार्यपध्दती ह्यांचे सातत्याने मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करणे.

प्रचलित पध्दतीमध्ये गतिशीलता आणण्याच्या प्रक्रियेत खालील गोष्टीने सुरुवात झालेली आहे :-

१) समान संज्ञेच्या विविध पदांकरिता अर्हतांची कार्यपध्दती व सेवा प्रवेशाचे प्रमाणिकीकरण करणे.

२) पदोन्नती, विविध पातळ्यांवर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी दूर करणे, कर्मचाऱ्यांच्या निवडीकरिता व सेवा प्रवेशाकरिता मंडळे स्थापन करणे इ. बाबी विचारात घेऊन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन परिपत्रके प्रसारित करणे.

३) घटनेन्वये आवश्यक असल्यानुसार सेवा भरतीचे नियम सुधारित करणे आणि मागासवर्गीय उमेदवार, खेळाडू, अपंग व्यक्ती, माजी सैनिक ह्यांच्यासाठी नोकरीमध्ये जागा राखीव ठेवणे.

४) (एक) कर्मचारीविषयक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सर्व खात्यांतील कर्मचारीवृंदविषयक प्रकरणे हाताळणारे अधिकारी आणि

(दोन) सर्वसाधारण स्वरुपाचे तंटे मिटविण्यासाठी मान्यताप्राप्त कामगार संघटनांचे प्रतिनिधी ह्यांच्याबरोबर नियत कालांतराच्या बैठकीसाठी नियमित कार्यक्रम आखणे.

महानगरपालिका आयुक्तांच्या आस्थापनेवर रचना व कार्यपध्दती हा एक स्वतंत्र विभाग आहे. रचना व कार्यपध्दती ह्या विभागाची मुख्य कामे अशी आहेत :-

(१) महानगरपालिका कार्यालयाची कार्यपध्दती सुधारण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन परिपत्रके प्रसृत करणे व अंमलबजावणीच्या दृष्टीने निरीक्षण करणे, (२) विभागांच्या / खात्यांच्या कार्यालयाचे दफ्तर तपासणे, (३) पारदर्शक, तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यासाठी केलेल्या अंमलबजावणीबाबत आढावा घेणे व सबंधित खात्याकडे पाठपुरावा करणे. सदर अधिनियमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सेवेसाठी प्राप्त होणारे अर्ज व अपिल अर्ज याविषयी मासिक अहवाल शासनास सादर करणे (४) केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विविध खात्यांचे जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूकांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, तसेच या

अधिनियमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त होणारे माहिती अर्ज व अपिल अर्ज या विषयीचा मासिक /वार्षिक अहवाल शासनास सादर करणे.

**मराठी-परीक्षा विभाग:**

राज्य शासन आणि महानगरपालिका हयांच्याद्वारे प्राप्त निदेशानुसार, प्रमुख कर्मचारी अधिकारी यांच्या अधिपत्याखाली कार्यरत मराठी विभाग प्रस्थापित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मराठी विभाग व परिक्षा विभाग एकत्रितपणे कार्यरत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा १००% वापर करण्याबाबतचे धोरण राबविण्यासाठी वेळोवेळी राज्य शासनाकडून शासन निर्णय / परिपत्रक प्राप्त होतात. सदर शासन निर्णय / परिपत्रकांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व खाते प्रमुख व विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते. मराठी परिक्षा विभागामार्फत यांचा वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो. मराठी भाषा संवर्धनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार प्रत्येक विभाग प्रमुख / खातेप्रमुख हयांना 'मराठी भाषा अधिकारी' यांची नियुक्ती करण्याचे व त्यानुसार कामकाज करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

शासन निदेशाच्या अनुषंगाने माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याबाबत व त्या अनुषंगाने आपापल्या स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबतचे निदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते / विभाग प्रमुख यांना देण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दरवर्षी ज्ञानपीठ विजेते थोर मराठी लेखक, कवी व नाटककार श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. महानगरपालिकेचा दि. १० मे २०१० च्या ठराव क्र. १५२ अन्वये दि. २७ फेब्रुवारी पासून पुढील १५ दिवस मराठी भाषा पंधरवडा' म्हणून साजरा करण्यास महानगरपालिकेने मान्यता दिली आहे. त्यानुसार दि. २७ फेब्रुवारी ते १२ मार्च पर्यंतचा कालावधी 'मराठी भाषा पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात आला. तसेच, शासनाच्या निदेशानुसार दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी पर्यंतचा कालावधी हा 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने मराठी भाषा संवर्धनार्थ ९ फेब्रुवारी २०२४ रोजी महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता एकत्रित एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच, महानगरपालिका ठरावानुसार दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी 'मराठी भाषा गौरव' दिन महानगरपालिका सभागृहात साजरा करण्यात आला. सदर समारंभाकरिता डॉ. रविंद्र शोभणे, सुप्रसिध्द साहित्यिक, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन यांना प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. मराठी भाषा पंधरवडा या कालावधीत यावर्षी मराठी पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन दि. २७, २८ व २९ फेब्रुवारी २०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालयात करण्यात आले. शासन व्यवहारात मराठी भाषा संवर्धनाच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेद्वारे प्रकाशित मराठी प्रस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली. पुस्तक प्रदर्शन व विक्री कार्यक्रमास महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा तसेच, अभ्यागतांचा चांगला प्रतिसाद प्राप्त झाला.

**मागासवर्ग कक्ष :**

१. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत 'मागासवर्गीयांसंबंधी राज्य शासनाचे आरक्षण विषयक धोरण व आदेशांचे कार्यान्वयन' या कामासाठी एकत्रित घटक म्हणून दि.२६ फेब्रुवारी १९७९ पासून मागासवर्ग कक्ष कार्यरत आहे. हा कक्ष महानगपालिकेमधील सरळसेवा, निवड आणि पदोन्नती या भरती प्रक्रियेमधील सामाजिक व समांतर (महिला, दिव्यांग, स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, भूकंपग्रस्त प्रकल्पग्रस्त, अनाथ, इत्यादी) आरक्षणाच्या दृष्टीकोनातून वेळोवेळी प्राप्त शासन निदेशानुसार काम पाहतो. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत आरक्षण आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील आरक्षण /अनुशेषाबाबतची सांख्यिकी माहिती राज्य शासन व इतर संबंधितांना या कक्षाद्वारे वेळोवेळी सादर करण्यात येते. तसेच, आरक्षण व तदनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने आवश्यक त्या इतर शासन निर्णयानुसार कार्यवाही बाबतच्या मार्गदर्शनपर प्रक्रिया या कक्षाकडून पार पाडल्या जातात.

२. अहवाल वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मागासवर्गीयांच्या सरळसेवा भरतीने / पदोन्नतीने भरण्यात आलेल्या पदासंबंधातील माहितीचे नियतकालीक अहवाल तयार करुन विविध प्राधिकरणांना वेळोवेळी सादर करण्यात आले. तसेच, महानगरपालिकेतील विविध आस्थापनांद्वारे विविध पदांच्या भरती आणि पदोन्नतीबाबत सादर होणाऱ्या प्रस्तावांची या कक्षाकडून आरक्षणाच्या दृष्टीकोनातून पडताळणी करण्यात आली. विविध खाते / विभागांनी आयोजित केलेल्या एकूण २६३ पदोन्नती समिति व ०६ निवड समित्यांच्या सभांना या कक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

३. अहवाल वर्षात विविध आस्थापनांकडून प्राप्त झालेले सरळसेवा निवड, पदोन्नती, दिव्यांग पदसुनिश्चिती, अधिसंख्य पद निर्मिती याबाबतच्या एकूण १८०८ प्रस्तावांबाबत कार्यवाही करण्यात आली.या व्यतिरिक्त अहवालाच्या वर्षात या कक्षास प्राप्त झालेले सांख्यिकी अहवाल, विविध खाते/ विभाग, राज्य शासनाचे प्राधिकारी, विधिमंडळ, लोकप्रतिनिधी यांच्याकडून आरक्षणाच्या अनुषंगाने विविध विषयांबाबत प्राप्त झालेले पत्रव्यवहार, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज इत्यादी एकूण ४६३५ प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली.

४.विविध विषयांबाबत मार्गदर्शन व/वा स्पष्टीकरण प्राप्त करुन घेण्यासाठी राज्य शासनाच्या विविध प्राधिकाऱ्यांबरोबर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला.

५. दिनदर्शिका वर्ष २०२३ मध्ये मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे विविध खात्यांकडून नियुक्त्या व पदोन्नत्या देण्यात आल्या.

| अनु. क्र. | भरतीची पध्दत | भरलेली पदे | नियुक्त केलेले प्रवर्ग निहाय मागासवर्गीय कर्मचारी | | | | | | | | | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागासवर्ग | |
| १. | सरळसेवा | ८३३ | ९७ | ४४ | ३१ | १६ | २४ | १३ | १६ | १४७ | ३८८ | ४४५ |
| २. | पदोन्नती | १५९२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १५९२ |

(टिप - परिपत्रक क्र. एमबीसी/८४५ दि. १४.०५.२०२१ व त्यासोबतचे शासन निर्णय दि. ०७.०५.२०२१ मधील निर्देशांनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सवे रिक्त पदे दि. २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.)

६. राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती कल्याण संसदीय समितीच्या दि. २४.०८.२०२३ ते दि. २९.०८.२०२३या कालावधीतील दौ-याच्या अनुषंगाने विहित विविरणपत्रात क्र. एमबीसी/१०२६ दि. १४.०८.२०२३अन्वये राज्य शासनास माहिती सादर करण्यात आली आहे.

७. सन २०२३ ते २०२४ या वर्षात विविध विषयांवरील१४ परिपत्रके सर्व खाते प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना अंमलबजावणीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी निर्गमित करण्यात आलेली आहेत.

## ४. कामगार खाते :

### तक्रार निवारण समिति :

महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी घटक स्तरावर परिमंडळ स्तरावर व शिखर स्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत आणि त्या समित्यांच्या नियतकालिक सभा वेळोवेळी आयोजित केल्या जातात आणि कामगार कर्मचा-यांची गा-हाणी /तक्रारी यांचे निवारण करण्यात येते.

### अनुकंपा / वारसाहक्क प्रकरणे :

महानगरपालिकेमध्ये लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार तसेच अनुकंपा धोरणानुसार कामगार कर्मचारी यांच्या पात्र वारसास नोकरी देण्याबाबतच्या प्रकरणांची पडताळणी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. तसेच कामगार /आया / सफाईगार /हमाल / कार्यालयीन शिपाई या पदांची मंजूर प्रकरणे विविध खाते, विभागांमध्ये नियुक्तीसाठी निर्देशित करण्यात येतात.

**आंतरविभागीय/खात्यांतर्गत नाट्यस्पर्धा/राज्य नाट्यस्पर्धा :**

ह्या खात्यामार्फत दरवर्षी आंतरविभागीय नाट्यस्पर्धेचे सुद्धा आयोजन केले जाते. एकूण ३० पेक्षा जास्त खाते / विभाग सदर स्पर्धेत भाग घेतात आणि सदर नाट्यस्पर्धेमध्ये तीन फिरते चषक देण्यात येतात. तसेच, महानगरपालिकेच्यावतीने कामगार विभागातर्फे दरवर्षी राज्य स्पर्धेत पाच नाटके सादर केली जातात.

**कामगार कल्याण विभाग :**

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या कामगार / कर्मचारी वसाहतींमध्ये एकूण ३६ कामगार कल्याण केंद्रे कार्यरत आहेत. केंद्रांमध्ये कल्याणकारी योजना राबविल्या जातात. प्रत्येक कल्याण केंद्रामध्ये कुटुंबासाठी स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, मकरसंक्रांत, गणपती उत्सव, बृध्दजयंती हे उत्सव साजरे केले जातात. वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा, सुगम संगीत (गायन) स्पर्धा, कॅरम स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले जाते.

'कुटुंबाची गुणवत्ता' हया दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे  विविध खाते, विभाग आणि रुग्णालयात कार्यरत चतुर्थ श्रेणी कामगार आणि त्यांच्या पती/पत्नीसाठी आयोजित केले जाते.

**उल्लेखनीय कामे-**

सामाजिक संस्था आणि रा.ए.स्मा. रुग्णालयाच्या सहकार्याने उपाहारगृहात रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

राष्ट्रीयकृत बँक आणि टपाल खात्याच्या सहकार्याने मुख्यालयातील उपाहारगृहात 'आर्थिक साक्षरता आणि नियोजन' या विषयावर एक ते पाच दिवसीय शिबिराचे आयोजन कर्मचा-यांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवण्याचे प्रयत्न केले.

## ५. लेखापरीक्षा आणि लेखा :

प्रमुख लेखापाल (वित्त) आणि प्रमुख लेखापाल (कोषागार) हे प्रमुख लेखापाल खात्याचे दोन प्रमुख वैधानिक अधिकारी असून ते उप आयुक्त (वित्त) / अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) यांच्या नियंत्रणाखाली काम करतात. प्रमुख लेखापाल (वित्त) हे महानगरपालिका आयुक्तांना आर्थिक बाबींसंबंधात सल्ला देणारे महानगरपालिका मुख्य वित्तीय अधिकारी आहेत. प्रमुख लेखापाल (कोषागार) हे महानगरपालिका मुख्य कोषागार अधिकारी असून महानगरपालिकेच्या सर्व वित्तीय व्यवहाराचे लेखे ठेवण्याच्या कामास ते जबाबदार असतात.

**अ) आर्थिक बाबींसंबंधीची कामे :**

**१) अर्थसंकल्प :**

महानगरपालिकेची उपलब्ध असलेली उत्पन्नाची सर्व साधने विचारात घेऊन प्रत्येक खात्याने केलेली कामे आणि निरनिराळ्या खात्यांनी सादर केलेल्या गरजांचे मूल्यमापन यांच्या आधारे दरवर्षी, अर्थसंकल्प 'अ', 'ब' आणि 'ई' बाबतीत, आगामी वर्षासाठी जमा व खर्चाचा अर्थसंकल्पीय अंदाजाचा मसुदा, सर्व परिशिष्टांसह प्रमुख लेखापाल (वित्त) तयार करतात.

**२) कर्जे:**

प्रमुख लेखापाल (वित्त) हे, महानगरपालिकेच्या भांडवली स्वरुपाच्या कामांसाठी वित्त पुरवठा करण्याकरिता आवश्यक असलेली कर्जे उभारण्याचे आणि त्या कर्जाची विहित वेळेत परतफेड करण्याचे कामकाज पाहतात.

**३) गुंतवणूकी :**

प्रमुख लेखापाल (वित्त) हे, महानगरपालिका निधीतील अधिशेष रक्कम अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १२२ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या बँकांमध्ये गुंतविण्याचे व गुंतवणुकीवरील व्याजाची वसुली करण्याचे आणि भारतीय स्टेट बँकेकडील महानगरपालिकेच्या चालू खात्यामधील शिल्लक असलेल्या रोख रकमेचा दैनंदिन आढावा घेण्याचे कामकाज पाहतात.

**४) विशेष निधी :**

प्रमुख लेखापाल (वित्त) हे, कर्ज निवारण निधी तसेच महानगरपालिकेचे सर्व विशेष निधी यांच्या नियंत्रणाचे कामकाज पाहतात.

**५) अंतर्गत लेखापरीक्षा :**

प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या नियंत्रणाखाली काम करणारा कर्मचारीवर्ग, नागरी सुविधा केंद्रात जमा केलेल्या महानगरपालिका महसूलाचे तसेच खात्यांनी वसूल केलेल्या दैनंदिन महसुलाची पडताळणी आणि सदर महसूल महानगरपालिकेच्या कोषागारामध्ये विहित मुदतीत भरण्याच्या कामकाजाचे सातत्याने लेखापरीक्षण करीत असतो.

**६) खर्चावर नियंत्रण :**

प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या नियंत्रणाखाली काम करणारा कर्मचारीवर्ग हा बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम तरतुदी, नियम व कार्यपद्धती आणि त्यासाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद या बाबी विचारात घेऊन, खर्चाच्या सर्व प्रस्तावांचे लेखापरीक्षण करीत असतो.

**ब) कोषागारासंबंधीची कामे :**

**१) महसुलाचे संकलन :**

**ऑनलाईन :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विविध महसूल ऑनलाईन पेमेंट गेटवे, आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी./वॅन, BBPS, मोबाईल एप्लिकेशन व सायबर सीएफसी, इ. मार्फत महानगरपालिकेच्या खात्यामध्ये जमा केला जातो. सन २०१९ पासून सर्व २४ विभागांचा इस्टेट व फिल्म शूटींगचा महसूल तसेच २०२२ पासून स्विमिंग पूल महसूल, झु तिकिट महसूल, फिको महसूल ऑनलाईनद्वारे जमा केला जातो.

**ऑफलाईन :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांमध्ये नागरी सुविधा केंद्रांद्वारे महसूल संकलन केले जाते व ॲक्सिस बँक (शहर), आय.सी.आय.सी.आय. बँक (पश्चिम उपनगरे) व एच.डी.एफ.सी. बँक (पूर्व उपनगरे) या बँकामार्फत सदर महसूल भारतीय स्टेट बँकेत जमा केला जातो.

**२) अधिदान :**

**(एक) देयके :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य, विभागीय व परिमंडळीय कार्यालयांकडून प्राप्त होणारी अर्थसंकल्प 'अ', 'ब', व 'ई' संबंधीत देयके लेखापरीक्षण व मंजूर करून सदर खर्चाच्या देयकांचे रोख स्वरुपात / धनादेश / ई.सी.एस. / एन.ई.एफ.टी / आर.टी.जी.एस./ सी.बी.एस.द्वारे अधिदान करण्यात येते.

**(दोन) कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन :**

बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाचे ई.सी.एस द्वारे अधिदान करण्यात येते.

**(तीन) निवृत्तिवेतनादी फायदे :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून नियतवयोमानानुसार दरमहा सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनादी फायदे जसे उपदान-अंशराशीकरण-भविष्य निर्वाह निधि निवृत्तीनंतरच्या त्यांच्या निवृत्तीवेतन खात्यात इ. सी. एस. द्वारे पाठविले जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम, १९५३ आणि सुधारणा संबंधी प्रशासनाने वेळोवेळी पारित केलेल्या परिपत्रकांच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरीनुसार दि. ०१.११.२०१९ पासून

महानगरपालिकेच्या सेवेतून नियत वयोमानानुसार दरमहा सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे तसेच स्वेच्छेने, मृत्यू, असमर्थता इ. कारणाने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनादी फायदे जसे उपदान, अंशराशीकरण, भविष्य निर्वाह निधि तसेच रजा रोखीकरणाचे अधिदान व निवृत्तीवेतन सुरु करण्याबाबतची कार्यवाही मानव संसाधन प्रणालीमधून करण्यात आलेली आहे.

माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीमध्ये एकूण ३७८६ कर्मचाऱ्यांना मानव संसाधन प्रणालीमधून व दि. १-११-२०१९ पूर्वी निवृत्त झालेल्या एकूण १०९ कर्मचाऱ्यांना मॅन्युअल पध्दतीने संगणकीय प्रणालीमधून अधिदान करण्यात आलेले आहे.

**(चार) पेन्शन अदालत :**

महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना/मृत पावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना त्यांचे अनुज्ञेय सर्व फायदे तातडीने मिळावेत यासाठी सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख /अधिष्ठाता यांच्या स्तरावर पेन्शन अदालत आयोजित करुन निवृत्तीवेतन धारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या प्रलंबित दाव्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येत आहे. जर विभागीय पेन्शन अदालतीमध्ये निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारींचे निवारण होऊ शकले नाही, तर माननीय महानगरपालिका आयुक्तांनी दि. ०३.०६.२०१० च्या परिपत्रक क्र. प्रकअ/१६/सर्व/एमसीएल/ओडी/१०१२ अन्वये निर्देशिल्यानुसार, लोकशाही दिनाच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या विविध समस्यांचा निपटारा करण्याकरिता प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या दालनात दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी 'उच्चस्तरीय पेन्शन अदालत' आयोजित केली जाते. सदर उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख कर्मचारी अधिकारी व उप कायदा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख कर्मचारी अधिकारी व उप कायदा अधिकारी यांच्या त्रिसदस्यीय समिती कडून प्राप्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या तक्रारी ऐकून त्यावर योग्य आदेश दिले जातात. याचा लाभ अनेक निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना मिळालेला आहे.

**(पाच) सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना थकबाकी अधिदानासंबंधी :**

१) सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार निवृत्तीवेतन दाव्याच्या अधिदानासंबधी परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/१८ दि. ११-०९-२०१९ रोजी प्रसृत करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या आर्थिक वर्षात एकूण सुमारे १३०५ दावे मंजूर करण्यात आले आहेत.

२) दि. ०१-०७-२००५ च्या सुधारित वेतनश्रेणीनुसार निवृत्तीवेतन दाव्याच्या अधिदानासंबधी परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/०६ दि. ०२-०६-२०१२ च्या अनुषंगाने आधार सामग्री संस्करण विभागाने दिलेल्या यादीनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार एकूण ३००२७ दावे सुधारित करावयाचे होते. यापैकी मार्च २०२३ पर्यंत २९३११ दावे सुधारित करण्यात आले असून एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ५२ दावे मंजूर करण्यात आले आहेत.

३) सातव्या वेतन आयोगानुसार दि. ०१-०१-२००६ नंतर व दि. ०१-०१-२०१६ पूर्वीचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना एकत्रिकरणाचा लाभ देण्याच्या अनुषंगाने परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/१७ दि. ११-०९-२०१९ रोजी प्रसृत करण्यात आले असून सुधारित वेतन श्रेणीनुसार एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत एकूण ५४० दावे मंजूर करण्यात आलेले आहेत.

४) दि. ०१-०१-२०१६ पूर्वी सेवानिवृत्त / मृत झालेल्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतन एकत्रिकरणाचे परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/०४ दि. १३-०६-२०१३ नुसार आधार सामग्री संस्करण विभागाने दिलेल्या यादीनुसार एकूण ७४,९०१ निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतन एकत्रिकरणाच्या थकबाकीचे मार्च २०२३ पर्यंत ५२,३४० दावे सुधारित करण्यात आले आहेत व एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ४० दावे मंजूर करण्यात आलेले आहेत.

**(सहा) मासिक निवृत्तीवेतन :**

निवृत्तीवेतन विभागाच्या संगणकीकृत अभिलेखानुसार मार्च २०२४ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एकूण १,१४,०८३ निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारक आहेत. त्यापैकी १,१४,०४७ निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना बँकेमार्फत व ३६निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना पोस्टाद्वारे निवृत्तीवेतनाचे अधिदान करण्यात येते.

**(सात) कुटुंब निवृत्तीवेतन :**

निवृत्ती वेतनधारकाच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार (पती /पत्नी/मुलगा/मुलगी) यांना बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियमावली, १९५३ नुसार कुटुंब निवृत्तीवेतन संबंधित कार्यवाही केली जाते. सन २०२३-२०२४ या वर्षात एकूण १,२४१ दावे पडताळून मंजुर करण्यात आले व कायदेशीर वारसांना सदर दाव्यांचे अधिदान करण्यात आले.

कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यासाठीची सुधारीत पध्दत अवलंबविण्यासाठी परिपत्रक क्र. प्र. ले. (को)/कुनिवे/३९ दि. ११-०१-२०२१ निर्गमित करण्यात आले आहे.

**(आठ) अन्‌अंशदायी भविष्य निर्वाह निधि :**

सन २०१९-२० हया आर्थिक वर्षात दि. ०१.११.२०१९ पासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, मृत्यू, तसेच इतर प्रकारे निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी दावे मानव संसाधन प्रणालीत (HR) कार्यान्वित करण्यात येत असून त्यांचे अधिदानदेखील मानव संसाधन प्रणालीतून करण्यात येत आहे.

मानव संसाधन प्रणालीमधून दि.०१-४-२०२३ ते दि.३१-०३-२०२४ पर्यंत एकूण ३,८०१ कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी दावे निकाली काढण्यात आले असून सदर कर्मचाऱ्यांना मानव संसाधन कार्यप्रणालीत ई. सी. एस. द्वारे अधिदान करण्यात आले आहे. दि. ०१-०४-२०२३ ते ३१-०३-२०२४ या कालावधीत एकूण २,४९९ भविष्य निर्वाह निधी व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतनाचे योजना (डीसी-१) अंतर्गत दावे मानवीय पध्दतीने (Manually) प्राप्त झाले असून त्यापैकी ७९ भविष्य निर्वाह निधी व १५ नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डीसी-१) दावे निकाली काढण्यात आले आहेत.

**(नऊ) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना :**

केंद्र शासन/राज्य शासन यांच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेत दि. ०५-०५-२००८ व तद्नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये स्तर-१ व स्तर-२ असे दोन स्तर आहेत. स्तर-१ हा महानगरपालिकेच्या सेवेत दि. ०५ मे २००८रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना अनिवार्य असेल, तर स्तर-२ वैकल्पिक स्वरुपाचा असेल, तथापि स्तर-२ बृहन्मुंबई महापालिकेमध्ये कार्यान्वित केलेला नाही.

स्तर-१ अंतर्गत प्रत्येक महानगरपालिका कर्मचाऱ्यास मूळ वेतन अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या १०% इतकी रक्कम वेतनातून वसूल केली जाते व १४% इतके मासिक अंशदान महानगरपालिकेकडून कर्मचाऱ्याच्या डीसीपीएस खाती जमा केले जाते. ही अंशदाने आणि गुंतवणुकीवरील प्राप्तीच्या रकमा आहरीत करता न येण्याजोग्या (Non-withdrawable) असून 'निवृत्तीवेतन स्तर-१' खात्यामध्ये जमा केल्या जातात.

परिपत्रक क्र. प्रले(को)/एफडीसीपीएस/२८ दि. १३-१०-२०२० नुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतील कर्मचारी १० वर्ष सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू पावल्यास त्यांच्या वारसास रु. १० लाख इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येत होती. तथापि, परिपत्रक क्र. परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/१२ दि. ११.१०. २०२३ अन्वये सदर योजना बंद करण्यात आली असून परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व असमर्थ सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला असमर्थता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच, महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेल्या / होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान अनुज्ञेय करण्यात आले आहे.

'निवृत्तीवेतन स्तर-१' योजनेअंतर्गत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या दि. ३१-०३-२०२४ पर्यंत ४७,४१५ इतकी आहे.

### ३) सॅप कार्यपध्दतीतील महानगरपालिकेचे लेखे व लेख्यांचा ताळेबंद :

'जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण कार्यक्रम' या योजनेअंतर्गत केंद्र/राज्य शासनाने घालून दिलेल्या निर्देशांनुसार तसेच राष्ट्रीय महापालिका लेखांकन हस्तपुस्तिकेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प 'अ', 'ब' व 'ई' चे रोख तत्वावरील लेखे उपार्जित तत्वावरील दुहेरी लेखांकन पध्दतीत रुपांतरीत करुन, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे लेखे दि. ०१.०४.२००७ पासून एस.ए.पी., ई.आर.पी. फिको मॉड्यूल मध्ये तयार केले जात आहेत. सॅप कार्यपध्दतीत लेखे निधी, कार्य निधी केंद्र/ खर्च केंद्र व लेखा संकेतांकनिहाय तयार केले जातात. प्रत्येक महिना संपल्यावर त्या त्या महिन्याचे मासिक जमा व खर्चाचे गोषवारे तसेच वित्तिय वर्षाच्या अखेरीस वार्षिक लेखे बंद केले जातात व त्यानंतर सॅप कार्यप्रणालीमधून तयार झालेले मासिक जमा व खर्चाचे गोषवारे व वार्षिक लेखे उत्पन्न व खर्चाचे पत्रक, ताळमेळ पत्रक, जमा व खर्चाचा गोषवारा, तेरीज पत्रक इ. वित्तीय विवरणपत्रे महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परीक्षकांकडे लेखापरीक्षणार्थ सादर केली जातात. तदनंतर, वार्षिक लेखे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांच्या माहितीकरिता प्रसिध्द केली जातात.

अशाप्रकारे प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अखत्यारितील ताळेबंद उपविभागाने सन २०२२-२३ पर्यंतचे वार्षिक लेखे, नॅशनल म्युनिसिपल अकाऊंटिंग मॅन्युअलमध्ये विहित केलेल्या प्रपत्रांनुसार सॅप कार्यप्रणालीद्वारे तयार करुन, मुख्य लेखा परिक्षकांना लेखा परिक्षणार्थ सादर केलेले आहेत. सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे व माहे एप्रिल २०२३ ते माहे मार्च २०२४ पर्यंतचे बारा महिन्यांचे मासिक जमा व खर्चाचे गोषवारे तयार करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु असून महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षकांना लेखापरीक्षणार्थ सादर करण्यात येतील.

## ६. माहिती तंत्रज्ञान विभाग :

### १) मायबीएमसी बिल्डिंग आयडी :

सदर प्रणालीच्या माध्यमातून आपल्या इमारतीची बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संदर्भातील सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे. तसेच, एकाच इमारतीचे विविध खात्यातील संदर्भ क्रमांक त्या इमारतीच्या एकमेव इमारत ओळख क्रमांकाशी (Building UID/SAC) जोडण्याची सुविधा या प्रणालीमध्ये आहे. त्या माध्यमातून इमारती संबंधी सर्व प्रकारची ऑनलाईन माहिती सॅक आयडीच्या माध्यमातून एका क्लीकवर प्राप्त होते.

### २) 3D सिटी मॉडेल मुंबई :

'3D सिटी मॉडेल मुंबई' प्रकल्प मुंबई शहराच्या शहरी व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामध्ये प्रगत भौगोलिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन मुंबईचा संपूर्ण त्रिमितीय डिजिटल ट्विन बनवण्याचा समावेश आहे. हया प्रकल्पात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे जवळजवळ ५०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचे एरियल, टेरेस्ट्रियल आणि मोबाइल बॅकपॅक LIDAR सर्वेक्षणांद्वारे डिजिटल ट्विन विकसित केले जाईल. हया प्रकल्पाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा विकास, नागरी नियोजन, आपत्ती व्यवस्थापन अतिक्रमण निर्मूलन व प्रतिबंध इ. बाबींमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

### ३) डॅशबोर्ड :

माहिती तंत्रज्ञान विभागाने एस.ए.पी. अनुप्रयोगांसाठी नवीन सिस्टम इंटिग्रेटर नियुक्त केला आहे. इंटिग्रेटर सध्या त्यांच्याकडे उपलब्ध टूल वापरुन डॅशबोर्ड तयार करण्याच्या प्रक्रियेत आहे. याच बरोबर, नवीन डॅशबोर्ड टूलचा वापर करून SAP BIBO module मधले जूने डॅशबोर्ड देखील विकसित करत आहेत.

### ४) लो कोड नो कोड :

बृहन्मुंबई महानगरपालिकेधील विविध विभागांसाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी लो कोड नो कोड प्लॅटफॉर्म हा महानगरपालिकेमध्ये मार्च २०२४ मध्ये अंमलात आला. लो कोड नो कोड प्लॅटफॉर्म हे ॲप्लीकेशन विकसित करण्यासाठी त्वरित प्रभावीपणे आणि सुविधा पुरवतात. तसेच, डिजिटल परिवर्तन उपक्रमांना गती देण्यात संस्थांमध्ये नवकल्पना सक्षम करण्यात मदत करतात. सद्यस्थितीत महानगरपालिकेतील घन कचरा व्यवस्थापन विभागासाठी फील्ड

मशिन ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. तसेच, प्रमुख लेखापाल (वित्त) विभागासाठी कोटेशन मॅनेजमेंट सिस्टिम, उद्यान विभागासाठी झाडे काढण्याची परवानगी, आरोग्य विभागासाठी रुग्णालय स्वच्छता व्यवस्थापन, हिंवताप, आजारावरील रिपोर्टींग, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी केंद्रीकृत कन्टेंट मॅनेजमेंट सिस्टीम विकसित करण्यात येत आहे.

## ७. पाणी पुरवठा व मलनि:सारण खात्याचा अर्थ व प्रशासन कक्ष-

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)**

**कर्जे :**

**जागतिक बँकेकडून कर्जे :**

बृहन्मुंबई महानगरपलिकेला मुंबई पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्प, टप्पा-एक, दोन व तीनसाठी जागतिक बँकेकडून महाराष्ट्र शासनामार्फत रु. ८३२.७५ कोटी तसेच मुंबई मलनि:सारण विल्हेवाट प्रकल्प टप्पा-१ साठी रु. ४१३.५३ कोटी एवढे कर्ज वितरीत करण्यात आले. वरील कर्जापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. ३१-०३-२०२४ पर्यंत अनुक्रमे रु. ८२८.६१ कोटी आणि रु. ३८८.६० कोटी एवढया कर्जाची परतफेड केली असून, रु. ४.१४ कोटी आणि रु. २४.९३ कोटी एवढे कर्ज शिल्लक आहे.

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्जे :**

मुंबई तीन -अ पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्पांतर्गत असलेल्या उर्वरित कामांकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून घेण्यात आलेल्या रु. १५४.०७ कोटी एवढया कर्जाची दि. ३१-०३-२०१९ पर्यंत महानगरपालिकेकडून पूर्ण परतफेड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुंबई तीन-अ पाणी पुरवठा प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रु. २२३.१४ कोटी एवढे कर्ज घेण्यात आले आहे. त्यापैकी दि. ३१-०३-२०२४ पर्यंत रु. १४५.९६ कोटी एवढया कर्जाची परतफेड करण्यात आली असून, रु.७७.९८ कोटी एवढे कर्ज शिल्लक आहे. मेगासिटी प्रकल्पांतर्गत कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून घेण्यात आलेल्या रु. १९.७० कोटी एवढ्या कर्जाची दि. ३१-०३-२०२१ पर्यंत महानगरपालिकेकडून पूर्ण परतफेड करण्यात आली आहे.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण कार्यक्रमांतर्गत प्रकल्प :**

केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण कार्यक्रमांतर्गत (नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन) आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प, मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-दोन), मलबार हिल गार्डन ते क्रॉस मैदान पर्यंत बोगदा आणि मरोशी ते रुपारेल कॉलेजपर्यंत बोगदा असे चार प्रकल्प मंजूर केले होते. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजनेअंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मुंबई महानगरपलिकेच्या विविध प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून ३५ टक्के व राज्य शासनाकडून १५ टक्के अनुदान मिळाले असून उर्वरित ५० टक्के प्रकल्प खर्च महानगरपालिकेने अंतर्गत निधीतून केलेला आहे.

**मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पाचा** एकूण अंदाजित खर्च रु.१५८३.९७ कोटी इतका होता. त्यास केंद्र शासनाच्या व्यय वित्त समितीने रु.१३२९.५० कोटी इतक्या खर्चाच्या अनुदानास मान्यता दिली. सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार समितीने दि.२२.०२.२००७ रोजी मंजुरी दिली. सदर प्रकल्पांतर्गत मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून रु.४६५.३२ कोटी आणि महाराष्ट्र शासनाकडून रु.१९९.४२ कोटी असे एकूण रु.६६४.७४ कोटी दि.३१.०३.२०२४ पर्यंत प्राप्त झाले आहेत.

**मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-दोन)** चा एकूण अंदाजित खर्च रु.१८९६.०० कोटी इतका असून, पहिल्या घटकाचा (Component – I) प्राधान्य कामे खर्च रु.५०२.४१ कोटी होता. परंतु, केंद्र शासनाच्या सेन्ट्रल सँन्क्शन ॲन्ड मॉनिटरींग कमिटीने रु.३६४.४७ कोटी इतक्या खर्चास अनुदानासाठी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पांतर्गत मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून रु.११४.०३ कोटी आणि राज्य शासनाकडून रु. ४८.८८ कोटी असे एकूण रु. १६२.९१ कोटी दि. ३१.०३.२०२४ पर्यंत प्राप्त झाले आहेत.

**मलबार हिल गार्डन ते क्रॉस मैदान** असा बोगदा खणण्याच्या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रु. १०२.१३

कोटी खर्चाचा प्रकल्प केंद्र शासनास सादर केला होता. हया प्रकल्पासाठी सेंन्ट्रल सँन्क्शन अॅन्ड मॉनिटरींग कमिटीने रु. १३.१९ कोटी इतक्या खर्चाच्या अनुदानास ऑगस्ट २००७ मध्ये मान्यता दिली. सदर प्रकल्पांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून रु.२९.६१ कोटी आणि महाराष्ट्र शासनाकडून रु.१२.६८ कोटी असे एकूण रु.४२.२९ कोटी दि.३१.०३.२०२४ पर्यंत प्राप्त झाले आहेत.

**मरोशी ते रुपारेल कॉलेज** असा बोगदा खणण्याचा एकूण अंदाजित रु. ३१५.५१ कोटी खर्चाचा दुसरा प्रकल्पही केंद्र शासनास सादर केला होता. ह्या प्रकल्पासाठी सेंन्ट्रल सँन्क्शन अॅन्ड मॉनिटरींग कमिटीने रू २१४.८७ कोटी इतक्या खर्चास अनुदानासाठी सप्टेंबर २००७ मध्ये मान्यता दिली. सदर प्रकल्पांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून रु. ९२.८८ कोटी आणि महाराष्ट्र शासनाकडून रु. ३९.८१ कोटी असे एकूण रु. १३२.६९ कोटी दि. ३१.०३.२०२४ पर्यंत प्राप्त झाले आहेत.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजने** अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून रुपये ७०१.८४ कोटी व महाराष्ट्र शासनाकडून रु. ३००.७९ कोटी असे एकूण रुपये १००२.६३ कोटी एवढे अनुदान दि. ३१.०३.२०२४ पर्यंत प्राप्त झाले आहेत.

## ८. करनिर्धारण व संकलन खाते :

**प्रस्तावना:**

करनिर्धारण व संकलन खाते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महसूल संकलनाचे प्रमुख स्त्रोत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील इमारती आणि जमिनी हयांचे करनिर्धारण, त्यांचेवर करावयाच्या मालमत्ता करांचे परिगणन आणि वार्षिक देयके तयार करून मालमत्ताकराचे संकलन करण्याचे काम हया खात्याकडून करण्यात येते. करनिर्धारण व संकलन खात्यात सद्यस्थितीत सुमारे १,१३५ कर्मचारी असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रु ३१९९.०३ कोटी इतका मालमत्ता कर संकलीत करण्यात आला.

**करनिर्धारण व संकलन खात्याचे संगणकीकरण :**

भांडवली मूल्याधारित करप्रणाली अंतर्गत मालमत्तांचे करनिर्धारण करणे, मालमत्ता कर देयके निर्गमित करणे व मालमत्ता कराचे संकलन इ. सर्व कामकाज संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येते. सदर संगणकीय करप्रणाली ही पारदर्शक असून वापरकर्त्यांस, सोपी व सुटसुटीत झाली आहे.

१) **भांडवली मूल्याधारित करप्रणालीची अंमलबजावणी:**

दि. १ एप्रिल २०१० च्या प्रभाव्य दिनांकापासून भांडवली मूल्याधारित करप्रणालीनुसार मालमत्तांचे करनिर्धाण करून त्यानुसार देयके निर्गमित करण्यात येतात. अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १५४ (१) (अ) अन्वये सुनिश्चित केलेले भांडवली मूल्य कलम १५४(१)(क) अन्वये दर पाच वर्षांनी सुधारित करण्याची तरतूद आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये नव्याने अंतर्भूत केलेल्या पोट कलम १५४(१)(ड) नुसार भांडवली मूल्यातील सुधारणा सलग चार वर्षांनी पुढे ढकलण्यात आली आहे. सदर सुधारणेअंती होणारी वाढ अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १४० (अ) अन्वये लगतपूर्व वर्षाच्या कराच्या ४०% पेक्षा अधिक असणार नाही.

२) **मालमत्तेच्या भांडवली मूल्य व अधिदानायोग्य मालमत्ता करासह मालमत्तेचा सविस्तर तपशील संकेतस्थळावर उपलब्ध :**

मालमत्तेच्या भांडवलीमूल्याधारित करप्रणालीमुळे नागरीकांना त्यांच्या मालमत्ता कराचे परिगणन करणे व मालमत्ता कराचे ऑनलाईन अधिदान करणेदेखील शक्य झाले आहे.

त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर खालील सुविधा उपलब्ध आहेत :-

१. मालमत्ता कर (नवीन) tab येथे नागरीकांना त्यांच्या मालमत्ता कराचे परिगणन करणे. मालमत्ता कराचे ऑनलाईन अधिदान करणे.

२. मालमत्ता कर प्रणालीबाबत तक्रार दाखल करणे.

३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने Integrated Property Validation Solution (IPVS) नामक हाती घेतलेल्या ३६०

अंश प्रकल्पांतर्गत कंत्राटदार कंपनीकडून प्राथमिक सर्वेक्षण करुन संकलित केलेली माहिती आणि मालमत्ता कर विभागाकडे नोंद असलेल्या सदर मालमत्तेच्या माहितीच्या पडताळणीअंती जे फरक स्विकारण्यात आले, त्यांच्या बाबतीत कंत्राटदार कंपनीकडून ज्या मालमत्तांच्या सर्वेक्षणाची माहिती प्राप्त झालेली आहे, त्या माहितीच्या आधारे करनिर्धारण व संकलन खात्याच्या अभिलेखातील करनिर्धारणामध्ये आवश्यक तेथे दुरुस्ती करण्यात येऊन संबंधीत मालमत्तांचे पुनः करनिर्धारण करण्याचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पांचे कंत्राट रद्द केले असल्याने सदर प्रणाली फक्त अवलोकनासाठी उपलब्ध आहे. या प्रणालीद्वारे उपलब्ध डाटा माहिती तंत्रज्ञान विभाग MyBMC BUID या प्रकल्पासाठी हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

४) अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १४४अ अन्वये सामाजिक दृष्टया किंवा परिस्थितीकीय लाभासाठी (Socially or ecologically benefical schemes) अंमलात येणाऱ्या योजनांच्या संदर्भातील जमिनी आणि इमारतींवर आकारावयाच्या मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय आहे. मालमत्ता कराचा घटक असलेल्या सर्वसाधारण करात, अ) इमारतीच्या आवारात निर्माण होणाऱ्या संपूर्ण कचऱ्याचे वर्गीकरण करुन, इमारतीच्या आवारात कंपोस्टीकरण करणाऱ्या ब) संपूर्ण कचऱ्याचे वर्गीकरण करुन, पुनर्वापरकर्त्या संस्थांस सोपवून त्याची विल्हेवाट लावणाऱ्या आणि क) इमारतीच्या आवारातील टाकाऊ पाण्याचा पुनर्वापर करुन, ते पाणी स्वच्छतागृहाच्या निःसारणासाठी (Toilet Flushing) वापरणाऱ्या तसेच इमारतीमध्ये जलसंधारण योजना राबविणाऱ्या, निवासी मालमत्तांना प्रत्येकी ५% इतकी सवलत देण्यात येते. तथापि, कलम १४४ अ अन्वये देय असलेल्या सदर सवलतीची सर्वोच्च मर्यादा १५% पर्यंत सिमित राहील.

५) मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने मालमत्ता दर देयकांवर अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०२ ते २०६ च्या तरतुदींचा अवलंब करण्यात येतो. त्यामध्ये जल जोडणी खंडीत करणे, चल मालमत्तांची अटकावणी, अचल मालमत्तांची जप्ती अटकावणी व लिलाव इ. कार्यवाही करण्यात येते. तसेच थकीत मालमत्ता कराच्या देय दिनांकाच्या ९० दिवसानंतर प्रति माह २% दराने दंड आकारणी करण्यात येत असून अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०६ च्या तरतुदीनुसार थकीत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तांची विक्री करण्याबाबतच्या मानक कार्यपध्दतीस (S.O.P.) प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे व जाहीर लिलावासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.

६) सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५ पारित करण्यात आला असून सदर अधिनियमानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४६.४५ चौ.मी. (५०० चौ. फूट) व त्यापेक्षा कमी चटई क्षेत्र असणाऱ्या निवासी इमारती व निवासी गाळ्यांना दि. १ जानेवारी २०२२ च्या प्रभाव्य दिनांकापासून संपूर्ण मालमत्ता करातून सवलत लागू करण्यात आली आहे.

७) संरक्षणदलातील शौर्य पदकधारक आणि 'माननीय बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजनेअंतर्गत' माजी सैनिक व सैनिक विधवा / पत्नी यांच्या निवासी मालमत्तेस तसेच, संरक्षण दलातील अविवाहीत शहीद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तेस करातून सूट देण्यात येते.

## ९. जनसंपर्क विभाग :

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने राबविण्यात येणारे प्रकल्प, उपक्रम नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधा, वेगवेगळे धोरण, निर्णय आदी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रतिमा जनमानसांत उजळण्याच्या दृष्टीने जनसंपर्क खाते वेगवेगळ्या पातळींवर अविरतपणे प्रयत्न करीत असते. महानगरपालिकेच्या वतीने सन २०२३-२४ मध्ये आयोजित केलेले समारंभ, उपक्रम, कार्यक्रम, प्रकल्प, घटना, घडामोडी, नागरी सेवा-सुविधा आदींबाबत विविध भाषिक वर्तमानपत्रे, वृत्तचित्रवाहिन्या, समाजमाध्यम याद्वारे प्रसिद्धी करण्यात आली. वार्तापत्रे, छायाचित्रे, दृकश्राव्य चित्रफिती व अधिकाऱ्यांच्या मुलाखती, वृत्तपत्रीय जाहिराती, नभोवाणी संदेश, भित्तीपत्रके, जाहिरात फलक तसेच प्रसिद्धी व प्रचाराची इतर माध्यमे यांचा उपयोग करुन प्रसिद्धी देण्याची कार्यवाही जनसंपर्क खात्याने वेळोवेळी केली. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये घडणाऱ्या विशेषतः पावसाळ्यातील विविध घटनांची वस्तुस्थितीदर्शक माहिती प्रसारमाध्यमांसह जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कामकाज या विभागाने पार पाडले.

सन २०२३-२४ वर्षात जनसंपर्क खात्याने एकूण ७३० वार्तापत्रे प्रसारित केली. तर वृत्तपत्रांतून प्रसिध्द झालेल्या

टीका-टिप्पणीवर १५४ पेक्षा अधिक खुलासे प्रसिध्दीस देण्यात आले. यामुळे जनतेला वस्तुस्थिती अवगत होऊन महानगरपालिकेविषयी असलेले गैरसमज तसेच, पूर्वग्रह दूर करण्यात मदत झाली. वार्तापत्र, खुलासे यांच्यासह दैनंदिन घडामोडी, पत्रकार परिषद , इतर उपयुक्त माहिती आदींबाबतचे संदेशही प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना इ-मेल व व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून दररोज पाठविण्यात आले. दैनंदिन विविध कार्यक्रम, उपक्रम, प्रकल्प, समारंभ, दौरे, बैठका इत्यादींचे छायाचित्रण व दृकश्राव्य चित्रण करण्यात आले. मान. महानगरपालिका आयुक्त व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्या महत्त्वाच्या विषयांवर पत्रकार परिषदा आयोजित करण्यात आल्या. दैनंदिन वृत्तपत्रांमधून महानगरपालिकेविषयी प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचे कात्रणसंग्रह नस्ती स्वरुपात संकलित करुन, स्कॅन करुन माननीय महानगरपालिका आयुक्त, सर्व माननीय अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, विविध विभाग प्रमुखांना इमेल व व्हॉट्सअपद्वारे पाठविण्यात आली.

महानगरपालिकेच्या विविध खात्यांच्या मिळून सुमारे ३ हजार ५३३ जाहिराती विविध भाषिक वृतपत्रांतून प्रसिध्दीसाठी देण्यात आल्या. जनसंपर्क खात्याच्यावतीने प्रकाशनकार्यही केले जाते. त्यामध्ये सन २०२४ ची नागरी दैनंदिनी, सन २०२४ ची दिनदर्शिका, गणेशोत्सव -२०२३ माहिती पुस्तिका तसेच, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा या संकल्पनेवर आधारित माहिती पुस्तिका' या खात्यामार्फत प्रकाशित करण्यात आली.

नागरी दैनंदिनीसह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित कॉफी टेबल बुकची देखील विक्री अहवाल वर्षात करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल २०२३ रोजी आणि महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी चैत्यभूमी (दादर) येथे छायाचित्राचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तसेच महापरिनिर्वाण दिनी अभिवादनाचे समाजमाध्यमांसह दूरदर्शनच्या राष्ट्रीय वाहिनीवरुन थेट प्रक्षेपण करण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही जनसंपर्क खात्याच्या वतीने गणेश गौरव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्यांना महानगरपालिका सभागृहात समारंभपूर्वक गौरविण्यात आले. मराठी भाषा पंधरवडानिमित्त 'भाषा शुध्दी, मराठी कविता व प्रशासनिक मराठी' विषयी माहिती दर्शविणारे ४ संकल्पनांवर आधारित प्रत्येकी १ हजार या प्रमाणे एकूण ४ हजार रंगीत भित्तीपत्रके प्रकाशित करुन त्याचे वितरण करण्यात आले. तसेच प्रमुख कर्मचारी अधिकारी, प्रमुख कामगार अधिकारी खात्यांसमवेत मिळून जनसंपर्क विभागाने दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिन सोहळा समारंभाचे समन्वयन केले. यासह जी-२० आंतरराष्ट्रीय परिषद, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित मेरी माटी-मेरा देश, अमृत कलश यात्रा, महास्वच्छता अभियान, आपत्ती व्यवस्थापनविषयक रंगीत तालीम इत्यादी कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग घेतला व कार्यक्रमास विविध माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली. मुंबई सुशोभीकरण प्रकल्पांतर्गत केलेल्या कामांना व्यापक प्रसिध्दी देण्यात आली. त्याचप्रमाणे, डिसेंबर २०२३ पासून संपूर्ण मुंबईत राबविण्यात येत असलेल्या सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लीन ड्राइव्ह) या सार्वजनिक स्वच्छतेच्या उपक्रमाला मुद्रितमाध्यमे, वीजकीय माध्यमे व समाज माध्यमांतून व्यापक प्रसिध्दी मिळवून दिली, परिणामी, मोहिमेविषयी जनजागृती होवून लोक सहभागात वाढ झाली.

## १०.विधी खाते :

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विधी खाते, अद्ययावत् सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, मुंबई दुकाने आणि आस्थापना अधिनियम १९४८, अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम १९५४, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे ) वृक्ष संवर्धन अधिनियम, १९७५ इत्यादी अधिनियम, विकास नियंत्रण विनियम व इतर उपविधी वगैरेंच्या अंमलबजावणी संबंधातील महानगरपालिकेच्यावतीने व महानगरपालिकेविरुध्द चालविण्यात येणाऱ्या न्यायालयीन खटल्यांशी संबंधित आहे.

न्यायालयीन खटले दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारचे असतात. ते वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये चालविले जातात. त्यात सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, मुंबई मधील विनंती अर्जासंबधातील (रिट पिटीशन ) प्रकरणांचा तसेच, इतर न्यायाधिकरणे, लघुवाद न्यायालय, मानवी हक्क आयोग, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण न्यायालय व इतर, कामगार व औद्योगिक न्यायालये, सहकारी न्यायालये, ग्राहक तक्रार निवारण मंच, निवडणूक याचिका, जनहित याचिका, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण पुणे, मुंबई बाहेरील फौजदारी व दिवाणी न्यायालये वगैरेंचा समावेश होतो.

महानगरपालिकेच्या मालमत्तांसंबंधी व अन्य विविध प्रकरणांसंबंधी करारनामे, भाडेपट्टा, मक्ता, खरेदीखत, महानगरपालिकेच्या मालमत्तेसंबंधातील समझोत्यांची निवेदनपत्रके बनविणे, विकास नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम हया अन्वये महानगरपालिकेकडून ताब्यात घ्यावयाच्या मालमत्तांच्या मालकांचा शोध घेऊन मालमत्तांवरील मालकी हक्क निश्चित करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेल्या अनेक प्रकल्पांबाबत करारनामे बनविणे, इत्यादी कामे सुध्दा सदर खाते पाहते .

नागरी प्रशासनास ज्या-ज्या वेळी आवश्यकता भासते त्या-त्या वेळी खात्यातर्फे कायदेविषयक सल्ला/मत दिले जाते.

## ११. मध्यवर्ती खरेदी खाते :

मध्यवर्ती खरेदी खाते हे ई-निविदाद्वारे महानगरपालिकेच्या विविध खात्यांना तसेच रुग्णालयांना लागणाऱ्या खालील बाबींकरीता पुरवठादारांची नियुक्ती करून दर परिपत्रके प्रसारीत करते :-

१) विविध खात्यांना लागणाऱ्या सर्वसाधारण बाबी जसे फर्निचर, लेखनसामग्री, शालेय उपयोगी वस्तू, गणवेश, किटकनाशके आणि इतर उपस्करे इत्यादी.

२) वैद्यकीय उपकरणे व अनुसूचीवरील औषधे.

३) मनुष्यबळ यांचा पुरवठा करण्याकरीता बहिस्त्रोतांतर्गत व खाजगी भागीदार तत्वावर (पी.पी.पी.), ई -निविदा मागवून पुरवठादारांची नेमणूक करणे.

## १२. प्रमुख अधिकारी (चौकशी) विभाग :

बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत प्रमुख अधिकारी (चौकशी) ह्यांचे खाते हे, सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये, लाचलुचपत, भ्रष्टाचार, महानगरपालिका निधीतील गळती, अनावश्यक खर्च, महानगरपालिका निधीचा व मालमत्तेचा अपहार अशाच अन्य प्रकारची महानगरपालिका कर्मचाऱ्यांची गैरवर्तणूक व गैरकृत्ये आणि कामातील निष्काळजीपणा, इ. संबंधीच्या प्रकरणी प्राथमिक चौकशी करते आणि या खात्याने सक्षम अधिकाऱ्यांना सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालाच्या निष्कर्षांच्या आधारे प्रशासनातर्फे पुढील योग्य त्या कारवाईबाबत म्हणजेच संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी/संक्षिप्त चौकशी करणे किंवा अभिलेखित ताकीद देणे याबाबत निर्णय घेण्यात येतो.

कर्मचाऱ्यांची अनधिकृत अनुपस्थिती व किरकोळ स्वरुपाचे गैरवर्तन/निष्काळजीपणा याबाबत सर्वसाधारणतः संबंधित खात्यांमार्फत अन्वेषण/चौकशी केली जाते. मात्र, गंभीर स्वरुपाचे गैरव्यवहार वा गुन्हे तसेच, नैतिक अधःपतन अंतर्गत प्रकरणे व ज्या प्रकरणी एकापेक्षा अधिक खात्यांतील कर्मचारी गुंतलेले आहेत अशी प्रकरणे त्याचप्रमाणे महानगरपालिका आयुक्त/ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त / सह आयुक्त / उप आयुक्त / खाते प्रमुख ह्यांनी विशेषतः सोपविलेली प्रकरणे प्रमुख अधिकारी (चौकशी) यांच्याकडे प्राथमिक चौकशी/खात्यांतर्गत चौकशी ह्याकरिता सुपूर्द केली जातात. कामकाजात अनियमितता केलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र बजावून, चौकशीअंती दोषसिध्दी झाल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार योग्य ती शिक्षा देण्यात येते. अपराधी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत खात्यांतर्गत चौकशी करताना, संबंधित कायदे, विविध कार्यपद्धती, विहित नियम आणि विनियम तसेच, नैसर्गिक न्यायतत्व ह्यांचे सदर खाते काटेकोरपणे पालन करते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त होणारी लाचेच्या संबंधित प्रकरणे केवळ या खात्यामार्फत हाताळली जातात. लाचलुचपत प्रतिबंधक खाते तसेच, राज्य शासन ह्यांच्याशी आवश्यक तो पत्रव्यवहार या खात्यातर्फे करण्यात येतो. निलंबन करणे, संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध माननीय विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी मंजुरी आदेश तयार करून सादर करणे, मंजुरी प्राधिकाऱ्यांना म्हणजेच महानगरपालिका आयुक्तांना, माननीय विशेष न्यायालयाच्या सुनावणी दरम्यान सहाय्य करणे, दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकणे / बडतर्फ करणे, निर्दोष मुक्तता झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत पुनर्स्थापित करणे, इ. बाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त करणे, उप-आयुक्त/सह आयुक्त/ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त/महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार राज्य शासनाच्या धर्तीवर ह्याबाबतीत धोरण तयार करणे इ. कामे या खात्यातर्फे केली जातात. फौजदारी गुन्ह्याकरिता तसेच

गंभीर गैरवर्तणुकीकरिता निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा अद्ययावत् तपशील संबंधीत खात्याकडून प्राप्त झाल्यानंतर एकत्रितरित्या या खात्यामार्फत ठेवण्यात येतो व निलंबनाचे पुनर्विलोकन करण्याकरिता गठित झालेल्या समितीसमोर तो ठेवण्यात येतो.

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १७(अ) अन्वये तक्रारीच्या अन्वेषणांच्या मान्यतेसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त होणारा पत्रव्यवहार/ तक्रारी प्रचलित कार्यपध्दतीनुसार संबंधित खाते प्रमुखांना त्याअनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्णय घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभागास कळविण्यासाठी पाठविण्यात येतात. परंतु याबाबतचा पाठपुरावा चौकशी कार्यालयामार्फत करण्यात येतो.

त्याचप्रमाणे बाह्य चौकशी अधिकारी जसे खाते प्रमुख, उप-आयुक्त/ सह आयुक्त/ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या प्राथमिक/खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीत व अपील सुनावणीत ह्या खात्यातील अन्वेषण अधिकारी (चौकशी), सहाय्यक प्रमुख अधिकारी (चौकशी) व उप प्रमुख अधिकारी (चौकशी) वेळोवेळी कार्यप्रणालीविषयक सहाय्य करतात. त्याचप्रमाणे, महानगरपालिका आयुक्त ह्यांच्या आदेशान्वये वेळोवेळी महानगरपालिकेतील सर्व खात्यांची दफ्तर तपासणी या कार्यालयामार्फत करण्यात येते व निदर्शनास आलेल्या त्रुटी/ अनियमितता सक्षम अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येतात. तसेच, ठोठावण्यात आलेली शिक्षा/निलंबन इ. विरुद्धच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये ह्या खात्यामार्फत विविध सक्षम न्यायालयांमध्ये उपस्थित राहून ती प्रकरणे ह्या खात्यामार्फत हाताळली जातात.

कर्मचाऱ्यांची पदोन्नती, स्वेच्छा निवृत्ती, नियत वयोमानानुसार निवृत्ती, पारपत्र, इ. बाबत ना-हरकत प्रमाणपत्रासाठी सॅप प्रणाली अंतर्गत व्यवस्था विकसित करण्यात आली आहे. याबाबतच्या कार्यध्दतीचे निर्देश सर्व खाते प्रमुख/ विभाग प्रमुख /रुग्णालय प्रमुख इ. यांना परिपत्रक क्र. प्रअचौ/मुख्यालय/ २५१४ दि. १.१०.२०२० अन्वये प्रसारित केले आहेत.

याबरोबरच या खात्यामार्फत पुढील नमूद महत्त्वाची चौकशी प्रकरणे हाताळण्यात आली :-

१) कमला मिल कंपाऊंड दुर्घटना.

२) नाले सफाईमधील अनियमितता.

३) रस्ते दुरुस्तीमधील अनियमितता.

४) ई-निविदे मधील अनियमितता.

५) जोगेश्वरी भूखंड प्रकरणी करण्यात येत असलेली चौकशी.

६) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालयात जंतु संसर्गामुळे रुग्णांचे डोळे दगावल्याची दुर्घटना.

७) बनावट कागदपत्रांच्या आधारे घन कचरा व्यवस्थापन खात्यात करण्यात आलेली बोगस कामगार भरती.

८) हिमालय पूल दूर्घटना.

## १३. बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल (बी.एम.एस.एफ.) :

महानगरपालिकेच्या सर्व वॉच ॲन्ड वॉर्ड सेवांचे केंद्रीकरण करण्यात आल्यानंतर सन १९६६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दलाची स्थापना झाली. सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश मुंबई महानगरपालिकेच्या शहर, उपनगरे, ठाणे व पालघर जिल्ह्यातील नगरबाह्य विभागात पसरलेल्या मालमत्तेचे संरक्षण करणे हा आहे. सन १९९२-९३ मध्ये मुंबई शहरात झालेली बॉम्बस्फोट मालिका व जातीय दंगली या घटना लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या सर्व कामाच्या ठिकाणांची सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यात आली आहे. वाढत्या अतिरेकी कारवायांच्या पार्श्वभूमीवर मुंबई व उपनगरांतील नागरिकांना अखंड नागरी सेवा पुरविण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्व कामाच्या ठिकाणी अत्याधुनिक उपकरणे बसविण्यात आली आहेत. महानगरपालिका प्रशासनाने परिणामकारक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची कार्यालये, रुग्णालये आणि इतर संवेदनशील कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही/डीव्हीआर यंत्रणा, डोअरफ्रेम व हॅन्ड मेटल डिटेक्टर्स, एक्स-रे बॅगेज स्क्रिनिंग मशीन्स, अंडर व्हेईकल चेकिंग मिरर्स सर्च इ. उपकरणे बसविण्यात आले आहेत. ह्या उपकरणांच्या सहाय्याने कार्यालयामध्ये प्रवेश करणारे व बाहेर जाणारे कर्मचारी व अभ्यागत यांच्या हालचालींवर, सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने, नजर ठेवणे शक्य होणार आहे. महानगरपालिका रुग्णालयांमधील प्रसुतीगृहात व प्रसुतीपश्चात कक्षातील माता व नवजात अर्भकांच्या सुरक्षेसाठी खाजगी सुरक्षा मदतनीस नियुक्त करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांच्याकडून राजे सातवे एडवर्ड स्मारक रुग्णालय, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व बा.य.ल. नायर रुग्णालय येथे अतिरिक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. देवनार क्षेपणभुमी येथे महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांच्याकडून संपूर्ण सुरक्षा व्यवस्था नियुक्त करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांच्याकडून सुध्दा सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक महानगरपालिकेच्या कामाच्या विविध महत्त्वाच्या ठिकाणी करण्यात आली आहे.

सुरक्षा दलातील ३४७ प्रशिक्षित सुरक्षा रक्षकांना आपात्कालिन विभागामार्फत आपात्कालिन व्यवस्थापनाचे ०१ महिन्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांची सेवा आपात्कालिन परिस्थितीत घेण्यात येते. भविष्यात अजून १०० प्रशिक्षित सुरक्षा रक्षकांना आपात्कालिन व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दलाचे स्वत:चे असे अत्याधुनिक सुविधा असलेले प्रशिक्षण केंद्र भांडुप संकुल येथे उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी शारिरीक तसेच सुरक्षा व कायदा विषयक वेगवेगळया बाबींशी संबंधित असलेले इनडोअर प्रशिक्षण देण्यात येते. सदरचे प्रशिक्षण केंद हे अर्धसैनिकी दल तसेच महाराष्ट्र राज्य पोलिस दलाकरिता त्यांच्या प्रशिक्षण हेतूकरिता त्यांच्या मागणी आणि उपलब्धतेनुसार प्रशिक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात येते. सुरक्षा कर्मचाऱ्यांना शस्त्र व दारुगोळा विषयक प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र रायफल असोसिएशन, वरळी आणि पोखरण, ठाणे, येथील आर्मीचे गोळीबार केंद्र येथे पाठविण्यात येते.

**गस्त पथक :**

मोडक सागर, मध्यवैतरणा, तानसा, विहार व तुळशी तलावातून मुंबई शहराला पाणी पुरवठा केला जातो. पहिले तीन तलाव ठाणे जिल्ह्यातील पालघर येथील दुर्गम अशा जंगल परिसरात वसलेले आहेत. पाणी पुरवठा जलवाहिन्यांमार्फत करण्यात येतो व भिवंडी जवळील पिसे पांजरापूर येथे मोठे जलशुद्धीकरण प्रक्रिया केंद्र आहे. स्थानिक पोलिसांच्या मदतीने, बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल हे सर्व तलाव, जलवाहिन्या, प्रक्रिया केंद्रे, उदंचन केंद्रे आणि धरणे यांचे संरक्षण गस्त पथकाद्वारे दिवस रात्र गस्त घेऊन करते. दलाकडे दुसरे एक गस्त पथक आहे जे भांडुप संकुल येथील जलशुद्धीकरण केंद्राचे दिवसरात्र गस्त देऊन संरक्षण करते.

तसेच, महानगरपालिकेच्या चार प्रमुख रुग्णालये राजे सातवे एडवर्ड स्मारक रुग्णालय, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालय व डॉ. रु. न. कूपर रुग्णालय येथे सुध्दा विशेष गस्त पथकाद्वारे दिवस-रात्र रुग्णालयात गस्त घातली जाते.

**महानगरपालिकेचे सशस्त्र दल :**

बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दलाचा स्वत:चा सशस्त्र विभाग आहे. संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या व संवेदनशील ठिकाणी सशस्त्र सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. सशस्त्र सुरक्षा रक्षकांच्या सेवा कॅश व्हॅन, कॅश काऊंटर्स आणि आवश्यकता असेल त्यावेळी बंदोबस्तासाठी वापरण्यात येतात. आणीबाणीच्यावेळी आणि बंद, संप, आंदोलने यावेळी उच्चपदस्थांना संरक्षण देण्यासाठी सशस्त्र सुरक्षा रक्षकांच्या सेवा देण्यात येतात.

**इतर खात्यांच्या कामामध्ये महत्त्वाचे योगदान :**

घनकचरा व्यवस्थापन, अतिक्रमण निर्मूलन, अनुज्ञापन विभाग यासारख्या विभागांच्या कामांमध्ये सुरक्षा खात्यातील अधिकारी वर्ग तसेच, सुरक्षा रक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. ह्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या सेवा अतिक्रमण निर्मूलन, स्वच्छता मोहिम, अनधिकृत फेरीवाले यांवर करण्यात येणाऱ्या कारवाईमध्ये वापरण्यात येतात व त्याची प्रशासनाने प्रशंसा केली आहे.

महानगरपालिकेच्या संप, बंद या कालावधीमध्ये अत्यावश्यक सेवांवर विपरित परिणाम होतो. अशा वेळी अत्यावश्यक सेवा सुरळीत चालू ठेवण्यासाठी या खात्यातील अधिकारी, सुरक्षा कर्मचारी आवश्यक ते कर्तव्य बजावित आले आहेत. सुरक्षा अधिकारी, विभागीय स्तरावर पोलीस दल, गृहसंरक्षक दल, नागरी संरक्षक दल तसेच, अग्निशमन दल व आपत्कालीन व्यवस्थापन विभाग यांच्या संपर्कात राहून आपल्या विभागांचे काम सांभाळतात. महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या वेळी निवडणुकांचे काम सुरळीत चालू रहावे म्हणून प्रशासनास व निवडणूक अधिकाऱ्यांना सुरक्षा खाते मदत करते.

## १४. महानगरपालिका मुद्रणालय :

महानगरपालिका मुद्रणालयाचे व्यवस्थापन आधुनिकीकरण आणि तांतडीच्या जलद कामकाजाकरिता सातत्याने प्रयत्नशील आहे. मुद्रणालयातील दर्जोन्नतीसाठी कामगार कर्मचा-यांना आधुनिक प्रशिक्षणाकरिता प्रयत्नशील आहे.

गेल्या काही वर्षापासून महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून विविध प्रकारच्या मागणी पत्रामध्ये लक्षणीय वाढ झाली असून देखील, महानगरपालिका मुद्रणालय महानगरपालिकेतील अंतर्गत विभागांना समाधानकारक सेवा पूरवित आहे. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांचे मुद्रण कामकाज करून देण्याचा व महानगरपालिकेकरीता महसूल जमा करण्याचा मुद्रणालय व्यवस्थापकांचा मानस आहे.

महानगरपालिका मुद्रणालयात सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून VDP प्रकारच्या कामकाजाची वाढ झालेली आहे. तसेच महानगरपालिका मुद्रणालयात **'ON DEMAND PRINTING'** च्या कामकाजाचा प्रकार देखील वाढला आहे. या परिस्थितीतही महानगरपालिका मुद्रणालयाने अंखड व अविरतपणे मुद्रीत सेवा पुरविली आहे. सद्यस्थितीतील VDP प्रकारच्या कामकाजाची वाढ पाहता तसेच, महानगरपालिकेच्या विविध विभागांना **'ON DEMAND PRINTING'** ने जलद मुद्रिते वितरीत करण्याकरिता महानगरपालिका मुद्रणालयात विविध प्रकारची Digital Printing यंत्रे(रंगीत व कृष्णधवल) कार्यान्वित करण्यात आलेली आहेत, त्यामुळे मुद्रीत सेवांचे वितरण करणे अधिक जलद व सोपे झाले आहे. तसेच, बांधणी विभागातदेखील अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सद्यस्थितीत महानगरपालिका मुद्रणालय कमीत कमी मनुष्यबळात अधिकाधिक व दर्जेदार उत्पादनावर भर देण्याकरिता प्रयत्नशील आहे.

महानगरपालिका मुद्रणालयातील सद्यस्थितीतील तांत्रिक यंत्रणा ही इतर सरकारी व निमसरकारी मुद्रणालयांसाठी आदर्श ठरली आहे.

## १५. बृहन्मुंबई महानगरपालिका मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष :

'महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५' अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रमुख अभिलेख अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सार्वजनिक अभिलेखांचे व्यवस्थापन, वर्गीकरण व जतन करण्यासाठी २००८ साली मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहे.

माननीय आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि. २५.०३.२०13 चे परिपत्रक क्र. एमओएम/३२९३ अन्वये मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष कार्यालयामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व जनमाहिती अधिकारी तथा अभिलेख अधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन अति महत्त्वाच्या सार्वजनिक अभिलेखांचे वर्गीकरण करुन जतन करण्याबाबत आणि कालबाह्य झालेल्या अभिलेखांचे निर्लेखन (विल्हेवाट) करण्याबाबत मार्गदर्शन करीत आहे.

मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष कार्यालयाकडून परिपत्रक क्र. प्रअभिज/अभि/१४ दि. ०७.०७.२०२३ पारित करुन 'महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००७' च्या ८(१) नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते / विभागांकडून त्यांच्या अखात्यारितील अभिलेखांचा वार्षिक अहवाल 'नमुना ५' मध्ये तयार करुन माननीय आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत माननीय संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# पाणी पुरवठा





मध्य वैतरणा धरण



भांडुप जलशुध्दीकरण केंद्र

# पाणी पुरवठा

**जल अभियंता खाते :**

**पाणी पुरवठा**

मुंबई शहराला मुंबईत असलेल्या विहार व तुळशी तसेच, मुंबईपासून सुमारे १००ते १७५ कि. मी. अंतरावर स्थित असलेल्या तानसा, मोडक सागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा आणि भातसा या सात जलस्त्रोतांतून पाणी मिळते.

या स्त्रोतांमधून उपलब्ध झालेले पाणी ५५०० मि.मी. ते २२३५ मि.मी. व्यासाच्या जलवाहिनी आणि बोगद्यामधून भांडुप संकुल (२८१० एम.एल.डी.) आणि पांजरापूर (१३६५ एम.एल.डी.) येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत वाहून आणले जाते. तुळशी (१८ एम.एल.डी.) आणि विहार (९० एम.एल.डी.) येथील जलशुध्दीकरण केंद्र हे स्त्रोताजवळ आहेत. सदर ठिकाणी कोॲग्युलेशन, फ्लोक्युलेशन, सेटलिंग, रॅपिड सँडफिल्टरेशन आणि पोस्ट क्लोरीनेशन या प्रक्रिया आयएस - १०५००:२०१२ मानांकनात नमूद गुणवत्तेनुसार पाणी शुध्द केले जाते.

जलशुध्दीकरण केलेले पाणी भांडुप संकुल (मुंबईतील) व येवई (मुंबई बाहेरील) येथील महासंतुलन जलाशयामध्ये (Master Balancing Reservoir) साठवले जाते. हे पाणी संपूर्ण शहरात अस्तित्वात असलेल्या २७ सेवा जलाशयांना (Service Reservoir) पुरविले जाते. हे संवाहन जाळे सुमारे ४५० कि.मी. लांबीचे असून २४ तास कार्यान्वीत असल्याने यामधील पाणी भूजल / सांडपाण्याने दूषितीकरण होण्याची शक्यता टळते. मुंबईला सध्या दररोज ३९५० दशलक्ष लिटर्स इतका पाणी पुरवठा करण्यात येतो.

**लोकसंख्या वाढीचा अंदाज, पाण्याची मागणी व पाणी पुरवठयात वाढ**

मुंबईच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. सन २०४१ पर्यत मुंबईची अंदाजित लोकसंख्या १७.२४ दशलक्ष आणि पाण्याची मागणी प्रतिदिनी ६५३५ दशलक्ष लिटर्स (मार्गस्थ पुरवठा व वहनातील घट धरुन) इतकी असेल. भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी शासनाने मुंबईसाठी दिलेले गारगाई (४४० दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी), पिंजाळ (८६५ दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी) व दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्प (१५८६ दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी) हे स्त्रोत विकसित करता येण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठयात प्रतिदिनी २८९१ दशलक्ष लिटर्स इतकी वाढ होईल.

| अनु. क्रमांक | स्त्रोत | वर्ष | उपसा (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | | शहरापासुनचे संचयीत अंतर (किमी मध्ये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विहार | १८६० | ९० | ९० | शहरांतर्गत | सध्याचे स्त्रोत |
| २ | तुळशी | १८७२ | १८ | १०८ | शहरांतर्गत | |
| ३ | तानसा | १८९२-१९४५ | ५०० | ६०८ | १०६ | |
| ४ | लोअर वैतरणा | १९५४ | ४५५ | १०६३ | ११९ | |
| ५ | *अप्पर वैतरणा | १९७२ | ६३५ | १६९८ | १६३ | |
| ६ | *भातसा | १९८०-२००७ | २१२० | ३८१८ | १०२ | |
| ७ | मध्य वैतरणा | २०१४ | ४५५ | ४२७३ | १५० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | गारगाई | २०२२-२०२७ | ४४० | ४७१३ | १८० | भविष्यातील स्त्रोत |
| ९ | पिंजाळ | २०२४-२०२५ | ८६५ | ५५७८ | १९५ | |
| १० | दमणगंगा | २०२९-२०३० | १५८६ | ७१६४ | | |

* महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित

**अभय योजना :**

दिनांक १५.०२.२०२० पासून अभय योजनेची अंमलबजावणी सुरू असून, यामुळे जल जोडणीधारकांना थकीत रकमेचे अधिदान केल्यास, अतिरिक्त आकारात सूट मिळत आहे. दि.१ एप्रिल २०२३ ते दि.३१मार्च २०२४पर्यंत ८२५९ जल जोडणी धारकांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे व त्यांना रु. ४०.८५ कोटी सुट देण्यात आली आहे.

**सर्वांसाठी पाणी धोरण :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे २०२२ पासून झोपडपट्ट्या, अनधिकृत बिगर झोपडपट्टी बांधकामे आणि गावठाण, कोळीवाड्यातील रहिवाशांना पाणी पुरवठा मंजूर करण्यासाठी एक सर्व समावेशक धोरण सर्वांसाठी पाणी अंमलात आणले आहे. या धोरणामुळे उपरोक्त सर्वांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ते अधिकृत जलजोडणी घेण्यास पात्र होणार आहेत. या धोरणाअंतर्गत ३१ मार्च २०२४ पर्यंत सुमारे ११४५४ परवानग्या देण्यात आल्या असून त्यापैकी ५००० नविन जलजोडण्यांना देण्यात आल्या आहेत.

**जल वितरण सुधारणा कामे :**

| अनु. क्र. | कामाचे स्वरुप | सन २०२३-२४ आतापर्यंतची झालेली कामे | सन २०२४-२५ मध्ये प्रस्तावित कामे |
|---|---|---|---|
| १. | जुन्या जलवाहिन्या बदलणे/ नविन जलवाहिन्या टाकणे | १०९.२११ कि.मी. | १६६.४३ कि.मी. |
| २. | झडपांच्या कक्षांची दुरूस्ती व पुनर्बांधकाम | २५१८ नग | २३५० नग |
| ३. | सेवा जलजोडण्यांचे नूतणीकरण | ३३६६४ नग | ६११५५ नग |
| ४. | सेवा जलजोडण्यांचे जुडगे काढणे | ३७ नग | १९ नग |

# शिक्षण विभाग





महानगरपालिका अभ्यासिका खोताची वाडी, गिरगाव




महानगरपालिका शाळा, वरळी सी फेस

# शिक्षण विभाग

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ६१ (क्यू) नुसार प्राथमिक शिक्षणाची सुविधा मुलांना उपलब्ध करून देणे, हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे. ही जबाबदारी १९०७ सालापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेचा शिक्षण विभाग पार पाडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये २,६०,२८१ विद्यार्थी महानगरपालिकेच्या ९३८ प्राथमिक शाळांमधून सर्व शैक्षणिक सुविधा घेत असून त्या आठ माध्यमांमध्ये चालविल्या जातात. त्यासाठी ७,३९८ शिक्षक कार्यरत आहेत. तसेच, मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक मुलांसाठी चालविल्या जाणा-या १९ शाळांमध्ये ८७६ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यासाठी ७८ शिक्षक कार्यरत आहेत.

सन २००७-०८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या असून त्यामध्ये ज्युनि. के. जी. ते इयत्ता १० वी पर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२०-२१ पासून सन २०२३-२४ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने सी.बी.एस.ई. मंडळाच्या १४ तसेच आय.सी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई. व आय.बी. मंडळाची प्रत्येकी एक अशा एकूण १७ शाळा सुरु केलेल्या आहेत. सन २०२४-२५ मध्ये सी.बी.एस.ई. मंडळाच्या आणखी ०४ शाळा नव्याने सुरु होणार आहेत.

'बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वय वर्षे ०६ ते १४ पर्यंत असणा-या सर्व प्रवेशपात्र मुला/मुलींना नजीकच्या महानगरपालिकेच्या शाळेत किंवा अनुदानित शाळेत मोफत प्रवेश देऊन शिक्षण प्रवाहात आणले जाते. मुलांना त्यांच्या वयानुरुप वर्गामध्ये प्रवेश दिला जातो. महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील १०० टक्के विद्यार्थी शाळेत प्रवेश घेतील, यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील वरिष्ठ पातळीपासून सर्व यंत्रणा काम करीत असते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता महानगरपालिका शिक्षण विभागाकडून 'एकच लक्ष्य-एक लक्ष' उपक्रम 'मिशन ॲडमिशन' अंतर्गत राबविण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून बहुसंख्य प्रवेशपात्र व शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात महानगरपालिका यशस्वी झालेली आहे. या कार्याची देशपातळीवर दखल घेऊन महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी यांना राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

**माध्यमिक शिक्षण विभाग :**

महानगरपालिका सन १९६५ पासून माध्यमिक शाळाही चालवित असून सध्या ४९ अनुदानित माध्यमिक शाळांमधून शिक्षणाची मोफत सुविधा पुरवित आहे. तसेच, १४२ विनाअनुदानित माध्यमिक शाळाही सद्यस्थितीत सुरु आहेत. एकूण १९१ महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून ३८,४५० विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जात असून सुमारे १,२४४ शिक्षक कार्यरत आहेत.

सन २०२३-२४ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये अनुदानित - १५,४७०, विनाअनुदानित २२,९८० असे एकूण ३८,४५० विद्यार्थी महानगरपालिका माध्यमिक शाळेत शिकत आहेत. माध्यमिक शिक्षण मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती, तेलुगु, कन्नड, तामिळ इ. माध्यमांतून दिले जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून, माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२३ करीता बसलेल्या १७,१४० विद्यार्थ्यांपैकी १४,५२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण ५९ विद्यार्थ्यांनी ९० टक्के व त्याहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा एकूण निकाल ८४.७७% लागला आहे. महानगरपालिकेच्या ४१ शाळांचा निकाल १००% लागला आहे.

गुंदवली एम.पी.एस. शाळेमधील कु. शुभम अवधेश सिंग या विद्यार्थ्याने ९५.२० टक्के गुण मिळवून महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे.

**अध्यापक / विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आर.सी.उर्दू अध्यापक विद्यालय, इमामवाडा व आर.सी.उर्दू अध्यापक विद्यालय, माहिम अशी दोन उर्दू अध्यापक विद्यालये अनुदानित तत्वावर चालविण्यात येत आहेत.

महानगरपालिकेवर आर्थिक भार न येता सद्यस्थितीत विद्यालंकार संस्थेमार्फत १) भवानीशंकर रोड महानगरपालिका शाळा, दादर (प.), २) रतनबाई वालबाई महानगरपालिका शाळा, मुलुंड (प.), व आयडियल या शैक्षणिक संस्थेमार्फत ३) दिक्षित रोड महानगरपालिका शाळा, विलेपार्ले (प.) ही तीन विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये भागीदारी तत्त्वावर सुरु आहेत. सदर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयांमधून महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून शिक्षण घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना इ. ११ वी व १२ वी मध्ये विनामूल्य शिक्षण दिले जाते. तसेच आय आय.टी., जे.ई.ई.सारख्या परीक्षांचीही पूर्वतयारी करुन घेण्यात येते.

**खाजगी प्राथमिक शाळा :**

शिक्षण खाते खाजगी प्राथमिक शाळांना मान्यता देऊन व त्यांची नोंदणी करुन त्यांचे नियमन करते. तसेच, ते सदर शाळांचे प्रशासन व कारभार सुरळीत चालविण्याकरिता मदत करते. उप शिक्षणाधिकारी खाजगी प्राथमिक शाळा विभाग हयांच्या अधिपत्याखाली अनुदानित व विना-अनुदानित शाळा कार्यरत आहेत.

| शाळेचा प्रकार | शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| अनुदानित | ३८५ | १,०६,४४८ | २,५९५ |
| विना-अनुदानित | ६७८ | २,६४,१८५ | ६,५८५ |

**शालेय इमारती :**

शालेय इमारतींची संख्या खाली दिलेल्या तक्त्यांमध्ये दर्शविली आहे :

(२०२३-२४ च्या अहवालानुसार)

| अनु.क्र. | इमारतीचा प्रकार | एकूण शालेय इमारती |
|---|---|---|
| १. | स्वत:च्या मालकीच्या | ४५९ |
| २. | विनाभाडे तत्त्वावर | २३ |
| ३. | भाडे तत्त्वावर | २०७ |
| ४. | सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) | ३२ |
| | **एकूण** | **७२१** |

**दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना :**

अ) शिष्यवृत्ती:- इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी मधील दोन्ही सत्र परीक्षेत 'ब' किंवा त्यापेक्षा वरील श्रेणी प्राप्त होईल, अशा विद्यार्थ्यांना रु.१,०००/- ते रु.२,०००/- पर्यंत वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते.

सन २०२३-२४ या वर्षात एकूण २,६८७ विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

ब) उपस्थिती भत्ता योजना:- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता एकूण ३,५२१ विद्यार्थ्यांना प्रतिदिन रु.२०/- प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची कार्यवाही सन २०२३-२४ मध्ये पूर्ण झाली आहे.

क) सन २०२३ या वर्षात विशेष शाळांतील विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन सुलभ जावे यासाठी 'दिशा' अभ्यासक्रमाच्या ८७८ विद्यार्थ्यांना वर्कबुक वाटप करण्यात आले. सन २०२४-२५मध्ये सदर योजना सुरु राहणार आहेत.

ड) सन २०२३-२४ करीता १८ विशेष शाळेतील विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक शाळेला ०५ प्रकारचे थेरेपी साहित्य देण्यात आले.

**शारीरिक शिक्षण विभाग :**

महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत शारीरिक शिक्षण विभाग कार्यरत असून विभागामार्फत योगासन , कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल, फुटबॉल, ज्युडो, कुस्ती, आटया-पाटया, बास्केटबॉल, बुध्दिबळ, कॅरम, थाय बॉक्सिंग, थांगता, रग्बी सारख्या विविध सांघिक व वैयक्तिक खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. सन २०२३-२४ मध्ये शासकीय व बाह्य संस्थांमार्फत आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्राथमिक विभागाच्या एकूण २,४३५ व माध्यमिक विभागाच्या एकूण ४,०८० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग घेतला.

- शासकीय स्पर्धा व बाह्य संस्थांमार्फत आयोजित राज्य व राष्ट्रीय स्तर स्पर्धेत सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची सांख्यिकी माहिती -

| अ.क्र | स्पर्धा स्तर | प्राथमिक विभाग | माध्यमिक विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य | १५ | ४० | ५५ |
| २ | राष्ट्रीय | ०४ | १७ | २१ |
| | एकूण | १९ | ५७ | ७६ |

- मुंबई क्रिकेट असोसिएशन मार्फत ०८ मैदानांवर क्रिकेट खेळाचे मोफत प्रशिक्षणाचा लाभ महानगरपालिकेच्या ३२७ विद्यार्थ्यांनी घेतला. त्यातील १५ विद्यार्थ्यांची विशेष प्रगत प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.
- महानगरपालिकेच्या जलतरण केंद्रावर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना जलतरणाचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. यात सहभागी १०३ विद्यार्थ्यांपैकी ८६ विद्यार्थ्यांना जलतरणाचे एक वर्षाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.
- महानगरपालिका सर्व खेळ प्रकार समावेशक व पूर्ण सोयीसुविधायुक्त ०३ मुख्य क्रिडा केंद्रांपैकी ०२ मुख्य क्रीडा केंद्र आणि ३२ उप केंद्रांपैकी २३ उप केंद्रांवर सर्व साहित्यासह प्रशिक्षण सुरु झाले आहे.
- श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारीक खेळ महाकुंभ स्पर्धा २०२३-२४ चे आयोजन ८० ठिकाणी करण्यात आले. यामध्ये १६ पारंपारीक खेळांचा समावेश करण्यात आला होता. सदर स्पर्धेत महानगरपालिका शाळांतील ४४,००० पेक्षा जास्त विद्यार्थी होते. एकाच मैदानावर एकाच दिवशी ०८ खेळांचे अंतिम सामने आयोजित केल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदविले गेले असून सदर संस्थेमार्फत शिक्षण विभागाला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**स्काऊट- गाईड विभाग :**

स्काऊट-गाईड ही एक जागतिक चळवळ असून शील संवर्धन, आरोग्य, हस्तव्यवसाय आणि सेवा या चतु:सुत्रीवर आधारीत अभ्यासक्रम राबविला जातो व विविध उपक्रमाद्वारे आदर्श नागरीक घडविले जातात.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये स्काऊट-गाईड चळवळीमध्ये ३१,७६० विद्यार्थी व १,२९२ शिक्षकांची नोंद झाली आहे. या वर्षात १८७ विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार (४२ चतुर्थ चरण, २८ हीरकपंख, ५५ गाईडस व ६२ स्काऊटस) प्राप्त झाले. तसेच ०७ शिशुवीर (स्काऊट) विद्यार्थ्यांना राष्ट्रस्तरीय पुरस्कार (सुवर्णबाण पुरस्कार) प्राप्त झाला आहे. दि.२६ जानेवारी २०२४ रोजी शिवाजी पार्क, दादर येथे झालेल्या शासकीय संचालनात महानगरपालिका स्काऊट-गाईड पथकांनी सहभाग घेतला.

स्काऊट-गाईड प्रशिक्षण केंद्र, पवई येथे महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांकरीता ‘Urban Vegetable Farming’ अंतर्गत ‘किचन गार्डन’ हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. स्काऊट-गाईड अभ्यासक्रमात ‘किचन गार्डन’ या विषयाचा समावेश आहे. त्यामुळे राज्य व राष्ट्रपती पुरस्कार चाचणीकरीता या विषयांचे प्राविण्य पदक मिळविणे आवश्यक असते. तसेच वाढते प्रदुषण व ग्लोबल वार्मिंगला आळा घालण्यासाठी पृथ्वीवर जास्तीत जास्त हिरवळ निर्माण होणे आवश्यक आहे. या कारणांमुळे विद्यार्थ्यांनी सदर उपक्रम हाती घेतला आहे.

**संगीत आणि कला अकादमी :**

**संगीत :**

सुसज्ज व सर्व वाद्य सोयी सुविधांनी अद्ययावत अशी २४ विभागनिहाय संगीत अकादमी शालेय विद्यार्थ्यांसाठी पुनःश्च सुरु करण्याबाबत नियोजन सुरु केले आहे.

यावर्षी समूहगान शिबिर, लोकनृत्य शिबिराबरोबरच नाट्य शिबिर ऐवजी नाट्य संगीत प्रशिक्षण शिबिर आयोजित केले गेले. यामुळे शालेय उपक्रमांचा दर्जा उचांवला आहे. कै. म. वा. देसाई (माजी आयुक्त) स्मृतिदिना निमित्त स्वरांजली चित्रांजली कार्यक्रम, आषाढी एकादशी भक्ती संगीताचा कार्यक्रम लोकप्रिय झाले. तसेच पंडित हरीप्रसाद चौरासिया यांचे पट्टशिष्य पंडित. विवेक सोनार यांचे प्रात्यक्षिक व्याख्यान अत्यंत यशस्वी व उद्बोधनात्मक ठरले. संगीत साप्ताहामध्ये विद्यार्थ्यांच्या कार्यक्रम 'जाऊ संताचिया गावा' व संगीत शिक्षकांची एकांकिका ह्या कार्यक्रमांचे सर्व मान्यवरांनी व रसिक प्रेक्षकांनी विशेष कौतुक केले.

संगीत स्पर्धेत सुमारे ५,००० विद्यार्थी सहभागी झाले, अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेस सुमारे ३०० विद्यार्थी उत्तम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाकरिता सन २०२३-२४ या वर्षातील अत्यंत अभिमानास्पद बाब म्हणजे आपला माजी विद्यार्थी कु. मयूर सुकाळे यांस 'महाराष्ट्र शाहीर' या मराठी चित्रपटामधील 'गाऊ नको रे किसना' गीताच्या पार्श्वगायनाकरिता फिल्म फेअर पुरस्कार मिळाला आहे.

सन २०२३-२४ संगीत स्पर्धा विजेती कु. आशी विपश्यना या विद्यार्थिनीचे 'राधा का भी शाम' हे गीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये खूप गाजले व मान्यवर अधिकारी व रसिकांनी भरभरून कौतुक केले.

दि. १ मे, महाराष्ट्र दिन व मराठी भाषादिन इ. राज्यस्तरीय कार्यक्रम माननीय राज्यपाल यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या सादर झाले.

**कला विभाग :**

- उर्जा संवर्धन स्पर्धेत ०४ विद्यार्थीनींची राज्यस्तरावर निवड झाली.
- महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मार्फत ऑक्टोबर २०२३ मध्ये शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते.
- एलिमेंटरी परीक्षेमध्ये ३,३७२ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी ३,०८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात २०० विद्यार्थ्यांना 'ए' ग्रेड, ७१९ विद्यार्थ्यांना 'बी' ग्रेड प्राप्त झाली.
- इंटरमिजीएट परीक्षेमध्ये १,४९७ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १,३५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात ११४ विद्यार्थ्यांना 'ए' ग्रेड, २७८ विद्यार्थ्यांना 'बी' ग्रेड प्राप्त झाली.
- बॉम्बे आर्ट सोसायटी १३२ व्या चित्र प्रदर्शनात कलाकार विभागात कला निदेशक यांच्या चित्रास पारितोषिक प्राप्त झाले.
- आर्ट सोसायटी ऑफ इंडिया १०६ व्या चित्र प्रदर्शनात शिवाजीनगर महानगरपालिका शाळांच्या चित्रांची निवड झाली.
- दिनांक १५, १६ व १७ डिसेंबर २०२३ या कालावधीत नेस्को, गोरेगाव पूर्व येथे बालचित्रकला,निवडक चित्रांचे छायाचित्रण प्रदर्शन भरविण्यात आले.
- मान. महापौर आयोजित 'माझी मुंबई' या संकल्पनेवर आधारित 'जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे बालचित्रकला स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. सन २०२३-२४ करिता सदर स्पर्धा रविवार, दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी मुंबईतील ४८ मैदाने / उद्यानात आयोजित

करण्यात आली होती. सदर स्पर्धेत ८८,७४२ विद्यार्थी सहभागी झाले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दिनांक २१ मार्च २०२४ रोजी हम्बोल्ट पेंग्विन सभागृह, वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय येथे संपन्न झाला.

- महानगरपालिका कलाशिक्षकांच्या मुरुड, जंजिरा येथे डिसेंबर २०२३ मध्ये संपन्न झालेल्या आर्टिस्ट कॅम्प मध्ये निर्मित चित्रांचे प्रदर्शन नेहरू सेंटर कलादालन, वरळी येथे दि.०५ ते ११ मार्च २०२४ या कालावधीत भरविण्यात आले.

**कार्यानुभव :**

कार्यानुभव विषयातून कलागुणांचा विकास होण्याकरिता विविध उपक्रम राबविले जातात. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत कौशल्य विकासावर आधारीत व्यवसायाभिमुख विविध उपक्रमांवर जास्तीत जास्त भर देण्यात आलेला आहे. ज्यामध्ये अनिवार्य उपक्रमातून, गरजाधिष्टीत उपक्रमातून, उत्पादक उपक्रमातून, पर्यावरण संरक्षणाची जाणीव करून दिली जाते. जलसाक्षरता व आपत्ती व्यवस्थापन विषयी जनजागृती केली जाते. उपलब्ध साधन सुविधा व विद्यार्थ्यांची आवड व गरजा लक्षात घेऊन ऐच्छिक उपक्रमांतर्गत उत्पादक क्षेत्रात आपल्या सणाप्रमाणे राखी तयार करणे, भेटकार्ड तयार करणे, कागदी पिशवी तयार करणे, आकाश कंदील तयार करणे, कटवर्क रांगोळी तयार करणे, पणती तयार करणे, पतंग तयार करणे, मध्यवर्ती विद्यार्थी स्पर्धा, मध्यवर्ती शिक्षक स्पर्धा, शिक्षक लघुउद्योग क्षेत्राला भेट इ. चे आयोजन करण्यात येते.

सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत अंदाजे १८,५२३ विद्यार्थांनी सहभाग घेतला व ३,९४८ विद्यार्थांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले.

सन २०२४-२५ मध्ये सदर स्पर्धा,उपक्रम,कार्यशाळा क्षेत्र भेट सुरू राहणार आहेत.

**व्हर्च्यु अल क्लासरुम (व्ही.टी.सी.) :**

सन २०११ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने व्हर्च्युअल क्लासरुमची स्थापना केली. सद्यस्थितीत मराठी, हिंदी, ऊर्दू व इंग्रजी या ०४ माध्यमाच्या एकूण ४८० व्ही.टी.सी. शाळांमध्ये (३६० प्राथमिक व १२० माध्यमिक) तज्ज्ञ शिक्षकांच्या व्याख्यानांचे थेट प्रक्षेपण होत आहेत . इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी च्या प्रत्येक इयत्तेसाठी मराठी , हिंदी, उर्दू व इंग्रजी या चार माध्यमाद्वारे अध्यापनाचे कार्य राबविले जात आहे.

**संगणक प्रयोगशाळा अद्ययावतीकरण :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत २२४ (प्राथमिक १९३ व माध्यमिक ३१) संगणक प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण करणे व ५० संगणक प्रयोगशाळांमध्ये (प्राथमिक ४१ व माध्यमिक ०९) अतिरिक्त संगणक संचांची खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यापैकी सन २०२३-२४ मध्ये ११२ संगणक प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण तसेच ३८ संगणक संचांची खरेदी करण्यात येणार आहे.

**डिजिटल क्लासरुम :**

सन २०२२-२३ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील १,३०० वर्गखोल्या इंटरॲक्टिव पॅनलद्वारे डिजिटल करण्यासाठी यांत्रिक व विद्युत (वि. स.) विभागामार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून महानगरपालिकेच्या शाळेत डिजिटल वर्ग बसविण्यासाठी विद्युतीकरण (Electrification work) कामाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे व कंत्राटदारामार्फत शाळेत पुरवठा करण्यात आलेला आहे.

**शाळा व्यवस्थापन माहिती यंत्रणा :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळेत शैक्षणिक कामाबरोबरच इतर प्रशासकीय कामे करणेही आवश्यक असते. त्यामुळे शाळेतील सर्व आवश्यक माहिती संकलित करुन त्यामध्ये एकरुपता येण्यासाठी व वेळोवेळी सादर करण्यात आलेल्या माहितीचे निरीक्षण व अवलोकन करण्यासाठी शाळा व्यवस्थापन यंत्रणा माहिती आज्ञावली महानगरपालिकेच्या सर्व शाळेत सुरु करण्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. यामध्ये सर्व मुख्याध्यापकांना Mobile App ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या बदल्यांबाबत ऑनलाईन सॉफ्टवेअर निर्मिती :**

मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या बदल्यांबाबत ऑनलाईन सॉफ्टवेअर विकसित करण्याचे नियोजित आहे. शिक्षण विभागातील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या बदल्यांचे धोरण निश्चित करुन मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअरद्वारे पारदर्शक बदल्या करण्यात येतील. शासन नियमानुसार पात्र शिक्षकांच्या बदल्या करण्यात येतील.

**ई - वाचनालय :**

सन २०२०-२१ मध्ये महानगरपालिकेच्या २५ माध्यमिक शाळेत ई-वाचनालयाची उभारणी करण्यात आलेली आहे. या ई-वाचनालयामध्ये इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे सर्व विषय तसेच आवश्यक संदर्भ ग्रंथ मोफत स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदर ई-वाचनालयाची उपयुक्तता लक्षात घेऊन सन २०२४-२५मध्ये महानगरपालिकेच्या ५० प्राथमिक शाळांमध्ये ई-वाचनालयाची उभारणी करण्यात येणार आहे.

**गॅमिफाईड लर्निंग ऍप :**

बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील इयत्ता१० वी च्या विद्यार्थ्यांकरीता Ieamified Learning App उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. ई-सामग्रीयुक्त Gamified Learning App ( खेळातून शिक्षण) या ई प्रणालीचा महानगरपालिका शाळांतील इयत्ता१० वीच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

**चित्रफीत :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे महानगरपालिका शाळांतील मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरिता केल्या जाणा-या प्रयत्नांची माहिती चित्रफित स्वरुपात सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. याकरिता विविध उपक्रमांची माहिती देणारे चित्रफित तयार करून विविध माध्यमांद्वारे (टिव्ही, इंटरनेट) प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

**शालेय विद्यार्थांसाठी जलशुध्दीकरण यंत्रे व परिरक्षण :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रे बसविण्यात आलेली आहेत.

**शालेय विद्यार्थांच्या बैठक व्यवस्थेसाठी एम.डी.एफ. डेस्क-चेअर :**

महानगरपालिका शाळांतील इयत्ता ०१ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या संख्येतील वाढ होत आहे. तसेच वापरातील डेस्क बेंच मोडकळीस आलेले आहेत यास्तव विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेकरीता सन २०२३-२४ व २०२४-२५ प्राथमिक विभागाकरीता २२,४५० डेस्क व ३७,४५८ खुर्ची व माध्यमिक विभागाकरीता ६,३२० डेस्क व १२,६४० खुर्ची खरेदी बाबतची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

**शालेय विद्यार्थांसाठी मोफत प्रवास अंतर्गत बेस्ट बस (चलो स्मार्ट कार्ड) :**

सन २०१६-१७ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील गणवेशधारी विद्यार्थ्यांसाठी बेस्ट उपक्रमाच्या सवलतीच्या योजने अंतर्गत महानगरपालिका शाळा विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करून बेस्ट बसेसचे पास तसेच काही ठिकाणी विशेष फेरी बस सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इयत्ता ०१ ली ते इ.१० वीतील गणवेशधारी विद्यार्थ्यांना त्यांच्या निवासस्थानापासून ते शाळेपर्यंत बेस्ट बस मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तसेच, ज्या मार्गावर बेस्ट विभागांची वाहने उपलब्ध नाहीत अशा मार्गावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांकरिता विशेष बस सेवा पुरविण्यात येत आहे.

**सेंद्रिय शेती (किचन गार्डन) :**

बृहन्मुंबई महानगरपलिका व महाराष्ट्र शासन सचिव, जिल्हा नियोजन समिति मुंबई शहर यांच्या संयुक्त योगदानाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील १०० शालेय इमारतींमध्ये सेंद्रिय शेती (किचन गार्डन)

स्थापन करण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पांतर्गत शहरातील विद्यार्थ्यांना सेंद्रिय पध्दतीने पिकविल्या जाणा-या भाज्यांचे महत्त्व समजेल. विद्यार्थ्यांना सुदृढ, निरोगी आरोग्य प्राप्त होण्यास मदत होईल. उपयुक्त आणि पर्यावरणपूरक भाजीपाला उपलब्ध होऊ शकेल. शालेय परिसर सुंदर होण्यास मदत होईल.

**खुली अथवा बंदिस्त व्यायाम शाळा :**

बृहन्मुंबई महानगरपलिका व महाराष्ट्र शासन सचिव, जिल्हा नियोजन समिती मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पश्चिम उपनगर विभागातील १०० शालेय इमारती व पूर्व उपनगरे विभागातील १०० शालेय इमारतींमध्ये अशा खुल्या अथवा बंदिस्त व्यायाम शाळा स्थापन करण्यात येत आहेत.

**ग्रंथालय विभाग :**

बृहन्मुंबई परिसरातील नागरिकांना, विद्यार्थ्यांना ग्रंथालय /वाचनालय सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने मुंबई परिसरात एकूण ४३सार्वजनिक ग्रंथालये/वाचनालये शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षणाखाली चालविण्यात येतात. हयापैकी एकूण २९ ग्रंथालये/वाचनालये करारांतर्गत परिरक्षण व व्यवस्थापनाकरिता सन १९६५ पासून 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' हया संस्थेस चालविण्यासाठी दिलेली आहेत. ०२ ग्रंथालये/वाचनालये राज्य शासनामार्फत चालविण्यात येत आहेत. ०४ ग्रंथालये/वाचनालये ही मागाठाणे मित्रमंडळ, भारत विकास परिषद, शैलेंद्र एज्युकेशन सोसा. व दहिसर स्पोर्टस हया खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत.

सार्वजनिक उद्दिष्टांसाठी ग्रंथालयाकरिता आरक्षित असलेल्या ०६ जागा काळजीवाहू तत्वावर परिरक्षण व व्यवस्थापनेकरिता मुंबई परिसरातील नामांकित ०६ संस्थांना देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या जागेत सुस्थितीत ग्रंथालये/वाचनालये सुरू आहेत. त्यापैकी बॉम्बे सेंटर फॉर डेफ व श्यामराव विठ्ठल को. बँक लि. ही ०२ ग्रंथालये /वाचनालये सद्यस्थितीत बंद आहेत. महानगरपालिकेच्यावतीने सार्वजनिक उद्दिष्टांसाठी ग्रंथालयाकरिता आरक्षित असलेल्या 'आर/उत्तर' विभागातील दहिसर (प.) येथे स्थानिक विद्यार्थ्यांसाठी ई-ग्रंथालय व अभ्यासिका तसेच 'एम/पश्चिम' विभागातील चेंबूर येथे स्थानिक विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालविण्यात येत आहेत.

शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या ज्ञान व मनोरंजनासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी उपयुक्त असलेली शैक्षणिक संदर्भसेवा उपलब्ध करून देण्याकरिता परिमंडळनिहाय ०६शिक्षक ग्रंथालये चालविण्यात येत आहेत. त्यापैकी दादर हिंदू कॉलनी येथील इमारत नव्याने बांधत असल्याने तेथील ग्रंथालय हे ग्रँटरोड, गिल्डर टँक येथील म.न.पा. शिक्षक ग्रंथालयात तात्पुरत्या स्वरूपात विलीन करून सुरू करण्यात आलेले आहे. हया ग्रंथालयांचा वापर परिमंडळीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच इतर विभागातील कर्मचारीही करीत आहेत.

**शालेय वाचनालय :**

केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम (R.T.E.) २००९ कायद्यांतर्गत प्रत्येक शाळेत ग्रंथालय असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वतीने २०१९-२० या शैक्षणिक वर्षात रूम टू रिड या संस्थेच्या सहकार्याने ३४ शाळांमधून तसेच २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ५५ शाळांमधून ग्रंथालये तयार करून घेण्यात आलेली आहेत. अशा महानगरपालिकेच्या एकूण ४०६ शाळेत ग्रंथालये सुरु असून हया ग्रंथालयांचा वापर त्या त्या संकुलातील सर्व भाषिक विद्यार्थी करीत आहेत.

**विज्ञान कुतुहल भवन :**

विज्ञान कुतुहल भवन हा विज्ञान, खगोल, भूगोल व आरोग्य या विषयावरील चलत प्रतिकृतींचा बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचा केंद्रीय स्वरुपाचा स्वतंत्र प्रकल्प असून तेथे चलत प्रतिकृतींचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी सर्वभाषिक शाळांचे विद्यार्थी वार्षिक नियोजनानुसार ०३ मिनी बसच्या सहाय्याने आणले जातात. तसेच या प्रकल्पाचा लाभ खाजगी माध्यमिक शाळा, डि.एड., बी.एड. कॉलेज व नागरीक विनामूल्य घेत असतात. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात विज्ञान कुतुहल भवनास '९,०२६ विद्यार्थी, ४१५ शिक्षक, १८ शिपाई असे एकूण ९,४५९ लोकांनी लाभ घेतलेला आहे.

**वैद्यकीय अधिकारी (शाळा) विभाग :**

**शालेय आरोग्य सेवा :-**

शालेय आरोग्य विभागातर्फे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ०१ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी केली जाते. सदर वैद्यकीय तपासणी वैद्यकीय पथकांमार्फत माहे जून ते एप्रिल या शैक्षणिक वर्षात, क्रमशः प्रत्येक शाळेत जाऊन केली जाते. वैद्यकीय पथकामध्ये एक वैद्यकीय अधिकारी, एक कनिष्ठ परिचारीका व एक शिपाई यांचा समावेश असतो.

या तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांमध्ये जन्मजात व्यंग, आजार, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व वाढीच्या समस्या इ. प्रकारचे आजार आढळून आल्यास त्यांना रोगनिदान व उपचारासाठी आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका दवाखाने, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना व रुग्णालयातील शालेय चिकित्सालयात संदर्भित करुन होणारे उपचार व शस्त्रक्रियांबाबतचा पाठपुरावा घेण्यात येतो. सदर उपचार व शस्त्रक्रिया मुलांवर मोफत केली जातात. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये माहे जून २०२३ते मार्च २०२४ या कालावधी मध्ये १,२८,४२९' मुले व १,२६,०६९ मुली अशा एकुण २,५४,४९८ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

- चष्मे वाटप- वैद्यकिय तपासणी दरम्यान दृष्टीदोष आढळलेल्या मुलांची पुढील चाचणी करुन त्यांना चष्मे वाटप करण्यात येतात. सन २०२३-२४ मधे एकूण १,८८६ (बृहन्मुंबई महानगरपालिका १,१०५ अधिक स्वंयसेवी संस्था ७८१) इतके चष्मे वाटप करण्यात आले.
- राष्ट्रीय जंतनाशक मोहिम- या कार्यक्रमांतर्गत मुलांना वर्षातून दोनदा जंतनाशक गोळी शिक्षकांच्या देखरेखीखाली दिली जाते. महानगरपालिका शाळा व महानगरपालिका अनुदानित शाळेत जाणा-या मुलांना दि.१३ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व दि. २० फेब्रुवारी २०२४ मॉप अप दिन राबविण्यात आला. यामध्ये एकूण ३,९२,४१० मुलांपैकी ३,७६,७९९ (९६.२०%) इतक्या मुलांना जंतनाशक गोळी खाण्यास देण्यात आली.

**माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य :**

मार्च २०२० पासून महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रथम येणाऱ्या २५ विद्यार्थ्यां करीता पदवी/व्यावसायिक शिक्षणासाठी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी रु.२५,०००/- इतकी रक्कम अथवा संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पूर्ण शैक्षणिक शुल्काचा (Only Tuition Fee) महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो. यामुळे पालिका शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरची सर्वोत्कृष्ट संधी उपलब्ध होते.

**उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरीता (Career Counselling) कार्यक्रम :**

विद्यार्थ्यांना सर्वंकष माहिती असावी याकरीता Career Aware या कार्यक्रमांतर्गत एक पाऊल पुढे जाऊन अंतरंग फाऊंडेशनच्या लोकसहभागामधून महानगरपालिका माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९वी व इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांकरीता मार्च २०२१ पासून व्हॉट्सएप चॅटबॉट उपक्रम सुरु करण्यात आला आहे व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया पार पाडण्याकरीता विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जात आहे.

**शाळा सुधार प्रकल्प :**

शिक्षण विभाग, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेच्या भागीदारीने दोन उपक्रम राबवित आहे. '**समर्थ उपक्रम**' आणि '**ऊर्जा उपक्रम**'.

- **समर्थ उपक्रम :** शिक्षकांचे अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी जागतिक स्तरावर अंमलात आणण्यात येत असलेल्या अध्यापन शास्त्राबाबत ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन 'समर्थ उपक्रम' अंतर्गत केले जाते.
- **ऊर्जा उपक्रम :** या बरोबरच सर्व विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ निरोगी ठेवण्यासाठी त्रैवार्षिक उर्जा उपक्रम हाती घेतलेला आहे. सदर उपक्रम टप्प्या-टप्प्याने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मानसिक अस्वास्थाची स्क्रीनिंग करण्याबाबत सर्व शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे

- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये उर्वरित वॉर्डातील प्राथमिक शाळेतील सुमारे ५,००० शिक्षकांना व माध्यमिक शाळेतील सुमारे ७०० शिक्षकांना ऑफलाईन प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात आली. अशाप्रकारे मानसिक आजाराने ग्रस्त विद्यार्थ्यांचे प्रारंभिक स्तरावर निदान करुन व समुपदेशनाद्वारे उपचार करुन विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ सुदृढ करता येईल.

**मोफत पाठयपुस्तके वाटप :**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठयपुस्तक योजनेतून मुंबई महानगरपालिकेच्या इयत्ता ०१ ली ते इयत्ता ०८ वी तसेच खाजगी अनुदानित शाळांतील इयत्ता ०१ ली इयत्ता ते ०४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना १५,९३,१८३ मोफत पाठयपुस्तके पुरविण्यात आली.

**मोफत शैक्षणिक साहित्य वाटप :**

सद्यस्थितीत शिक्षण विभागामार्फत सन २०२२-२३ व सन २०२३-२४ साठी सर्व शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आलेले आहे.

**टॅब :**

बृहन्मुंबई महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान अवगत होण्यासाठी व बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण मिळण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये २२,७९९, सन २०१६-१७ मध्ये २१,०४४ व सन२०१७-१८ मध्ये १८,०७८ टॅब इयत्ता ०८वी, ०९वी व १०वी च्या मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात आले होते. सन २०२१-२२ मध्ये इयत्ता१० वीच्या विद्यार्थ्यांना १९,४०१ टॅब पहिल्या वर्षाच्या मूळ Warranty सह पुढील ०४ वर्षाची Extended Warranty (सन २०२२-२३ ते २०२५-२६पर्यंत) सह पुरवठा करण्यात आलेला आहे.

**इन्सिनरेटर मशीनसह सॅनिटरी नॅपकीन :**

सन २०१८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील इयत्ता ०६वी ते इयत्ता ०८ वीच्या विद्यार्थीनींकरिता वेंडींग मशीनसह सॅनिटरी नॅपकीन विथ डिसपोझेबल पाऊच पुरविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिका शाळेतील विद्यार्थीनींना सन २०२२-२०२३ पर्यंत सॅनिटरी नॅपकीनचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच सन २०२३-२४ व २०२४-२५ करिता इन्सिनरेटर मशीनसह सॅनिटरी नॅपकीन (वेंडींग मशीनशिवाय) पुरविण्याबाबतची ई - निविदा प्रक्रीयेची कार्यवाही उप प्रमुख अभियंता (म.ख.खा.) भायखळा कार्यालयाकडून कार्यान्वित आहे.

**सी.सी.टी.व्ही. कॅमेरा :**

महानगरपालिका शालेय विद्यार्थी, शिक्षक, शालेय इमारत, साधन सामुग्री, शालेय परिसर आदी भौतिक सुविधांना समाजकंटकापासून सुरक्षितता उपलब्ध करुन देण्यासाठी प्रथमतः बृहन्मुंबई महानगरपालिका शहर विभागातील शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली असून निविदेबाबतची कंत्राटदार नियुक्तीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

**आर्थिक साक्षरता मिशन (Mission Financial Literacy):**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा भविष्यात आर्थिक स्तर उंचावण्यासाठी 'बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टीटयुट लिमिटेड' यांच्या सहयोगाने 'आर्थिक साक्षरता मिशन' (Mission Financial Literacy) उपक्रम राबविला जात आहे. त्या अनुषंगाने १०० मास्टर ट्रेनर्सना आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांच्यामार्फत महानगरपालिकेच्या इतर सर्व शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षित शिक्षक इयत्ता०८वी व इयत्ता ०९वीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे शिक्षण देत आहेत.

**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना :**

केंद्र शासन व राज्य शासनाने विहित केलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळांतील इयत्ता ०१ ली ते इयत्ता ०५ वी मधील विद्यार्थ्यांना वर्षातून किमान २२२ दिवस ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त ४०० ते ४५० ग्रॅम शिजविलेला आहार पुरविण्यात येतो. त्याचप्रमाणे इयत्ता ०६ वी व इयत्ता ०८वी मधील विद्यार्थ्यांना वर्षातून किमान २२२ दिवस ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त ७०० ते ७५० ग्रॅम शिजविलेला आहार पुरविण्यात येतो.

**महापौर पुरस्कार :**

विद्यादानाचे पवित्र कार्य करणा-या शिक्षकांना प्रोत्साहित करावे, त्यांना प्रेरणा व स्फूर्ती मिळावी व त्यातून त्यांनी उद्याचे भावी नागरिक घडविताना तन, मन, धनाने कार्य करावे याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक, विशेष शाळा तसेच खाजगी अनुदानित शाळांतील ५० मुख्याध्यापक, प्रशिक्षकांना भारताचे भुतपूर्व राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी, दि.०५ सप्टेंबर रोजी मान.महापौरांच्या हस्ते आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

**बालकोत्सव :**

बृहन्मुंबई महानगरपालिका शाळागृहांमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आपल्या नृत्य, संगीत व अभिनय गुणांचा अविष्कार दाखविण्याची उत्तम संधी उपलब्ध करुन देण्यात येते व संपूर्ण महानगरपालिकेतून जवळ जवळ २०,५२० विद्यार्थी सहभागी होणारी ही महत्वपूर्ण स्पर्धा आहे. ही स्पर्धा विभागस्तर, महापालिका स्तरावर आयोजित करण्यात येते. बालकोत्सव स्पर्धेअंतर्गत तीन प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यामध्ये नाट्यस्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा विभागस्तरावर घेण्यात येते.

**पथनाट्य स्पर्धा :**

दरवर्षी महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांची चमक दाखविण्यासाठी अत्यंत मर्यादित साधन सामुग्रीच्या आधारे परिसरातील ज्वलंत समस्येवर अनोखी कलाकृती सादर करण्याच्या हेतूने हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे तीन परीमंडळातून तीन वेगवेगळे विषय देऊन पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केले जाते.

सन २०२३-२४ ची यावर्षी कार्यबाहुल्यामुळे स्पर्धा होऊ शकली नाही.

**शिष्यवृत्ती परीक्षा :**

पूर्व उच्च प्राथमिक शाळा व पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणे आयोजित इयत्ता०५ वी व इयत्ता ०८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी महत्वपूर्ण शाळाबाह्य स्पर्धा परीक्षा असून ही परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुस-या किंवा तिस-या आठवड्यात घेण्यात येते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेकडून सन २०२३-२४ या कालावधीतील शिष्यवृत्ती परीक्षा ही दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद आयोजित N.M.M.S. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा २०२३-२४ मध्ये यावर्षी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील १८१ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.

**विद्यार्थीनींसाठी मुदत ठेव योजना (मुलींचा उपस्थिती भत्ता) :**

सन २०२३-२४ मध्ये इयत्ता ०८ वीच्या प्राथमिक व माध्यमिक विभागातील एकूण ११,९२० विद्यार्थीनींना योजनेचा लाभ मिळाला आहे.

**शैक्षणिक सहल :**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ०४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी 'वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालय, भायखळा' व इयत्ता ०७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'किड्झानिया थीम पार्क, घाटकोपर' या ठिकाणी सहली आयोजित करण्यात आल्या होत्या.

**बालवाडी :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सद्यस्थितीत बाह्य संस्थेद्वारे (बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांची नियुक्ती व व्यवस्थापन याबाबत सेवा घेतली जाते) आठ भाषिक एकूण ९०० बालवाडी वर्ग चालविण्यात येत आहेत.

**जिल्हा प्रशिक्षण केंद्र :**

ज्ञानपीठ पुरुस्कार विजेते मराठी लेखक, कवी व नाटककार वि.वा.शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्ताने दि. २७ फेब्रुवारी रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्रामार्फत मराठी भाषा गौरव पुस्तिका तयार करण्यात आली.

**हाऊसकिपींग :**

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत सर्व शाळा इमारतींसाठी स्वच्छता, सुरक्षा व सभोवतालच्या परिसराची स्वच्छता याकरीता सार्वजनिक वृत्तपत्राद्वारे निविदा मागवून २००९ पासून बाहय कंत्राटदारांची नेमणूक करण्यास सुरुवात झाली होती. त्याअनुषंगाने सन २०१६-२०१९ या कालावधीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची स्वच्छता, सुरक्षा व सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करण्यासाठी तसेच बाहेरील व्यक्तींकडून समाजघातक प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी सन २०१९ पासून खाजगी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील स्वच्छता तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत झाली. तसेच सभोवतालच्या परिसराचीही स्वच्छता होत असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होत आहे.

# आरोग्य सेवा





डायलिसिस कक्ष, लो.टी.म्मा.सा. रुग्णालय, शीव



किटक नियंत्रण विभागाची धुम्र फवारणी

# आरोग्य सेवा

बृहन्मुंबई महानगरपालिकेची सार्वजनिक आरोग्य विषयक सेवाकार्ये मुख्यत्वे करुन पुढील प्रमाणे आहेत.

**कुष्ठरुग्णांसाठी ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय, वडाळा :**

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय दि. ०७ नोव्हेंबर १८९० रोजी तत्कालिन महानगरपालिका आयुक्त श्री. ॲक्वर्थ यांनी स्थापन केले. एप्रिल १९९१ पासून हे रुग्णालय पूर्णपणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतले असून कार्यकारी आरोग्य अधिका-यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विशेष रुग्णालयांपैकी एक म्हणून कार्यरत आहे.

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयातर्फे पुरविल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवा खालीलप्रमाणे आहेत :-

१) **आंतररुग्णसेवा :** सध्याची आंतररुग्ण शय्याभरती ४० टक्के असून सर्व आंतररुग्णांना अन्न ,वस्त्र, निवारा या सुविधा पुरविल्या जातात. कुष्ठरोग व संबधित इतर आजारांवर वैद्यकिय उपचारांबरोबर पुनर्वसनात्मक व कल्याणकारी सेवा ही आंतररुग्णांना पुरविल्या जातात.

२) **बाह्य रुग्णसेवा :** रोगनिदान व उपचार सुविधांबरोबर भौतिकोपचार, प्रयोगशाळा, दवाखाना, समाजसेवा, व्रणोपचार या सोयीही बाह्यरुग्ण विभागात उपलब्ध आहेत. या विभागात सरासरी ४५ रुग्ण दररोज येत असतात.

३) **कार्यक्षेत्रातील कार्य :** राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या 'इ' ,'एफ/ उत्तर' व 'एफ/दक्षिण' विभागात कुष्ठरोग विषयक सर्वेक्षण, आरोग्यशिक्षण व उपचार कार्यक्रम या रुग्णालया तर्फे हाती घेतले जातात.

४) **ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय व स्वंयसेवी संस्था यांचे संयुक्त कार्यक्रम :**

- **ॲक्वर्थ कुष्ठरोग संग्रहालय** : कुष्ठरोगाविषयी संपूर्ण शास्त्रोक्त माहिती देणारे हे भारतातील एकमेव संग्रहालय आहे.
- **फुटवेअर विभाग** : या विभागातर्फे कुष्ठरुग्णांना आवश्यक असणारे फुटवेअर व स्प्लिंटस सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिले जातात.

**मुंबई जिल्हयाचा रुग्णनिहाय अहवाल - सन २०२३-२४**

| | |
|---|---|
| नविन शोधलेले रुग्ण | : ६०२ |
| नविन रुग्णापैकी सांसर्गिक रुग्ण | : ४१६ |
| नविन रुग्णांपैकी असांसर्गिक रुग्ण | : १८६ |
| पी.आर. | : ०.४ (दर दहा हजारी) |

**आरोग्य शिक्षण -**

ॲक्वर्थ रुग्णालय 'एफ/उत्तर', 'एफ/दक्षिण' व 'ई' विभागात कुष्ठरोग विषयक आरोग्य शिक्षणाचे मोलाचे कार्य करते. ज्यायोगे कुष्ठरोग विषयी समाजात असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होते. प्रतिवर्षी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दि. ३१ जानेवारी ते दि. १३ फेब्रुवारीच्या दरम्यान कुष्ठरोग निर्मूलन पंधरवडयाचे आयोजन केले जाते. या पंधरवड्या दरम्यान कुष्ठरोग क्षेत्रात काम करणा-या सर्व संस्थांमार्फत त्यांच्या कार्यक्षत्रात प्रभावीपणे जन जागृती व आरोग्य शिक्षणाचे अभियान राबविले जाते.

**नेत्र रुग्णालय :**

बृहन्मुंबई महानगरपालिका, सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत, मौलाना शौकत अली रोड, दुर्गादेवी उद्यानासमोर, मुंबई ४०० ००८ येथे सन १९४० पासून महानगरपालिकेचे एकमेव नेत्र रुग्णालय कार्यरत आहे. सदर रुग्णालयात ८० रुग्णशय्यांची सोय असून, प्रमुख वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली डोळ्यांना होणा-या सर्व विकारांवर विविध उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातात. केंद्र शासन व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची अंमल बजावणी या रुग्णालया मार्फत करण्यात येते.

सन २०२० या वर्षात मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालयात कोविड -१९ च्या रुग्णांकरीता विलगिकरण व लसीकरण कक्ष चालू करण्यात आले होते. सन २०२३ या वर्षी ५७,५८६ बाह्य रुग्णांवर उपचार करण्यात आले व एकूण १,७८३ डोळ्यांच्या शस्त्रक्रीया करण्यात आल्या.

**सानेगुरुजी मार्ग येथील संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रुग्णालय :**

मुंबई महानगरपालिकेचे संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रुग्णालय हे आग्नेय आशियातील संसर्गजन्य रोगांचे सर्वात मोठे रुग्णालय आहे. सर्व प्रकारच्या संसर्गजन्य रोगांचे रुग्ण ह्या रुग्णालयात दाखल केले जातात.

१) संसर्गजन्य रोग उदा. कांजण्या, गोवर, गालगुंड, ए.एफ.पी., कावीळ (ए, बी, सी, इ आणि इतर कावीळ), ताप विषमज्वर, मलेरीया, लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, एच१एन१, एच३एन२, मस्तिष्कदाह, हगवण, उलटी-जुलाब, पटकी, घटसर्प, डांग्या खोकला, रेबीज व कोविड-१९ (क्षयरोग, गुप्तरोग व कुष्ठरोग वगळून) तसेच नव्याने उद्भवणाऱ्या आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण येथे वेगळे ठेवण्यात येऊन त्यांच्यावर उपचार केले जातात. प्लेग व पटकी ह्या रोगांची लागण झालेले रोगी सक्तीने ह्या रुग्णालयात हलविण्यात येतात.

२) स्वाईन फ्लू कोविड-१९ व गोवर रुग्णांसाठी विलगीकरण कक्ष उपलब्ध केला आहे.

३) सप्टेंबर २०२२ मध्ये गोवर रुग्णांच्या साथीचा प्रतिबंध करण्यासाठी कस्तुरबा रुग्णालयात विशेष प्रयत्न केले.

४) कस्तुरबा रुग्णालयात भाजलेल्या रुग्णांसाठी २५ खाटांचे व संसर्गजन्य आजारांच्या रुग्णांसाठी २० व्हेंटिलेटर्स व इतर सुविधांसहीत २० खाटांचे अतिदक्षता विभाग उपलब्ध आहे.

५) कस्तुरबा रुग्णालयात रुग्णांसाठी (१०८०, ३६० व १९० लिटर्स प्रत्येक मिनिट) असे तीन ऑक्सिजन जनरेटर प्लांटची सोय आहे.

६) कस्तुरबा रुग्णालयात १० खाटांच्या विलगीकरण कक्षाची (निगेटिव्ह प्रेशरसह) उभारणी चाचणी व कार्यान्वितीकरण करण्यात आले आहे.

७) कस्तुरबा रुग्णालयात एच. बी. ओटी. (Hyperbaric Oxygen Therapy) ची सोय उपलब्ध आहे.

८) कस्तुरबा रुग्णालयात क्षयरोग रुग्णांसाठी क्षयरोग प्रयोगशाळेची उभारणी करण्यात आली आहे.

९) कस्तुरबा रुग्णालयात व्हायरल रिसर्च डायग्नॉस्टिक लॅब (V.R.D.L.) प्रस्तावित आहे.

**मध्यवर्ती विश्लेषण प्रयोगशाळा -**

कस्तुरबा रूग्णालयातील मध्यवर्ती विश्लेषण प्रयोगशाळा सन १९८७ पासून कार्यरत आहे. सदर प्रयोगशाळा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य रूग्णालये, प्रसुतिगृहे व दवाखाने येथे पुरवठा करण्यात येणा-या औषधांचे विश्लेषण करून त्यांचा दर्जा ठरविण्याचे काम करते.

**असंसर्गजन्य आजार कक्ष**

- **कार्यक्रमांची उद्दिष्टे :-** मधुमेह, उच्च रक्तदाब, सामान्य कर्करोग - मुख, स्तन, गर्भाशय मुख आणि मानसिक आजार यासारख्या असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी वस्ती पातळीवर आणि बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्य केंद्र / दवाखाना / रुग्णालय पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.
- **बृहन्मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्पीय तरतूद :** सन २०२४-२५ करिता असंसर्गजन्य आजार कक्षासाठी १२ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.
- **जागतिक आरोग्य संघटना स्टेप्स सर्वेक्षण :** मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा तसेच असंसर्गजन्य आजारांकरीता जोखमीचे इतर घटक यांच्याकरीता सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणनुसार मुंबईतील रहिवाश्यांमध्ये १८ ते ६९ वयोगटात ३४% उच्च रक्तदाब व १९ % मधुमेह आढळून आला आहे.
- **असंसर्गजन्य आजार मोबाईल फोन सर्वेक्षण :** सी.डी.सी. फाऊंडेशनच्या सहकार्याने मधुमेह, उच्च रक्तदाब रुग्णांचे असंसर्गजन्य आजारांच्या संलग्न जोखमीच्या घटकांकरीता सर्वेक्षण करण्यात आले.

- **महानगरपालिका दवाखाने व रुग्णालयामध्ये तपासणी :** सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २०९ महानगरपालिका दवाखाने, २०६ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, १६ उपनगरीय रुग्णालये आणि ०४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संधिसाधू तपासणी आणि उपचार पुरविण्यात येतात.
- **असंसर्गजन्य रोग निदान केंद्र (NCD Corner) :** ऑगस्ट २०२२ पासून ०५ मेडिकल कॉलेज, १४ उपनगरीय रुग्णालये , ०१ ट्रॉमा रुग्णालय, ०४ विशेष रुग्णालये अशा २४ रुग्णालयांमध्ये सर्व ३० वर्षांवरील व्यक्तींची तपासणी करण्यासाठी NCD तपासणी केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. मार्च २०२४ पर्यंत ३,२८,३०८ व्यक्तींची तपासणी करण्यात आली आहे.
- **झोपडपट्टी व तत्सम वस्तीमध्ये रक्तदाबाची तपासणी व असंसर्गजन्य रोगांचे धोक्याचे सर्वेक्षण :** माहे जानेवारी २०२३ पासून झोपडपट्टी आणि झोपडपट्टीसारख्या भागातील २४ विभागांमध्ये लोकसंख्या आधारीत तपासणी सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. मार्च २०२४ पर्यंत १६,५२,२५८ व्यक्तींची तपासणी करण्यात आली आहे.
- **आहारतज्ज्ञांकडून समुपदेशन :** मधुमेह आणि उच्च रक्तदाब रूग्णांसाठी जीवनशैलीतील बदल करण्याबाबत रूग्णांसाठी आहार समुपदेशन सर्व २४ विभागात महानगरपालिका दवाखाने आणि हिं.बा.ठा. H.B.T. दवाखान्यांमध्ये नियुक्त केलेल्या कंत्राटी आहारतज्ञांच्या मार्फत केले जाते. मे २०२३ ते एप्रिल २०२४ पर्यंत समुपदेशन केलेले एकूण रुग्ण : ६७,६७६.
- **मधुमेह रुग्णांमध्ये डोळ्यांची तपासणी :** 'एफ/उत्तर', 'जी/उत्तर' आणि 'एम/पश्चिम' या तीन विभागांमध्ये के.एस.एफ. या संस्थेद्वारे महानगरपालिका दवाखान्यात उपचार घेत असलेल्या मधुमेह व उच्च रक्तदाब रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून संदर्भ सेवा व पाठपुरावा करण्यात येत आहे.
- **मुख कर्करोग तपासणी :** सर्व महानगरपालिका दवाखान्यांमध्ये व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मध्ये कर्करोग तपासणी एप्रिल २०२३ पासुन सुरु करण्यात आली आहे.
- **मानसिक आरोग्य कार्यक्रम:** मानसिक आरोग्य कार्यक्रम मनशक्ती अंतर्गत सर्व दवाखान्यात समुपदेशन व निदान सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने मानसिक आरोग्यासाठी हितगुज - २४१३ १२१२ आणि नॅशनल टेली मानस हेल्पलाइन - १४४१६ सारखे हेल्पलाइन क्रमांक प्रदान केले आहेत.
- **योगा केंद्रे :** जीवनशैली व्यवस्थापनासाठी २४ प्रभागात शिवयोग केंद्राची संकल्पना मांडण्यात आली असून एकूण ११७ केंद्रे कार्यरत असून सुमारे ३१,००० लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.
- **समाज माध्यमातून जनजागृती :** वेळोवेळी जीवनशैलीत व आहाराच्या सवयीत बदल करण्याकरीता पोस्टर, फलक, होर्डींग, रेडीओ जींगल्स व चित्रफित अश्या वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, मुंबई -**

मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी अंतर्गत मुंबईच्या २४ जिल्ह्यांमध्ये (विभाग) नियुक्त केलेल्या २४ जिल्हा क्षय अधिकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सुमारे ५८ उपचार संघटक आणि राष्ट्रीय क्षय निर्मूलन कार्यक्रम (N.T.E.P.) मध्ये कार्यरत ४५८ कंत्राटी कर्मचारी यांच्यामार्फत विविध निदान आणि उपचार सेवा प्रदान करते.

- **क्षयरोग सेवा देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले उपाय:-**

**निदान -**

- अपफ्रंट C.B.N.A.A.T. चाचणी - २९ सी.बी.नॅट साइट्सवर ४२ सी.बी.नॅट मशीन आणि ३४ ट्रूनॅट मशीन्स क्षयरोगासाठी आगाऊ निदान सुविधा देत आहेत.
- कस्तुरबा रुग्णालयामध्ये नवीन कल्चर आणि डी.एस.टी. लॅब - अशा प्रकारची पहिली कल्चर आणि डी.एस.टी. लॅब एका कंटेनरमध्ये सेट केली जात आहे.
- क्षयरोग समूह रुग्णालयातील हॉस्पिटलमधील कल्चर आणि डी.एस.टी. लॅबची दर्जोन्नती - क्षयरोग समूह रुग्णालयाच्या सध्याच्या कल्चर आणि डी.एस.टी. लॅबच्या दर्जोन्नतीचे काम पूर्ण झाले आहे.

- जे. जे. रुग्णालयामध्ये विद्यमान कल्चर आणि डी.एस.टी. लॅब - जे. जे. हॉस्पिटल कल्चर आणि डी.एस.टी. लॅबमध्ये दररोज एल.पी.ए. आणि सी.डी.एस.टी. प्रक्रियेच्या ६० ते ८० नमुन्यांची प्रक्रिया केली जाते.
- रा. ए. स्मा. रुग्णालयामध्ये विद्यमान कल्चर आणि डी.एस.टी. लॅब - रा. ए. स्मा. रुग्णालय कल्चर आणि डी.एस.टी. लॅबमध्ये सी.डी.एस.टी. प्रक्रियेचे दररोज २० ते ४० नमुने प्रक्रिया केली जातात.
- कूपर रुग्णालयामध्ये आगामी कल्चर आणि डी.एस.टी. लॅब - कूपर रुग्णालयामध्ये पश्चिम उपनगरांसाठी आगामी कल्चर आणि डी.एस.टी. लॅब नियोजित आहे आणि सिव्हिल कामासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**उपचार-**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत १९० दवाखाने, २११ आरोग्य केंद्रे आणि २३७ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (आपला दवाखाना) द्वारे क्षयरोगाचे उपचार दिले जातात.
- संपूर्ण मुंबईत ३१ औषध प्रतिरोधी क्षयरूग्ण सेवा केंद्रे आहेत त्यापैकी ०७ खाजगी औषध प्रतिरोधी क्षयरूग्ण सेवाकेंद्रे आहेत. या औषध प्रतिरोधी उपचार केंद्रामार्फत सर्व चाचण्या व औषधे पूर्ण कालावधीकरीता (सुमारे १८ ते २० महिने) विनामूल्य दिलेजातात.
- वाडिया आणि जे.जे. हॉस्पिटल येथे बालरुग्णांसाठी मोफत उपचार सुविधा सुरू झाली आहे.

**क्षयरोग नियंत्रणासाठी हाती घेतलेले विशेष उपक्रम -**

**१. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आणि राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम यांच्याद्वारे मुंबईच्या अति जोखमीच्या गटातील लोकसंख्येसाठी प्रौढ बी.सी.जी. लसीकरण कार्यक्रम -**

- हा राष्ट्रीय कार्यक्रमात्मक अभ्यास असून मुंबईच्या २४ जिल्ह्यांमध्ये (विभाग) राबविण्यात येत आहे.
- १२ जिल्हे इंटरवेंश्नल असतील आणि १२ जिल्हे कंट्रोल जिल्हे असतील.
- इंटरवेंश्नल जिल्ह्यांमधील १८ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील ०६ अति जोखीम गटातील लाभार्थ्यांची निवड केली जाईल.
- **अतिजोखीम गट** -
  १. गेल्या ०५ वर्षातील क्षयरोगाने बाधित रुग्ण.
  २. मागील ०३ वर्षातील क्षयरोग रूग्णांचे घरगुती संपर्कातील व्यक्ती.
  ३. स्वयंघोषित मधुमेही.
  ४. स्वयंघोषित धूम्रपान करणारे.
  ५. कुपोषित.
  ६. वय ६० वर्षांपेक्षा जास्त.

**२. कृत्रिम बुद्धिमत्ता (<u>Artificial Intelligence</u> AI) आधारित एक्स-रे सेवा**

**३. स्पुटम सॅम्पल चा मागोवा घेण्यासाठी ची प्रणाली -**

**४. P.M.T.P.T. कार्यक्रम व I.G.R.A. चाचणी** :- केंद्रीय क्षयरोग विभागामार्फत Programmatic Management of T.B. Preventive Therapy (P.M.T.P.T.) सुरू केले आहे.

**५. प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान (P.M.T.B.M.B.A.) पोषक आहार :-** निक्षय मित्रांतर्फे दर महिन्याला सहा महिने ते एक वर्षांपर्यंत सर्व क्षयरुग्णांना पौष्टिक आहार दिला जातो.

**जागतिक क्षयरोग दिन २०२४ क्षयरोग विषयक जनजागृतीकरीता मुंबई जिल्ह्यात राबविण्यात आलेले उपक्रम:**

- संपूर्ण मुंबईत १२० होर्डिंग्जद्वारे आणि १२० बेस्ट बस थांब्यांवर टी.बी. जनजागृती संदेश प्रदर्शित केला गेला.
- प्लॅटफॉर्म आणि लोकल ट्रेनमध्ये टी.बी. जनजागृती जिंगल वाजवून टी.बी. जागृती मोहीम केली गेली.

- दि.२३ मार्च रोजी संध्याकाळी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक आणि बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे हेरिटेज स्ट्रक्चरला विद्युत रोषणाई करण्यात आली.

**क्षयरोगाची प्रमुख लक्षणे:-**

- दोन आठवड्याहून अधिक कालावधीचा खोकला.
- दोन आठवड्याहून अधिक कालावधीचा ताप.
- वजन कमी होणे/ भूक मंदावणे.
- रात्री घाम येणे.
- मानेवर गाठ येणे.

अशी कोणतीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी दुर्लक्ष करू नये आणि जवळच्या बृहन्मुंबई महानगरपालिका दवाखाना, आरोग्य केंद्र, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे भेट द्यावी. क्षय रुग्णांना सर्व सेवा आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत.

**क्षयरोगरुग्णांचा गेल्या तीन वर्षांचा अहवाल**

| वर्ष | एकूण प्रकरणे सूचित | मुंबईमधील | मुंबई बाहेरील |
|---|---|---|---|
| २०२१ | ५८,२१४ | ४९,५६८ | ८,६४६ |
| २०२२ | ६५,७४७ | ५५,२८४ | १०,४६३ |
| २०२३ | ६३,५७५ | ५०,२०६ | १३,३६९ |

**साथरोग कक्ष :**

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत दि. २५ एप्रिल २००७ पासून साथरोग नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आलेला आहे. डेंग्यु, लेप्टो, मलेरिया, गॅस्ट्रो, काविळ, एच१ एन१ (स्वाईन फ्लू) इत्यादी संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्याकरीता संपूर्ण सोयीयुक्त अशा साथरोग नियंत्रण कक्षाच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे. साथरोग कक्षामार्फत इतर आजारांसोबत कोविड १९ आजारावर नियंत्रण ठेवण्याकरीता रुग्णासंबंधी माहितीचे संकलन तसेच अहवालांचे विश्लेषण करण्यात येते.

**कार्यालयाचा पत्ता :** साथरोग नियंत्रण कक्ष, कस्तुरबा रुग्णालय वॉर्ड क्र.- ३८,
१ ला मजला, साने गुरुजी मार्ग, सातरस्ता मुंबई - ४०००१२.

**साथरोग कक्षाची प्रमुख कामे :**

- दरवर्षी पावसाळ्यात साथरोग कक्ष येथे नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येते व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या, शासकीय आणि खाजगी रुग्णालयांकडून दररोज साथीच्या रुग्णांची महिती गोळा केली जाते व प्राप्त माहितेचे संकलन करून साथीच्या रोगांचे नियंत्रण करण्याकरीता वैद्यकिय आरोग्य अधिकारी (विभाग) यांना साथीच्या रुग्णांची माहिती दिली जाते. तसेच पावसाळयाच्या कालावधी व्यतिरिक्तदेखील उपरोक्त सर्व माहिती संकलित करण्यात येते व त्याचे विश्लेषण करुन आवश्यक त्या उपाय योजना करण्यात येतात.
- राष्ट्रीय कीटक जन्य रोग प्रतिबंधक व नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना नुसार मलेरिया व डेंग्यु या आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी सार्वजनिक आरोग्य खात्याच्या कीटक नियंत्रण विभागास साथीच्या रोगांची माहिती कळवून मुलभूत डास नियंत्रण कार्यवाहीच्या सेवा याद्वारे पार पाडल्या जातात.
- विविध आरोग्य तसेच इतर खात्याशी समन्वय करून संसर्गजन्य रोगावर नियंत्रण ठेवणे व उद्रेक परिस्थिती टाळण्यासाठी या खात्याशी समन्वय करणे.

- ❖ नियमित पाणी गुणवत्ता चाचणीकरिता पिण्याच्या पाण्याचे नमुने महानगरपालिका प्रयोग शाळेत तपासण्यास अयोग्य नमुना आढल्यास जल खात्याच्या समन्वयाने उपाययोजना करणे तसेच फेरीवाल्याकडील पाण्याचे नमुने, बर्फाच्या पाण्याचे नमुने (फेरीवाले, दुकाने तसेच वर्ण तयार करणारे कारखाने) यांची गुणवत्ता तपासणी करण्यात येते.
- ❖ लेप्टोस्पायरोसीस ची प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना राबविण्याकरिता महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग, किटक नाशक विभाग, जलअभियंता विभाग, पशुवैद्यकिय विभागांच्या संयुक्त प्रयत्नातून लेप्टोस्पायरोसीस संयुक्त कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार सर्व प्राण्यांच्या गोठे, तबेल्यांची नियमित पाहणी करण्यात येते.
- ❖ अतिवृष्टी झाल्या नंतर लगेच घरोघरी सर्वेक्षण करून अती जोखीम असलेल्या व्यक्तींना जोखमीच्या प्रकारानुसार लेप्टोस्पायरोसीस बचावाकरीता औषधाचे वाटप करणे.
- ❖ एखाद्या साथीच्या रोगाचा उद्रेक झाल्याचे आढळल्यास साथरोग कक्षाशी संलग्न असलेल्या रॅपीड रिस्पॉन्स टिम मार्फत आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य केंद्राच्या कर्मचा-यांच्या समन्वयाने वस्ती पातळीवर रोग उद्रेक नियंत्रणात सहभाग करणे.

  दूरध्वनीक्र. २३०७ ७३२४ / १४४३(शहरे), पूर्व उपनगरे २५९१ ७९१९ (मुलुंड यानगृह) पश्चिम उपनगरे २६४२ ५६५५ (वांद्रे यानगृह),२८८२ २८९३ (मालाड यानगृह).

**सहाय्यक आरोग्य अधिकारी (संनिरीक्षण) :**

**हिवताप निर्मूलन-**

मुंबईत हिवताप निर्मूलनाचे काम संनिरिक्षण विभागातर्फे करण्यात येते.

संनिरीक्षण विभागाची प्रमुख कामे :

१. हिवताप रुग्णाचे तात्काळ व अचूक निदान आणि २४ तासांच्या आत अहवाल.

२. सर्व हिवतापबाधित रुग्णांना पूर्ण व समूळ उपचार.

३. N.V.B.D.C.P. च्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण.

४. वैद्यकीय आरोग्य अधिकारी व किटकनाशक अधिकारी यांच्याद्वारे संयुक्त कार्यवाही व जनजागृती.

हिवतापाचा रुग्ण आढळलेल्या ठिकाणांची माहिती डास नियंत्रण कार्यवाहीसाठी किटक नियंत्रण अधिका-यास कळविण्यात येते. तसेच हिवताप रुग्णाचे संनिरीक्षण करण्यासाठी किटक नियंत्रण अधिका-यामार्फत डास उत्पत्तीची स्थाने वैद्यकीय आरोग्य अधिका-यांना कळविण्यात येतात. पावसाळ्यापूर्वी बांधकामाच्या ठिकाणी मच्छरदाणीचे वाटप व बांधकाम कर्मचा-यांच्या तपासणीबाबत विकासकास कळविण्यात येते. आरोग्यपत्रिकांचे वाटप करण्यात येते व किटकनाशक अधिका-याद्वारे किटकनाशकाची फवारणी (आय.आर.एस.) करण्यात येते.

५. बांधकामाच्या ठिकाणी मजुरांकरीता तसेच विभागातील असुरक्षित घटकांकरिता विशेष मोहीम.

**हिवताप निर्मूलनाच्या कार्यपद्धती :**

- ❖ तापग्रस्त रुग्णांमधून हिवतापग्रस्त रुग्णांवर लक्ष केंद्रित करण्याकरिता सूक्ष्म आराखडा व रेखांकन.
- ❖ धोरणात्मक दृष्टिकोण.
- ❖ ३ 'T' दृष्टिकोण चाचणी - उपचार - पाठपुरावा (Testing - Treating - Tracking)
- ❖ परिणामकारक डास नियंत्रण.
- ❖ महानगरपालिकेतील खात्यांतर्गत व बाहय खात्याशी समन्वय.
- ❖ जनजागृती व प्रशिक्षण.

**विस्तारित लसीकरण कार्यक्रम :**

भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पाच वर्षांखालील सर्व बालकांचे लसीकरण करण्यासाठी विस्तारित लसीकरण कार्यक्रम आयोजित केला जातो, पोलिओ, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, क्षयरोग, गोवर, रुबेला, हिपॅटायटीस-बी, रोटा वायरस, अतिसार, एच.एन्फलुन्झा-बी, न्यूमोकोकल न्यूमोनिया या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी त्यांना प्रतिबंधक लसी दिल्या जातात. तसेच गर्भवती महिलांना धनुर्वात टाळण्यासाठी टी.डी. लसीकरण केले जाते. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उपनगरीय रुग्णालये, आरोग्य केंद्रे, दवाखाने, प्रसूतीगृहे इत्यादी ठिकाणी लसीकरण मोफत केले जाते.

**कीटकनाशक विभाग :**

कीटकजन्य रोग नियंत्रणाचे कार्य कीटकनाशक शाखेतर्फे सन १९२३ पासून व्यावसायिकपणे केले जाते. कीटकनाशक खात्याच्या कार्याचे उद्दिष्ट मुख्यत्वेकरून अग्रहक्कक्रमानुसार पुढीलप्रमाणे- हिवतापवाहक डासांचे नियंत्रण, डेंग्यु/चिकनगुन्या वाहक डासांचे नियंत्रण, हत्तीरोगवाहक (उपद्रवकारक) डासांचे नियंत्रण, मक्षिका नियंत्रण, मुषक व झुरळे नियंत्रण.

हिवतापविरोधी मोहिमेखाली नागरी हिवताप प्रसारक (ॲनोफिलिस स्टिफेन्सी) डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण ठेवणे, त्यासाठी अभियांत्रिकी, जीवशास्त्रीय, रासायनिक कीटकनाशकांचा वापर धुम्रफवारणी व कायदेशीर उपाययोजना या पध्दतींचा अवलंब करण्यात येतो. डेंग्यु व चिकनगुन्या प्रसारक (एडिस ईजिप्टी) डासांवर नियंत्रण आणण्यासाठी या डासांची उत्पत्तीस्थाने म्हणजेच घरांमधील व सभोवताली असलेल्या पाणी साठण्याच्या ठिकाणांवर कारवाई करण्यात येते.

हिवतापाचा रूग्ण आढळलेल्या ठिकाणांची माहिती प्राप्त झाल्यानंतर विभागातील कीटक नियंत्रण अधिकाऱ्यांमार्फत, हिवताप पसरविणा-या (ॲनोफिलिस स्टिफेन्सी) या डासांची उत्पत्ती स्थळे शोधण्याची मोहिम (कुसेड) हाती घेण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ विभागांमध्ये मूषक नियंत्रण व मक्षिका नियंत्रण कार्यक्रम सुध्दा राबविले जातात.

खाजगी मालमत्तांदारांनी मागणी केल्यास अळीनाशक व धुम्रफवारणी कामाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांच्या मालकांकडून शुल्क स्विकारून किटक नियंत्रण उपाययोजना राबविते.

**जन्म -मृत्यू नोंदणी :**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जन्म आणि मृत्यूची नोंदणी ही केंद्र शासनाच्या जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९अन्वये व महाराष्ट्र शासनाने त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार केली जाते. या अधिनियमानुसार जन्म व मृत्यूच्या नोंदणीची पद्धत संपूर्ण देशात एकसमान पध्दतीने राबविली जाते. सुखरूप व मृतावस्थेत जन्मलेल्या अर्भकांची तसेच मृत्यूविषयी माहिती देणे आणि नोंदणी करने सक्तीचे आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार अशा मुलांची माहिती सदर घटना घडल्या पासून २१ दिवसांच्या आत हयाकरीता विहित केलेल्या छापील नमुन्यात निबंधकाकडे (कार्यकारी आरोग्य अधिकारी हयांच्याकडे) देणे आवश्यक आहे.

जन्म व मृत्यू बाबतच्या चुकीच्या नोंदी दुरुस्त वा रद्द करावयाच्या असल्यास कागदोपत्री पुराव्यासह दोन विश्वसनीय व्यक्तींचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. बालकाच्या नावाची नोंद, जन्माच्या नोंदीपासून १२ महिन्यांच्या कालावधीत विनामूल्य आणि त्यानंतर उशिरा नोंद होण्याबद्दलचा आणि इतर विहित केलेला आकार मुलाच्या वयाच्या १५ वर्षापर्यंत भरून करता येते. जन्म - मृत्यू घटनांच्या प्रमाणपत्रांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागीय नागरी सुविधा केंद्रामध्ये विहित नमुन्या मध्ये अर्ज करून व विहित शुल्क भरून नागरिकांना जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्यात येत आहे.

**'बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९' अंतर्गत शुश्रूषालय यांची नोंदणी :**

प्रसुतिगृहांसह शुश्रूषालये इत्यादींची 'मुंबई शुश्रूषालये नोंदणी अधिनियम, १९४९' अन्वये व त्याखाली केलेल्या नियमानुसार, महानगरपालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. शुश्रूषालयांच्या सदर नोंदणी / नूतनीकरणासाठी वापरातील बदल सक्षम प्राधिका-याने करणे आवश्यक आहे. नोंदणी / नोंदणीचे नूतनीकरण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात

आली असून Fire Compliance प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**परिचारिका आस्थापनांना परवाना देणे :**

परिचारिका आस्थापनांना 'मुंबई परिचारिका प्रसविका व आरोग्य प्रचारिका आस्थापना अधिनियम, १९५४' आणि त्याखाली तयार केलेले नियम व पोटनियम ह्यानुसार परवाना घेणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी ह्यांजकडे अर्ज केल्यानंतर विहित शुल्क आकारून सदर परवाना दिला जातो.

**विवाह नोंदणी :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याकडून बृहन्मुंबईत विवाह नोंदणीचे कामकाज महानगरपालिकेच्या 'ए' ते 'टी' विभाग कार्यालयांमध्ये दि. ०५ मार्च २०१० पासून करण्यात येत आहे. तसेच, नागरीकांना विभाग कार्यालयांतील नागरी सुविधा केंद्रांमध्ये प्रत्यक्ष जाऊन अथवा ऑनलाईन www.portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावरुन विवाह नोंदणी करण्याची सुविधा मार्च २०१६ पासून उपलब्ध करण्यात आली आहे.

**स्मशाने व दफन भूमी हयांचे नियमन :**

**स्मशानभूमी** -

अद्ययावत सुधारित मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (ई) अंतर्गत मुंबईमध्ये मृतदेहांची विल्हेवाट लावणे व त्यासाठी जागांचे विनियमन करणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे.

| | हिंदू | मुस्लिम | ख्रिश्चन | इतर | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | ४८ | १७ | १० | ०० | ७५ |
| खाजगी | २२ | ५७ | ४२ | ०५ | १२६ |
| **एकूण** | ७० | ७४ | ५२ | ०५ | २०१ |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ४८ हिंदू स्मशानभूमीं पैकी०६ संयुक्त स्मशानभूमी आहेत. या स्मशानभूमीं मध्ये हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन धर्मियांसाठी अंत्यविधी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व खाजगी हिंदू स्मशानभूमी मध्ये दि. ०१.०८.२००८ पासून महानगरपालिकेतर्फे जळाऊ लाकडांचा मोफत पुरवठा करण्यात येत आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या व खाजगी मुस्लिम दफन भूमी मध्ये महानगरपालिकेतर्फे दफन भूमीत वापरण्यात येणाऱ्या फळ्यांचा मोफत पुरवठा करण्यात येतो.

जळाऊ लाकडांचा अपव्यय व प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने इंधनाचा स्वस्त पर्याय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदू स्मशानभूमीमध्ये काही चिता राखून पारंपारिक जळाऊ लाकडांवरील चिता आणि विद्युत दाहिनीच्या भट्टयांचे रुपांतर गॅस दाहिनीच्या भट्टयांमध्ये करण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे.

सद्यस्थितीत ०७ स्मशानभूमी मध्ये विद्युत दाहिनी व १३ स्मशानभूमी मध्ये गॅस शवदाहिनी बसविली आहेत.

**ब्रिकेट्स :-**

मृतदेहाच्या दहनासाठी लाकड ऐवजी पर्यायी इंधन म्हणून ब्रिकेट्स बायोमास (Briquetts Biomass-Agro /Tree Waste Wood) चा वापर करण्याकरिता प्रायोजित तत्वावर ०९ स्मशानभूमी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. जेणेकरुन पर्यावरणाचा ऱ्हास न होता वायुप्रदूषण देखील टाळता येईल.

**मृतदेह मुंबईबाहेर नेण्याची परवानगी :**

मृतदेह बृहन्मुंबईच्या हद्दीबाहेर नेण्याची परवानगी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (पहिला व तिसरा शनिवार धरून) सकाळी १०.३० ते संध्याकाळी ०५.३० तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सुद्धा (शनिवार दुपार वगळून) आठवड्याच्या सर्व दिवशी सकाळी ८.३० ते दुपारी ११.३०

आणि दुपारी ०३.००ते संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत मिळते. मुंबईतील महानगरपालिका रुग्णालयांमध्ये मृत्यू झाल्यास, मृत्यूनंतर २४ तासांमध्ये मोटारीने पोहोचता येऊ शकणा-या ठिकाणी मृतदेह न्यावयाचा असल्यास संबंधित महानगरपालिका रुग्णालयातून ही असा परवाना मिळू शकतो. तसेच, कार्यालयीन वेळेखेरीज इतर वेळी आणि रविवारी/ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी मृतदेह मुंबईच्या बाहेर नेण्यास परवानगी हवी असल्यास, वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि आरोग्य खात्यांतर्गतच्या सर्वसाधारण रुग्णालयातून प्राप्त होऊ शकते. मृत्यूनंतर मृतदेह, फक्त २४ तासांमध्ये मोटारीने पोहोचू शकत असेल अशा मुंबई बाहेरच्या ठिकाणी नेण्याची परवानगी देण्याचा अधिकार ह्या रुग्णालयांना देण्यात आला आहे.

मृतदेहांचे दफन करण्याकरीता कौटुंबिक थडगी उकरण्याची परवानगी, कार्यकारी आरोग्य अधिकारी, उप कार्यकारी आरोग्य अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी आणि विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी तसेच कस्तुरबा, वांद्रे भाभा, कुर्ला भाभा व भगवती रुग्णालयातील तातडीच्या कामावर असलेले सहाय्यक वैद्यकीय अधिकारी ही देऊ शकतात.

**राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम**

- सन २०१७ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सद्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत मुंबई जिल्ह्यात एकूण ५५ पथके कार्यरत आहेत. एका पथकामध्ये एक पुरुष वैद्यकिय अधिकारी, एक स्त्री वैद्यकिय अधिकारी, औषधनिर्माता व सहाय्यक परिचारीका यांचा सामावेश असतो.
- या कार्यक्रमाअंतर्गत वैद्यकीय पथकांमार्फत मुंबईच्या आंगणवाडी मधील ०० ते ०६ वयोगटातील बालकांची वैद्यकीय तपासणी वर्षातून दोन वेळा, बालवाडी व अनुदानित शाळांमधील ०६ ते १८ वयोगटातील बालकांची वैद्यकीय तपासणी वर्षातून एक वेळा करण्यात येते.
- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत आरोग्य तपासणी दरम्यान नवजात बालकांमधील जन्मत: आढळून येणारे व्यंग (Birth Defects), लहान मुलांमधील आजार (Diseases), जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार (Deficiencies) व विकासात्मक वाढीच्या समस्या (Developmental Delays) इत्यादी प्रकारच्या ४ D's चे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य उपचाराकरीता संदर्भित केले जातात.
- अंगणवाडी, बालवाडी व अनुदानित शाळांमधील मुलांची आरोग्य तपासणी दरम्यान आढळून येणा-या आरोग्यविषयक समस्याच्या पुढील उपचारांकरिता लाभार्थ्यांना संदर्भसेवा आणि वैद्यकीय व शल्य चिकित्सक उपचार पूरविण्यात येतात. तसेच आर.बी.एस.के. पथकांकडून पालकांचे समुपदेशन केले जाते आणि लाभार्थी पूर्ण बरा होईपर्यंत त्यांच्या पाठपूरावा केला जातो.
- दिर्घकालीन व मोठ्या आजाराने ग्रस्त असणा-या मुलांना पुढील तपासणी व औषधोपचारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखाना व रुग्णालयांमध्ये आवश्यकतेनुसार संदर्भित केले जाते.
- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत प्रमुख १०४ शस्त्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकिय रुग्णालयांमध्ये करण्यात येतात तसेच या शस्त्रक्रिया करण्यासाठी राज्य शासनाने मुंबईतील काही खाजगी रुग्णालयांसोबत सामंजस्य करार केला आहे.

**अंमली पदार्थ व्यसनमुक्ती केंद्र**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २० रुग्णशय्या असलेले अंमली पदार्थ व्यसनमुक्ती केंद्र, भरडावाडी प्रसुतीगृह इमारत, भरडावाडी, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५८ येथे सन १९९२ पासून सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कार्यरत आहे. सदर व्यसनमुक्ती केंद्रामध्ये दारु, अफू, चरस, गांजा, झोपेच्या गोळ्या, हुंगण्याचे पदार्थ, एम.डी., एमफीटामाईन, तंबाखू अशा विविध प्रकारच्या व्यसनांच्या आजारावर निर्विषिकरण उपचार केले जातात. सदर केंद्रामध्ये खालील सेवा उपलब्ध आहेत :-

१) **आंतररुग्ण विभाग :** या केंद्रात केवळ १८ वर्षावरील पुरुष रुग्णांना विविध प्रकारच्या व्यसनांवरील निर्विषिकरण उपचाराकरिता दाखल केले जाते.

२) **बाह्यरुग्ण विभाग :** दररोज सकाळी ०९.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत (रविवार व सार्वजनिक सुट्टया वगळून) नियमितपणे विविध प्रकारच्या व्यसनांच्या रुग्णांवर बाह्यरुग्ण विभागात उपचार केले जातात. ब्राऊन शुगर व्यसनांच्या रुग्णांना विनामूल्य OPIOID SUBSTITUTION THERAPY दिली जाते.

३) **समुपदेशन :** बाह्यरुग्ण तसेच आंतररुग्ण विभागात दाखल झालेल्या रुग्णांचे तसेच त्यांच्या कुटुंबियांचे वेळोवेळी समुपदेशन केले जाते.

४) **रक्तचाचणी :** आंतररुग्ण विभागात दाखल करण्यापूर्वी सर्व रुग्णांच्या महानगरपालिकेच्या आपला दवाखाना योजने अंतर्गत रक्ताच्या विविध प्रकारच्या चाचण्या मोफत केल्या जातात.

५) **अध्यात्मिक सभा :** आंतररुग्ण विभागात दाखल झालेल्या रुग्णांकरिता अल्कोहोलीक्स ऍनॉनिमस, नारकॉटिक्स ऍनॉनिमस यांच्या सभा घेतल्या जातात. तसेच रुग्णांच्या कुटुंबियांना फॅमिली ऍनॉनिमस व अल ऍनॉन यांच्या सभांमध्ये सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

**कुटुंब कल्याण कार्यक्रम**

**गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान कायद्याची अंमलबजावणी :**

स्त्री भ्रुणहत्या थांबविण्यासाठी व स्त्री- पुरुषाच्या जन्म दरात समतोल राखण्यासाठी महाराष्ट्र शासन / केंद्र सरकार यांच्या निर्देशानुसार सन २००१ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते. सदर कायद्यांतर्गत महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय आरोग्य अधिकारी हयांना समुचित प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. तसेच मुंबई जिल्हा स्तरावर सल्लागार समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीची सभा दरमहा आयोजित केली जाते. हया कायद्यांतर्गत जेनेटिक काऊन्सिलिंग सेंटर्स / जेनेटिक प्रयोगशाळा / जेनेटिक क्लिनीक / अल्ट्रा सोनोग्राफी केंद्र / इमेजिंग सेंटर/ वंध्यत्व क्लिनिक इ. केंद्रांची नोंदणी घेणे बंधनकारक आहे.

मार्च - २०२४ अखेरपर्यंत केंद्र नोंदणीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| नोंदणी करण्यात आलेली एकूण पी.सी.पी.एन.डी.टी. केंद्र | - | १,७४४ |
| नोंदणी करण्यात आलेली एकूण एम.टी.पी. केंद्र | - | ७६५ |
| सन २०२३ जन्माच्या वेळची लिंग सरासरी | - | ९३८ / १००० |

**जननी सुरक्षा योजना :**

आर. सी. एच. II कार्यक्रमांतर्गत जननी सुरक्षा योजनेव्दारे आरोग्य संस्थेतील १०० टक्के प्रसुति ह्या आरोग्य संस्थांमध्येच व्हाव्यात असा प्रयत्न करुन माता व बाल यांचे आजारपण व मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर योजनेअंतर्गत गर्भवती मातेची शासकीय व शासनमान्य रुग्णालयात प्रसुति झाल्यास रु.६००/- पी.एफ.एम.एस. मार्फत देण्यात येतात. सदर योजनेचा लाभ १९ वर्षावरील दारिद्रय रेषेखालील तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती अंतर्गत नोंद असलेल्या मातेस देण्यात येतो.

एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ जननी सुरक्षा योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या - ६,४५९.

**मुंबई महानगरपालिकेतर्फे मातामृत्यूंचा आढावा :**

सन २०१० पासून केंद्र सरकारच्या शासकिय आदेशानुसार माता मत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व गरोदर स्त्रियांना उत्कृष्ट दर्जाची सेवा देण्याकरिता जिल्हास्तरीय गुणवत्ता अभिवचन समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व रुग्णालयात होणाऱ्या मृत्यूच्या प्रकरणांचा अहवाल २४ तासात विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. ज्या रुग्णालयात १,००० पेक्षा जास्त मुलांचा जन्म होतो अशा रुग्णालयात मातामृत्यू आढावा बैठक घेऊन, सदर बैठकीचे इतिवृत्त विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण यांच्या विभागाला सादर करणे आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये माता मृत्यूची संख्या व मृत्यूदर पुढीलप्रमाणे आहे :-

एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ - १६७ नोंद झाली आहे.

रुग्णालयातून प्राप्त झालेल्या अहवालानुसार एकूण माता मृत्यूचा दर -१२७

मुंबईतील माता मृत्यू - ८७, मुंबईतील माता मृत्यू दर - ६६

### कुटुंब कल्याण कार्यक्रम:

कुटुंब कल्याण कार्यक्रम हा भारत सरकार पुरस्कृत कार्यक्रम असून विशेष अधिकारी (कुटुंब कल्याण) यांच्या कार्यालयाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका राबवित आहे. या कार्यक्रमांतर्गत खालील सेवा निःशुल्क पुरविल्या जातात.

अ) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (स्त्री नसबंदी/ पुरुष नसबंदी)

ब) तांबी बसविणे

क) गर्भनिरोधक गोळी(स्त्रियांच्या वापरासाठी)

ड) प्रचलित संतती प्रतिबंधक (निरोध)

ई) 'अंतरा' इंजेक्टेबल गर्भनिरोधक (जुलै २०१७)

### पुरुष नसबंदी :

'एफ/दक्षिण' विभाग कार्यालयाच्या इमारतीमधील कुटुंब कल्याण केंद्र नायगाव प्रसुतीगृह येथे स्थलांतरीत करण्यात आले असून येथे सोमवार ते शुक्रवार पुरुष नसबंदी दररोज केली जाते. 'एफ/दक्षिण' कुटुंब कल्याण केंद्र विभागाला पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला मोबदला दिला जातो.

### सरोगसी (नियमन) कायदा २०२१ आणि सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा २०२१:

सरोगसी कायद्याची अंमलबजावणी भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार मुंबईत केली. या कायद्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे समुचित अधिकारी म्हणून काम पाहतात.

मुंबईमध्ये सरोगसीसाठी वैद्यकीय संकेत प्रमाणपत्र (Medical Indication Certificate) देण्यासाठी जानेवारी २०२३ मध्ये जिल्हा वैद्यकीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

मुंबईमध्ये एप्रिल २०२४ पर्यंत एकूण -

- सरोगसी केंद्र - २७ (नोंदणीकृत)
- A.R.T. केंद्र -१५० (प्राप्त झालेले अर्ज)

### महानगरपालिका विश्लेषक प्रयोगशाळा, 'जी/ उत्तर' विभाग कार्यालय

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील महानगरपालिका विश्लेषक प्रयोगशाळा 'जी/उत्तर' विभाग, दादर येथे स्थित आहे. प्रयोगशाळेत आधुनिक साधने व तंत्रज्ञानाचा वापर करून अन्न आणि पाणी नमुन्यांचे रासायनिक व सुक्ष्मजीवशास्त्रीय विश्लेषण केले जाते. प्रयोगशाळेला भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण ( F.S.S.A.I.) यांच्याकडून अन्न व पाणी नमून्यांचे विश्लेषण करण्याची अधिकृत मान्यता आहे तसेच माहे डिसेंबर २०२० मध्ये प्रयोगशाळेला राष्ट्रीय परीक्षण आणि अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (N.A.B.L.) मार्फत आंतरराष्ट्रीय मानक I.S.O. १७०२५:२०१७ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे. माहे जानेवारी २०२३ पासून प्रयोगशाळा अत्याधुनिक सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर तांत्रिक माहिती व विश्लेषण अहवाल प्राप्त करण्यासाठी करत आहे. सॉफ्टवेअरचे नाव Food And Water Quality Monitoring System (F.W.Q.M.S.) असून वेबसाइटचे नाव https://fwqms.mcgm.gov.in असे आहे.

### कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन

बृहन्मुंबई महानगरपालिकेत सन १९६४ पासून कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जननक्षम जोडप्यांना छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देणे व जन्म दर कमी करून लोकसंख्या मर्यादित ठेवणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दीष्ट आहे. कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन कार्यक्रमातंर्गत माता व बाल आरोग्य संबंधीत विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम जसे प्रजनन व बाल आरोग्य प्रकल्पाचे कुटुंब कल्याण कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, विस्तारित लसीकरण कार्यक्रम,

जीवनसत्व अ व जंतनाशक औषधी मोहिम राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाची अंमलबजावणी करण्यात येते. तसेच माता व बालकांना देण्यात येणा-या आरोग्य सेवांचा दर्जा सुधारुन माता मृत्यू दर व बाल मृत्यू दर कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. याप्रमाणे मुंबईच्या नागरीकांचा आरोग्य स्तर सुधारण्यासाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

सदर कार्यक्रम कु.क.मा.बा.सं. अंतर्गत ०३ ब्युरो कार्यालय, २११ आरोग्य केंद्रे, ०४ वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालय, ०५ विशेष रूग्णालये,१६ उपनगरीय रुग्णालये, २९ प्रसुतीगृहे, ०१ माता व बाल रुग्णालयामार्फत राबविण्यात येतात.

**आरोग्य केंद्रे व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे :**

- मुंबई शहरातील जनतेला त्यांच्या रहिवासाच्या जागेपासून नजिकच्या अंतरावर प्राथमिक आरोग्य सेवा देण्यासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत सद्यस्थितीत एकूण २१२ आरोग्य केंद्रे प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातंर्गत ३६ आरोग्य केंद्रे नव्याने प्रस्ताविण्यात आली आहेत.

- सदर आरोग्य केंद्रांमार्फत ०० ते ०५ वर्षातील बालकांचे पूर्ण लसीकरण, पल्स पोलिओ अभियान, ०९ महिने ते ०६ वर्षापर्यंतच्या बालकांसाठी जीवनसत्व अ व जंतनाशक औषधी मोहिम, किशोरवयीन मुले व मुलींसाठी आरोग्य सेवा, गर्भवती महिलांच्या तपासण्या करून त्यांना रुग्णालयामध्ये प्रसुतिसाठी प्रवृत्त करणे, प्रसुतीनंतर माता व नवजात बालकांना भेट देणे, जननक्षम जोडप्यांना गर्भनिरोधक साधनांचे वाटप, ज्या जननक्षम जोडप्यांचे कुटुंब पूर्ण झाले आहे त्यांना कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करणे, विविध तसेच कुटुंब संदर्भात विस्तृत माहितीचे संकलन करणे, नोंदी ठेवणे व माहिती अद्ययावत करणे इत्यादी सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी आरोग्य केंद्र/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत करण्यात येते.

**प्रसूतिगृहे :**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेची एकूण २९ प्रसुतिगृहे व ०१ माता बाल रुग्णालय कार्यरत आहेत. यापैकी ०५ प्रसुतिगृहे सेंटीनल सेंटर्स व २५ प्राथमिक प्रसुतिगृहे आहेत. चांदिवली प्रसुतिगृह ('एल' विभाग) व महाराष्ट्र नगर प्रसुतिगृह ('एम/पूर्व' विभाग) ही दोन प्रसुतिगृहे नव्याने सुरु करण्याचे प्रस्ताविले आहे.

- प्रसुतिगृहांमध्ये गरोदर स्त्रियांसाठी प्रसुतिपूर्व तपासणी, प्रसूती व प्रसूतीपश्चात सेवा पुरविल्या जातात. तसेच कुटुंब कल्याण व गर्भनिरोधक सेवा, नवजात बालक व बालरुग्ण तपासणी,स्त्रीरोग तपासणी व सोनोग्राफी इ. सुविधा मोफत पुरविल्या जातात. त्या अंतर्गत गरोदर स्त्रियांना जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान इत्यादी योजनांचा लाभ ही दिला जातो. 'लक्ष्य' कार्यक्रम १६ प्रसुतिगृहांत व 'सुमन' ११ प्रसुतिगृहात राबविण्यात येत आहेत. या शिवाय मोफत रक्ततपासणी, आहार व रुग्णालयातून घरी जाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

- प्रसुतिगृहामधील एप्रिल - २०२३ ते मार्च - २०२४ पर्यंतचा कामगिरी अहवाल खालीलप्रमाणे आहे :-

| | नवीन प्रसुतिपूर्व नोंदणी | एकूण प्रसुती | एकूण सिझेरियन प्रसुती | एकूण शस्त्रक्रीया | एकूण सोनोग्राफी | रक्त तपासणी |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ३४,८४७ | १५,८५० | ४,६३८ | ७,७७८ | ८०,४५१ | ७,४०,५३४ |

**खाद्यपदार्थ विषयक स्वच्छता कार्यक्रम (अनुज्ञापन) :**

खाद्यपदार्थ तयार केल्या जाणाऱ्या, साठवल्या जाणाऱ्या आणि विक्रीसाठी ठेवल्या जाणाऱ्या ठिकाणांचे नियंत्रण आणि देखरेख खाद्यपदार्थ स्वच्छतेमध्ये समाविष्ट आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियमच्या तरतुदींनुसार अनुज्ञापने घेणे बंधनकारक करून सदर नियंत्रण केले जाते. अनुज्ञापनाच्या अटींमध्ये हे व्यवसाय स्वच्छतेचे पालन केले जातील अशा अटींचा अंतर्भाव आहे.

**आरोग्यास हानिकारक खाद्यपदार्थ नष्ट करणे :**

फेरीवाल्यांकडून व दुकानदारांकडून खाण्यास अयोग्य अशा खाद्यपदार्थांची विक्री होत असल्यास, आणि त्यामुळे रोग उद्भवू नये म्हणून अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४१५ व ४१६ अंतर्गत असे खाण्यास अयोग्य खाद्यपदार्थ ताब्यात घेऊन नष्ट करण्याचे काम प्रत्येक विभागातील कनिष्ठ निरीक्षक व अनुज्ञापन खात्यातील अतिक्रमण हटविणारा कर्मचारी वर्ग करतो.

**विवक्षित व्यवसाय, चित्रपटगृहे आणि नाट्यगृहे आदींवर नियंत्रण:**

पीठ गिरण्या, केशकर्तनालये, खाद्यगृहे, बेकरी, निवासी हॉटेल्स, मिठाईची दुकाने, धुलाई केंद्रे, पानपट्टीची दुकाने या व्यवसायांवर सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अंतर्गत विशिष्ट अटींवर अनुज्ञापत्रे देऊन नियंत्रण करण्यात येते.

नाट्यगृहे, चित्रपटगृहे ह्यांची तपासणी करुन त्यामधील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा सुस्थितीत असल्याबाबतची खात्री करुन पोलीस खात्याकडून नविन अनुज्ञापत्र देतेवेळी अथवा जुन्या अनुज्ञापत्राच्या नूतनीकरणासाठी आरोग्य खाते 'ना हरकत प्रमाणपत्र' देते.

**शालेय आरोग्य सेवा :**

शालेय आरोग्य विभागातर्फे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ०१ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी केली जाते. सदर वैद्यकीय तपासणी वैद्यकीय पथकांमार्फत माहे जून ते एप्रिल या शैक्षणिक वर्षात, क्रमश: प्रत्येक शाळेत जाऊन केली जाते. वैद्यकीय पथकामध्ये एक वैद्यकीय अधिकारी, एक कनिष्ठ परिचारीका व एक शिपाई यांचा समावेश असतो.

**माहिती शिक्षण व संपर्क विभाग**

**प्रशिक्षण विभागाचे उपक्रम :-**

सातत्याने परिणामकारक दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य खात्यातील प्रशिक्षण विभागाचे नियमित प्राथमिक व सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

प्रशिक्षण विभागाचे वेगवेगळे उपक्रम खालीलप्रमाणे आहेत :-

१) नव्याने नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता आरोग्य खात्यातील वेगवेगळ्या विभागांची माहिती व कामकाज पध्दतीबाबतचे प्रशिक्षण.

२) आरोग्य खात्यातील वेगवेगळ्या उपक्रमाबाबतचे अद्ययावत ज्ञान व माहिती तसेच असलेल्या माहितीची उजळणी सेवांतर्गत प्रशिक्षणामार्फत दिली जाते.

३) आरोग्य सेवांबाबत नव्याने येणा-या प्रकल्पाबाबतची माहिती, उद्दीष्टांच्या अंमलबजावणाकरिता मुल्यमापन पध्दतीचे प्रशिक्षण,

४) वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता वेगवेगळ्या कार्यशाळा आयोजित करणे.

५) विशेष प्रशिक्षणाकरीता कर्मचा-यांना प्रतिनियुक्त करण्यात येते.

६) पावसाळ्यातील आजार उदा. लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो, स्वाईन फ्ल्यू इत्यादीबाबत अद्ययावत माहिती नियंत्रण व उपचार पध्दती याविषयी प्रशिक्षण आयोजिले जाते.

७) वैद्यकीय कर्मचारीवृंदाकरीता सातत्याने वैद्यकीय शिक्षण आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची प्रशिक्षण विभागाने अधिस्विकृती मिळवलेली आहे.

**आपला दवाखाना (हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे)**

दि.१७ नोव्हेंबर २०२२ रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व नागरिकांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा पुरविण्याच्या उद्देशाने 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे

आपला दवाखाना' सुरू केला.

**ठळक वैशिष्ट्ये:**

१) नागरिकांना सोयीच्या ठिकाणी व वेळेत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा पुरविणे.

२) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना क्लिनिक मोकळ्या भूखंडावर पोर्टा केबिनमध्ये, रेडी स्ट्रक्चर आणि उपलब्ध दवाखान्यामध्ये सुरू करण्यात आले आहेत.

३) पायाभूत सुविधा अद्ययावत करून विद्यमान दवाखान्यांमध्ये पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटर उभारून तज्ज्ञ सल्लागार सेवांची उपलब्धता.

४) नागरिकांना मोफत सेवा देऊन आरोग्यसेवेवरील खर्च कमी करणे.

५) 'एच.बी.टी. आपला दवाखाना' मध्ये 3 टॅब सॉफ्टवेअर वापरून पेपरलेस पर्यावरण पूरक कामकाज.

६) 'एचबीटी आपला दवाखाना' येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांना निश्चित मासिक व प्रोत्साहनपर आधारित मानधन.

**आर्थिक तरतूद:**

आर्थिक वर्ष २०२३-२४करिती १२३ कोटी रुपये आणि सन २०२४-२५ करिता ०५ कोटी रुपये मंजूर.

**प्रस्तावित आणि कार्यरत क्लिनिकची संख्या:**

सद्यस्थितीला दि. २२ मे २०२५ पर्यत २३९ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यरत असून त्यामध्ये ३३ पॉलीक्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटर, ८० पोर्टा केबिन, १०८ उपलब्ध दवाखाने आणि १८ तयार क्लिनिकस आहेत.

**वेळ:**

- पोर्टा केबिन आणि रेडी स्ट्रक्चर - सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० , दुपारी ०३.०० ते रात्री १०.००
- सध्याचे दवाखाने - सकाळी ०९.०० ते दुपारी ०४.०० , दुपारी ०३.०० ते रात्री १०.००

**प्रदान केलेल्या सेवा**

१) मोफत वैद्यकीय तपासणी आणि उपचार

२) मोफत रक्त चाचण्या

३) खाजगी डायग्नोस्टिक सेंटरच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या दराने डायग्नोस्टिक टेस्ट (एक्स- रे, सोनोग्राफी, सी.टी. स्कॅन, ई. सी. जी., मॅमोग्राफी एम.आर.आय. इ.).

४) पॉली क्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटरमध्ये दंतचिकित्सक, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, वैद्यकीय चिकित्सक, त्वचारोगतज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ आणि फिजिओथेरपिस्ट अशा विविध तज्ज्ञांमार्फत मोफत सल्ला.

# वैद्यकीय सहाय्य व शिक्षण





नायर दंत रुग्णालय प्रशिक्षण कार्यक्रम



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, कुलाबा

# वैद्यकीय सहाय्य व शिक्षण

## एक ) - राजे सातवे एडवर्ड स्मारक रुग्णालय व सेठ गो. सुं. वैद्यकीय महाविद्यालय

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत मुंबईतील नागरिकांना प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक, पुनर्वसन आणि उपचारात्मक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे. महानगरपालिका तिच्या आरोग्य सेवा विभाग, उपनगरीय रुग्णालये तसेच तृतीय उपचार स्तरावरील ०४ प्रमुख वैद्यकीय रुग्णालये व एक दंत महाविद्यालय ह्यांच्या विद्यमाने संपूर्ण आरोग्यसेवा पुरविते. केवळ मुंबईतीलच नव्हे तर महाराष्ट्र राज्य आणि देशातून, सीमेपलीकडील समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना सर्वोत्तम आणि जवळजवळ मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी सर्व आरोग्य सेवा विभाग हातात हात घालून काम करतात. महानगराच्या लोकसंख्येच्या प्रचंड वाढीसह, नागरी गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. स्वच्छतेच्या देखभालीसारख्या नागरी समस्या वाढल्या आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे एक कठीण काम बनले आहे, ज्यामुळे या अत्यंत गजबजलेल्या शहरात विविध रोग आणि आजार उद्भवतात, जे कधीकधी साथीचे रूप घेतात. त्यामुळे वैद्यकीय मदत हे नागरी संस्थेच्या आवश्यक कार्यांपैकी एक बनते.

समाजातील असुरक्षित गटाला ज्या सेवा मिळू शकत नाहीत त्या सेवा त्यांना उपलब्ध करुन देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी ०४ अध्यापन रुग्णालये सुरू करण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी अग्रगण्य पावले उचलली आहेत. चार वैद्यकीय आणि एका दंत महाविद्यालयात असलेल्या सर्वोत्तम शिक्षकांसह महानगरपालिका, वैद्यकीय क्षेत्रातील प्रत्येक नवीन शाखेत पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाच्या प्रशिक्षण सुविधा पुरवते आणि म्हणूनच कदाचित जगातील स्थानिक संस्थांमध्ये ते विलक्षण आहे.

राष्ट्रप्रेमाने व जाज्वल्य राष्ट्राभिमानाने सेवेच्या, शिक्षण व संशोधन ह्या ध्येयांनी प्रेरित होऊन संपूर्णतया भारतीयांनी चालविलेल्या अशा ह्या दोन जुळ्या संस्था सन १९२६ मध्ये स्थापन झाल्या. 'नॉन सिबी सेड ओमनिबस' म्हणजेच 'स्वत:साठी नाही तर सर्वांसाठी ' असे ब्रीद वाक्य असलेल्या ह्या संस्था लाखोजनांना उत्तम आरोग्य सेवा देत आहेत. संस्थांनी लाखो लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा दिल्या आहेत. या जुळ्या संस्थांनी वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सेवेच्या क्षेत्रात स्वत:साठी एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

**विभागनिहाय विशिष्ट उपक्रम खालीलप्रमाणे :-**

**१) शरीररचनाशास्त्र विभाग :**

**रुग्ण आणि समुदाय काळजी:**

- विभागातील प्राध्यापकांनी 'देहदानाचे महत्त्व' या विषयावर जनजागृतीसाठी मोहीम राबवली.

**शैक्षणिक :**

- 'AETCOM' मॉड्यूल१.१ 'डॉक्टर होण्याचा अर्थ काय ?' यावर पॅनेल चर्चेचे आयोजन केले.
- प्रथम 'एमबीबीएस' विद्यार्थ्यांचे 'अर्ली क्लिनिकल एक्सपोजर' (मूलभूत विज्ञान सह-संबंध) या वरील सादरीकरण आयोजित केले.
- सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रथम एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरणावर कार्यक्रम आयोजित केला.

**संशोधन :**

- अध्यापक सदस्यांनी शरीरशास्त्र आणि वैद्यकीय शिक्षण विषयातील संशोधन, कार्यशाळा आणि परिषदांमध्ये सक्रिय योगदान दिले.
- चिकित्सक विभागांसोबत विविध सहयोगी कार्यशाळा आयोजित केल्या.

२) **रक्त संक्रमण औषधशास्त्र विभाग :**

- या विभागामध्ये प्लेटलेट फेरेसिस, स्टेम सेल ऍफेरेसिस, उपचारात्मक प्लाझ्माफेरेसिस यासारख्या प्रगत प्रक्रिया केल्या जातात.
- 'राष्ट्रीय जैविक संस्था' (एन.आय.बी. ) व्दारे राबविल्या जाणाऱ्या 'हेमोव्हिजिलन्स' कार्यक्रमात ह्या विभागाचा सक्रिय सहभाग आहे .
- या विभागाकडून रक्त संक्रमण औषधशास्त्र या विषयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम (एमडी) शिकविला जातो .

३) **हृदयरोग चिकित्साशास्त्र विभाग :**

- रा. ए. स्मारक रुग्णालय हृदयरोग चिकित्सा विभाग निदान आणि उपचार या दोन्ही सेवांमध्ये आपल्या सुविधांमध्ये सुधारणा करत आहे. हजारो रुग्णांचे हृदयस्पंदन आलेख, हृदयप्रतिध्वनी - आलेख, ट्रेडमिल तपासणी आणि कोरोनरी अँजिओग्राफी, कायमस्वरूपी पेसमेकर इम्प्लांटेशन, स्टेंटिंगसह कोरोनरी अँजिओप्लास्टी, इंट्राव्हॅस्क्युलर अल्ट्रासाऊंड आणि ऑप्टिकल कोहेरेन्स टोमोग्राफी यासारख्या अत्याधुनिक इमेजिंग सुविधांचा समावेश आहे.
- द्विभाजन 'पीसीआय' आणि रोटेशनल एथेरेक्टॉमी यासारख्या प्रक्रिया 'अॅड्रोइट ऑपरेटर' द्वारे केल्या गेल्या.
- 'थ्री -डी मॅपिंग' आणि 'कॉम्प्लेक्स एरिथमिया ऍब्लेशन' सह 'इलेक्ट्रोफिजियोलॉजिकल' अभ्यास करण्याची समृद्ध परंपरा सुरू ठेवली.
- नेहमीच्या बलून मिट्रल व्हॅल्व्होटॉमीज, सेप्टल डिफेक्ट क्लोजर, कॉर्क्टेशन स्टेंटिंग आणि ट्रान्सकॅथेटर एओर्टिक आणि पल्मोनरी व्हॉल्व्ह बदलण्यासारख्या विदेशी प्रक्रिया करून स्ट्रक्चरल प्रक्रियेतही एक लक्षणीय कामगिरी केली. या वर्षी देखील सहा डॉक्टरेट ऑफ मेडिसिन कार्डिओलॉजी विद्यार्थी आणि चार बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आहे. ट्रान्स कॅथेटर मिट्रल व्हॉल्व्ह एज टू एज रिपेअर (टीईईआर) आणि रेसिस्टंटसाठी रेनल डिनरव्हेशन यासारखी नवीन प्रक्रिया करण्यात आली.
- राज्यातील कोणत्याही सार्वजनिक रुग्णालयात प्रथम उच्च रक्तदाबाची तपासणी करण्यात आली. प्राथमिक 'अँजिओप्लास्टी' कार्यक्रम वेगात सुरू आहे.

४) **हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आणि थोरॅसिक शस्त्रक्रिया विभाग :**

- या विभागाने 'फोल्डेक्स' चाचणी ('फोल्डेक्स वाल्व्ह'सह महाधमनी बदलणे) यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.
- या विभागाने विद्यार्थी प्रशिक्षण आणि शिक्षणासाठी मार्च २०२३ मध्ये महाधमनी सिम्पोजियम आणि ऑक्टोबर २०२३ मध्ये थोरॅसिक सिम्पोजियम आयोजित केले.
- या विभागाने आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय जर्नल्समध्ये अनेक लेख प्रकाशित केले आहेत.
- या विभागाला हृदय प्रत्यारोपण कार्यक्रम सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे.

५) **जीवरसायनशास्त्र विभाग :सी.सी.बी.एल., ई-लॅब, सि.व्हि.टी.सी लॅब- (३१५)**

- रा. ए. स्मारक रुग्णालयामध्ये खालील प्रयोगशाळांमध्ये विविध प्रकारच्या जीवरसायनशास्त्रीय रक्त चाचण्या केल्या जातात:-

  **सी.सी.बी.एल. :-** प्रत्येक दिवशी सरासरी १३,८५४ चाचण्या केल्या जातात. या सर्वसामान्य जीवरसायनशास्त्रीय रक्त चाचण्या असतात.

  **ई-लॅब :-** ही प्रयोगशाळा दररोज २४ तास सेवा पुरवते. दररोज सुमारे ३,७८५ चाचण्या केल्या जातात. या प्रामुख्याने आपत्कालीन चाचण्या आहेत.

  **सी.व्हि.टी.सी लॅब (३१५) :-** या प्रयोगशाळेत हृदयरोगसंबंधीत जीवरसायनशास्त्रीय रक्त चाचण्या होतात. या मध्ये लिपीड-प्रोफाईल, सिरम् अमायलेज तसेच, फ्लुईड ऍनॅलिसीस या चाचण्यांचा समावेश होतो. प्रत्येक दिवशी सरासरी २९० रक्त चाचण्या केल्या जातात.

## ६) उर : औषधशास्त्र विभाग व पर्यावरण प्रदूषण संशोधन केंद्र :

- ऊर:औषध विभाग व पर्यावरण प्रदूषण संशोधन केंद्र श्वसन विकार असलेल्या रुग्णांसाठी निदान आणि उपचारात्मक सेवा प्रदान करते.
- फुफ्फुस क्षमता चाचणी, निद्रेतील श्वसनाचा आलेख, पॉलीसोम्नोग्राफी, रक्तातील प्राणवायुचे प्रमाण चाचणी (एबीजी), ब्रॉन्कोस्कोपी, व निदानाकरीता थोरॅकोस्कोपी इत्यादी सेवा मूल्यमापनासाठी पुरविल्या जातात.
- वायु प्रदुषणामुळे होणाऱ्या श्वसनाच्या तक्रारींबाबत पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई शहरातील विविध भागातील लोकांचे सर्वेक्षण करते.
- रुग्णांना नियमितपणे दमा विकाराबाबत शिक्षण दिले जाते.
- सन २०२४ मध्ये फुफ्फुसांतील गाठींची तपासणी करण्याकरिता 'एंडोब्रोन्कियल अल्ट्रासाऊंड' (EBUS) ही चाचणी सुरु करण्यात आली आहे.

## ७) त्वचारोग व गुप्तरोगशास्त्र विभाग :

- 'मल्टी प्लॅटफॉर्म लेझर' त्वचा व गुप्त रोग विभागामध्ये असून त्याचा उपयोग अनावश्यक केस, रंग द्रव्यविकार, गोंदणे इ. काढण्याकरीता वापरण्यात येते.
- 'एक्सायमर लेसर' अंगावरील कोड व सोरायसिस चा उपचार करण्यास उपयोगी ठरते.
- रुग्णांना त्वचेच्या आरोग्याविषयी व आजारांची माहिती देणारे व्हिडीओ बाह्य रुग्ण विभागात चालू करण्यात आले आहेत.

## ८) दंतशास्त्र चिकित्सा विभाग :

- आपला दंत चिकित्सा विभाग देणग्यांद्वारे प्राप्त झालेल्या उत्कृष्ट उपकरणांसह रुग्णांना अपेक्षित उपचार प्रदान करण्यात प्रगती करत आहे.
- आता डिजिटल एक्स-रे बॅकअपसह जी.ए.अंतर्गत रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया आणि रूट कॅनल प्रक्रिया केल्या जातात.
- तसेच, नियमित रूग्णांशिवाय वैद्यकीयदृष्ट्या तडजोड झालेले रुग्ण, हिमोफिलिक रूग्ण आणि शालेय चिकित्सालयामधील मुलांची सेवा मोठ्या जोमात आणि उत्साहाने सुरू ठेवली आहे.

## ९) कान, नाक, घसा चिकित्सा विभाग :

- कान, नाक आणि घसा चिकित्सा विभाग मायक्रो इयर शस्त्रक्रिया, एन्डोस्कोपीक सायनस शस्त्रक्रिया, स्कल बेस शस्त्रक्रिया, व्हॉइस डिसऑर्डर शस्त्रक्रिया, एअरवे ऑबस्ट्रक्शन, कॉस्मेटीक शस्त्रक्रिया, हेड आणि नेक कर्करोग शस्त्रक्रिया यामधील लक्षणिय कामगिरीसाठी भारतात आणि भारताबाहेर ओळखला जातो.
- या शिवाय सदर विभाग कॉक्लीयर इंम्प्लांट आणि बाह्य शस्त्रक्रिया आणि सायल एन्डोस्कोपी यासारख्या उच्च दर्जाचे शल्यचिकित्सा केंद्र आहे.

## १०) आंतर स्त्राविकीशास्त्र विभाग :

- ह्या विभागाने जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ मध्ये ०५ संमेलने आयोजित केली होती.
- ह्या विभागाने १७ प्रकाशने सन २०२३ मध्ये प्रकाशित केली आहेत.

## ११) तात्काळ वैद्यकीय शास्त्र सेवा :

- तात्काळ वैद्यकिय सेवा विभागामध्ये गंभीर रुग्णांच्या उपचाराकरिता नाविन्यपूर्ण १५ खाटांचा 'वैद्यकीय अति दक्षता विभाग - २' चालू करण्यात आला.

## १२) न्यायवैद्यकशास्त्र चिकित्सा विभाग :

- कॅडेव्हर पुनर्प्राप्ती प्रशिक्षण कार्यशाळा सुलभ करण्यासाठी विशेष कोल्ड स्टोरेज सुविधेमध्ये सुधारणा करण्यात आली.
- आर.ओ.टी.टी.ओ. - एस.ओ.टी.टी.ओ. यांच्या सहकार्याने कॅडेव्हर पुनर्प्राप्ती प्रशिक्षण कार्यशाळेकरीताची, कॅडेव्हर प्रयोगशाळा अद्ययावत करण्यात आली.
- अस्थिव्यंग विभागाच्या बेसिक स्पाईन कॅडेव्हरीक कार्यशोकरीता कॅडेव्हर देण्यात आले.
- पोस्ट मार्टम व ॲण्टी-मार्टमच्या एकूण १,२४९ व ३९४ केसेस सन २०२३ मध्ये करण्यात आल्या.
- न्यायवैद्यकशास्त्र हा विभाग हा संवेदनशील, गुंतागुंतीची प्रकरणे तसेच, न्यायवैद्यक व लैंगिक अत्याचार प्रकरणांबाबत महत्वाचे संदर्भ केंद्र आहे.

## १३) सर्वसाधारण औषधवैद्यकशास्त्र विभाग :

- हा विभाग बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) आणि आपात्कालीन सेवा (इमर्जन्सी सर्व्हिसेस) मध्ये वेगवेगळ्या वैद्यकीय परिस्थितीत असलेल्या रुग्णांना सेवा देतो. औषधवैद्यकशास्त्र बाह्यरुग्ण सेवा आठवड्यातून ६ दिवस चालते तसेच, आपत्कालीन सेवा ही वर्षभर २४X७ दिली जाते. याशिवाय संधिवात शास्त्र, एच.आय.व्ही., उच्च रक्तदाब, जेरियाट्रिक, संसर्गजन्य रोग पॅलिउटिव्ह केअर ओपीडी या विभागाअंतर्गत साप्ताहिकरित्या चालविल्या जातात.
- नूतनीकरण केलेले ३२ रुग्णशय्येचे मेडिकल आय.सी.यु. गंभीर रुग्णांची सेवा करते. मेडिकल आय.सी.यु. मध्ये स्ट्रोक आय.सी.यु. साठी ६ रुग्णशय्या आणि हेमोडायलिसिस सुविधेसाठी २ रुग्णशय्या देखील समर्पित आहेत.

## १४) जठरांत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग :

- रा. ए. स्मारक रुग्णालयामधील जठरांत्रशल्यचिकित्सा विभाग हा जठराशी निगडीत सर्व आजार, कॅन्सर यावर अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त जटिल शस्त्रक्रिया सेवा देणारे तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणारा महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक रुग्णालयांतील, एकमेव विभाग आहे.
- अन्ननलिका, जठर, यकृत, स्वादुपिंड, लहान व मोठे आतडे यांचा कर्करोग आणि इतरही शस्त्रक्रिया नियमित केल्या जातात.
- या क्षेत्रातील यशामुळे केवळ मुंबई नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात, परराज्य आणि परदेशातूनही अनेक रुग्ण या विभागाकडे पाठविले जातात.
- ' एम.सी.एच. सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी' हा ०३ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम शासकिय रुग्णालयात उपलब्ध असणारा एकमेव विभाग आहे.

## १५) जठरांत्र शास्त्र विभाग :

- 'एन्डोस्कोपिक सबम्यूकोसल डिसेक्शन ' (ईएसडी) सेवा सुरु करण्यात आली आहे.
- 'एन्डोस्कोपिक अल्ट्रासाऊंड' मार्गदर्शित 'लिव्हर बायोप्सी' (ईयुएस-एलबी) सेवा सुरु करण्यात आली आहे.
- 'एन्डोस्कोपिक अल्ट्रासाऊंड' मार्गदर्शित 'पित्त निचरा ' (ईयुएस-बीडी) सेवा सुरु करण्यात आली आहे.
- 'अँटी-रिफ्लक्स म्यूकोसल ऍब्लेशन' (एआरएमए) सेवा सुरु करण्यात आली आहे.
- राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रम (एनविएचसीपी) अंतर्गत बाहय रुग्ण विभाग सुरु करण्यात आले आहे.
- कक्षात फायब्रोस्कॅन सेवा सुरु करण्यात आली आहे.
- पेरॉरल एंडोस्कोपिक मायोटॉमी (पीओईएम) सेवा सुरु करण्यात आली आहे.

### १६) सर्वसाधारण शल्य शास्त्र विभाग :

- सन २०२३ मध्ये सर्वसाधारण शल्य शास्त्र विभाग सौम्य आणि कर्करोग स्तन सेवांसाठी स्तन सेवा चालवत आहे.
- शस्त्रक्रिया विभागाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय परिषदांमध्ये उत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार मिळाला आहे.

### १७) रुधिर शास्त्र विभाग :

- रुधिरशास्त्र विभाग येथे रक्त विषयक व्याधींनी ग्रस्त अशा रुग्णांवर उपचार करण्यात येतात. सन २०२३ मध्ये ३ रुग्णांवर 'ऑटोलॉगस स्टेम सेल ट्रान्सप्लांट' यशस्वीरित्या करण्यात आले आहे.

### १८) सूक्ष्मजीवशास्त्र विभाग :

**रुग्ण सेवा**

- सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने अलीकडेच मालडी टॉफ (MALDI-ToF) तंत्रज्ञानावर आधारित 'VITEK MS Prime' अत्याधुनिक उपकरण स्थापित करुन कार्यान्वित केले. त्यामुळे सूक्ष्मजीवपेशी विलगतेची ओळख तासाभरात उपलब्ध होईल, ज्यामुळे पूर्वीच्या २४ ते ४८ तासांच्या तुलनेत जलदरीत्या उपचार सुरु करणे शक्य होईल.
- आपत्कालीन प्रयोगशाळेत हिपॅटायटीस-बी, हिपॅटायटीस-सी आणि एचआयव्ही (एचएचएच) साठी जलद चाचण्या सुरु करण्यात आल्या आहेत.
- 'एनएबीएल' मान्यता सुरु ठेवण्यासाठी डेस्कटॉप मूल्यांकन यशस्वीरित्या पूर्ण केले.
- केंद्रीय क्षयरोग विभागाने क्षयरोग कल्चर आणि औषधांच्या संवेदनाक्षमतेसाठीची मान्यता पुढे चालू ठेवली.
- बॅक्टेरियोलॉजी, मायक्रोलॉजी, पॅरोसिटोलॉजी, सेरोलॉजी, व्हायरोलॉजी आणि इम्युनोलॉजी, CBNAAT (T.B.). SARS-CoV-2, RT-PCR इनफ्लुएंझा RT-PCR आणि डेंग्यू RT-PCR साठी राष्ट्रीय संस्थांद्वारे 'बाहय गुणवत्ता मूल्यांकन सेवा' - (EQAS) मध्ये यशस्वीरित्या सहभाग आणि उत्तीर्णता.

**शैक्षणिक :**

- महाराष्ट्र राज्यासाठी राज्यस्तरीय सीडी ४ सायफ्लो (CD4 CYFLOW) रिफ्रेशर तसेच एमडीएसीएस (MDACS) करिता दोन वेळा प्रशिक्षण आयोजित केले.

### १९) नवजात अर्भकशास्त्र विभाग :

- नवजात अर्भकशास्त्र विभागामध्ये दरवर्षी ६,००० पेक्षा जास्त नवजात बालकांची काळजी घेतली जाते. ज्यामध्ये इतर संस्थांकडून, रुग्णालयाकडून पाठविलेल्या अति धोका असलेल्या नवजात बालकांचा समावेश आहे.
- यापैकी ३०-३५ टक्के नवजात शिशूंना विविध आजारांकरीता अतिदक्षतेची आवश्यकता असते.
- नवजात अर्भकशास्त्र विभाग हा ४२ रुग्णशय्या, अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेला विभाग आहे.
- विभागाकडून कांगारु मातेसह काळजी तसेच वेदना आणि उपशामक काळजी हया सेवा पूरविल्या जातात.
- विभागामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत फॅसिलिटी बेस्ड न्यूबोर्न केअर (FBNC) साठी वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिकांना वर्ग आणि निरीक्षण प्रशिक्षण दिले जाते.
- विभागाकडून व्यापक स्तनपान व्यवस्थापन केंद्राची सेवा पुरविली जाते.

### २०) अणुवैद्यकशास्त्र चिकित्सा विभाग :

- अणुवैद्यकशास्त्र चिकित्सा हा विभाग दोन गॅमा कॅमेरायुक्त उपकरणांनी सुसज्ज असून यामध्ये स्पेक्ट रेक्टिलिनियर स्कॅनर, थायरॉईड अपटेक प्रोब आणि उपकरणे उपलब्ध आहेत. ह्या विभागात शरीराच्या वेगवेगळ्या भागांचे रोगनिदान व त्याच्या कार्यक्षमतेने मूल्यांकन स्कॅनद्वारे करता येते. ह्या उपकरणांनी रुग्णालयातील निरनिराळ्या विभागातील रुग्णांना रोगनिदान करण्याची गरज पूर्ण करता येते. जसे आंतरस्त्रावशास्त्र, मूत्रपिंड-मूत्रमार्ग संस्था, जठरांत्र संस्था, हृदयशास्त्र, मज्जातंतूशास्त्र, ऑनकॉलॉजी, श्वसनसंस्थाशास्त्र इत्यादी.

- **पेट स्कॅन :** कॅन्सर, ह्रदयाच्या आणि मेंदूच्या आजाराच्या निदानाकरिता रेडिओएक्टीव्ह ग्लुकोजचा उपयोग केला जातो.

**२१) मज्जातंतूशास्त्र विभाग :**

- १२२ रुग्णांवर स्ट्रोक थ्राम्बोलायसिस यशस्वीरीत्या करण्यात आले.
- ६८५ अपस्मार शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या.

**२२) मूत्रपिंड चिकित्सा विभाग :**

- मूत्रपिंड विभागामधील डी. एम. नेफ्रोलॉजी व अप्लाईड बायोलॉजी एम.एस.सी. व पी.एच.डी अभ्यासक्रम शिकविले जातात.
- या विभागात १४,५६६ रुग्णांवर बाह्यरुग्ण विभाग आणि आंतररुग्ण विभागामध्ये उपचार केले असून या वर्षी आतापर्यंत ३० जिवंत नातेवाईक दात्यांच्या आणि ५ मृत शरीरातील मूत्रपिंडांचे प्रत्यारोपण यशस्वीरीत्या पार पाडले व ९,१२२ रुग्णांना हेमोडायलेसीसची सुविधा पुरविण्यात आली.

**२३) मज्जातंतू शल्य शास्त्रविभाग :**

- विभागाने नवीन इंट्रा ऑपरेटिव्ह सीटी स्कॅन आणि नवीन अत्याधुनिक बायप्लेन डी.एस.ए. मशीन मिळविले आहे.
- विभागाने एक सर्वसमावेशक स्ट्रोक व्यवस्थापन कार्यक्रम सुरु केला आहे.

  १) खुल्या शस्त्रक्रिया :

  मोठ्या शस्त्रक्रिया - १,३२०

  लहान शस्त्रक्रिया - १०६

  २) डी.एस.ए. :

  डी.एस.ए. मोठ्या - १४५

  डी.एस.ए. लहान - ४२६

**२४ ) अस्थिव्यंगशास्त्र चिकित्सा विभाग :**

- अस्थिव्यंगशास्त्र चिकित्सा विभागाकडे सांधेरोपण व मज्जातंतूशी संबंधित शस्त्रक्रिया करण्याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध असलेले शस्त्रक्रियागार उपलब्ध आहेत.
- **विशेष सेवा**

  १. आपत्कालीन अपघात व अस्थिव्यंग शस्त्रक्रिया सेवा.
  २. संपूर्ण सांधे बदल/ सांधेप्रत्यारोपण सेवा.
  ३. जटिल (मणक्याची) मज्जातंतू शस्त्रक्रिया.
  ४. दुर्बिणीतून सांध्याच्या शस्त्रक्रिया व खेळाडूंवर औषधौपचार.
  ५. लहान मुलांच्या अस्थिव्यंग शस्त्रक्रिया.

**२५) नेत्रशास्त्र चिकित्सा विभाग :**

- तलवाडा येथील मासिक शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातात.
- अक्षीय लांबीचे अचूक मापन आणि इंट्राओक्युलर लेन्स पॉवरची गणना करण्यासाठी नवीन 'ऑप्टिकल बायोमीटर टोमी' स्थापित केले आहे.
- अपवर्तक त्रुटी आणि केराटोमेट्रीच्या गणनेसाठी नवीन ऑटोरेफ्रॅक्टोमीटर रेक्सक्साम.
- 'रेटीनल' आजार शोधण्यासाठी नवीन हेडलबर्ग ओसीटी अँजिओग्राफी.

२६) **स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विभाग :**

- प्रसूतिशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्रातील सर्जिकल सुरक्षिततेवर सीएमई राबविण्यात आली.
- निवासी डॉक्टरांसाठी शिक्षक कार्यशाळा आयोजित केल्या.
- सदर विभागाचे शिक्षक, कर्मचारीवृंद एम.ओ.जी. एस. (MOG's.) च्या' नंदिता पालशेतकर पदव्युत्तर अभ्यासक्रम' या कार्यक्रमात सहभागी झाले होते.
- बायोएथिक्स ग्रँड राउन्डस.
- स्तनपान व्यवस्थापन प्रशिक्षण.
- जागतिक स्तनपान सप्ताह निमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली.

२७) **व्यवसायोपचारशास्त्र शाळा आणि केंद्र :**

- विभागातील प्राध्यापक आणि व्यवसायोपचार तज्ज्ञ यांना भारतीय नौदलाच्या अश्विनी रुग्णालयाच्या अर्ली इंटरव्हेशन विभागाच्या मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

२८) **जन औषधवैद्यकशास्त्र विभाग :**

**आयुष्मानभव आरोग्य मेळा :**

- आयुष्मानभव आरोग्य मेळा योजनेतून आरोग्याशी संबंधित विषयांवर महिन्याच्या प्रत्येक शनिवारी प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC), खडवली, येथे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- **पल्स पोलिओ लसीकरण :**

  निमराष्ट्रिय पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रम अंतर्गत दि.१०/१२/२०२३ ते १५/१२/२०२३ पर्यंत पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. हा एक दूय्यम राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रम होता.
- नायगाव जेरियाट्रिक (ज्येष्ठ नागरिकांसाठी) बाह्यरुग्ण सेवा केंद्रामध्ये येणा-या लाभार्थ्यांसाठी भौतिकचिकित्सा (फिजिओथेरपी) सुरु करण्यात आली आहे.
- मालवणी नागरी आरोग्य केंद्र येथे कॉपर - टी बाह्य रुग्ण सेवा दि. ११.०९.२०२३ रोजी सुरु करण्यात आली आहे.
- मालवणी झोपडपट्टी भागात दंतरोगाबद्दल प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देण्याकरीता फिरते दंत बाह्यरुग्ण (मोबाईल डेंटल ओपीडी सेवा) सुरु करण्यात आली आहे.
- औषध- प्रतिरोधक क्षयरोगाची प्रकरणे लवकरात लवकर शोधण्याकरीता औषध प्रतिरोधक क्षयरोग बाह्यरुग्ण सेवा दि.२२.०५.२०२३ पासून सुरु करण्यात आली.

२९) **बालरोगशास्त्र विभाग :**

- ह्या विभागाचे तीन उपविभाग आहेत. अत्यावश्यक वैद्यकीय सेवा २४ तास चालू असते.
- विशेष सेवा-अद्ययावत बालरोग अतिदक्षता विभाग, जननशास्त्र विभाग, बालरोग संशोधन प्रयोगशाळा, ऊर-रोग चिकित्सा विभाग, मूत्रपिंड चिकित्सा विभाग आणि संधिवात चिकित्सा विभाग, बाल अपस्मार चिकित्सा व थॅलेसेमिया चिकित्सा डे केअर केंद्र (पाळणा घर केंद्र) हे विभाग आहेत.
- ह्या विभागामध्ये सुदृढ बालक चिकित्सा, विद्यार्थी (शाळा) चिकित्सा आणि शैक्षणिक दिव्यांग चिकित्सालय ह्या सेवा सुध्दा पुरविल्या जातात.

३०) **औषधनिर्माणशास्त्र विभाग :**

**रुग्ण सेवा :**

- औषधनिर्माणशास्त्र विभागाच्या आयुर्वेद संशोधन केंद्रात दर शुक्रवारी दुपारी बाह्य रूग्ण विभाग चालविला जातो. गेल्या वर्षी बाह्य रूग्ण विभागात १,०४८ रुग्णांची नोंद झाली होती.

- आयुर्वेदिक बाह्य रुग्ण विभागातील रुग्णांना कक्षामध्ये आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यात येते. जेथे सखोल मूल्यमापन, पंचकर्म उपचार आणि इतर उपचारात्मक प्रक्रिया पार पाडल्या गेल्या. सन २०२३ मध्ये ६८४ आंतररुग्ण प्रवेश झाले.

**३१) शरीरविकृतिशास्त्र विभाग :**

- 'ईएमएस' प्रयोगशाळा २४ तास कार्यरत असते.
- शवविच्छेदनाची सुविधा २४ तास उपलब्ध केली.
- पदवीपूर्व व पदव्युत्तर, (एम.बी.बी.एस., एम.डी., डी.एम.एल.टी., ओ.टी.पी.टी.) विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण.
- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित १२ विद्यार्थ्यांसाठी फेलोशिप पदे आहेत.
- प्रयोगशाळेच्या एनएबीएल (NABL) मान्यतेसाठी अर्ज करण्यात येत आहे आणि त्यासाठी काही प्रयोगशाळांचे नुतनीकरण करण्यात आले आहे

**३२) मनोविकृतीशास्त्र चिकित्सा विभाग :**

- हा विभाग मानसिक आजार असलेल्या रुग्णांसाठी दैनंदिन बाह्यरुग्ण आणि आंतररुग्ण सेवा प्रदान करतो. बालमार्गदर्शन चिकित्सा, स्मरणशक्ती चिकित्सा, आत्महत्या प्रतिबंधासाठी समुपदेशन, लैंगिक समस्यांवर सामुहिक समुपदेशन आणी रूग्णांच्या नातेवाईकांसाठी आजारावर मार्गदर्शन अशा प्रकारच्या वविविध सेवाही दिल्या जातात.
- समाजासाठी अनेक प्रकारचे जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात.
- आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे व्यसनाधीनता उपचार प्रादेशिक केंद्र सुरु करण्यात आले आहे.
- मानसिक आरोग्य हेल्पलाईन हितगुज (HITGUJ) (०२२-२४१३ १२१२) देखील विभागामार्फत रुग्ण आणि आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांसाठी चालविली जात आहे.
- नियमित योग सत्र आयोजित करण्यासाठी योग शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**३३) बालरोग शल्य चिकित्सा विभाग :**

- ह्या विभागाने लहान वयोगटातील रुग्णांकरीता मिनिमल एक्सेस सर्जरी या सुरू केली आहे. त्यामुळे रुग्ण सेवेत लक्षणीय प्रगती झाली आहे.
- ह्या विभागात सर्व वयोगटातील मुलांवर निदान विषयक व उपचार विषयक लॅप्रोस्कोपी आणि थोरॅकोस्कोपी करण्यात येते. त्यामुळे जखम रहात नाही. शस्त्रक्रियेपश्चात वेदना कमी होतात आणि १४ वर्षांत जवळपास ४,८५० किंवा एमएएस १९४ त्यापेक्षा जास्त शस्त्रक्रिया केल्या गेल्या आहेत.
- तसेच, बाल रुग्णांमधील मुत्रखड्याच्या लेझर प्रणालीने १०७ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहे.

**३४) सुघटन शल्य चिकित्सा विभाग :**

- ह्या विभागात सुघटन शल्यशास्त्र चिकित्साच्या रूग्णांसाठी ४० खाटा आणि जळीत स्त्रिया व लहान मुलांसाठी १२ रुग्णशय्यांचा कक्ष आहे.
- सुघटन शल्य चिकित्सेसाठी ८१४ रुग्ण आणि जळीत रुग्णांच्या विभागात ७२ रुग्ण दाखल करण्यात आले.
- अपघात विभागातून आणि इतर विभागातून पाठविलेल्या रुग्णांसाठी तातडीची सेवा अहोरात्र चालू असते. तातडीच्या आणि नियमित सेवेत एकूण ५,६४० रूग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. बाह्य रुग्ण विभागामध्ये ७,६८७ रुग्णांवर उपचार करण्यात आले.
- के.ई.एम. टिश्यू बँकेचे उद्घाटन जानेवारी २०२३ मध्ये करण्यात आले आणि अम्निऑन आणि त्वचा देणगी मिळत आहे.

## ३५) क्ष-किरण विभाग :

- **रुग्णसेवा :** रा.ए.स्मारक रुग्णालयातील क्ष-किरण विभाग हा भारतातील सर्वात मोठ्या शिक्षण विभागांपैकी एक आहे. जो प्रदान केलेल्या क्लिनिकल सेवा आणि रेडिओलॉजी रेसिडेन्सी, फेलोशिप, रेडिओग्राफर प्रशिक्षण, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (एमयूएचएस) चा कार्यक्रम या दोन्ही बाबतीत सेवा देत आहे. विभाग दरवर्षी ४,००,००० रुग्णांची तपासणी करतो. या विभागात सर्व प्रकारच्या निदान आणि इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिकल प्रक्रिया केल्या जातात.

## ३६) मूत्ररोग शल्य चिकित्सा विभाग :

- मूत्ररोग शल्य चिकित्सा विभागाच्या प्रयत्नांमधून अवयव प्रत्यारोपण आणि दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याकरीता नविन सेमिनार हॉल उभारण्यात आला आहे. मृत देहावर प्रात्यक्षिकाद्वारे अवयव प्रत्यारोपण व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया यांचे प्रशिक्षण देण्यात येते.

## ३७) भौतिकोपचार चिकित्सा शाळा आणि केंद्र :

- कार्डिओरेस्पिरेटरी फिजिओथेरपी मध्ये आर्थ्रोस्कोपी आणि स्पोर्ट्स रिहॅब यावर परिषद आयोजित करण्यात आली.
- दि. ०८ सप्टेंबर २०२३ रोजी 'जागतिक भौतिकोपचार दिन' हा सांध्यांचा संधिवात विषयसुत्रासह सादर केला. कर्मचारी आणि रुग्णांसाठी भित्तीपत्रिका आणि पीपीटी (P.P.T.) कार्यस्थळी प्रदर्शित करण्यात आले.
- दि. २९ सप्टेंबर २०२३ रोजी 'जागतिक हृदय दिन' या विषयसूत्रावर आधारित भित्तीपत्रिका स्पर्धा आयोजित करण्यात आली.
- वृद्धापकाळ समुदाय सेवा प्रदान करण्यात आल्या.

## ३८) बधिरीकरणशास्त्र विभाग :

**रुग्ण सेवा :**

- दि.१२ मे २०२३ पासून नविन पोस्ट ऍनेस्थेशिया केअर युनिट (PACU) (१२ रुग्णशय्या) रा.ए.स्मा.रुग्णालयाच्या मुख्य इमारतीमधील दुस-या मजल्यावर सुरु करण्यात आलेले आहे.

**सामाजिक बांधिलकी :**

- तेरणा भौतिकोपचारशास्त्र महाविद्यालय, नेरुळ, नवी मुंबईच्या चौथ्या वर्षाच्या भौतिकोपचारशास्त्र आंतर्वासिता विद्यार्थ्यांसाठी सीपीसीआर (बीएलएस) प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. तसेच, इतर विद्यार्थ्यांकरिता सीपीआर आणि एसीएलएस प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**शिक्षण :**

- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ मान्यताप्राप्त ४ शिष्यवृत्ती अभ्यासक्रम यशस्वीरित्या चालवण्यात आलेले आहेत.
- 'अपडेट इन ऑर्थोपेडीक अनॅस्थेशिया' सीएमईचे (CME) ह्या विभागाकडून आयोजन करण्यात आलेले आहेत.
- पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सतत शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात आले.

## ३९) शरीरक्रिया शास्त्र विभाग :

- **रुग्ण सेवा :** रा. ए. स्मारक रुग्णालयातील गरजू रुग्णांना (विशेषत: 'इंडोव्हॅस्कुलर इंटरव्हेन्शन्स' करीता) दिलेल्या अनुदानाच्या अर्जाची छाननी करण्यास हा विभाग मदत करतो व ही प्रक्रिया संगणकीकृत करण्यात आली होती. यामुळे रुग्णांना आर्थिक अडथळे दूर होण्यास आणि आवश्यक उपचारांची व्यवस्था करण्यास मदत होते.
- **शिक्षण :** मास्टर्स कोर्स इन स्पोर्टस हया मुंबई विद्यापीठाकडून दिल्या जाणा-या प्रशिक्षणासाठी विभागातील तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करतात.
- **संशोधन :** इतर विभागांच्या सहकार्याने शरीरक्रियाशास्त्र व त्यातील विविध पैलू हयांच्याशी निगडीत संशोधन केले जाते.

## ४०) होमिओपॅथी विभाग :

- होमिओपॅथी विभागात दर मंगळवारी सकाळी ८.३० ते सकाळी १०.३० या वेळेत अंदाजे५५ ते ६५ रुग्ण पाहिले आहेत. दर शनिवारी दुपारी १.३० ते दुपारी ३.०० या वेळेत अंदाजे२५ -३० रुग्ण पाहिले आहेत.
- क्रॉनिक रेनल फेल्युअर, ॲडव्हान्स कॅन्सर, अप्पर आणि लोअर रेस्पीरेटरी ट्रॅक्ट ॲलर्ज,ॲन्झायटी न्यूरोसि, डिप्रेशन डिसऑर्ड, चाइल्डहुड एपिलेप्स, एक्जिम, सोरायसि, लाइकेन प्लानस, इरिटेबल बोवेल सिंड्रोम, अल्सरेक्टिव्ह कोलायटिस यासारख्या विविध निदान क्षेत्राशी संबंधित प्रकरणे आहेत.
- आवश्यकतेनुसार पॅथॉलॉजी विभाग, मूत्ररोगशास्त्र विभाग, बालरोगशास्त्र विभाग, अस्थिव्यंगशास्त्र विभाग यासारख्या संबंधित विभागांकडे प्रकरणे नियमितपणे पाठविली जातात.
- शनिवारी बाह्य रुग्ण विभागामध्ये रुग्णांना पॅलीएटिव्ह केअर करताना अगोदर पॅथॉलॉजिकल केसेस विशेषत: कर्करोगाने ग्रस्त असलेले रुग्ण पाहिले जातात.

## ४१) समाजसेवा विभाग :

- **रुग्णसेवा** - समाज सेवा विभागात कार्यरत असणा-या समाज विकास अधिकाऱ्यांनी सुमारे ३६,३३१ बाह्य व आंतररुग्णांसाठी विविध प्रकारची मदत प्राप्त करुन दिली. समुपदेशन, उपचाराकरीता निधी जमविणे तसेच, आरोग्य विषयक जाणीव - जागृतीकरीता विविध कार्यक्रम आयोजित केले.
- **निधी उभारणी** :- गरीब रुग्णांच्या औषधोपचार, शस्त्रक्रिया तसेच, पुनर्वसनासाठी सुमारे रु. १२,५०,१४,३३३/- जमा करुन दिले. तसेच, अनेक रुग्णोपयोगी देणग्या वस्तूरुपाने मिळविल्या.
- मा. अधिष्ठात्री यांच्या मार्गदर्शनानुसार माहे मे २०२२-२०२३ यासाठी 'व्यावसायिक सामाजिक जबाबदारी' (सीएसआर) द्वारा रुग्णालयात विविध विभागांसाठी यंत्र सामुग्री व रुग्णोपयोगी प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. यंदाचे वर्षी 'व्यावसायिक सामाजिक जबाबदारी '(सीएसआर) द्वारे रु.१,९९,००,०००/- एवढा निधी उभारण्यात आला.

## ४२) आहार विभाग :

### रुग्णांची काळजी :

- सन २०२३ मध्ये विशेष पोषण काळजी प्रदान करण्यात आली. जसे - डूज सिंड्रोम (DOOSE SYNDROME) सारख्या दुर्मिळ न्यूरोलॉजिकल आजारांसाठी सुधारित कीटोजेनिक आहार; एमएसयूडी, फ्रुक्टोस १, ६ बी - फॉस्फटस, ग्लुटरिक ॲसिडयुरिया इ. कमतरता यांसारख्या दुर्मिळ अनुवांशिक विकारांसाठी मेटाबॉलिक आहार दिला जातो.

## ४३) औषधालय विभाग :

- मुख्य औषधालय हे औषध व सौंदर्य प्रसाधने कायद्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अद्ययावत करण्यात आलेआहे. रुग्णांना अधिक योग्यरित्या रुग्णसेवा देण्याकरीता अधिकची औषध खिडकी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- रा.ए.स्मारक रुग्णालय औषध फॉर्मूलरी (FORMULARY) नुसार विविध मिश्रणे तयार करुन आणि रुग्णांना देण्यात आली.
- फार्मसी विभागांतर्गत औषधालय विभागाद्वारे नेफ्रोलॉजी विभागाच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच रा.ए.स्मा.रुग्णालयातील रुग्णांना पी.डी.फ्लुईड (PD FLUID) उपलब्ध करुन वितरण करण्यात आले.
- फार्मसी विभागांतर्गत औषधालय विभागाद्वारे, अंत:स्रावीकशास्त्र विभागाच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच रा.ए.स्मा.रुग्णालयातील टाइप-1 मधुमेहाच्या बाह्य रुग्णांना 'इन्सुलिन' इंजेक्शन देण्यास सुरुवात केली.

**४४) चिकित्सालयीन औषधनिर्माणशास्त्र विभाग :**

**कर्तृत्वे आणि ठळक वैशिष्टये -**

- फार्माकोव्हिजिलन्स प्रोग्राम ऑफ इंडिया (पीव्हीपीआय) च्या अंतर्गत प्रादेशिक केंद्र म्हणून दोन फार्माकोव्हिजिलन्स 'प्रगत स्तर प्रशिक्षण' कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.
- दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजी 'राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह' दरम्यान, ह्या विभागाच्या फार्माकोव्हिजिलन्स टीमने कम्युनिटी मेडिसिन विभागातील जरा चिकित्सा बाह्य रुग्ण विभागामधील रुग्णांमध्ये औषधाच्या प्रतिकूल प्रतिक्रियांबद्दल जागरूकता निर्माण केली आहे.

## दोन ) - बा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालय आणि टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय

सन १९२१ मध्ये राष्ट्रपित्याच्या हाकेला प्रतिसाद म्हणून ४ विद्यार्थ्यांनी नवीन राष्ट्रीय संस्था सुरू करण्याच्या उद्देशाने, ब्रिटिश सरकार चालवित असलेले ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय सोडले आणि टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय उदयास आले. प्रारंभी, ही एक वैद्यकीय शाळा होती व तिची नोंदणी कॉलेज ऑफ फिजिशियन्स व सर्जन्स ह्यांचेकडून परवानाधारक पाठ्यक्रमासाठी करण्यात आली होती. सन १९४६ मध्ये संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात, बृहन्मुंबई महानगरपालिकेने  सदर महाविद्यालय ताब्यात घेतले व ते पदवी पाठ्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठास संलग्न करण्यात आले. सदर महाविद्यालयास टोपीवाला देसाई कुटुंब आणि सुविख्यात लोकहितवादी दाते डॉ. आनंदराव ल. नायर ह्यांचेकडून सढळ हस्ते देणगी मिळाली. म्हणून, त्यास टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय व बाई यमुनाबाई ल. नायर धर्मादाय रुग्णालय अशी नावे देण्यात आली. आज ह्या जोडसंस्था देशातील अग्रगण्य वैद्यकीय संस्थांपैकी एक आहेत.

ह्या रुग्णालयात वैद्यकीय, शल्यक्रिया, हृदयरोग व नवजात अर्भके अशा सर्व रुग्णांसाठी सुसज्ज असे अतिदक्षता विभाग आहेत. तर मुलांसाठी स्वतंत्र अतिदक्षता विभाग आहे. अपघात विभागाच्या बाजूलाच अपघात उपचार कक्ष (ट्रॉमा वॉर्ड) आहे. अन्न व औषध प्रशासनाची मान्यता असलेली रुग्णालयाची स्वतःची रक्तपेढी व रक्त घटक उपचारकेंद्र (कंपोनंट थेरपी युनिट) असून सदर रक्तपेढी फेडरेशन ऑफ ब्लड बँकेची सदस्य आहे आणि प्रस्तुत केंद्रात अष्टौप्रहर सेवा उपलब्ध केली जाते. ह्या रुग्णालयात होल बॉडी सी.टी. स्कॅनर, कार्डिॲक कॅथेटरायझेशन यंत्रणा आणि स्पेक्ट कॅमेरा इत्यादि यंत्रसामुग्री असून, अशा प्रकारचा स्पेक्ट कॅमेरा ह्या रूग्णालयात प्रथमच बसविला आहे आणि हया कॅमे-याच्या सहाय्याने वैदयकशास्त्राच्या विविध क्षेत्रांतील अनेक रोगांचे अचूक निदान करता येते. कस्तुरबा रूग्णालयाच्या आवारात असलेले, नायर रूग्णालयाचे स्वतंत्र हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी चेंबर्स हे मुंबईतील अशा प्रकारचे दुसरे केंद्र आहे. मुंबईत प्रथम स्थापन झालेले स्वतंत्र हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपी चेंबर्स, (H.B.O.T.) वडाळा येथील पोर्ट ट्रस्ट रूग्णालय येथे आहे.

रुग्णालय व्यवस्थापक माहिती (HMIS) पध्दतीमुळे रुग्णालयातील प्रशासकीय काम व्यवस्थित होण्यास मदत झाली असून पूर्वी रुग्णांना दिलेल्या औषधांची तसेच उपचाराची माहिती या प्रणालीमुळे तंतोतंत मिळते. रुग्णालय व्यवस्थापन प्रणालीमुळे रुग्णांची संपूर्ण माहिती डॉक्टरांना कळत असल्यामुळे संबंधित वैद्यकिय अधिकारी रुग्णांना चांगली व त्वरीत सेवा देऊ शकतात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हेल्थ केअर सुविधा (बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय, कस्तुरबा रुग्णालय आणि इतर ठिकाणी) राबविण्यात येणारी एचएमआयएस प्रणाली 'आरोग्य संचयनी' म्हणून ओळखली जाते. एक्स-रे, सीटी-स्कॅन, यूएसजी सारख्या संग्रहित थ्री-डी प्रतिमांसह व्यवस्थापन आणि वास्तविक रुग्णांची माहिती सर्व बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासह, रेडिओलॉजी आणि प्रयोगशाळेतील उपकरण एकत्रिकरणासाठी पी.ए.सी.एस. देखील रेडिओलॉजिस्ट आणि लॅब तंत्रज्ञांनी त्वरित अहवाल देण्यासाठी तयार केला आहे.

चांगल्या व्यवस्थापन आणि प्रशासनासाठी एच.एम.आय.एस.विविध डॅशबोर्ड्स आणि एमआयएस अहवालासह देखील सक्षम केले गेले आहेत, जे सारांशित तसेच रुग्णालयाच्या विभागीय आकडेवारीचा तपशीलवार दृष्टीकोन प्रदान करतात, जसे की कोविड प्रकरणांची नोंद, रुग्णालयातील बेडची संख्या, एचएमआयएस मधील वास्तविक वेळ, एक्स-रे, लक्षणे ग्रस्त रुग्ण, एसीम्प्टोमॅटिक रुग्ण, बरे/डिस्चार्ज आणि मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या, अचूक संगणकीकृत बिलिंग इत्यादीची नोंद ठेवली जाते. बा. य. ल. नायर धर्मा. रुग्णालय येथील एच. एम. आय. एस. प्रणालीमुळे रुग्णालयाशी संबंधित प्रशासनाचे काम अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यात मदत केली आहे. आता पुनर्क्रमित पातळी राखण्यासाठी रुग्णाला दिलेल्या औषधांची संख्या वास्तविक वेळेत तपासणे शक्य आहे. प्रशासनाच्या दृष्टीकोनातून विभागानुसार आधारित रुग्णांची संख्या मिळवणे आता सोपे झाले आहे. वास्तविक वेळेतील नोंदणी झालेल्या रुग्णांची माहिती मिळू शकते, जो विभागावरील भार व्यवस्थापित करण्यात आणि डॉक्टर आणि रुग्ण यांचे मूल्यांकन करण्यास मदत करतो.

**टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय :**

हे महाविद्यालय सन १९२१ च्या राष्ट्रीय चळवळीच्या वेळी, वैद्यकीय परवानाधारकांना शिक्षण देणारी संस्था म्हणून प्रथम सुरू करण्यात आली आणि नंतर राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणून संबोधले जाऊ लागले. सन १९४६ मध्ये महाविद्यालयाचा दर्जा पदवी परीक्षेपर्यंत वाढविण्यात आला व ऑक्टोबर १९४६ मध्ये ते मुंबई विद्यापीठास संलग्न करण्यात आले व महानगरपालिकेने ते आपल्या ताब्यात घेतले. टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय हे आता संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रख्यात वैद्यकीय महाविद्यालय बनले आहे.

ह्या महाविद्यालयात प्रतिवर्षी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी १५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. भारतीय वैद्यकिय नियमानुसार अतिविशेषकृत विभागातील म्हणजेच हृदयशास्त्र, हृदयशल्यचिकित्सा, मज्जातंतूशास्त्र, मज्जातंतू शल्यचिकित्सा विभाग, मूत्ररोग विभाग, आंतरासर्गविभाग, जठरांत्रचिकित्साशास्त्र विभाग (वैद्यकिय), औषधवैद्यक शास्त्र विभाग, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र विभाग, इ. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या श्रवणशास्त्र व वाकविकृति उपचार पध्दतीच्या पदवी अभ्यासक्रमासाठी १० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ही सुविधा फक्त हया संस्थेतच उपलब्ध आहे.

सन १९९०-९१ मध्ये स्कूल ऑफ ऑक्युपेशनल थेरेपी अँड फिजिओथेरपीची सुरुवात झाली. दरवर्षी १० बी.एस.सी. आणि एम.एससी. विद्यार्थ्यांना यूजी आणि पीजी अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जातो. या विद्यालयात नर्सिंग कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेने चालविल्या जाणाऱ्या परिचारिका विद्यालयात दरवर्षी १०० विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो.

**शरीररचना शास्त्र विभाग :**

ह्या विभागाकडून एम.बी.बी.एस., बी.पी.टी.एच., बी.पी.एम.टी., बी.ओ.टी.एच., बी.ए.एस.एल.पी आणि नर्सिंगच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शिकविले जाते. त्याचप्रमाणे एम.डी. व पी. एच. डी. च्या विद्यार्थ्यांना शरीर रचना शास्त्र शिकविले जाते. शरीर दान आणि शरीर दान जनजागृती कार्यक्रम राबविले जातात.

**बधिरीकरणशास्त्र विभाग :**

बधिरीकरणशास्त्र विभाग हा बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालयातील व नायर दंत रुग्णालय व महाविद्यालय येथे विविध शस्त्रक्रियागारांना बधिरीकरणशास्त्र संबंधित सेवा पुरवितो. बधिरीकरणशास्त्र विभागातील ओ. पी. डी. पहिल्या माळ्यावर स्थित आहे. वेळ सकाळी ८.३० ते १.३० सोमवार ते शनिवार. बधिरीकरणशास्त्र विभाग आय.सी.यु. व ट्रॉमा ह्या दोन अत्यावश्यक विभागासाठी सेवा पुरविते. विभागातर्फे सोमवार व गुरुवार यादिवशी वेदनाशमन सेवा रुग्णांना देण्यात येतात. बधिरीकरणशास्त्र विभागात दरवर्षी पदव्युत्तर २६ व बी.पी.एम.टी. मध्ये ०७ असे विद्यार्थी दाखल होत असतात. ह्या विभागात विविध विषयावर संशोधन केले जाते.

**ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपी** :

ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपी विभागाची स्थापना जानेवारी १९६६ मध्ये करण्यात आली आणि दक्षिण आशियातील उच्चार-भाषा आणि श्रवण कमी असलेल्या व्यक्तींचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन करण्यासाठी हा पहिला विभाग आहे. ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपीमध्ये बॅचलर प्रोग्राम १९६७ मध्ये सुरू झाला आणि पदव्युत्तर कार्यक्रम १९९६ मध्ये सुरू झाला.

हा विभाग भाषण, भाषा, गिळणे, ऐकणे आणि संतुलन विकारांची ओळख, निदान आणि व्यवस्थापनाशी संबंधित असंख्य उपक्रम राबवतो. सेवांची श्रेणी नवजात बालकापासून वृद्धापकाळापर्यंत वाढलेली असते. भाषण-भाषेचे विकार असलेल्या मुलांचे जसे की भाषेतील विलंब दुय्यम अटेन्शन डेफिसिट हायपरएक्टिव्हिटी डिसऑर्डर ए.डी.एच.डी. (ADHD), ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर, श्रवण कमी होणे, सेरेब्रल पाल्सी, तोतरेपणा, डिस्फोनिया, बोलण्याचा आवाज विकार, डिसार्थरिया इत्यादींचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन केले जाते.

**जीवरसायन शास्त्र विभाग :**

जीवरसायनशास्त्र विभागाने फेब्रुवारी २०१८ मध्ये क्लिनिकल बायोकेमिस्ट्री लॅब आणि इमर्जन्सी लॅबचा पदभार स्विकारला. तेव्हापासून तांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती, नवीन साधने खरेदी करणे आणि नियमित गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम आयोजित करणे यासारख्या बऱ्याच सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. या प्रयोगशाळामार्फत संपूर्ण रुग्णालयाकरिता सेवा पुरविली जाते. क्लिनिकल बायोकेमिस्ट्री लॅबमध्ये वर्षाकाठी सुमारे २० लाख चाचण्या केल्या जातात आणि आपत्कालीन प्रयोगशाळेत वर्षाकाठी १२ लाख चाचण्या केल्या जातात.

**हृदयशल्य चिकीत्सा विभाग :**

हृदयशल्य चिकीत्सा विभागाने विभागाने सन २०२३-२४ मध्ये ५०० हून अधिक ओपन हार्ट सर्जरी केल्या आहेत. ज्यात जन्मजात आणि नियमित हृदयविकाराचा समावेश आहे. विभाग एओर्टो-बायफेमोरल ग्राफ्टिंग आणि फेमोरो-पॉपलाइटल ग्राफ्टिंग सारख्या रक्तवाहिन्यासंबंधी प्रकरणे देखील करत आहे, ऑफ-पंप कार्डियाक शस्त्रक्रिया नियमितपणे केल्या जात आहेत. विभागाने प्रौढ रुग्णांमध्ये डबल आउटलेट राईट व्हेंट्रिकल डी.ओ.आर.व्ही. सारख्या जटिल जन्मजात हृदयविकारांवर शस्त्रक्रिया सुरू केल्या आहेत.

**चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग :-**

१) **विभागाच्या रुग्ण सेवा :**

- **थेरप्युटीक ड्रग मॉनिटरिंग (टी.डी.एम.) ओ.पी.डी. :** औषधांची रक्तातील पातळी तपासणे.
- **आयुर्वेदिक विभाग :** आयुर्वेदिक ओ.पी.डी. व पंचकर्म सेवा
- **विशेष प्रयोगशाळा सेवा :** हा विभाग विशेष प्रयोगशाळा तपासणी देखील करतो. उदा. पी.टी. - आय.एन.आर., ए.पी.टी.टी., होमोसिस्टीन, फिब्रिनोजेन, डी-डायमेर, संपूर्ण लिपिड प्रोफाइल, (एकूण कोलेस्ट्रॉल, एच.डी.एल. कोलेस्ट्रॉल, एल.डी.एल. कोलेस्ट्रोल, ट्रायग्लिसराइड्स), प्रोटीन 'C' प्रोटीन 'S' ॲंटिथ्रोम्बीम आणि C - प्रतिक्रियाशील प्रथिने.

२) **प्रतिकूल औषध प्रतिक्रिया (ए.डी.आर.) मॉनिटरिंग सेंटर (ए.एम.सी.) विभाग :** हे भारत सरकारच्या फार्माकोव्हिजिलन्स आणि मॅटेरियो व्हिजिलन्स प्रोग्राम अंतर्गत औषधे आणि वैद्यकिय उपकरणांसाठी ए.डी.आर. देखरेख केंद्रांपैकी एक आहे.

**रोगप्रतिबंधक व सामजिक वैद्यकशास्त्र विभाग :-**

१) यूजी शिक्षण : एम.बी.बी.एस. कोर्स, नर्सिंग कोर्स, ऑक्युपेशनल थेरपी आणि फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांना यूजी टिचिंगमध्ये समाविष्ट केले जाते.

२) पीजी अध्यापन- एम.डी. कम्युनिटी मेडिसिन कोर्समध्ये दरवर्षी १० विद्यार्थी प्रवेश घेतात.

३) ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत खारबांव जिल्हा ठाणे येथील प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात सेवा पुरवितो.

४) शहाजी नगर, मानखुर्द या शहरी झोपडपट्टी भागात असलेल्या दोन प्राथमिक आरोग्य केंद्राचे व्यवस्थापन कम्युनिटी मेडिसिन विभागामार्फत केले जाते.

५) युनिव्हर्सल इम्युनायझेशन प्रोग्राम अंतर्गत जनऔषध वैद्यकीयशास्त्र विभागातर्फे लसीकरण क्लिनिकचे व्यवस्थापन केले जाते.

६) संशोधन उपक्रम : पीजी शिक्षक म्हणून मान्यता प्राप्त अनुभवी कर्मचारी असल्याने विद्यार्थ्यांना योग्य वैज्ञानिक पध्दतीच्या सहाय्याने मार्गदर्शन केले जाते.

७) वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप कार्यक्रम जनऔषध वैद्यकीयशास्त्र विभागाद्वारे व्यवस्थापित केला जातो.

८) जनऔषध वैद्यकीयशास्त्र विभागाच्या इन्फेक्शियस डिजीस सर्व्हेलन्स प्रोग्राम (आय. डी. एस. पी.) युनिटमध्ये संसर्गजन्य रोग वेक्टरजनित आजार, कोविड १९, अतिसारजन्य आजार आदींबाबत दररोज माहिती दिली जाते.

९) वरिष्ठ प्राध्यापक ई.सी.ए आर पी. आणि डी.डी.एफ. सारख्या विविध संस्थात्मक समित्यांचा सहभाग देखील आहे.

१०) या विभागामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध पावसाळी आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते.

११) एन.सी.डी. स्क्रीनिंग : लक्षणे नसलेल्या लोकांमध्ये मधुमेह आणि उच्च रक्तदाबाची प्रकरणे शोधण्यासाठी रुग्णालयासह शहरी आरोग्य केंद्रांमध्ये असंसर्गजन्य रोग (एन.सी.डी.) तपासणी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

१२) बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील मुलांना संदर्भ सेवा देण्यासाठी विभाग तज्ज्ञांसह स्कूल हेल्थ क्लिनिक देखील चालवत आहे.

१३) सार्वजनिक आरोग्य विभाग आणि एपिडेमिओलॉजिकल पेशींच्या समन्वयाने, विभाग विविध सामुदायिक सर्वेक्षण, रोग देखरेख उपक्रम आणि इतर राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये योगदान देतो.

**कान नाक व घसा विभाग (ENT):**

कान नाक घसा विभाग सर्व वयोगटातील कान, नाक, घसा आणि मान यांच्याशी संबंधित समस्यांचे सर्वसमावेशक बहु-विषय व्यवस्थापनामध्ये गुंतलेले आहे. विभागाने महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रातील रुग्णालयामधील पहिली व्हिडीओनिस्टॅगमोग्राफी प्रयोगशाळा (व्ही.एन.जी.लॅब) सुरू केली आहे. ज्यामध्ये व्हर्टिगोचे मूल्यांकन आणि व्यवस्थापनासाठी अत्याधुनिक व्ही.एन.जी. मशीन आणि इतर विविध उपकरणे आहेत. रुग्णांचे व्यवस्थापन करण्याव्यतिरिक्त, विभाग वैद्यकीय पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थी, नर्सिंग, भौतिकोपचार, व्यवसायोपचार, ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपी विद्यार्थ्यांना शिकवण्यात सक्रियपणे सहभागी आहे. विभागाने १९ ऑगस्ट २०२३ रोजी पल्मोनरी मेडिसिन विभागाच्या सहकार्याने ऍलर्जी आणि वायुमार्गावर सी.एम.ई. आयोजित केले होते.

**आंतरासर्ग विभाग :**

आंतरासर्ग विभागातर्फे मधुमेह विकार, गलग्रंथी विकार, सर्वसाधारण आंतरासर्गीय विकार, प्रजनन विकार, आंतरासर्गीय विकार, हाडाचे चयापचय विकार, मज्जातंतू आंतरासर्गीय विकार आणि मधुमेही पायांचे विकार याबाबत चिकित्सालय चालविले जाते. मधुमेही पायांच्या चिकित्सालयामध्ये रुग्णांच्या मज्जातंतूच्या विकारांचे लवकर निदान होण्यासाठी बायोस्थेशियोमिटर आणि रक्तवाहिन्यांच्या विकारांचे लवकर निदान होण्यासाठी हॅन्ड हेल्ड डॉप्लर ही उपकरणे प्राथमिक पडताळणी करण्यासाठी वापरली जातात आणि मधुमेह रुग्णांच्या गुंतागुंतीचा योग्य तो पाठपुरावा केला जातो. तसेच पायाची निगा व सुरक्षित पादत्राणे याबाबत सल्ला दिला जातो.

**न्याय वैद्यक शास्त्र विभाग :**

हा विभाग पदवीपूर्व एम.बी.बी.एस. आणि पदव्युत्तर एम.डी. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतो. M.C.P.C. २००६ पासून फॉरेन्सिक मेडिसीन विभागाकडून कार्यरत आहे. ही एक लैंगिक शोषणाचा सामना करावा लागलेल्या मुलांकरिता रुग्णालय आधारित सेवा आहे.

**जठरांत्र विभाग :**

जठरांत्र विभाग निदान आणि उपचारात्मक प्रक्रिया आयोजित करतो. निदान प्रक्रियेमध्ये अप्पर जीआय स्कॉपी, कोलोनोस्कोपी, ईआरसीपी, सिग्मोइडोस्कोपी, यकृत बायोप्सी, ड्युओडेनल बायल एस्पिरेट (गियार्डियासिस आणि कोलेस्ट्रॉल क्रिस्टल्ससाठी) यांचा समावेश होतो. विभागाद्वारे केल्या जाणाऱ्या उपचारात्मक प्रक्रियांमध्ये एसोफेजियल व्हेरिसियल स्क्लेरोथेरपी, एसोफेजियल व्हेरिसियल बँड लिगेशन, एसोफेजियल डायलेटेशन (कार्सिनोमा एसोफॅगससाठी), ग्लूसह गॅस्ट्रिक व्हेरिसिस इंजेक्शन, इ. चा समावेश आहे.

**वैद्यक औषधशास्त्र विभाग :**

वैद्यक औषधशास्त्र विभाग बाहयरुग्ण आणि आंतररुग्ण सेवा देते. सदर सेवेव्यतिरिक्त विशेष बाह्यरुग्ण विभाग दमा, उच्च रक्तदाब, संधिवात, दारुचे दुष्परिणाम, वयोवृध्द रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग वेगवेगळ्या ऋतुंमध्ये होणाऱ्या कटिबंधीय रोगासाठी बाहयरुग्ण सेवा पुरविते. अतिदक्षता विभागाप्रमाणे १५ खाटांचे HDU (High Dependency Unit) चालू करण्यात आले. एम.आय.सी.यु. - 23 खाटांच्या अतिदक्षता विभागाचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

**शल्यक्रियाशास्त्र विभाग :**

विशेष सेवा

**आंतरग्रंथी शल्यक्रिया :**

आंतरग्रंथी विकाराच्या शास्त्रांची एक नवीन उप शाखा विकसित झाली आहे. आंतरग्रंथी विकारांशी संबधित सर्जिकल युनिट थायरॉइड, पॅराथायराईड, ऍड्रीनल ग्रंथीच्या शस्त्रक्रिया केल्या जातात.

**स्तन शल्यक्रिया विभाग :**

स्तन रोगास समर्पित बाह्य रुग्ण विभाग दर बुधवारी दुपारी ०१.०० ते ०४.०० पर्यंत सुरु असतो. स्तनाच्या आजाराविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि लवकर रोगनिदान करण्यासाठी, लोक जागृतीसाठी वेगवेगळ्या ठिकाणी नियमित शिबिरे आयोजित केली जातात.

**मधुमेहामुळे होणारे पायाचे विकार :**

सर्व रुग्णांना जखमांवरील सर्व प्रकारचे आधुनिक उपचार मोफत उपलब्ध आहेत. रेडियोलॉजी विभागात एंजोग्राफी आणि इंटरव्हेन्शनल रेडियोलॉजीची सुविधा आणि कस्तुरबा रुग्णालयामध्ये उपलब्ध हायपरबेरिक ऑक्सिजन सुविधा यामुळे अनेक मधुमेही रुग्णांचे पाय बरे करण्यात मोलाचे सहाय्य मिळते.

**जठरांत्र शल्यक्रिया विभाग:**

जठरांत्र विकारांशी संबंधित अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या जातात. यकृत पित्ताशय आणि स्वादुपिंडाच्या विशेष कौशल्यपूर्ण शस्त्रक्रिया केल्या जातात.

सर्जिकल एन्डोस्कोपी (जठरांत्र अंतर दर्शन विभाग) नैसर्गिक मार्गातून लवचिक एन्डोस्कोप टाकून केलेली तपासणी अनेक रोगांचे निदान आणि उपचार करण्याची क्षमता देते.

**लॅपरोस्कोपी (दुर्बीणीतून शस्त्रक्रिया):**

लॅपरोस्कोपी या तांत्रिक प्रगतीमुळे संपूर्ण उदर पोकळी आणि छातीच्या पोकळी मध्ये प्रवेश करून छोटया छेदातून गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्याची क्षमता मिळते.

**सर्जिकल ओन्कोलॉजी (कर्क रोग शल्यक्रिया) :**

स्तन, जठर, मोठे आतडे, स्वादुपिंड, थायरॉईड,पॅराथायरॉईड आणि एड्रेनल अशा विविध अवयवावरील शस्त्रक्रिया केल्या जातात. या बरोबरच किमोथेरपी व रेडिओथेरेपी उपचार ही रुग्णालयात उपलब्ध आहेत.

**स्टोमा क्लिनिक :**

स्टोमा क्लिनिकमध्ये कोलस्टोमी आणि युरोस्टोमीच्या रुग्णांची देखभाल केली जाते. स्टोमा पिशव्या मोफत किंवा रूग्णांना सवलत दराने दिल्या जातात. हे प्रशिक्षित स्टोमा थेरपिस्टद्वारे चालवले जाते.

वेन क्लिनिक आणि लेझर थेरपी या विभागात अत्याधुनिक लेसर उपचार वाजवी किंमतीत केले जातात.

**हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी युनिट :**

शस्त्रक्रिया विभागाने चालविलेल्या हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपी युनिट कस्तुरबा रुग्णालयाच्या परिसरात स्थित आहे. मुंबई शहरातील हे सर्वात जुने कार्य करणारे असे हे युनिट आहे. गेल्या तीन दशकात, या युनिटने फक्त नायर

रुग्णालयातच नव्हे तर इतर सर्व नगरपालिका आणि सरकारी रुग्णालये आणि खाजगी रुग्णालये आणि शुश्रुषालयांमधून सुध्दा आलेल्या लाखो रुग्णांस वाजवी दरात एच.बी.ओ.टी. ची सेवा दिली आहे. अलिकडेच नवीन हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी चेंबर कार्यान्वित झाले आहे.

**रूधिरशास्त्र विभाग :**

रूधिरशास्त्र विभागामध्ये क्लिनिकल रूधिरशास्त्र आणि रूधिरशास्त्र प्रयोगशाळा समाविष्ट आहेत. ज्या रूग्णांना तात्काळ सेवेची व केमोथेरपीची गरज आहे त्यांना भरती करण्यात येते. रूधिरशास्त्रातील कर्करोग रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांच्याशी डॉक्टर संवाद साधून समुपदेशनातून या आजारातून होणारा त्रास कमी कसा होईल, यासाठी प्रयत्न केला जातो. लहान मुले तसेच, मोठया थॅलेसेमिया रूग्णांना रक्त चढविण्याची सेवा येथे उपलब्ध आहे.

**सुक्ष्मजीवशास्त्र विभाग -**

१) टो. रा. वैद्यकिय महाविद्यालय, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, आणि बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालयाचे पदवी पूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी हॉस्पिटल एम.यु.एच.एस. नाशिकशी संलग्न आहे.

२) विभाग त्याच्या विविध प्रयोगशाळांमधून संसर्गजन्य रोगांसाठी निदान सेवा प्रदान करतो जसे की, बॅक्टेरियोलॉजी, मायक्रोबॅक्टेरिओलॉजी, मायकोलॉजी, परजीवीशास्त्र, आण्विक निदान, सेरोलॉजी आणि इम्युनोलॉजी आय.सी.टी.सी. आणि आर.टी. आय./एस.टी.१ सह.

३) विभागात रुग्णालयातील सर्व ओपीडी आणि आयपीडी रुग्णांना सेवा दिली जाते.

४) विभाग काही तपासण्यांसाठी आपात्कालीन प्रयोगशाळा सेवा देखील प्रदान करतो जे गंभीर आजारी रुग्णांसाठी २४x७ उपलब्ध असतात.

५) विभाग आय.एस. ओ. १५१८९:२०१२ नुसार एन. ए. बी. एल. मान्यताप्राप्त आहे.

**मुत्रपिंडोपचारशास्त्र विभाग :-**

मुत्रपिंडोपचारशास्त्र विभाग २४ तास हेमोडायलिसिस सेवा देत असून विभागाकडे २९ डायलिसिस मशीन आहेत. मुत्रपिंडोपचारशास्त्र विभागामध्ये अतिदक्षता केयर युनिट असे खाते आहे. त्यामध्ये वेंटिलेटर ही सुविधा उपलब्ध आहे. मुत्रपिंडोपचार शास्त्र विभागाने एकुण ११,८३२ डायलिसिस सेशन केले आहे. एक्यूट व क्रोनिक किडनी निकामी झालेल्या रूग्णांना अविरत सेवा देता यावी हयासाठी डायलिसिस सेवा तीन वेगवेगळया कक्षामध्ये चालू करण्यात आली. मुत्रपिंडोपचारशास्त्र विभागाने एकूण १२ किडनी प्रत्यारोपण पार पाडले आहेत.

**मज्जातंतू शल्यचिकीत्सा विभाग :-**

ह्या विभागात नियमितपणे जटिल न्यूरोसर्जिकल शस्त्रक्रीया (मेंदू आणि मणक्याचे) आणि एंडोव्हस्कुलर प्रक्रिया केल्या जातात.

एम.सी.एच. विद्यार्थ्यांसाठी दररोज केस प्रेझेंटेशन, सेमिनार, फॅकल्टी डिस्कशन या स्वरूपात नियमित अध्यापन आयोजित केले जाते.

**स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र :-**

प्रसूती आणि स्त्रीरोग विभागामार्फत गेल्या वर्षी एकुण ३२०७ प्रसूती (१३८६ सिझेरियन सेशन सह) आणि १४५२ शस्त्रक्रिया (मोठया ६०८ व लहान ८४४)करण्यात आल्या. वंध्यत्व, मूत्ररोग आणि स्त्रीरोग ऑन्कोलॉजीसाठी विशेष सेवा प्रदान केल्या जात आहेत.

**नेत्रशल्यचिकित्सा विभाग :**

फिरते नेत्रचिकित्सा वाहन -

ह्या विभागाने लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत त्यांच्या दारात सेवा, रुग्णांची तपासणी, विशेषज्ञ नेत्र शल्यचिकित्सक आणि त्यांच्या टीमद्वारे अद्ययावत मशीनद्वारे तपासणी करणे या उद्देशाने हे काम पूर्ण केले आहे.

कोलेजन क्रॉस लिंकिंग (C3R) मशीन -

बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांमध्ये प्रथम, केराटोकोने, कॉर्निया पातळ होणे, पोस्ट लेसीक इत्यादी सारख्या डोळ्यांच्या उपचार करण्यासाठी उपयुक्त आहे.

**विकृतीशास्त्र विभागः**

**विशेष विभागीय कार्ये -**

(१) सर्जिकल पॅथॉलॉजी प्रयोगशाळेत इंटेलसिंट पूर्णपणे स्वंयचलित टिश्यू प्रोसेसेरची स्थापना.

(२) हेमॅटोलॉजी प्रयोगशाळेतील रुग्णांसाठी एच. एम.आय.एस. चा वापर सुरु केला.

(३) हेमॅटोलॉजी प्रयोगशाळेत ०२ पूर्णपणे स्वयंचलित कोगुलोमीटरचा वापर सुरु केला.

(४) सन २०२२ मध्ये आयोजित बाह्य रक्तदान (१४८) शिबिरांची विक्रमी संख्या.

(५) रक्त केंद्रामध्ये कूम्बच्या क्रॉस मॅचिंगसाठी जेल कार्ड तंत्रज्ञानाचा वापर सुरु केला.

(६) दात्याच्या तपासणीसाठी अचूक होमोग्लोबीन मापनासाठी स्वयंचलित हिमोग्लोबिन विश्लेषकांचा वापर सुरु केला.

(७) ओ.पी.डी.क्र. १६ च्या रक्त संकलन क्षेत्रात पब्लिक अॅड्रेसल प्रणाली सुरु केली.

(८) A.I.I.M.S. नवी दिल्लीचा इ.क्यू.ए. एस. कार्यक्रम, ओ.पी. डी. १६ मध्ये गुणवत्ता आश्वासनासाठी सुरु केला.

(९) इम्युनोहिस्टोकेमिस्ट्री पॅनेल मार्करची संख्या ५४ पर्यंत वाढली आहे.

**बालरोग चिकित्सा शास्त्र :**

नागपाडा येथे असलेल्या अर्ली इंटरव्हेंशन अँड रिहॅबिलिटेशन सेंटर फॉर चिल्ड्रेन (EIRCC) ने दि.१२ जुलै २०२३ पासून विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी सेवा सुरू केली आहे. बालरोग चिकित्सा, मानसोपचार, ईएनटी, नेत्रचिकित्सा, भौतिकोपचार, व्यावसायोपचार, ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपी, दंत इत्यादी विभागांचा समावेश असलेल्या बहु-अनुशासनात्मक सहयोगाद्वारे या सेवा प्रदान केल्या जातात. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते दि.२४ डिसेंबर २०२३ रोजी केंद्राचे अधिकृतपणे उद्घाटन झाले. बालरोग विभागाने स्पाइनल मस्क्युलर ऍट्रोफी एस. एम. ए. असलेल्या मुलांसाठी एस. एम. ए. आर. टी. (एस. एम. ए. पुनर्वसन आणि उपचार) बाह्यरुग्ण आणि GENIUS (जेनेटिक आणि अनडायग्नोस्ड सिंड्रोम) बाह्यरुग्ण सेवा सुरू केली आहे.

**बाल शल्यचिकित्सा विभाग :**

बाल शल्यचिकित्सा विभागाची स्थापना १९९३ मध्ये स्वतंत्र विभाग म्हणून करण्यात आली. हा विभाग १९९३ पासून एम.सी.एच.चे प्रशिक्षण देत आहे. भारतात बालरोग लॅपरोस्कोपी सुरू करणारा हा पहिला विभाग आहे. विभाग आठवड्यातून दोनदा (सोमवार आणि गुरुवार) बालरोग शस्त्रक्रिया ओपीडी चालवतो.

**औषधशास्त्र विभाग :**

औषधशास्त्र विभाग एमबीबीएस, बीडीएस, बीओटीएच, बीपीटीएच, बीपीएमटी आणि नर्सिंग डिप्लोमाच्या यूजी विद्यार्थ्यांना शिकवत आहे आणि प्रशिक्षण देत आहे.विभागात विविध पदव्युत्तर उपक्रम जसे की जर्नल क्लब, सेमिनार, गट चर्चा, प्रोटोकॉल सादर करणे, बायोएससे एक्सपेरीमेंट्स आयोजित केले जातात, फार्माकोव्हिजिलन्स, संस्थात्मक प्राणी नीतिशास्त्र समिती आणि संस्थात्मक नीतिशास्त्र समितीसाठी निवासी डॉक्टरांची नियुक्ती केली जाते. वैद्यकीय शिक्षण अध्यापन तंत्रज्ञानाद्वारे आयोजित कार्यशाळेत शिक्षकांच्या प्रशिक्षणात प्राध्यापकांनी सहभाग घेतला. विभागाने जानेवारी २०२४ मध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय मल्टीस्पेशालिटी कॉन्फरन्स (ATCON 2024) आयोजित केली होती.

**फिजिओथेरपी (भौतिकोपचार) :**

फिजिओथेरपी स्कूल आणि केंद्र महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ एम.यु.एच.एस. शी संलग्न पदवी पूर्व, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट शैक्षणिक कार्यक्रम चालवतात आणि त्यांच्या सेवा आंतरुग्ण कक्ष युनीट आणि अतिदक्षता विभाग रुग्ण आणि ओपीडी रुग्णांना देतात.

फिजिओथेरपी केंद्र मस्कुलोस्केलेटल ओपीडी, न्यूरो-रिहॅबिलिटेशन ओपीडी, छातीची ओपीडी दररोज आणि विशेष ओपीडी जसे की उच्च जोखमीच्या नवजात ओपीडी, स्तन कर्करोग ओपीडी, जेष्ठ नागरीकांसाठी (Geriatric OPD) ओपीडी, हदयशल्यचिकीत्सा पुनर्वसन कार्डिक सर्जरी रिहॅब ओपीडी आणि पायाची काळजी (फूट केअर) ओपीडी आठवड्यातून एकदा चालते.

विभागाने अलीकडेच लिम्फेडेमा ओपीडी फिटनेस ओपीडी आणि फूट केअर ओपीडी यासारख्या नवीन सेवा सुरू केल्या आहेत.

**सुघटण शल्य चिकित्सा :**

सन १९६४ मध्ये स्थापन झालेल्या या विभागामध्ये सध्या 30 खाटांची संख्या आहे. दरवर्षी एम.सी.एच. चे ४ निवासी डॉक्टर (प्रशिक्षणार्थी) यांना प्रवेश दिला जातो. हा विभाग कस्तुरबा रुग्णालयात बर्न्स युनिटही चालवतो. रुग्णांच्या उत्तम सेवेसाठी विभागाने कार्बन डायऑक्साइड डायोड आणि मल्टीप्लॅटफॉर्म लेसर विकत घेतले आहे. सन २०१२ मध्ये स्थापन करण्यात आलेली क्लिनिकल कौशल्य प्रयोगशाळा सप्टेंबर २०२१ मध्ये अपग्रेड करण्यात आली आहे.

**मनोविकृतीशास्त्र विभाग :-**

नायर रुग्णालय मनोविकृतीशास्त्र विभाग हा आय.एस.ओ. प्रमाणित असून येथे सर्व प्रकारच्या मनोविकृतीवर इलाज केला जातो. नेहमीच्या कामा व्यतिरिक्त येथे प्रशिक्षण व संशोधन कार्य तसेच पुढील खास सेवा रुग्णांना पुरविण्यात सर्व शिक्षा अभियनांतर्गत येणाऱ्या रुग्णांचे इलाज करण्यात येतात. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

शालेय मानसिक आरोग्य केंद्र हे भारतातील एकमेव केंद्र असून येथे सर्व शिक्षा अभियानांतर्गत येणाऱ्या रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार दिले जातात. आमच्या येथे अध्ययन क्षमता कमी असलेल्या मुला/मुलींसाठी लर्निंग डीसएबिलिटी क्लिनिक एल.डी. क्लीनिक चालवले जाते.

या विभागात आठवडयातून एकदा वृध्द आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मानसिक आरोग्याची तपासणी करून योग्य ते औषधोपचार केले जातात.

स्वामी विवेकानंद रेमेडीअल केंद्रातर्फे हा विभाग चालविण्यात येतो, ज्यामध्ये अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

या विभागाने ८ विद्यार्थ्यांसह Child & Adolescent in Mental Health मध्ये फेलोशीप सुरु केली आहे.

**श्वसनविकार विभाग :-**

हा एक सुपर स्पेशालिटी विभाग आहे जो श्वसन विकारांनी ग्रस्त रुग्णांना सेवा देतो. हा विभाग बाहयरुग्ण, आय.पी.डी., आय.सी.यु., झोपेचा अभ्यास इ. रुग्ण सेवा पुरवतो. या विभागामार्फत COPD, ILD, फुफ्फुसाचा कर्क रोग, OSAS, PTE, Hydropneumothorax, empyema, TPE, ABPA, पल्मोनरी AV विकृती इ. रोगांच्या रुग्णांना उपचार दिला जातो.

**रेडिएशन ऑन्कोलॉजी :**

रेडिएशन थेरपी ही कर्करोगाच्या उपचारांमध्ये वापरली जाणारी एक महत्त्वाची पद्धत आहे. रेडिएशन थेरपी कर्करोगाच्या पेशी नष्ट करते, ट्यूमर आकार कमी करते आणि लक्षणे दूर करते. रेडिएशन ऑन्कोलॉजी विभाग कर्करोगाच्या रुग्णांना उपचारात्मक आणि उपशामक रेडिओथेरपी प्रदान करतो. विभागाने टेलीथेरपी मशिनमध्ये नवीन किरणोत्सर्गी समस्थानिक कोबाल्ट ६० आणि ब्रेकीथेरपी मशिनमध्ये Ir-192 किरणोत्सर्गी समस्थानिक स्थापित केले आहेत ज्याचा कर्करोग रुग्णांच्या व्यवस्थापनासाठी खूप उपयोग होईल.

**त्वचा आणि गुप्तरोग विभाग :**

१) ॲक्ने सर्जरी मध्ये ॲक्ने, ॲक्नेकॉरकरीता केमिकलवील, उरमारोलर, सबसिशन पंच इलेवेशन, स्कॉर रिविजन हे उपचार केले जातात.

२) व्हिटोलिगो सर्जरी करिता ह्या विभागात सक्शन ब्लिसटर ग्रॉफ्ट, नॉन कल्चर मेलॅनोसाईट ट्रान्सफर, परमाबॅसन, स्पिलर थिकनेस त्वचा ग्राफ्टींग उपचार पध्दती मोठ्या प्रमाणात यशस्वीरित्या केल्या जातात.

३) एकसिशन - लोकल भूल देऊन सिचेशियससिस्ट, लिपोमा, न्युरोफायब्रोमा, स्टेटोसिस्टपमा सिस्टिक लेशन, म्युकोसेल, मोल, नर्व्ह इत्यादी वेगवेगळे उपचार केले जातात.

४) नेल एक्यलसन - नखे डिसआर्डर, अर्धे नखे याकरीता उपचार केले जातात.

५) पी.आर.पी. (प्लेटलेट रियाप्लाझमा) रुग्णांकरीता उपचार केले जातात.

६) स्किनबायोप्सी, निडल, मोलॅस्कम, कॉन्टॅजीओसम, कोमेडो एक्सप्रेशन, पोडोपायलीन वॉटर्स, नेलक्लिपकोओएच, ग्रॅम, टिएॅक, हेअर माऊट इ.पध्दती ह्या विभागात होतात.

**मुत्रशल्य चिकित्सा विभाग :**

या विभागात दर वर्षी १६,००० पेक्षा जास्त बाह्यरूग्णांना आणि २००० पेक्षा जास्त आंतररूग्णांना उपचार प्रदान केला जातो. दोन ओ टी सह मॉड्युलर ओटी कॉम्प्लेक्सचे उद्‌घाटन ३० जुलै २०१८ रोजी करण्यात आले. फेब्रुवारी २०२१ मध्ये एक समर्पित एंड्रोलॉजी क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. नेफ्रोलॉजी विभागासह मूत्रविज्ञान विभागाने जुलै १९९३ मध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण सुरु केले. तेव्हापासून, दोन्ही विभाग नियमितपणे मूत्रपिंड प्रत्यारोपण करत आहेत, दरवर्षी १०-१५ प्रत्यारोपण केले जातात. विभागाने ऑक्टोबर २०२३ मध्ये या रुग्णालयाच्या इतिहासातील पहिले स्वॅप रेनल ट्रान्सप्लांट देखील यशस्वीरित्या पार पाडले.

## तीन ) - नायर रुग्णालय दंत महाविद्यालय

**अ) दंत महाविद्यालय :**

देशातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था असलेल्या व मुंबई शहराच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या, नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाची स्थापना जुलै १९३३ मध्ये करण्यात आली.नायर रुग्णालय दंत महाविद्यालय हे दातांच्या सर्व प्रकारच्या आजारावर उपचार करण्यासाठी आधुनिक उपकरणे तसेच निष्णात व पारंगत कर्मचाऱ्यांनी सुसज्ज असे दंत संकुल आहे. नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, मुंबई विद्यापीठाशी आणि आता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न असून दंतोपचाराच्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणारे देशातील एकमेव दंत महाविद्यालय आहे. नायर रुग्णालय दंत महाविद्यालयात नियमाप्रमाणे आवश्यक असलेला अध्यापकीय व परिचारीका कर्मचारीवृंद उपलब्ध असून पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिक्षण देताना भारतीय दंत परिषदेने निर्धारीत केलेल्या सर्व निकषांची पूर्तता केली जाते. गेल्या अनेक वर्षांत संस्थेने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि नियतकालिके ह्यांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले असून भारतातील एक मान्यताप्राप्त आणि अग्रगण्य संस्था म्हणून नावलौकिक मिळविला आहे.

संस्थेची आजवरची प्रगती वाखाणण्याजोगी असून येथे विद्यार्थ्यांना दंत शास्त्रातील उच्च दर्जाचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. ह्या महाविद्यालयात दंत शास्त्रातील पुढील नऊ प्रमुख विविध शाखांमध्ये पदव्युत्तर शिक्षण देण्यात येते :–

(१) मुखरोग परीक्षा आणि क्ष-किरणशास्त्र विभाग,

(२) मुखहनुसुघटन उपचार विभाग,

(३) हिरडीरोग उपचार विभाग,

(४) दात भरण्याचा व वाचविण्याचा विभाग,

(५) बालदंत उपचार विभाग,

(६) दंतव्यंगोपचार विभाग,

(७) कृत्रिम दंत विभाग

(८) मुखरोग चिकित्सा विभाग, आणि

(९) सामाजिक दंत आरोग्य विभाग.

संस्थेच्या वाचनालय विभागात दृक-श्राव्य प्रणालीची सुविधा उपलब्ध आहे.

**ब) दंत रुग्णालय :**

ह्या संस्थेकडे आंतररुग्णांकरिता स्वत:चा मुखहनुसुघटन व दंत रोग उपचार विभाग आहे.

सद्यस्थितीत, नायर रुग्णालय दंत रुग्णालयात ०९ सुपर स्पेशालिटी विभाग आणि एकूण ३०३ दंत खुर्च्या आहेत. सर्व विभागात निष्णात डॉक्टर्स उपलब्ध आहेत जे आपल्या कामात पारंगत आहेत. तसेच विभागप्रमुख आणि सर्जनशील अधिष्ठाता यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली प्रत्येक टप्प्यावर उत्कृष्ट कामगिरी अविरत बजावण्याचे कार्य सर्व डॉक्टर्स करीत आहे.

रुग्णांच्या मौखिक आरोग्याच्या गरजा पूर्ण करत असताना दि. १८ डिसेंबर २०२३ रोजी सदर महाविद्यालयास ९० वर्ष पूर्ण होणार असून अत्याधुनिक असे सी.बी.सी.टी. तंत्र यंत्र व सुविधांनी सुसज्ज ऑपरेशन थिएटर, सिरॅमिक लॅब, इम्प्लांट सेंटर, मोबाईल डेंटल व्हॅन, व्यसनमुक्ती केंद्र आणि मुख कर्करोग केंद्र यासारख्या नवीनतम तंत्रज्ञान व उपकरणांचा अभिमान बाळगतो.

रुग्णालयाद्वारे शालेय दंत चिकित्सा कार्यक्रम आयोजित केले जातात. ज्याद्वारे महानगरपालिका शाळेतील मुलांवर विनामूल्य दंतोपचार करण्यात येतात. महानगरपालिकेच्या शाळेतील सुमारे १०,००० विद्यार्थ्यांवर दरवर्षी विनामूल्य उपचार केले जातात. त्याचप्रकारे अनाथाश्रमातील मुले, कैदी, दिव्यांग रुग्ण आणि महानगरपालिकेतील कर्मचारी यांनाही हे उपचार मोफत दिले जातात.

तसेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपचाराचा खर्च ५० टक्के अनुदानित आहे. महाविद्यालयात आता म.आ.वि. विद्यापीठाशी संलग्न पी.एच.डी. अभ्यासक्रम सुरु केला आहे. अलिकडेच, सामान्य जनतेला सेवा देण्याच्या उद्देशाने नायर रुग्णालय दंत महाविद्यालयात ०४ एन.सी.डी. कॉर्नर सुरु केले आहेत व त्याद्वारे ३० वर्षावरील सर्व रुग्णांच्या मधुमेह व उच्च रक्तदाब यांच्या तपासण्या करण्यात येतात.

ही संस्था वर्षानुवर्षे अधिकाधिक बहरत गेली आहे आणि ९० वर्षापूर्वी रुजलेल्या बीजाचे रुपांतर आज भरगच्च वृक्षामध्ये होऊन त्याची फळे आज आपल्याला लाभलेली आहे.

**नवीन विस्तारीत इमारत**

दि. १५.०३.२०२४ रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या नविन विस्तारीत इमारतीचा लोकापर्ण सोहळा पार पडला. या इमारतीमध्ये रुग्णांना प्रगत दंत उपचार प्रदान करण्यासाठी उत्कृष्ट केंद्र असेल तसेच दंत प्रयोगशाळा, सिम्युलेशन प्रशिक्षण लॅब, नवीन क्लासरुम आणि मॉड्युलर ओ.टी. असतील ज्यामध्ये मिनी आय.सी.यु. चा समावेश आहे आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व वॉर्डनची राहण्याची व्यवस्था देखील आहे. तसेच, कॅडकॅम डिजिटल लॅबची व्यवस्था देखील आहे. तळघरात ३७ वाहनांकरिता वाहनतळाची व्यवस्था आहे.

तळमजल्यावर मुख निदान व क्ष-किरण विभागाचा समावेश आहे, जिथे सर्व दंत रुग्णांची तपासणी होतील. ह्या असलेल्या सिबिसिटी, थ्रीडी प्रिंटिंग द्वारे अद्ययावत तंत्रज्ञानासह तपास व उपचार होतील. इम्प्लांट उपचार आणि मॅक्सिलोफेशियल शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांच्या अचूक उपचार नियोजनासाठी देखील याचा वापर केला जाईल.

सदर इमारतीमध्ये मौखिक आरोग्य संग्रहालय देखील आहे जे थ्रीडी मॉडेल्स, बॅनर्स आणि पोस्टर्सच्या प्रदर्शनाद्वारे मौखिक आरोग्याचा प्रचार करेल याद्वारे रुग्णांना मार्गदर्शन करणारे आश्वासक वातावरण तयार करण्याचे नियोजन आहे. हे प्रदर्शन दातांच्या आजारांबद्दल आणि ते टाळण्यासाठीच्या पध्दतींबद्दल जागरुकता निर्माण करण्यास मदत करेल.

वर्तणूक समुपदेशन आणि निकोटीन रिप्लेसमेंट थेरपीच्या स्वरुपात वैयक्तिक हस्तक्षेपाद्वारे तंबाखूच्या नकारात्मक परिणामांबद्दल सामान्य लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा तंबाखू निर्मूलन केंद्राचा मानस आहे.

पहिल्या मजल्यावर अधिष्ठाता कार्यालय, प्रशासकीय कार्यालय आणि परिक्षक व निरिक्षक इत्यादींसह ०६ अतिथी कक्ष आहेत.

दुसऱ्या मजल्यावर मॉड्युलर ओ.टी.चा समावेश आहे ज्यामध्ये १६ रुग्णांसाठी इन हाउस वॉर्ड व्यवस्थेसह ०४ विशेष खाजगी खोल्या, लहान अतिदक्षता कक्षासह नर्सिंग स्टेशन असून परिसरात रुग्णांसाठी अट्रीयम - गार्डन समाविष्ट आहे.

तिसऱ्या मजल्यावर डेंटल सिम्युलेशन सेंटर ही एक प्रयोगशाळा आहे जी दंत विद्यार्थ्यांसाठी क्लिनिकल वातावरणाचे अनुकरण करते. ज्यामुळे विद्यार्थी इलेक्ट्रिकल फिजिओलॉजिक डेंटल खुर्च्यांवरील डमी (फँटम) रुग्णांवर प्रिक्लिनिकल कोर्सचा सराव करू शकतील.

कृत्रिम दंतशास्त्र विभाग दुसऱ्या, चौथ्या आणि सहाव्या मजल्यावर विस्तारीत आहे.

चौथ्या मजल्यावर पदव्युत्तर विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी क्लिनिक आहे तसेच दात भरण्याचा व वाचवण्याच्या विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी विद्या शाखा आहे. चौथ्या मजल्यावरील धातू आणि सिरेमिक प्रयोगशाळेचा वापर विभाग तंत्रज्ञांनी विविध प्रकारच्या धातूच्या सिरेमिक पक्क्या क्राऊन आणि काढता येण्याजोग्या दातांच्या ॲक्रेलिक फॅब्रिकेशनसाठी केला जाईल.

पाचव्या मजल्यावर आय.सी.टी. सक्षम व्याख्यान गृह आणि अत्याधुनिक सभागृह असेल.

सहाव्या मजल्यावर अत्याधुनिक डिजिटल डेंटल कॅडकॅम प्रयोगशाळा आहे. संगणक सहाय्यित इमेजिंग डिझायनिंग मिलींग आणि थ्रीडी प्रिंटिंग यासारख्या डिजीटल तंत्रज्ञानासह कृत्रिम अवयव तयार करण्यासाठी सर्व उपकरणे आणि सुविधा उपलब्ध आहेत.

सहाव्या मजल्यावरील दंतरोपण विभागात रोपण उपचारासाठी (इम्प्लांट ट्रिटमेंट) दोन ऑपरेशन थिएटर्स, एक निदान विभाग, रुग्ण रिकव्हरी कक्ष आणि स्टरिलायझेशन कक्ष आहे.

**वसतीगृह सुविधा :**

०८ ते ११ व्या मजल्यापर्यंत दंत पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या २६५ विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आहे. ७व्या मजल्यावर मेसची सुविधा तसेच वार्डनसाठी निवासी सदनिकेची व्यवस्था उपलब्ध आहे.

**१) मुखरोग परीक्षा आणि क्ष-किरणशास्त्र विभाग :**

**अ) बाह्य रुग्ण विभाग :**

या विभागामध्ये नवीन येणाऱ्या सर्व रुग्णांच्या दातांच्या तक्रारी आणि मुखाची तपासणी करून रोगनिदान केले जाते. रुग्णांच्या वर्तमान दंत स्थितीसह त्यांचा तपशीलवार वैद्यकीय / सामाजिक इतिहास यांची नोंद घेतली जाते. रुग्णांच्या तक्रारीनुसार तपासणी करुन रोग निदान करण्यासाठी बायोप्सी, रेडीओग्राफ्स, रक्त तपासणी अशा वेगवेगळ्या तपासण्या केल्या जातात. तपासणी करुन येणाऱ्या अहवालाची पडताळणी करून आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी रुग्णांना संबंधित विभागात पाठविले जाते. या विभागात तंबाखू सेवनामुळे होणा-या दुष्परीणामांबाबत आणि मुखरोगासंबंधी माहिती देण्यात येते.

**ब) मुखरोगनिदानशास्त्र कर्करोग निदान आणि मुखवेदना निदान केंद्र :**

मुखरोगनिदानशास्त्र विभागात तोंडाचे विविध आजार तसेच प्राथमिक अवस्थेतील कर्करोगांचे निदान व त्यावर उपचार केले जातात. रुग्णांची कर्करोगसबंधी तपासणी केल्यानंतर अशा रुग्णांवर क्ष-किरण तपासणी व बायोप्सी ह्या चाचण्या करण्यासाठी सुचविण्यात येते. रुग्णांचे पुनर्वसन व त्यांच्या आजाराबद्दल त्यांच्याशी पूर्ण विचारविनिमय करणे हा या केंद्राचा अविभाज्य भाग आहे.

टेंम्पोरोमॅन्डीबुलर विकार, मस्क्यूकोस्केलेटल जखम आणि ओरिफेशियल वेदना यांचे निदान करुन त्यावर उपचार केले जातात. या विभागात लहान लेजर शस्त्रक्रिया देखील केल्या जातात.

**क) क्ष-किरण विभाग :**

या विभागामध्ये सी.बी.सी.टी. यंत्र, रेडियोव्हिडियोग्राफी युनिट आणि लेझर उपकरणे उपलब्ध आहेत.

**२) मुखहनुसुघटन शस्त्रक्रिया आणि दात काढण्याचा विभाग :**

मुखहनुशल्यचिकित्सा आणि सुघटन शस्त्रक्रिया ही दंतरोग उपचार शास्त्राची एक विशेष शाखा असून ह्या शाखेत जबड्यांच्या संबंधित विविध रोगांचे उपचार शस्त्रक्रियेव्दारे केले जातात. ह्या विभागात दात काढण्याव्यतिरिक्त तोंडातील विविध रोगांचे उदा. विचित्र तऱ्हेने वाढलेल्या अक्कलदाढा,जबड्यांचे सांधे, दातांना झालेला जंतुसंसर्ग इत्यादीवरील

उपचार छोट्या व मोठ्या शस्त्रक्रियेद्वारे आणि जबड्यांचा संधीविकार (T.M.J. Ankylosis) चेहऱ्याचे हाड मोडणे, किंवा वाहन अपघातामुळे झालेला आघात, चेहऱ्याच्या नसासंबंधीतील रोग (Neurologic Disease) आणि चेहऱ्याच्या हाडाची पुनर्रचना (Facial Bone Deformities) ह्यांवरील उपचार गरज पडल्यास अवघड शस्त्रक्रियेव्दारे केले जातात. डिस्ट्रॅक्शन, ऑस्टिओजेनेसिस, फेशीयल रिॲनिमेशन ह्या चेहरा सुंदर बनविण्यासाठी वरच्या व खालच्या जबड्याच्या शस्त्रक्रिया आणि ट्युमर, कर्करोग आणि जबड्यातील गाठी काढल्यानंतर जबड्याचे हाड पूर्ववत बनविण्यासाठी सुघटन शस्त्रक्रिया असे विविध संशोधनात्मक कार्य या विभागात हाताळण्यात येतात.

### ३) हिरडीरोग उपचार विभाग :

हिरडीरोग उपचार ही दंतशल्य शास्त्राची एक स्वतंत्र शाखा असून ह्या विभागात हिरडीरोग आणि जबड्याच्या हाडांशी संलग्न विकारांवर उपचार केले जातात. मौखिक आरोग्याकडे दुर्लक्ष म्हणजे हिरडी विकारांना आमंत्रण. भारतात हिरडी विकारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या सुमारे ९० टक्के इतके आहे. दात घासण्याच्या चुकीच्या पध्दती व इतर घातक सवयींमुळे प्रामुख्याने मुख आरोग्याची हेळसांड होते व ह्यातूनच मौखिक विकारांची सुरुवात होते. ह्या विभागामध्ये हस्त उपकरणे आणि विद्युतचलित उपकरणे वापरुन प्रथम दातांवरील कचरा आणि किटाणू साफ केले जातात. गंभीर स्वरुप धारण केलेल्या हिरडी रोगांवर विविध उपकरणे, सामुग्री व तंत्रज्ञान वापरुन उपचार केले जातात.

दुर्धर हिरडी विकार असलेल्या रुग्णांच्या दातांची प्राथमिक तपासणी करून त्यांचे दात स्वच्छ केले जातात. अशा रुग्णांनाही अधिकाधिक दंत आरोग्य कशाप्रकारे प्राप्त करुन देता येईल ह्याचा सर्वांगीण विचार केला जातो. रुग्णांच्या हलणाऱ्या दातांवर तार लावून तसेच कॉम्पोझिट मटेरीयल वापरुन उपचार केले जातात.

### ४) बालदंत उपचार विभाग :

बालदंत उपचार विभागात समाजातील सर्व स्तरातील नवजात शिशुपासून ते किशोरवयीन मुलामुलींपर्यंत सर्वांना दंत वैद्यकीय उपचार दिले जातात. वेगवेगळ्या प्रकारचे प्रतिबंधात्मक उपचार उदा. मुख आरोग्य मार्गदर्शन, आहार मार्गदर्शन, फ्लोराईड (Fluoride) उपचार येथे केले जातात. मुखरोग चिकित्सा ते दातांत चांदी भरणे, दातांच्याच रंगाचे सिमेंट भरणे, दातातील नसेचा ईलाज, दात काढणे, लघुशस्त्रक्रिया व हानीकारक सवयी (उदा. अंगठा चोखणे, तोंडात बोटे घालणे, तोंडाने श्वास घेणे) इत्यादींवर येथे नियमितपणे उपचार केले जातात. अपघातामुळे इजा झालेल्या बालकांच्या दातांवर येथे आधुनिक उपचार प्रणाली वापरुन इलाज केले जातात.

सर्वसामान्य मुलांप्रमाणेच ह्रदयरोगी मुले, मतिमंद मुले, रक्ताच्या आजारांनी ग्रासलेली मुले, दुभंगलेला ओठ आणि टाळू असणारी बालके इत्यादींनाही येथे विशेष उपचार उपलब्ध करुन दिले जातात. त्यासाठी विभागात सर्व सोयी सुविधा असलेले शस्त्रक्रियागृह (Operation Theatre) आहे व निष्णात भूलतज्ज्ञ डॉक्टरही येथे उपलब्ध असतात.

महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांना येथे विनामूल्य उपचार दिले जातात. त्यासाठी रुग्णालयाकडे फिरते दंत चिकित्सालयही उपलब्ध आहे. संसर्गजन्य आजारांनी (एच.आय.व्ही./एड्स, हेपॅटायटीस बी) बाधित मुलांना आणि अनाथाश्रमात राहणाऱ्या मुलांना महिन्यातील एक दिवस येथे उपचारासाठी आणले जाते.

### ५) दंत व्यंगोपचार विभाग :

दंत व्यंगोपचार शास्त्र ही दंत उपचारशास्त्रातील अतिप्रगत आणि विशेष शाखा आहे. सदर उपचार पद्धती संपूर्ण भारतामध्ये सर्वप्रथम नायर दंत रुग्णालय व महाविद्यालयामध्ये सुरू झाल्यापासून आजपर्यंत उच्च प्रतीची सेवा रुग्णांना उपलब्ध झाली आहे. यापैकी काही कुशल उपचार पध्दती अशाप्रकारच्या आहेत :- १) दातांच्या अनैसर्गिक वाढीचे व्यवस्थापन करणे, २) घातक सवयीमुळे होणारी मुख अवयवांची असंबद्ध रचना सुधारणे, ३) दुभंगलेला टाळू अथवा भेगा असणाऱ्या टाळूवरील उपचार, ४) दंत व्यंग आणि जबड्याचे व्यंग यावरील उपचार, ५) ओठ, जबडा आणि दातांचे लहान मोठे विचित्र आकार सुधारणे, ६) दातांची एकमेकावर बसण्याची चुकीची बैठक दुरुस्त करणे, ७) वेडेवाकडे दात सरळ करणे, ८) मागे-पुढे असलेले दात सरळ रेषेत करणे, इत्यादी.

### ६) कृत्रिम दंतशास्त्र विभाग :

ह्या विभागात कृत्रिम दात बसविले जातात. कृत्रिम दात बसविण्यामागे तोंडाची हालचाल, बोलणे, चर्वण व दंत सौंदर्य, इत्यादी गोष्टी साध्य करणे हा उद्देश असतो.

रुग्णांच्या दातांच्या पडझडीची तपासणी केल्यानंतर रुग्णाला संपूर्ण कवळी बसवावी की, कायमची काढता येईल अशी अंशिक कवळी बसवावी हे ठरविण्यात येते. ज्यांना जन्मतःच दात नाहीत किंवा ज्यांच्या दातांमध्ये नंतर दोष निर्माण झाले आहेत अशा रुग्णांना कृत्रिम दात बसविण्यात येतात. उपलब्ध असलेली अत्याधुनिक सामुग्री (उदा. रेसीन, सिरॅमिक, धातू) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांच्या दातांवर कायम स्वरुपी किंवा अंशिक कवळी बसविण्याचे उपचार केले जातात. तसेच, ह्या विभागात दंत रोपण विभाग नव्याने सुरु करण्यात आला आहे. सदर विभागाचे गेल्या वर्षी नुतनीकरण करण्यात आले असून नविन डेंटल चेअर्स देखिल बसविण्यात आल्या आहेत.

या विभागात अत्याधुनिक डिजिटल डेंटल लॅब (कॅड / कॅम लॅब) सुरु करण्यात आली आहे, ज्यामुळे रुग्णांना संगणकाच्या माध्यमाने त्वरीत आणि उत्तम चिकित्सा देण्यात येईल.

### ७) मुखविकृती चिकित्सा आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभाग :

या विभागात विविध आजारांमुळे मुखात उत्पन्न होणाऱ्या परिणामांचे परिक्षण आणि उपचार केले जातात. बायोप्सी करण्यात येते आणि विकृतीविषयक अहवाल दिला जातो.

प्रयोगशाळेत रुग्णांसाठी नियमित चाचण्या करण्यात येतात. हा विभाग शैक्षणिक आणि शोधकार्यात कार्यरत आहे. विभागात रिसर्च मायक्रोस्कोप व ब्लड सेल काऊंटर उपलब्ध आहे. तसेच २५ सेल्फ इल्युमिनेटींग बायनोक्युलर मायक्रोस्कॉप उपलब्ध आहेत.

मुखकर्करोग आणि कर्करोग प्रतिबंध आणि निदान केंद्रात पूर्व मुखकर्करोग आणि कर्करोग असलेल्या रुग्णांची तपासणी होते. तसेच, समुपदेशन होते. पूर्व मुखकर्करोग आणि कर्करोग ओळखण्यासाठी वेलस्कोप ह्या विभागात उपलब्ध आहे.

### ८) दात भरण्याचा व वाचविण्याचा विभाग

दात भरणे व वाचविण्याच्या विभागात नावाप्रमाणे विविध उपचार पध्दतीद्वारे दात न काढता, किड लागलेल्या दातांना वाचविण्यात येते. सदर उपचार पध्दतीचा प्रमुख उद्देश हा रुग्णांच्या दंतवेदनांचे निवारण करणे हाच आहे. या विभागात अनेक उपचारपध्दती अवलंबिण्यात येतात. किडलेल्या दातांची रुट कॅनॉल ट्रिटमेंट (Root Canal Treatment) ही मुख्य उपचार पध्दत आहे. त्याचबरोबर वेडेवाकडे दातांची सौंदर्यीकरणाची ट्रिटमेंट, चांदी भरणे, दातांच्या रंगाचे फिलिंग (Filling) करणे, अतिशय खराब झालेल्या दातांना आवश्यकतेप्रमाणे विना शस्त्रक्रियद्वारे वाचविण्यात येते. अपघातामध्ये तुटलेल्या दातांना पुनर्निर्मित करण्यात येते.

दात खराब होऊन हिरड्यांना सूज आलेल्या दातांना सुध्दा शस्त्रक्रियेद्वारे वाचविण्यात येते. वेड्यावाकड्या दातांची नियमितता करणे, वारंवार सूज येणाऱ्या हिरड्यांना बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) पध्दतीने दातसंवर्धन केले जाते.

लेझर, ईलेक्ट्रोकॉट्री, दंतशस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारी दुर्मिळ दुर्बिण (Microscope) इ. अत्याधुनिक उपकरणाने हा विभाग सुसज्ज आहे.

मानसिक आणि दिव्यांग रुग्णांची विशेष काळजी घेऊन त्यांच्या उपचारासाठी वेगळी सुविधा या विभागात उपलब्ध आहे. ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य देऊन या विभागात उपचार केले जातात. त्याकरीता शुक्रवार राखीव ठेवला आहे.

कर्करोग, क्षयरोग, एच.आय.व्ही. बाधीत इ. रुग्णांची विशेष काळजी घेऊन दर बुधवारी उपचार करण्यात येतात.

### ९) सामाजिक दंत आरोग्य विभाग :

दंतरोगांचा सर्वांगीण प्रतिकार तसेच मौखिक आरोग्याच्या सर्वदूर प्रसारासाठी सार्वजनिक दंत आरोग्य विभाग (सामाजिक दंतचिकित्सा विभाग) सदैव कार्यरत असतो. 'जास्तीत जास्त लोकांना उत्तम मौखिक आरोग्य लाभावे', हेच एकमेव उद्दिष्ट ह्या विभागासमोर सतत असते.

फिरत्या दंत चिकित्सालयाद्वारे तीन नागरी आरोग्य केंद्रात जाऊन सामाजिक दंतसेवा दिली जाते. झोपडपट्टी व दूरवरच्या नागरी वस्त्यांमधील गरीब व गरजू जनतेला मोफत दंत उपचार मिळावे ह्यासाठी नियमितपणे सामाजिक दंतचिकित्सा कार्यक्रम राबविले जातात. त्याचप्रमाणे शाळेतील मुलांची नियमितपणे दंत तपासणी करण्यात येते. या नियमित भेटी व्यतिरिक्त सार्वजनिक दंत चिकित्सा विभागातर्फे झोपडपट्टी, वेश्यावस्ती, अनाथआश्रमे आणि सर्व सामान्य नागरिकांसाठी मुख आरोग्य माहिती त्याचप्रमाणे गरजूंवर उपचार देखील केले जातात.

दरवर्षी तंबाखू विरोधी दिन साजरा करून दंतरुग्णांना तंबाखू खाण्यामुळे होणारे दुष्परिणाम आणि मुखकर्करोगाबदद्ल जागरुक करण्यात येते. दंत शिबिराच्या माध्यमातून मुखरोगाच्या प्रक्रियेबद्दल समाजाला माहिती दिली जाते व शिक्षित करण्यात येते. पथनाट्ये, घोषवाक्ये, भित्तीचित्रे इ. द्वारे नागरिकांना निरोगी जीवनशैली आत्मसात करण्यास प्रवृत्त केले जाते.

या विभागाने विकसित केलेल्या मुख आरोग्य संग्रहालयामध्ये नायर रुग्णालय दंत महाविद्यालयामध्ये आलेल्या प्रत्येक रुग्णाला आणि जनतेला मुख आरोग्य आणि दंत रोगांशी सामना करण्यास शिकविले जाते.

भविष्यात एका सुसज्ज अशा फिरत्या दंत चिकित्सालयाव्दारे विशेषत: शहराच्या दूरवरील भागातील जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहोचून त्यांना मोफत दंतवैद्यकीय उपचारांचा लाभ मिळवून देण्यासाठी हा विभाग प्रयत्नशील आहे.

## चार ) - लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, शीव

### १) लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय :

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर सन १९४६ मध्ये मुंबई महानगरपालिकेने शीव येथील लष्करी रुग्णालय ताब्यात घेतले आणि दि. २४ एप्रिल, १९४७ रोजी ५० खाटांचे धारावी महानगरपालिका समुह रुग्णालय सुरु केले. सद्यस्थितीत लो.टि.म.स. रुग्णालय हे १,९०० खाटांचे सुसज्ज प्रमुख रुग्णालय आहे. रुग्णालयाच्या विस्तारीकरण व पुनर्विकासाच्या कामाला सुरुवात झाली असून तद्नंतर रुग्णालयात ३,००० रुग्णशय्या उपलब्ध होतील.

सदर रुग्णालयात विविध चिकित्सालयीन सुविधा व फिरते प्रसुतिपथक, अपघातग्रस्त लोकांसाठी रुग्णवाहिका आणि फिरता हृदयरोगविषयक विशेष काळजी विभाग ह्यासारखे विशेष कक्ष आहेत.

### २) लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकिय महाविद्यालय:

मुंबई महानगरपालिकेने सन १९६४ मध्ये तिसरे वैद्यकीय महाविद्यालय या रुग्णालयात सुरु केले. हे महाविद्यालय पूर्वी मुंबई विद्यापिठाशी व सध्या नाशिक येथील आरोग्य विज्ञान महाराष्ट्र विद्यापिठाशी संलग्न आहे. ह्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पर्यंत दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना, शैक्षणिक वर्ष२०१७-१८ पासून १५० पदवीपूर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून २०० पदवीपूर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ह्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सर्व विशेष व अतिविशेष शाखांतील वैद्यकीय पदविका आणि पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येतो. याशिवाय येथे डी.एम.एल.टी., एम.एस.सी. व पी.एच.डी. साठी सुक्ष्मजीवशास्त्र, जीवरसायनशास्त्र अप्लाईड जीवशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र ह्या विषयांचे अभ्यासक्रम घेण्यात येतात.

भौतिकोपचार व व्यवसायोपचार या विषयातील बी.एस.सी अभ्यासक्रमाकरिता येथे शाळा चालविण्यात येते. ह्या विशेष शाखांतील एम.एस.सी. अभ्यासक्रमासाठीदेखील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमासाठी सुध्दा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. भारतीय परिचर्या परिषदेशी संलग्नित असलेली परिचर्या पाठशाळा या रुग्णालयात असून दरवर्षी १०० विद्यार्थी परिचारिकांना प्रवेश दिला जातो.

- **बधिरीकरणशास्त्र विभाग :**

**वैद्यकीय काम :**

१) एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत, बधिरीकरणशास्त्र विभागाने लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या इतर २० विभागांना तसेच इतर रुग्णालयांना बधिरीकरणासंबंधीत सेवा प्रदान केल्या आहेत.

२) वर्ष २०२३ मध्ये २१,१०७ रुग्णांना जनरल ऍनेस्थेशिया, रिजनल ऍनेस्थेशिया आणि मॉनिटर्ड अनेस्थेशिया इ. स्वरुपात भूल देण्यात आली.

३) एकूण ४,१२४ अत्यवस्थ रुग्ण होते त्यापैकी १,५५२ रुग्णांना व्हेंटिलेटरी सपोर्ट आवश्यक होते, त्यांना एस.ओ.टी.आर.आर. / ट्रॉमा वॉर्ड, सि.व्ही.टी.एस. आणि न्यूरोसर्जरी रिकव्हरी रुम या भागात व्यवस्थापित करण्यात आले.

४) वेदनांच्या व्यवस्थापनासाठी, विविध फ्लुरोस्कोपिक आणि यूएसजी मार्गदर्शित प्रक्रिया पार पाडल्या गेल्या. सन २०२३ मध्ये अशा एकूण ४७४ प्रक्रिया पार पाडल्या आणि Pain ओपीडीमध्ये एकूण १,३४२ रुग्णांना वेदनाशामक सेवा देण्यात आली.

**प्रशासकीय कामे -**

- रुग्णांचे सुरळीत आणि कार्यक्षम व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली विविध उपकरणे खरेदी करण्यासाठी विभागातील अध्यापकीय वर्ग सक्रिय असतो.

**शैक्षणिक कार्य -**

१) बधिरीकरणशास्त्र विभाग पिडियाट्रिक अनेस्थेशिया आणि कार्डियाक अनेस्थेशिया मध्ये पोस्ट डॉक्टरेट फेलोशिप डिप्लोमा कोर्स आयोजित केला जातो. पदव्युत्तर पदवीपूर्व आणि बी.पी.एम.टी. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

२) एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांसाठी फाऊंडेशन कोर्स अंतर्गत विविध मॉडयूल्समध्ये पदवीधर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात अध्यापकीय वर्ग सक्रियपणे सहभागी झाले.

३) दि. ०९ ऑक्टोबर २०२३ रोजी 'मेकॅनिकल व्हेंटिलेशन - बेसिक्स आणि बियॉन्ड' वर सी.एम.ई.+ कार्यशाळा आयोजित केली.

४) दि. ३०.०३.२०२३ रोजी ई.एन.टी. विभागाद्वारे आयोजित एफ.ई.एस.एस. वरील लाईव्ह ऑपरेटिव्ह कार्यशाळेत विभागाने भाग घेतला आणि योगदान दिले.

- **शरिररचनाशास्त्र विभाग -**

या विभागातर्फे प्रथम एम.बी.बी.एस., प्रथम वर्ष भौतिकोपचार, प्रथम वर्ष व्यवसायोपचाराच्या विद्यार्थ्यांना आणि लो.टि.म.वै. महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शरिररचनेबाबत शिकविले जाते व त्यांचे मूल्यांकन केले जाते. प्रथम वर्ष बी.पी.एम.टी. अभ्यासक्रम आणि परिचारिका पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शरीररचनाशास्त्र शिकविले जाते. प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. च्या विद्यार्थ्यांना शवविच्छेदन शिकण्याकरिता व संशोधनासाठी ह्या विभागात मृतदेह स्विकारले जातात.

- **जीवरसायनशास्त्र विभाग :**

- बायोकेमिकल तपासणी पुर्णपणे स्वयंचलित क्लिनिकल बायोकेमिस्ट्री ऑटोएनालायझर वापरुन केली जाते. एल.एफ.टी., आर.एफ.टी., कॅल्शियम, युरिक ऍसिड, एमायलेस यासारख्या तपासण्यांचे विश्लेषण अतिदक्षता क्षेत्रासाठी केले जाते. सन २०२३ मध्ये बायोकेमिस्ट्री क्लिनिकल प्रयोगशाळेत एकूण चाचण्यांची संख्या ७,१९,६८० आणि आपत्कालीन प्रयोगशाळेत ६,६१,६९५ होती .

- रक्तातील साखर, सीरम इलेक्ट्रोलाइट्स, लिपिड प्रोफाइल, एल.डी.ए. द्रव आणि मूत्र जैवरसायन यांसारख्या तपासण्यांसह व्ही.एम.ए., अमोनिया, लिपेस, सी.आर.पी., सीरम लोह, सिरम फेरीटिन, असंतृप्त लोह बंधनकारक क्षमता, मॅग्नेशियम, ए.डी.ए., लैक्टेट, एमायलेस यासारख्या विशेष तपासणी करण्यात आल्या. सर्व रुग्णांसाठी (ओ.पी.डी. आणि आय.पी.) केले जाते. थायरॉईड ग्रंथीचे कार्य तपासण्यासाठी थायरॉईड कार्य चाचण्या देखील केल्या जातात.

- १३ सप्टेंबर २०२१ रोजी ३३ बायोकेमिस्ट्री पॅरामिटर्ससाठी विभागीय क्लिनिकल प्रयोगशाळा N.A.B.L. मान्यताप्राप्त झाली. या प्रयोगशाळेत गुणवत्ता नियंत्रणाचे पालन काटेकोरपणे केले जाते. तसेच, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता हमी योजनेद्वारे आयोजित बाह्य गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रमाचे पालन करते.
- या विभागाने तिसरे अखिल भारतीय राष्ट्रीय स्तरावरील इंटरकॉलेजिएट बायोकेमेस्ट्री UG क्विझ-एनर्जेटिक्सा २०२३ चे आयोजन केले होते, त्यामध्ये लो.टि.म.वै. महाविद्यालयाने पहिले आणि दुसरे पारितोषिक जिंकले.
- या विभागाने दि. १३ डिसेंबर ते दि. १६ डिसेंबर २०२३ या कालावधीत '30th ANNUAL CONFERENCE OF ASSOCIATION OF MEDICAL BIOCHEMISTS OF INDIA२०२३' वेगवेगळ्या विषयांवर दहा कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. यामध्ये संपूर्ण भारतातून ५०० जणांनी सहभाग घेतला.
- एम.यू.एच.एस. च्या एम.डी., एम.बी.बी.एस., बी. ओ.टी.एच., बी.पी.टी.एच., बी.पी.एम.टी., डि.एम.एल.टी. या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या विभागात प्रशिक्षण दिले जाते. पीएच.डी. (मेडिकल बायोकेमिस्ट्री) एम.यू.एच.एस. द्वारे देखील सुरू केले आहे. सध्या ०५ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाकरिता नोंदणी केली आहे. प्राध्यापकांद्वारे विविध संशोधन प्रकल्पही राबविले जातात.

- **हृदयरोगचिकित्साशास्त्र विभाग :**

हृदयरोग विभागाची स्थापना १९७५-७६ मध्ये झाली. प्राइमरी अँजिओप्लास्टी इन मायोकार्डियल इन्फाक्शन, ट्रान्स कॅथेटर इंडियन सोसायटी ऑफ अँओर्टिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट (टी.ए.व्ही.आर.) ऍट्रियल फ्लो रेग्युलेटर इत्यादी अनेक क्षेत्रात विभाग अग्रणी आहे. इंडियन सोसायटी ऑफ इलेक्ट्रोकार्डियोग्राफी ची स्थापना २० वर्षांनी सायनमध्ये झाली. सध्या विभागाकडे संपुर्णणे सुसज्ज अतिदक्षता हृदयरोग विभाग आहे, जे हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितींसाठी तीव्र काळजी प्रदान करते. लो.टि.म.स. रुग्णालयामध्ये आठवड्यातून दोनदा कार्डीओलॉजी ओ.पी.डी. आयोजित केली जाते. कार्डिओलॉजी विभागामध्ये २ डी आणि ३ डी कलर डॉपलर इकोकार्डियोग्राफी आणि ट्रान्स एसोफेजल इकोकार्डियोग्राफी आणि कॉम्प्युटराइज्ड स्ट्रेस टेस्ट आणि P.C.I. सारख्या इन्वेसिव्ह आणि नॉन-इन्वेसिव्ह कार्डियाक प्रक्रिया होतात आणि विविध क्लिनिकल चाचण्यांमध्ये देखील सामील होतो. दि. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी नवीन 'स्टेट ऑफ द आर्ट' कार्डियाक कॅथेटेरायझेशन लॅ स्थापित करण्यात आली. जिथे सर्व प्रकारच्या निदान आणि उपचारात्मक कार्डियाक प्रक्रिया जसे की अँजिओप्लास्टी, व्हॅल्व्युलोप्लास्टी, जन्मजात हृदयविकारांसाठी निदान आणि उपचारात्मक हस्तक्षेप आणि पेसमेकर इम्प्लांटेशन होतात. कार्डिओलॉजी विभागामध्ये जागतिक नामांकित प्राध्यापकांद्वारे उच्च विशिष्ट ऍरिथ्मिया क्लिनिक इलेक्ट्रोफिजियोलॉजी स्टडीज आणि रेडीओ फ्रिक्वेन्सी ऍब्लेशन सेवा देखील प्रदान होतात.

- **उर:रोग व उर:शल्य चिकित्साशास्त्र विभाग :**

या विभागामध्ये लहान मुलांच्या व प्रौढांसाठी हृदयशस्त्रक्रिया केल्या जातात. या मध्ये ओपन हार्ट शस्त्रक्रिया जसे की, वॉल्व बदलणे आणि कॉरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टींग आणि बालरोग हृदय शस्त्रक्रिया जसे सायनोटीक आणि असायनेटिक कनजेनाइटल हार्ट डिसिसचा समावेश आहे. थ्रोम्बोएम्बोलिझम असलेल्या व अपघातग्रस्त रुग्णांसाठी वेगवेगळ्या तातडीच्या वॅस्क्युलर शस्त्रक्रिया केल्या जातात. या विभागामध्ये वेगवेगळ्या थोरॅसीक शस्त्रक्रिया जसे डिकोकेशन, लोबॅक्टोमी, न्युमोनेक्टोमी आणि प्रौढांचे व बालकांचे सिस्ट काढणे आणि चेस्ट वैद्यकीय विभागामधून आलेल्या रुग्णांवर उपचार केले जातात. या विभागात डायलिसिसवर असणाऱ्या रुग्णांवर ए.वी.फीस्टुला ही शस्त्रक्रिया केली जाते.

- **जन-औषधशास्त्र वैद्यकशास्त्र विभाग :**

- **अध्यापन आणि प्रशिक्षण -**

जन-औषधवैद्यकशास्त्र विभागातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय एम.बी.बी.एस. च्या विद्यार्थ्यांसाठी पदवीचे शिक्षण घेतले जाते. पदवीधर आणि पद्व्युत्तर विद्यार्थ्यांना सार्वजनिक आरोग्याच्या महत्वाच्या विविध ठिकाणी नेले जात आहे. बी.पी.टी.एच., बी.ओ.टी., बी.पी.एम.टी., नर्सिंग चे विद्यार्थी तसेच एम.एस.डब्ल्यू. विद्यार्थ्यांचे अध्यापन व प्रशिक्षण घेतले जाते. याशिवाय एम.बी.बी.एस.च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फॅमिली अडॉप्शन प्रोग्राम सुरु करण्यात आला आहे.

❖ **एनसीडी क्लिनिक -**

ओ.पी.डी. इमारतीच्या तळमजल्यावर एन.सी.डी. क्लिनिकची स्थापना करण्यात आली आणि नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून एन.सी.डी.साठी निष्क्रिय देखरेखीचा एक भाग म्हणून त्याचा विस्तार करण्यात आला.

❖ **एकात्मिक रोग देखरेख प्रकल्प (आय.डी.एस.पी.) -**

या प्रकल्पांतर्गत मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, ताप, ए.आर.आय., कॉलरा, गॅस्ट्रोएन्टेरिटिस या पावसाळ्याशी संबंधित आजारांची प्रकरणे रुग्णालयातील आय.पी.डी., ओ.पी.डी. आणि लॅबमधून दररोज नोंदवली जातात. आय.डी.एस.पी.ने कोविड - १९रोग आणि म्युकरमायकोसिस अहवालात महत्वपूर्ण भूमिका बजावली. जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत एकूण ८,५०१ एमआरडी प्रकरणे आणि ८० मृत्यूंची नोंद झाली.

❖ **नागरी आरोग्य केंद्र, धारावी -**

धारावीतील नागरी आरोग्य केंद्रात जनरल ओ.पी.डी., पेडियाट्रिक ओ.पी.डी., पेडियाट्रिक इम्युनायझेशन ओ.पी.डी. आणि ग्रोथ अँड डेव्हलपमेंट क्लिनिक अशा विविध ओ.पी.डी. सुरू आहेत. जनरल ओ.पी.डी.मध्ये २७,६९८ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले तर ३,९९४ बालकांवर बालरोग ओ.पी.डी.मध्ये उपचार करण्यात आले. एन.टी.ई.पी., नाको , यू.आय.पी. असे विविध आरोग्य कार्यक्रम राबविले जातात. लसीकरण क्लिनिक ३,७८३ मुलांचे लसीकरण करण्यात यशस्वी झाले आणि त्यापैकी १,८१७ मुलांचे लसीकरण पूर्ण झाले.

❖ **ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र, वाशिंद -**

वाशिंद येथील आर.एच.टी.सी. वैद्यकीय आणि पॅरामेडिकल कर्मचारी यांच्या पदवीधर, पदव्युत्तरांसाठी प्रशिक्षण केंद्र आहे. हे सध्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने काम करते. पी.एम.एस.एम.ए. (प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान) शिबिर दर महिन्याच्या ०९ तारखेला आर.एच.टी.सी., वाशिंद येथे आयोजित केले जाते.

❖ **आउटरीच उपक्रम -**

या विभागातर्फे लाभार्थ्यांनुसार विविध विभागातील डॉक्टरांचा समावेश असलेली अनेक संपर्क शिबिरे आयोजित केली जातात. विविध सरकारी व खाजगी शाळांच्या वतीने शालेय आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते.

❖ **विशेष उपक्रम -**

आय.ए.पी.एस.एम.तर्फे क्षयरोगावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा आमच्या संस्थेत जनऔषधवैद्यकशास्त्र विभागातर्फे पदवीधर विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली आणि विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. पावसाळापूर्व तयारी प्रशिक्षण कार्यक्रम २०२३ आयोजित करण्यात आला होता. निवासी डॉक्टरांना गंभीर तीव्र कुपोषणाच्या सुविधेवर आधारित व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

● **जठरांत्ररोगचिकित्साशास्त्र विभाग :**

हा विभाग एन्डोस्कोपीसह पाचन तंत्र, यकृत पित्तविषयक प्रणाली आणि स्वादुपिंडाच्या रोगांचे नैदानिक मुल्यांकन, निदान आणि उपचारांमध्ये विशेष आहे.

● **स्त्रीरोग व प्रसुतिचिकित्साशास्त्र विभाग :**

लो. टि. म. स. रुग्णालयाच्या स्त्रीरोग व प्रसुतिचिकित्साशास्त्र विभागातर्फे गतवर्षी ८,००० पेक्षा जास्त प्रसुती करण्यात आल्या. नियमित स्त्रीरोग चिकित्सेशिवाय या विभागातर्फे मोठया प्रमाणावर स्त्रियांसाठी वंध्यत्व, कर्करोग, अर्भक वैदयकीय शास्त्र, जेरिआट्रिक केअर, सामान्य शस्त्रक्रिया व एंडोस्कोपीक शस्त्रक्रिया यांसाठी थेट प्रक्षेपण, कॉल्पोस्कोपीक फॉर अर्ली डिटेक्शन ऑफ सर्वाइकल कॅन्सर इ. सुरू करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्त्रीरोग आणि प्रसुतिशास्त्र विभागातर्फे पदवी नि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया शिकविण्यासाठी प्रयोगशाळा सुरू केलेली आहे.

जेनिटिक क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. ५०० हून अधिक कोविड बाधित मातांच्या प्रसुती करणारे लो.टि.म.स. रुग्णालय हे संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रथम क्रमांकाचे रुग्णालय आहे. ही बाब अभिमानास्पद आहे. स्त्रीरोग व प्रसुतिचिकित्सशास्त्र विभागातील कोविड बाधित रुग्णांसाठी एक कक्ष सुरू केला आहे. अखिल भारतीय फॉन्सी फोर्स कार्यशाळा या रुग्णालयातर्फे घेण्यात आली. तसेच संपूर्ण राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आणि परीक्षार्थींसाठी पी.जी. क्रॅश कोर्सचे आयोजन देखील करण्यात आलेले होते.

- **औषधवैद्यकशास्त्र विभाग :**

औषधवैद्यकशास्त्र विभाग हा एक अतिशय महत्वाचा विभाग असून विविध प्रकारच्या आजारांसाठी येथे उपचार केले जातात. फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी आणि नर्सिंग अभ्यासक्रमांसह एम.बी.बी.एस. आणि एम.डी. मेडिसिनच्या विद्यार्थ्यांना औषध वैद्यक शास्त्राचे प्रशिक्षण दिले जाते.

बाह्यरुग्ण विभागामध्ये दररोज ४०० - ५०० रुग्णांवर उपचार केले जातात. मधुमेह, एंडोक्राइनोलॉजी, संसर्गजन्य रोग, रक्तविज्ञान आणि संधिवात यांसारख्या विशेष बाह्यरुग्ण विभागामध्ये दर आठवड्याला सुमारे २५०-३०० रुग्णांवर उपचार केले जातात. ज्येष्ठ नागरिकांच्या बाह्यरुग्ण विभागामध्ये दर आठवड्याला सुमारे ४५-५० रुग्णांवर उपचार केले जातात. एच.आय.व्ही.साठी ए.आर.टी. केंद्रामध्ये महाराष्ट्र जिल्हे एड्स नियंत्रण संस्था व बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत दररोज १५०-२०० रुग्णांवर उपचार केले जातात. यावर्षी मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस यांसारख्या पावसाळ्याशी संबंधित तसेच इतर आजारांच्या ३०,०२० आंतररुग्णावर उपचार केले. औषधवैद्यकशास्त्र विभागात दररोज साधारणत: ७०-८० रुग्ण आंतररुग्ण म्हणून दाखल होतात जे पावसाळ्यात दररोज सुमारे १२०-१३० रुग्णांपर्यंत वाढते. नागरी आरोग्य केंद्र धारावीमध्ये दररोज ५०-६० रुग्ण बाह्यरुग्ण विभागात तपासले जातात आणि ५०पुरुष बेड आणि २० महिला बेडची इनडोअर क्षमता आहे ज्याचा पूर्ण वापर केला जातो.

थॅलेसेमिया मेजरच्या प्रौढ रुग्णांना बालरोग विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष थॅलेसेमिया केंद्रात ओ.पी.डी. तत्त्वावर रक्त दिले जाते. या विभागाच्या अतिदक्षता विभागामध्ये प्रतिवर्षी साधारण १,२०० गंभीर रुग्णावर उपचार केले जातात. आपत्कालीन वैद्यकीय सेवेला व्हेंटिलेटरची आवश्यकता असलेल्या गंभीर रुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभाग ७ ए हे अतिरिक्त १४ खाटांचे अतिदक्षता विभाग आहे. इन्फ्लिक्सिमॅब, रितुक्सिमॅब यांसारखी संधिवाताच्या ओ.पी.डी. रुग्णांसाठी उपलब्ध असलेली विशेष औषधे मोफत दिली जातात. तसेच औषधवैद्यकशास्त्र विभाग न्युरोलॉजी आणि रेडिओलॉजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालिन वैद्यकीय सेवांमध्ये स्ट्रोकच्या ४२ रुग्णांचे थ्रोम्बोलिसिस केले.

- **सूक्ष्मजीवशास्त्र विभाग :**

  - सूक्ष्मजीवशास्त्र विभाग ISO15189:२०१२ नुसार N.A.B.L. मान्यताप्राप्त लॅब आहे. सन २०२३ वर्षात ४,१७,०७४ इतके नमुने तपासले.
  - संसर्गजन्य रोगांसाठी अत्याधुनिक चाचणी सुविधा आहेत.
  - हा विभाग महासर - महाराष्ट्र राज्य प्रतिजैविक प्रतिरोधक पाळत ठेवण्याच्या कामी सहभागी आहे.
  - NVBDCP- डेंग्यु आणि चिकुनगुनियाचे सेंटिनेल निरिक्षण आणि राज्यसंदर्भ प्रयोगशाळा राष्ट्रीय व्हायलर हेपेटायटीस नियंत्रण कार्यकम
  - दूधपेढी / रक्तपेढी / त्वचा पेढी व वंध्यत्व गुणवत्ता चाचणी सुविधा आहे.
  - सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मासिकात वैज्ञानिक लेख प्रकाशित केले आहेत.
  - सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे ०६ चालू संशोधन प्रकल्प आहेत.

- **नवजात अर्भकशास्त्र विभाग :**

या विभागात रुग्णालयात जन्मलेल्या नवजात अर्भकांवर तसेच, सार्वजनिक व खाजगी रुग्णालयांतून निर्देशित केलेल्या नवजात अर्भकांची विशेष काळजी घेतली जाते.

४० खाटांच्या अतिदक्षता विभागात गंभीर आजारी नवजात अर्भकांवर विशेष उच्चस्तरीय उपचार केले जातात. तसेच, ह्या विभागात नवजात अर्भकांची अहोरात्र काळजी घेण्याकरीता इनव्हेसीव ॲण्ड नॉनइनव्हेसीव व्हेंटिलेशन, हायफ्रिक्वेंसी व्हेंटिलेशन फोटोथेरेपी आणि एक्सचेंज ट्रान्सफ्युजनची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्या विभागांतर्गत मानवी दुग्धपेढी गेल्या ३३ वर्षापासून कार्यान्वीत आहे. त्यातून, गरजू नवजात अर्भकांना मानवी दूध पुरवते. देशाच्या पश्चिम विभागातील झोनल रेफरंस सेंटर अंतर्गत कॉम्प्रीहेन्सिव लॅकटेशन मॅनेजमेन्ट सेंटर म्हणून ही दुग्धपेढी ओळखली जाते.

- **मज्जातंतू शल्यचिकित्सशास्त्र विभाग :**

या विभागामध्ये न्युरोट्रॉमा मणक्याची शस्त्रक्रिया व मेंदुच्या ट्युमरचा इलाज केला जातो. परंतू आता आधुनिक तंत्रज्ञानानुसार रिजनरेटीव्ह उपचार पध्दती जसे स्टेम सेल थेरपी, व्हॅस्क्युलर शस्त्रक्रिया मज्जातंतू एन्डोस्कोपी आणि बाल मज्जातंतू शल्यचिकित्साशास्त्र यांच्या सहाय्याने रुग्णांवर उपचार केले जातात. या उपचारपध्दतींसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे. एच.बी.टी.ए. ट्रॉमा विभाग आणि कुपर रुग्णालयामध्ये मज्जातंतू शल्यचिकित्साशास्त्र सेवा सुरळीत चालू ठेवण्यासाठी हा विभाग सहकार्य करतो.

- **मज्जातंतूचिकित्सा विभाग :**

हा विभाग स्वतंत्र विभाग म्हणून स्थापन करण्यात आला आहे. या विभागात स्ट्रोकच्या रुग्णांसाठी ई.एम.जी. नव्ह कंडक्शन स्टडी, ई.ई.जी., इंट्राव्हेनस थ्रोम्बोलिसिस यांसारख्या सेवा देतात. विभागाला नुकतीच डी.एन.बी. परिषदेकडून मान्यता प्राप्त झाली आहे.

- **नेफ्रोलॉजी विभाग :**

नेफ्रोलॉजी विभाग तीव्र मूत्रपिंड इजा आणि तीव्र मूत्रपिंडाचा आजार असलेल्या हेमोडायलिसिस सेवा प्रदान करतो. लो.टि.म.स. रुग्णालयामध्ये किडनी प्रत्यारोपण कार्यक्रम देखील चालविले जातात. नेफ्रोलॉजी विभागात गेल्या वर्षी सन - २०२३ मध्ये ५११ प्रवेश आहेत. ०६ थेट संबंधित मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आले. रुग्णालयात ०४ ठिकाणी हेमोडायलिसिस सेवा सुरु आहेत. नेफ्रोलॉजी विभागाने सन २०२३ मध्ये ६,३०० हेमोडायलिसिस सत्रे प्रदान केली. वॉर्ड ३५ आणि एम.आय.सी.यु. मध्ये गंभीर आजारी रुग्णांना १,००० एच.डी. सत्रे देण्यात आली. सन २०२३ मध्ये १३५ टनेल कफ कॅथेटर घालण्यात आले आणि १२७ मुत्रपिंड बायोप्सी करण्यात आल्या. नेफ्रोलॉजी विभागाने सन २०२३ मध्ये विविध रीनल, न्युरोलॉजिकल आणि संधिवातासंबंधी स्थिती असलेल्या रुग्णांना प्लाझ्माफेरेसिस देखील प्रदान केले आहे. नेफ्रोलॉजी विभाग०२ दोन बाह्य रुग्ण विभाग चालवते, एक सामान्य नेफ्रोलॉजीसाठी आणि दुसरी प्रत्यारोपणाच्या रुग्णांसाठी अशा ०२ बाह्य रुग्ण विभाग चालवते. सन २०२३ मध्ये ४,५३७ किडनी रुग्णांना बाह्य रुग्ण विभाग सेवेचा लाभ झाला. क्लिनिकल कामाव्यतिरिक्त, विभाग ०२ DrNB (नेफ्रोलॉजी) विद्यार्थी, पदव्युत्तर मेडिसिन विद्यार्थी आणि पदवीधर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम चालवतो.

- **नेत्ररोगचिकित्साशास्त्र विभाग :**

- **निदान सेवा :** नियमित डोळा तपासणी, रिफ्रॅक्शन, ऑटोरेफ्रॅक्टोकेराटोमेट्री, डोळ्याच्या मागच्या पडदयाची तपासणी (फंडोस्कोपी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष, ९०डी लेन्स), टोनोमेट्री (स्किओट्झ आणि ॲप्लॅनेशन), कोरड्या डोळ्यांची तपासणी, अश्रुग्रंथी सॅक सिरिंजिंग, इमेजिंगसह स्लिट लॅम्प तपासणी.
- **सर्जिकल सेवा :** डोळ्यातील कचरा काढून टाकणे, मोतीबिंदू शस्त्रक्रिया (लहान चीरेने मोतीबिंदू शस्त्रक्रिया, फेको- इमल्सिफिकेशन, बालरोग मोतीबिंदू),तिरळेपणा शस्त्रक्रिया, टेरिजियम शस्त्रक्रिया, काचबिंदू, ऑक्युलोप्लास्टी, केराटोप्लास्टी (ऑप्टिकल, उपचारात्मक, डाल्क, डीसेक, डीमेक), विट्रे ओरेटिनल शस्त्रक्रिया (स्क्लेरल बकल, व्हिट्रेक्टोमी),अश्रु ग्रंथी पिशवी सर्जरी, डरमॉईड गाठ कापुन काढणे, जखम अन्वेषण, कॉर्नियल / स्क्लेरल टीयर दुरुस्ती, डोळ्याच्या आतील कचरा काढणे इ.
- **विशेष सेवा :** मोतीबिंदू, काचबिंदू, कॉर्निया, विट्रे ओरेटिना, ऑक्युलोप्लास्टी, बालरोग नेत्ररोग, रेटिनोपॅथी ऑफ प्रीमॅच्युरिटी स्क्रीनिंग, आपत्कालीन २४ तास सेवा, ट्रॉमा व्यवस्थापन आणि २४ तास कॉर्निया पुनर्प्राप्ती केंद्र.

- **अस्थिव्यंगचिकित्साशास्त्र विभाग :**

❖ सन १९७० मध्ये या विभागाची स्थापना झाली. सुरुवातीला ह्या विभागामध्ये ५० खाटांचा कक्ष होता. सद्यस्थितीत हा विभाग केवळ मुंबईतच नव्हे तर संपूर्ण देशातील अस्थिव्यंग शस्त्रक्रिया करणारे एक नावाजलेले केंद्र आहे.

❖ प्रत्येक आठवड्यात ०६ दिवस ०३ शस्त्रक्रियागृहे व ०१ तातडीचे शस्त्रक्रियागृह अहोरात्र कार्यान्वीत असते. ह्या विभागाच्या बाह्यरुग्ण विभागात दररोज सरासरी ३५० रुग्ण तपासले जातात.

❖ सर्वसाधारण बाह्यरुग्ण विभागाव्यतिरिक्त या विभागातर्फे सांधे तपासणी, गुडघ्याचे चिकित्सालय व पाठीच्या मणक्याचे चिकित्सालय, सेरेब्रल पाल्सी क्लिनीक हे विशेष बाह्यरुग्ण विभाग देखील चालवले जातात.

❖ सन २०२३-२४ मध्ये अस्थिव्यंगचिकित्साशास्त्र विभागाने ३५,४१९ नविन रुग्ण आणि २१,४६० जुने सकाळचे रुग्ण व २८,८३२ जुने दुपारचे रुग्ण तपासले.३,३२५ प्रमुख शस्त्रक्रिया आणि १,२४० किरकोळ शस्त्रक्रिया केल्या. तसेच २,०५६ रोपण शस्त्रक्रिया केल्या. ४,२६९ रुग्ण दाखल केले गेले.

❖ ह्या विभागाला सन २०२४ मध्ये देणगीद्वारे आर्थोस्कोपीसाठी रोबोट मिळाला आहे.

❖ ह्या विभागाने एंडोस्कोपिक स्पाइन शस्त्रक्रिया सुरु केली आहे आणि आजपर्यंत १०० रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या आहेत.

- **शरीरविकृतीचिकित्साशास्त्र विभाग :**

❖ शरीरविकृतीचिकित्साशास्त्र विभागात विविध प्रयोगशाळेद्वारे सेवा प्रदान केली जाते, जसे की हेमॅटोलॉजी (मूलभूत रक्तविज्ञान चाचण्या २०२१ पासून N.A.B.L. मान्यताप्राप्त आहेत), सायटोपॅथॉलॉजी, हिस्टोपॅथॉलॉजी, शवविच्छेदन आणि पोस्टमॉर्टम हिस्टोपॅथॉलॉजी व केमिकल पॅथॉलॉजी.

❖ या विभागाची इमर्जन्सी हेमॅटोलॉजी लॅब आपत्कालीन रुग्णांसाठी दिवसाचे २४ तास कार्यरत असते. कर्करोगाच्या रुग्णांसाठी, येथे Immunohistochemistry आणि फ्रोझन विभाग सारख्या प्रगत चाचण्या आहेत. केमिकल पॅथॉलॉजी प्रयोगशाळेने हाय-एंड पूर्णपणे स्वयंचलित बायोकेमिस्ट्री विश्लेषक मिळवले आहे ज्यामुळे बायोकेमिकल चाचण्या खूप जलद दराने (ताशी १,२०० चाचण्या) करता आल्या आहेत.

❖ लो.टि.स्मा.सा. रुग्णालयाच्या रक्त केंद्रामध्ये सगळ्यात जास्त रक्त एककांचा संग्रह आहे. मागील वर्षी १७९ बाह्य रक्तदानाद्वारे १८,९५३ रक्त युनिट संकलित करण्यात आले. विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय महिला दिनी, लो.टि.स्मा.सा. रुग्णालय येथे रक्तदान मोहिमेत १३० रक्तदान करण्यास योग्य महिलांनी रक्तदान केले.

❖ पॅथॉलॉजी विभाग गॅस्ट्रोपॅथॉलॉजी आणि न्यूरोपॅथॉलॉजी स्पेशॅलिटीजमधील पोस्ट एम.डी. पॅथॉलॉजी उमेदवारांसाठी एम.यु.एच.एस. मान्यताप्राप्त फेलोशिप प्रोग्राम देखील आयोजित करतो.

- **बालरोगचिकित्साशास्त्र विभाग :**

सन २०२३ हे वर्ष बालरोगचिकित्साशास्त्र विभागाकरिता अत्यंत गतिशील व समाधानकारक होते.२३,८६३ रुग्णांनी बाह्यरुग्ण सेवेचा तर २१,२९८ रुग्णांनी आपात्कालीन बालरुग्ण सेवेचा लाभ घेतला. ह्या विभागाने ५,५८२ आंतररुग्णांवर उपचार केले, त्यापैकी ४८६ बालरुग्ण बालरोग अतिदक्षता विभागात भरती होते. २९० बालरुग्णांची एंडोस्कोपी आणि १८ बालरुग्णांचे अस्थिमज्जा प्रत्यारोपण करण्यात आले.

ह्या विभागाच्या शिक्षकांनी अनेक महत्वाची पदे भूषवली व ह्या पदांतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या सुव्यवस्थितपणे पार पाडल्या.

विभागाने अनेक वैज्ञानिक कार्यक्रम आणि विशेष उपक्रमांचे आयोजन केले होते, त्यापैकी खालील उपक्रम उल्लेखनीय आहेत.

❖ अकरावे DAFPAL CME on Pediatric Pulmonology चे आयोजन.

❖ द्वितीय बालरोग एंडोक्राइन C.M.E. चे आयोजन.

- ट्रिनिटी २०२३ चा एक भाग म्हणून picu टीमने आयोजित केलेल्या पीडियाट्रिक इमर्जन्सीजवरील कार्यशाळा.
- पूरक आहार दिन आणि जागतिक एड्स दिनानिमित्त रुग्ण आणि पालकांसाठी आनंद मेळा तसेच, इतर अनेक कार्यक्रमांचे आयोजन.
- विविध विभागीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये अनेक प्राध्यापकांना वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण १८ प्रकाशने हया वर्षात केली गेली. यापैकी बहुतेक मूळ संशोधन लेख आहेत. प्राध्यापक सदस्यांनी पीजी प्रबंधांव्यतिरिक्त अनेक संशोधन प्रकल्प हाती घेतले आणि संशोधन कार्य वर्षभर चालू ठेवले.
- एस.आर.एस. च्या वार्षिक C.M.E. मध्ये अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली.

- **शरीरक्रियाशास्त्र विभाग :**

शरीरक्रियाशास्त्र विभागात मुख्यत्वे प्रथम वर्षाच्या एम.बी.बी.एस., बी.ओ.टी.एच., बी.पी.टी.एच, बी.पी.एम.टी. आणि नर्सिंग विद्यार्थ्यांना शिकवले जाते. तसेच, त्यांच्यासाठी नियमित व्याख्याने, प्रॅक्टिकल, ट्युटोरिअल्स आणि सेमिनार आयोजित करुन त्यांचे नियमित मूल्यांकन केले जाते. विभागात पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अध्यापन आणि सेमिनार देखील आयोजित केले जाते. तिस-या वर्षाच्या बी.ओ.टी.एच. विद्यार्थ्यांसाठी वर्ग चालवले जातात. अध्यापक विविध अध्यापक विकास कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतात. फाऊंडेशन कोर्स दरम्यान सत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. संपूर्ण संस्थेचा इंडिया टु डे २०२३साठी संस्थात्मक डेटा संकलित केला. शैक्षणिक उत्कृष्टता पूर्ण करण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन सत्रे आयोजित केली आहेत.

I.C.M.R. / S.T.S. प्रकल्पांसाठी U.G. विद्यार्थ्यांना आणि एम.बी.बी.एस. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विविध प्रकल्पांसाठी मार्गदर्शन केले जाते. तसेच, III M.B.B.S. च्या Elective विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

- **भौतिकोपचार विभाग :**

या विभागातर्फे आंतररुग्ण व अतिदक्षता विभागातील रुग्णांवर भौतिकोपचार केले जातात. बाहयरुग्ण विभागात अस्थिरोग, संधिरोग,स्थायुंचे विकार, मज्जा संस्थेशी संबंधित विकार आणि ह्रदय व फुफ्फुसांचे आजार असलेल्या बाल व प्रौढ रुग्णांना सेवा, तसेच हाताला दुखापत झालेल्या रुग्णांना विशेष सेवा दिली जाते. या विभागात पुरुष, स्त्री व बाल रुग्णांचे पेल्विक फ्लोअर विकार, व्यवसायांशी संबंधित विकार तसेच वयोवृध्द व्यक्तींना विशेष भौतिकोपचार सेवा सुरु करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाशी संलग्नित भौतिकोपचार पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रम या विभागात शिकविले जातात.

- **सुघटनशल्यचिकित्साशास्त्र विभाग :**

- सुघटनशल्यचिकित्सा (प्लास्टिक सर्जरी) विभागाचा बाह्यरुग्ण विभाग आठवड्यातून ०३ दिवस सुरु असतो आणि प्रत्येक वेळी सुमारे १०० ते १२० रुग्ण येतात.
- ह्या विभागात हाताचे विकार, दुभंगलेले ओठ व टाळू आणि कवटीचे व्यंगोपचार (क्लेप्ट आणि कॅनिओफेशियल ओ.पी.डी.) आणि सौंदर्य (कॉस्मोटिक) सर्जरी असे ०३ विशेष बाह्यरुग्ण विभाग चालविले जातात.
- ह्या विभागाने जुलै-२०२३ पासून Google meet व्दारे टेलिमेडिसिन बाह्यरुग्ण सेवा सुरु केली आहे.
- ह्या विभागात दरवर्षी सुमारे ३,००० - ३,५०० नियमित आणि तातडीची (इमर्जन्सी) शस्त्रक्रिया केल्या जातात. ज्यामध्ये आघात व कर्करोग सुघटन शस्त्रक्रिया (ट्रॉमा ऍन्ड कॅन्सर रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी), दुभंगलेले ओठ व टाळू यांची शस्त्रक्रिया आणि लिंग बदल शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे.

- **मनोरुग्णचिकित्साशास्त्र विभाग :**

  या विभागामार्फत खालील सेवा पुरविल्या जातात :

१) बाह्यरुग्ण आणि आंतररुग्ण सेवा - बाह्यरुग्ण विभागामध्ये दररोज सुमारे २५० ते ३०० जुने रुग्ण आणि अंदाजे ३० ते ३५ नवीन रुग्णांचे मूल्यांकन, मूल्यमापन आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उपचार केले जातात. पुरुषांच्या आंतररुग्ण कक्षात १८ खाटा व महिला कक्षात ०९ खाटा आणि बालरोग कक्षात ०४ खाटा यांद्वारे अंतर्गत उपचार सुविधा देखील पुरविण्यात येते.

२) समुदाय पोहोच सेवा :

- कस्तुरबा भिक्षेकरीगृह चेंबूर येथे भेट.
- धारावीमध्ये शील्ड फाउंडेशनसोबत स्मृतिभ्रंश शिबिराचे आयोजन.
- वात्सल्य ट्रस्टला भेट.
- श्रध्दानंद महिला आश्रमाला भेट.
- ग्रेस फाउंडेशनला भेट.
- व्ही.व्ही.एफ. कॅम्प

३) चाइल्ड गाईडन्स क्लिनिक (C.G.C.) मध्ये दररोज १४वर्षांपर्यंतच्या वयोगटातील सुमारे १२-१५ रूग्णांचे मुल्यांकन आणि मुल्यमापन केले जाते.

४) इलेक्ट्रोकन्व्हल्सिव्ह थेरपी (E.C.T.): बाह्यरुग्ण विभागातील रुग्णांना तसेच, आंतररुग्णांना भूल देऊन सुधारित पध्दतीने इलेक्ट्रोकन्व्हल्सिव्हथेरपी दिली जाते.

५) केटामाइन थेरपी : आवश्यकतेनुसार इंट्राव्हेनस आणि ओरल केटामाइन थेरपी रुग्णांना दिली जाते.

६) मेंदूला उत्तेजना देणारी थेरपी : कॅनियल इलेक्ट्रोथेरपी स्टिम्युलेशन (सी.ई.एस.) आणि ट्रान्सक्रॅनियल डायरेक्ट करंट स्टिम्युलेशन (टी.डी.सी.एस.) सारखी मेंदूला उत्तेजन देणारी थेरपी बाह्यरुग्ण विभागातील रुग्णांना आवश्यकतेनुसार दिली जाते.

७) ईईजी सेवा : ह्या विभागात दररोज सुमारे ०३-०४ वैकल्पिक ई.ई.जी. केले जातात. तसेच रुग्णालयातील इतर कक्ष, I.C.C.U., M.I.C.U. आणि IRCU मधील गैर-रुग्णवाहक रुग्णांना मोबाईल ई.ई.जी. सेवा प्रदान केली जाते. विभाग सर्व रुग्णांसाठी परवडणा-या दरात व्हिडिओ ई.ई.जी. सेवा सुरु करण्याच्या मार्गावर आहे.

८) सवलतीच्या दरात औषधे : संडे फ्रेंड्स सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने विभाग गरीब आणि गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात मानसोपचार औषधे देऊन मदत केली जाते.

९) मानसशास्त्रीय चाचणी आणि मूल्यमापन / समुपदेशन सेवा : मनोरुग्णांसाठी तसेच रुग्णालयाच्या इतर विभागांमधून निर्देशित केलेल्या रुग्णांसाठी बुध्दीमापन चाचण्या (I.Q.) आणि विविध मानसशास्त्रीय चाचण्या R.O.R., M.M.P.I., T.A.T., C.A.T., इ. करण्यासाठी एक क्लिनिकल सायकोलॉजिस्ट आहे. मानसोपचार सामाजिक कार्यकर्ता (P.S.W.) रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना बाह्यरुग्ण विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशन प्रदान केले जाते.

१०) सामाजिक जागरूकता कार्यक्रम / सेमिनार : स्किझोफ्रेनिया, मुलांशी संबंधित समस्या, कौटुंबिक हिंसाचार याबाबत सर्वसामान्य लोकांसाठी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आणि स्वयंसेवी संस्थांसाठी आवश्यकतेनुसार सामाजिक जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जाते.

११) लिंग ओळख समस्या असलेल्या व्यक्तीसाठी चिकित्सालय : लिंग ओळख विकार आणि त्यांच्या लिंगाशी संबंधित इतर समस्या असलेल्या व्यक्तींसाठी थेरपी आणि समुपदेशनासह मूल्यांकन आणि प्रमाणन केले जाते.

१२) शैक्षणिक उपक्रम : महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी, नर्सिंग आणि ओ.टी. / पी.टी. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व्याख्याने आयोजित केली जातात. विभागाने P.G. च्या विद्यार्थ्यांसाठी आणि मानसोपचार तज्ज्ञांसाठी 'माईंड ॲण्ड लर्निंग' नावाची online व्याख्यानमाला सुरु केली आहे, ज्यात जगभरातून विनामूल्य उपस्थित राहता येईल.

१३) संशोधन उपक्रम आणि प्रकाशने : ह्या विभागात नियमितपणे विविध संशोधन उपक्रम राबविले जातात आणि लेख प्रकाशित केले जाते.

- **क्ष-किरण विभाग :**

क्ष किरण विभागात सद्यस्थितीत तीन पूर्ण कार्यक्षम मल्टीस्लाइस सी.टी. स्कॅन यंत्र (दोन १६० स्लाईस मल्टीडेटेक्टर सी.टी. स्कॅनर आणि तिसरा १६ स्लाइस मल्टीडेटेक्टर सी.टी. स्कॅनर ), दोन एम.आर.आय स्कॅनर (०३ टेस्ला), एक बायप्लेनर डी.एस.ए. यंत्र, १०पेक्षा जास्त हाय एन्ड ग्रे स्केल आणि कलर डॉपलर यंत्र, सी. आर. आणि डी. आर. यंत्र, डिजिटल मेमोग्राफी यंत्र, आणि एकाधिक पोर्टेबल क्ष-किरण आणि यूएसजी यंत्रे आहेत. तिस-या एम.आर.आय. यंत्रासाठी प्रस्ताव देण्यात आला आहे.

युएसजी विभागात गर्भ २डी इको, कॉन्ट्रास्ट वर्धित अल्ट्रासाऊंड आणि डॉप्लर सारख्या प्रक्रिया करण्यात येतात. सी.टी. स्कॅन मध्ये कॉरोनरी अभिसरण इमेजिंग, कॅल्शिअम स्कोरींग सी.टी. ब्राँकोस्कोपी आणि सी.टी. कोलोनोस्कोपी सारखी आभासी इमेजिंग, थ्रोबोलिससाठी रुग्णांची निवड करण्यासाठी हायपरएक्यूट स्ट्रोकमध्ये सी.टी. परफ्यूजन करणे. नवीन तंत्राचा वापर तसेच इंटरव्हेशनल रेडिओलॉजीमध्ये संवहनी आणि नॉनव्हस्कुलर हस्तक्षेप आणि बायोप्सी केल्या जातात. या विभागात दरवर्षी १० एम.डी. विदयार्थी, ०३ डी.एम.आर.डी., ०९ फेलोशीप आणि ०८ बी.पी.एम.टी. रेडिओग्राफीचे विद्यार्थी शिक्षण घेतात.

सन २०२३ मध्ये १,५०,७५३ एक्स-रे, ६५,००८ U.S.G., ९,२०३ कलर डॉप्लर, ३२,९९२ सी.टी. स्कॅन, ९,३६४ एम.आय.आर. स्कॅन, ७६ मॅमोग्राफी आणि ३,११० इंटरव्हेशन्स् ( D.S.A आणि U.S.G. मार्गदर्षित प्रक्रियांसह) करण्यात आले.

- **श्वसनविकार औषधोपचार विभाग :**

- श्वसनविकार औषधोपचार विभागामध्ये १२ खाटांचे इंटेसिव्ह रेस्पिरेटरी केअर युनिट (I.R.C.U.) २८ खाटांचे श्वसनविकार वॉर्ड कार्यान्वित आहे. श्वासोच्छ्वासाच्या औषधांशी संबंधित प्रकरणे आणि सी.ओ.पी.डी., दमा, इंटरस्टिशियल फुफ्फुसाचे रोग, व्यावसायिक फुफ्फुसाचे रोग, फुफ्फुसाचे रोग, तीव्र श्वसन त्रास सिंड्रोम (ए.आर.डी.एस.) क्षयरोग व गळफास आणि टिटॅनस यासारख्या आजारांचा उपचार करतात.
- ह्या विभागात ब्रॉन्कोस्कोपी, थोरॅकोस्कोपी,एमेज गाईडेड थोरॅकोसेन्टेसिस आणि बायोप्सी यासारख्या प्रक्रिया देखील करतात. विभागात ०१ सुसज्ज पल्मोनरी फंक्शन टेस्ट लॅब आणि पॉलीसोमनोग्राफी लॅब आहे.
- ह्या विभागात ०४ प्राध्यापकांसह , ०४ पदव्युत्तर पात्रता असलेले वरिष्ठ निवासी डॉक्टर , ०२ पोस्ट पी.जी. फेलोशिप विद्यार्थी आणि १२ एम. डी. निवासी डॉक्टर उत्तम रुग्णसेवा देत आहेत.

- **शल्यचिकित्साशास्त्र विभाग :**

- या विभागात प्रतिवर्षी साधारणपणे ८०,००० रुग्णांवर उपचार करण्यात येतात तसेच ६,००० मोठया शस्त्रक्रिया व १३,००० लहान शस्त्रक्रिया केल्या जातात.
- किमान प्रवेश शस्त्रक्रिया : दरवर्षी ८०० बेसिक मिनीमल ॲक्सेस शस्त्राक्रिया आणि १५० अत्याधुनिक लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया केल्या जातात.
- एंडोथेरपी क्लिनिक : दरवर्षी साधारणतः ३,००० डायग्नोस्टिक आणि २,५०० थेरापेटिक एंडोस्कोपीज केल्या जातात.
- कॅन्सर केमोथेरपी क्लिनिक : दर मंगळवारी कॅन्सर केमोथेरपी क्लिनिकमध्ये रुग्णांना सल्ला दिला जातो. डे-केअर केमोथेरपी आणि आंतररुग्ण केमोथेरपी सेवा दिली जाते.

- बर्न्स विभाग : विशेष बर्न्स विभाग जळीत महिला आणि बालरुग्णांची काळजी घेतो.
- ट्रॉमा : ह्या विभागात दरवर्षी ३,००० मोठे आघातग्रस्त रुग्ण येतात आणि त्यांच्यावर टीमचे नेतृत्व करणा-या सामान्य शस्त्रक्रिया विभागासह बहु- विषय दृष्टिकोनाने उपचार केले जातात.
- शिरांसंबंधी क्लिनिक : व्हेरिकोज व्हेन्सचा त्रास असणा-या रुग्णांचा नियमित पाठपुरावा करुन शोध घेऊन त्याच्यावर उपचार केले जातात. ह्या विभागाला १,००० नविन रुग्ण आढळलेले असून ३०० रुग्णांसह एंडोव्हेनस थेरपी दिली आहे.

- **जठरांत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग :**

- सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि GI-HPB ऑन्कोसर्जरी विभाग ह्या रुग्णालयात येणा-या असंख्य गरजू रुग्णांना प्रगत गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आणि हेपॅटो-पँक्रिएटिको-बिलीरी सर्जिक सेवा प्रदान करत आहे. सन २०२३-२४ या वर्षात १५० हून अधिक प्रमुख GI-HPB शस्त्रक्रिया केल्या आहेत आणि १,२०० हून अधिक रुग्णांना बाह्यरुग्ण सेवा प्रदान केल्या आहेत.
- ह्या विभागाने यासह अनेक प्रगत लॅपरोस्कोपिक शस्त्रक्रिया केल्या आहेत.
  - कर्करोग आणि सौम्य परिस्थितींसाठी लॅपरोस्कोपिक कोलो-रेक्टल शस्त्रक्रिया.
  - कर्करोग आणि सौम्य परिस्थितींसाठी लॅपरोस्कोपिक स्वादुपिंड शस्त्रक्रिया.
  - लॅपरोस्कोपिक सेक्स री-असाइनमेंट शस्त्रक्रिया.
  - जीईआरडी आणि अचलसियासाठी लॅपरोस्कोपिक अप्पर शस्त्रक्रिया.
  - अन्ननलिका ट्युमरसाठी व्हॅट्स (व्हिडिओ-सहाय्यित थोराकोस्कोपिक शस्त्रक्रिया)
- ह्या विभागाने यासह असंख्य GI-HPB कर्करोग शस्त्रक्रिया केल्या आहेत.
- ह्या विभागाने जटिल हर्नियासाठी पोटाची भिंत पुनर्रचना (AWR) देखील केली आहे.
- ह्या विभागात दर शनिवारी GI-HPB कर्करोग शस्त्रक्रिया ओ.पी.डी. आयोजित केली जाते.
- हा विभाग सर्वोत्कृष्ट प्रगत सुपर स्पेशालिटी GI आणि HPB सर्जिकल केअर प्रदान करण्यासाठी आणि इच्छुक आणि गुणवान सर्जन उमेदवारांसाठी सुपर स्पेशालिटी DrNB प्रशिक्षण देण्यासाठी सुसज्ज आहे.
- विविध परिषदांसाठी विभागीय प्राध्यापकांना प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे
- सध्या हा विभाग एक नेक्रोटायझिंग पॅनक्रियाटायटीस वर आणि पित्तनलिका दुखापतीवर संशोधन चाचण्या घेत आहे.

- **मूत्ररोगचिकित्साशास्त्र विभाग :**

लो.टि.म.स. रुग्णालयातील मूत्ररोग शल्यचिकित्साशास्त्र विभाग हा मुंबईमधील सर्वात जुन्या मुत्ररोग शल्यचिकित्साशास्त्र विभागांपैकी एक आहे. हा विभाग किडनी आजारावरील अत्यंत आधुनिक उपचार देण्याकरिता तत्पर असतो. या विभागामध्ये नियमितपणे किडनी प्रत्यारोपण- (लाइव्ह आणि कॅडेव्हरीक) यशस्वीरित्या केले जाते.

या विभागात प्रामुख्याने सर्व शस्त्रक्रिया दुर्बिणीव्दारे केल्या जातात (ॲन्ड्रोलॉजी, लॅप्रोस्कोपिक युरोलॉजी, लॅप्रोस्कोपिक डोनर किडनी ट्रीटमेंट इ.) तसेच अनेक आजारांवर जसे मूत्रपिंडातील खडे, कॅन्सर, मुत्राशयाच्या पिशवीचा आजार, प्रोस्टेट ग्रंथींचे विविध आजार यांवरदेखील उपचार केले जातात. LASER, ESWL, UDS, RIRS इत्यादी प्रगत उपचार आहेतच. त्याचप्रमाणे, खास ॲन्ड्रोलॉजी बाह्य रूग्ण कक्षदेखील आहे.

- **औषधनिर्माणशास्त्र विभाग :**

- द्वितीय वर्ष एम.बी.बी.एस., द्वितीय वर्ष फिजिओथेरपी, द्वितीय वर्ष व्यावसायिक थेरपी, द्वितीय वर्ष नर्सिंग आणि बी.पी.एम.टी.च्या विद्यार्थ्यांचे अध्यापन आणि मूल्यमापन.

- फार्माकोलॉजी मध्ये लि.टि.म.वै. महाविद्यालया च्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकवणे आणि प्रशिक्षण.
- ह्या विभागात प्रतिकूल औषधांच्या प्रतिक्रिया निरीक्षणासाठी फार्माकोव्हिजिलन्स केंद्र आहे. यात केंद्रीय पशुगृह देखील आहे. फार्माकोलॉजी विभागाचे कर्मचारी, प्राध्यापक आणि निवासी डॉक्टरांनी कोविड कर्तव्ये पार पाडली आहेत.

- **त्वचारोग विभाग :**

**क्लिनिकल कार्य :**

- जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत त्वचारोग बाह्यरुग्ण विभाग तत्त्वावर ८१,००० आणि आंतररुग्ण विभाग तत्वावर ११३ रुग्णांना सेवा दिली आहे.
- केस, व्हिटिलिगो, सोरायसिस, मुरुम / मेलास्मा साठी विशेष ओ.पी.डी. घेतली. एकट्या हेअर ओ.पी.डी.मध्ये यंदा १२,४८० रुग्णांची भर पडली आहे.
- हेअर ट्रान्सप्लांट वर्कशॉप : देशभरातील उत्साही त्वचारोग तज्ज्ञांसाठी एक अतुलनीय शिक्षण अनुभव जो ह्या विभागात आयोजित केला गेला.

- **दंतशास्त्र विभाग :**

- दंतशास्त्र विभागामध्ये अत्याधुनिक सोईसुविधा तसेच नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून दंतोपचार केले जातात. पदवी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबरोबरच विविध उपचार येथे केले जातात जसे की दात काढणे, आर.व्ही.जी. एक्स-रे, किरकोळ शस्त्रक्रिया, दातांच्या फिलिंग, रूट कनाल ट्रिटमेंट, क्राऊन आणि ब्रिजेस (कृत्रिम दात) बसविणे इत्यादी.
- डेंटल इम्प्लांट (कृत्रिम दंतरोपण) आणि फुल माऊथ रिहॅबिलिटेशन (दंत पुनर्वसन) असे क्लिष्ट उपचार सुद्धा आता नित्याने केले जातात. मागील वर्षी ह्या विभागामार्फत जवळपास ८०० फिलिंग, ७५० रूट कॅनल ट्रिटमेंट, ८०० क्राऊन आणि १० इम्प्लांट करण्यात आलेले आहेत.

- **बालरोगशल्यचिकित्साशास्त्र :**

- बालरोगशल्यचिकित्सा : बालरोगशल्यचिकित्सा विभाग हा २०२४ मध्ये ३४ व्या वर्षात पदार्पण करत आहे.
- बाह्यरुग्णचिकित्सा विभागात क्र. ०७ येथे रूम नं. १३ मध्ये बाहयरुग्णांची तपासणी मंगळवार, गुरुवार, शनिवार या दिवशी केली जाते. विशेष बाह्यरुग्ण् तपासणी शुक्रवार या दिवशी केली जाते. ज्या रुग्णांवर मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत किंवा करण्यात येणार आहेत अशा रुग्णाची तपासणी आणि पुढील योजना देखील याच दिवशी आखली जाते. राजावाडी रुग्णालय आणि शताब्दी रुग्णालय,गोवंडी येथे मा. अधिष्ठाता ( लो. टि.म.स.)रुग्णालय यांच्या आदेशाने सह- बाह्यरुग्ण् चिकित्सा विभाग फेब्रुवारी २०१८ मध्ये सुरू करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त, आपत्कालीन रुग्णांना अपघाती विभागाकडून २४ तास सेवा दिली जाते.
- गुरुवारी सकाळी ११.३० वाजता विशेष स्पिना बिफिडा बाह्यरुग्ण विभाग आयोजित केला जातो.
- विशेष प्रसूतीपूर्व क्लिनिक मंगळवारी दुपारी ०१.३० वाजता आयोजित केले जाते.

- **शस्त्रक्रिया विभाग :**

- बालरोगशल्यशस्त्रक्रिया विभागामध्ये सुसज्ज असे तीन शस्त्रक्रिया टेबल आहेत. तसेच, या शस्त्रक्रिया विभागात आपत्कालीन शस्त्रक्रिया सुद्धा केल्या जातात.
- सन २०२३ मध्ये सुप्रा मेजर शस्त्रक्रियांची एकूण संख्या ११० आहेत, एकूण प्रमुख शस्त्रक्रिया १,४९८ आहेत आणि एकूण किरकोळ शस्त्रक्रिया १,७६७ आहेत.

- **शस्त्रक्रिया शिबीर :**
- बालशल्यशस्त्रक्रिया शिबीराची सुरुवात ही एप्रिल २०२१ पासून सुरु करण्यात आले. या शिबीरात संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सर्व कमकुवत सामाजिक-आर्थिक स्थितीतील रूग्णांची पूर्तता केली जाते.
- **शैक्षणिक उपक्रम :**

हा विभाग सध्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील १० विद्यार्थ्यांना M. Ch. साठी प्रशिक्षण देत आहे. (बालरोग शस्त्रक्रिया) सुपर स्पेशालिटी बंधपत्रित उमेदवार ०६ व निबंधक १२ आहेत.

- **व्यवसायोपचारशास्त्र विभाग :**
- या विभागातर्फे बाह्यरुग्ण , आंतररुग्ण तसेच अतिदक्षता विभागातल्या रुग्णांवर एर्गोथेरपीयूटीक उपचार पध्दतीचा वापर करुन त्यांचे पुनर्वसन केले जाते.
- या व्यतिरिक्त या विभागातर्फे न्युरो - मेडिसिन, मस्कुलोस्केलेटल आणि मनोरुग्णांसाठी कॉग्निटिव्ह मुल्यांकन आणि पुनर्वसन .इ. विशेष सेवा उपलब्ध केल्या जातात.
- यू.एच.सी. - धारावी येथे कम्युनिटी बेस्ड रिहॅबिलिटेशन तसेच, समाजातील वृध्दांसाठी होम बेस्ड पुनर्वसन कार्यक्रम आखण्यात येतो.
- **न्यायवैद्यकशास्त्र :**

**अ) नियमित क्रियाकलाप :**

- एम.यु.एच.एस. अभ्यासक्रमानुसार प्रभावीपणे अंडरग्रॅजुएट व्याख्याने घेणे, ऑफलाइन मोडद्वारे.
- भारतीय दंड संहिता नुसार मुंबईच्या कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयापेक्षा जास्तीत जास्त मेडिकोलेगल पोस्ट मॉर्टेम करणे.
- सन २०२३ मध्ये एकुण २,०३० पोस्टमॉर्टम करण्यात आले.
- सन २०२२ मध्ये लैंगिक अत्याचाराच्या एकूण ४२२ प्रकरणांची तपासणी करण्यात आली (पीडित- १८९ आणि आरोपी- १३३).
- एकूण १९७ प्रकरणे वयाची तपासणी झाली.
- एम.यु.एच.एस. मार्गदर्शक तत्त्वे म्हणून टर्मिनल परीक्षा आणिएम.यु.एच.एस. विद्यापीठ परीक्षा आयोजित करणे.

**ब) विशेष क्रियाकलाप :**

- क्लिनिकल वॉर्डमधील डॉक्टरांना मेडिकोलॉजिकल बाबतीत मार्गदर्शन प्रदान करणे.
- लैंगिक हिंसाचारातून वाचलेल्यांच्या तपासणीसाठी वन स्टॉप मदत केंद्र.
- दंत तपासणीशी संबंधित प्रकरणांसाठी फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजी युनिट.
- **कान, नाक व घसा विभाग :**

लो.टि.म.स रुग्णालयाचा ई.एन.टी. विभाग हे तृतीयक संदर्भ केंद्र आहे, जेथे संपूर्ण देशभरातून जटिल आणि कठीण प्रकरणे संदर्भित केली जातात. रोजच्या रोज १७५-२०० रूग्णांवर बाह्यरुग्ण विभागात (OPD) उपचार केले जातात. ऑपरेशन थिएटर देखील दररोज कार्यरत आहे आणि दररोज ०७-१० मोठ्या आणि लहान ऑपरेशन्स केल्या जातात. आपत्कालीन ऑपरेशन २४ तास केले जातात. नियमित ई.एन.टी. प्रक्रियेव्यतिरिक्त , डोके आणि मानेच्या कर्करोगाच्या शस्त्रक्रिया, एंडोस्कोपिक आणि ओपन एअरवे शस्त्रक्रिया इ. २४ तास केल्या जातात.

- **अपघात व तातडीची वैद्यकीय सेवा विभाग :**

लो.टि.म.स रुग्णालयातील रुग्णांना तात्काळ उपचार देणा-या इमर्जन्सी मेडिकल आणि सर्जिकल सर्व्हिसेस विभागास (इ.एम.एस.) २१ वर्ष पूर्ण झाली आहेत. हा विभाग लो.टि.म.स. रुग्णालयाचा अविभाज्य भाग आहे. सर्व गरजू रुग्णांना आपत्कालीन सेवा २४ तास प्रदान केल्या जातात. लो. टि.म.स. रुग्णालय हे Tertiary care Hospital असल्याने सर्व आर्थिक गटातील रुग्णांना त्वरित उपचार दिले जातात.

- ज्या रुग्णांना पेनिड्युरा इंजेक्शन घ्यायचे असते ते सुध्दा निरिक्षणाखाली इ.एम.एस. मध्ये दिले जातात.
- इ.एम.एस. मध्ये लैंगिक हिंसाचाराच्या पीडितांच्या तपासणीसाठी 'वन स्टॉप मदत केंद्र' सुरू करण्यात आले आहे.
- तीन इ.सी.जी. तंत्रज्ञांची इ.एम.एस. अपघात विभागात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली आहे. हे तंत्रज्ञ चोवीस तास सेवा देतात.

- **लोकनेते एकनाथ गायकवाड नागरी आरोग्य सेवा केंद्र :**

- लोकनेते एकनाथ गायकवाड नागरी आरोग्य केंद्र हे लो.टि.म.वैद्यकीय महाविद्यालय व लो.टि.म.स.रुग्णालय, शीव, मुंबई - ४०० ०२२ यांचे विस्तारीत केंद्र आहे.
- यावर्षी डायलिसिस केंद्र सुध्दा येथे आपण सुरु केले आहे. ज्याचा रुग्णांना खूप फायदा होत आहे. या ठिकाणी (PPP) अर्थात सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर सी.टी.स्कॅन, एम.आर.आय.,सोनोग्राफी, २डी इको (2D Echo) आणि एक्स रे व रक्तदोष चाचणी (आपली चिकित्सा) सुध्दा लोकसेवेसाठी कार्यरत आहे.

## पाच ) – सेठ आत्मासिंग जेसासिंग बांकेबिहारी महानगरपालिका कान, नाक व घसा रुग्णालय, फोर्ट.

सेठ आत्मासिंग जेसासिंग बांकेबिहारी महानगरपालिका कान, नाक व घसा रुग्णालय हे सन १९६४ पासूनचे महर्षी दधीची मार्ग, फोर्ट येथे स्थित १०० खाटांचे कान, नाक व घसा ह्यांच्या रोगांवर विशेषोपचार करणारे विशेष रुग्णालय आहे.

येथील बाह्यरुग्ण विभाग रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता दररोज चालू असतो. येथे कान, नाक व घसा ह्या रोगांसंबंधातील शस्त्रक्रिया केली जाते. तातडीची रुग्णसेवा रात्रंदिवस उपलब्ध आहे. ह्या रुग्णालयात श्रवणक्षमता (ऑडिओलॉजी), श्रवणशास्त्रविषयक चाचण्या करण्याची, बोलण्याच्या उपचार पद्धतीची (न्युरो ओटोलॉजी) सोय आहे. रुग्णालयात विकृतीशास्त्र, रेडिओलॉजी विभाग व औषधनिर्माता विभाग आहे. औषधनिर्माता विभागामध्ये कान, नाक व घसा ह्यांच्या आजारावरील औषधे तयार केली जातात.

सन २०२३-२०२४ या वर्षात कान, नाक व घसा रुग्णालयात १,०५,५१० बाह्यरुग्णांवर उपचार करण्यात आले. तसेच, १,९१७ रुग्ण आंतररुग्ण विभागात दाखल करण्यात आले होते. सन २०२३-२०२४ मध्ये कान, नाक व घसा रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागात १,४७६ मोठ्या व ४८२ लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

## सहा ) – बृहन्मुंबई महानगरपालिकेची क्षयरोग नियंत्रण सेवाकार्ये, क्षयरोग रुग्णालय समूह आणि शहर क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्षयरोग रुग्णालय समूह हे आशिया खंडातील सर्वात मोठे क्षयरोग रुग्णालय आहे. औषध संवेदन व औषध रोधी (एम.डी.आर.टी.बी.) ह्या आजाराचे रुग्ण, तपासणी व भरतीसाठी सदर रुग्णालयात येत असतात.

- क्षयरोग बरा झालेल्या रुग्णांसाठी पल्मोनरी रिहॅबिलिटेशन सेंटर सुरु असुन आतापर्यंत ३,२२२ क्षयरुग्णांना पल्मोनरी रिहॅबिलिटेशन सेंटरचा फायदा झालेला आहे.
- क्षयरोग रुग्णांसाठी अल्कोहोलिक एनॉनिमस ही संस्था कार्यरत करण्यात आली आहे.

- जैव - वैद्यकीय कचरा विल्हेवाट लावण्यासाठी दोन मशिन्स रुग्णालयात बसविण्यात आल्या आहेत.
- ए.आर.टी.सेंटर (M.D.A.C.S. संलग्न) दि. १४ ऑगस्ट २०२० पासून कार्यरत आहे. क्षय व एच. आय. व्ही. बाधीत रुग्णांचा ए. आर. टी. सेंटरमध्ये उपचार केला जातो.
- रुग्णालयामध्ये २४ X ७ डिजिटल एक्स-रेची सुविधा उपलब्ध आहे.
- क्षयरोगबाधीत रुग्णांसाठी औषधसंवेदन (Drug Sensitive) आणि औषधरोधी (Drug Resistance) वेगवेगळा आंतररुग्ण कक्ष आहे तसेच बाह्यरुग्ण विभाग २४ X ७ कार्यरत आहे.
- क्षयरुग्णांसाठी ०२ खाटांचा फुफ्फुसांचा अतिदक्षता विभाग कार्यरत आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत १० खाटांचा फुफ्फुसाचा अतिदक्षता विभाग सुरु होण्याचे अपेक्षित आहे.
- क्षयरुग्णांसाठी अद्ययावत प्रयोगशाळा (T.B. Containment Lab) जीन एक्सपर्ट व एल.पी.ए. ह्या तपासण्या मोफत केल्या जातात. तसेच, जीन एक्सपर्टची क्षमता ०८ नमुना तपासणीवरुन १६ नमुना तपासणी एवढी केली आहे. तसेच, सद्यस्थितीत क्षयरोगावरील तीन औषधांसाठी कल्चर आणि सेन्सिटिव्हीटी टेस्ट केली जाते.
- क्षयरुग्णालयात काम करणाऱ्यांना सकस आहार (Supplimentry High Protien Diet) तिन्ही पाळ्यांमध्ये दिले जाते. जेणेकरुन, कर्मचाऱ्यांची रोग प्रतिकार शक्ती चांगली होण्यास मदत होईल.
- क्षयरुग्णालयात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे क्षयरोग व इतर आजार (मधुमेह, रक्तदाब व इतर आजारांसाठी) तिमाही तपासणी करुन योग्य ते उपचार सुरु करण्यात येतात.
- क्षयरोग रुग्णालयामध्ये असंसर्गजन्य रोगांसाठी (Non Communicable Diseases) नविन बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात आला असून, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची सदर विभागामध्ये तपासणी केली जाते.

**वर्षनिहाय सांख्यिकी माहिती :**

| वर्ष | बाह्यरुग्ण (नविन, जुने) | आंतररुग्ण प्रवेश |
|---|---|---|
| २०१९ | ३१,२५३ | ५,५०० |
| २०२० | २१,६३७ | ३,६०५ |
| २०२१ | २२,५६२ | ४,१५७ |
| २०२२ | २१,९३९ | ४,०९५ |
| २०२३ | २०,७३० | ४,२०० |

**शस्त्रक्रिया :**

| वर्ष | मोठी शस्त्रक्रिया | लहान शस्त्रक्रिया (ब्रॉन्कोस्कोपी समाविष्ट) | एकूण |
|---|---|---|---|
| २०१९ | ०९ | ७१९ | ७२८ |
| २०२० | ०० | ५२३ | ५२३ |
| २०२१ | ०० | ६१४ | ६१४ |
| २०२२ | ०० | ७६९ | ७६९ |
| २०२३ | ०४ | १,०७१ | १,०७५ |

# अभियांत्रिकी सेवा





जल बोगदा, भोईवाडा



मिठी नदी बोगदा

# अभियांत्रिकी सेवा

### १. नगर अभियंता ह्यांचे खाते :

अद्ययावत् सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ७४ अन्वये, नगर अभियंता हे वैधानिक पद आहे. नगर अभियंता ह्यांची मुख्य कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) अभियांत्रिकी खात्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती, बदली व बढती संबंधित सर्व आस्थापना कामे.

२) नगर अभियंता खात्याकडून सरळ सेवा भरती संबंधी वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या परिपत्रकांत नमूद केलेल्या अटींसापेक्ष कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यां. व वि.), दुय्यम अभियंता (स्थापत्य/यां. व वि.) व सहाय्यक अभियंता (स्थापत्य/यां. व वि.) या संवर्गातील तसेच वास्तुशास्त्रज्ञ संवर्गातील कर्मचाऱ्यांची कायम किंवा हंगामी तत्त्वावर अभियांत्रिकी विभागात नेमणूक केली जाते.

३) उपप्रमुख अभियंता , कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, दुय्यम अभियंता, कनिष्ठ अभियंता व तांत्रिक सहाय्यक (बांधकामे) या संवर्गातील पदांच्या अर्हता निश्चित करणे.

४) आरोग्य खात्यांतर्गत येणारी कामे वगळून अर्थसंकल्प 'अ', 'ब' आणि 'ई' मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यांसाठी नवीन इमारतीचे/पुनर्विकासासंबंधीची बांधकामे नगर अभियंता खात्यांमार्फत पार पाडली जातात.

५) अभियांत्रिकी खात्यातील कंत्राटदारांचे संनियंत्रण व नोंदणी करण्यासाठी एक विभाग आहे. संनियंत्रण व नोंदणी कक्ष हे विभाग कंत्राटदारांची नोंदणी, प्रमाणीकरण,श्रेणीवाढ संबंधात कामे पाहतो. सदर विभाग नोंदणीचे नियम बनविण्याचे कार्य करतो.

६) नगर अभियंता खात्याच्या अखत्यारित असलेल्या कार्यालयाकडून व २४ विभागांकडून महसूली खर्चाचे व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मागवून घेऊन अर्थसंकल्पीय प्रस्ताव तयार करतात.

७) नगर अभियंता खात्यातील/अभियांत्रिकी विभागात कार्यरत असणाऱ्या कोणत्याही शिक्षा झालेल्या कर्मचाऱ्यास दंड, सेवेतून कमी करणे, वेतन वाढ रोखणे, निलंबित किंवा बडतर्फ करण्यास नगर अभियंता हे सक्षम प्राधिकारी आहेत. तसेच, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ८३ मधील तरतूदीसापेक्ष नगर अभियंता खात्यात कार्यरत असणाऱ्या प्रशासकीय संवर्ग व सर्व अभियांत्रिकी संवर्गातील कर्मचाऱ्यास काढून टाकण्यासाठी किंवा बडतर्फ करण्यासाठी नगर अभियंता हे सक्षम प्राधिकारी असल्याने अशा कर्मचाऱ्यांचे शिक्षादेश नगर अभियंता यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतात.

### शाळा पायाभूत सुविधा कक्ष :

माननीय उच्च न्यायालयाची व माननीय धनुका समितीने शिफारस केल्यानुसार शाळा पायाभूत सुविधा कक्षाची निर्मिती सन २००८ पासून करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वमालकीच्या एकूण ४७९ शालेय इमारती आहेत. सदर शालेय इमारतींच्या दुरुस्ती, दर्जोन्नती पुनर्बांधकाम व नविन बांधणीचे काम नगर उप अभियंता (शाळा पायाभूत सुविधा कक्ष) या विभागामार्फत पार पाडण्यात येते. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये पुनर्बांधकाम व नवीन बांधणीच्या अशा एकूण २० शालेय इमारती या विभागामार्फत शिक्षण विभागास हस्तांतरित करुन लोकार्पण करण्यात आल्या आहेत.

नगर उप अभियंता (शाळा पायाभूत सुविधा कक्ष) या विभागामार्फत दुरुस्तीची ४८ कामे व पुनर्बांधणीची / नवीन बांधणीची १२कामे प्रगतीपथावर असून सदर कामे विहित वेळेत पूर्ण होतील. तसेच, ह्या विभागामार्फत नव्याने १५ शाळांच्या दुरुस्तीच्या व ०४ शाळांच्या पुनर्बांधणीच्या निविदा मागविण्यात आल्या असून प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर

कार्यादेश निर्गमित करण्यात येतील. उर्वरीत ६४ शालेय इमारतीच्या कामांसाठी टप्प्याटप्प्याने निविदा मागविण्यात येणार असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये रु.२२६.१० कोटी इतक्या सुधारीत अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी रु.१९५.४७ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद म्हणजेच ८६.४५ टक्के तरतूद खर्च करण्यात आली.

## २. पर्यावरण खाते :

पर्यावरण व्यवस्थापनाची बाजू पाहण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने जुलै १९७६ मध्ये नगर उप अभियंता ह्यांच्या अधिपत्याखाली या खात्याची स्थापना केली. वर्ष १९९४ पासून अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ६१ (अ ब) अनुसार,'पर्यावरणाचे रक्षण व जीवनसृष्टीचे प्रवर्तन', हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य झाले.

### अ) पर्यावरण विभाग :-

राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार व पाठविलेल्या नमुना (Template), मुंबईतील हवेचा दर्जा सुधारण्यासाठी, विहित मर्यादेत आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेला हवेचा कृती आराखडा, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. २४ ऑक्टोबर २०१९ रोजी मंजूर केला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका यामध्ये समन्वयक संस्था म्हणून काम करत असून, कृती आराखड्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत व बृहन्मुंबई महानगरपालिके बाहेरील संबंधित विभागांना बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे कळविण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक), प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन), प्रमुख अभियंता (विकास नियोजन), प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत), कार्यकारी आरोग्य अधिकारी, उद्यान अधिक्षक, सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त इत्यादींचा समावेश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिके बाहेरील आर.टी.ओ., वाहतूक पोलिस, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, बी.ई.एस.टी., रेल्वे, मेट्रो रेल्वे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, रिलायन्स, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, म्हाडा, परिवहन मंत्रालय, पेट्रोलियम मंत्रालय, खनन मंत्रालय इत्यादींचा महत्वपूर्ण सहभाग आहे.

सदर आराखड्यामध्ये रस्त्यांचे रुंदीकरण करणे, अडथळे दूर करून वाहतूक कोंडी कमी करणे, वाहतूक शिस्तबध्द करणे, बुध्दीमान वाहतूक प्रणाली विकसित करणे, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, लोअर परेल इत्यादी विभागातील वाहनांद्वारे उत्सर्जित होणारे वायू प्रदूषण कमी करणे, वायू प्रदूषण व पर्यायाने ध्वनी प्रदूषण नियंत्रित करणे या संबंधातील उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. सदर कार्यक्रम कालबध्द असून बृहन्मुंबई महानगरपालिकेला राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झाला असून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे यांत्रिकी झाडू खरेदी, वाहतूक नियोजनासाठी सिंक्रोनायझेशन सिस्टीम बसविणे, P.N.G. इंधनावर आधारित शवदाहिनी उभारणे, पर्यावरणीय सुधारणा जनजागृतीसाठी सदर निधी खर्च केला आहे.

राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत बनविण्यात आलेल्या मुंबई शहर हवेच्या कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरी स्तरावर 'नागरी स्तरीय हवा गुणवत्ता तपासणी' समिति गठीत केली आहे. सदर समितीत एकूण आठ सदस्य असून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त हे त्याचे अध्यक्ष आहेत.

सदर समितीत पोलिस आयुक्तांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी, नीरी या संशोधन संस्थेतील तज्ज्ञ, संचालक महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य, प्रादेशिक वाहतूक अधिकारी, कारखान्यांच्या संस्थेचे प्रतिनिधी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी असे सदस्य आहेत. सदर समितीतर्फे दरमहा बैठक आयोजित करून राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो.

राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत घेतलेली सर्व कामे यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर १५व्या वित्त आयोगाकडून 'Millon Plus Cities'ला हवा प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी निधी उपलब्ध

करण्यात आले आहेत. ह्या अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेसह M.M.R. Region मधील ०८ महानगरपालिकांना एकत्रित निधी देण्यात आला आहे. ह्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर निधीचे वाटप नागरी महानगरपालिका समूहात करण्यात येते. ह्यात वर्ष २०२०-२१ पासून वर्ष २०२२-२३ पर्यंत एकूण रू.९२९ कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. ह्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेस ह्या वर्षाकरीता ६२० कोटी रुपये एवढा निधी प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रीक वाहन योजनेला चालना मिळण्यासाठी व मुंबईतील हवेच्या गुणवत्तेची सुधारणा व्हावी ह्या कारणास्तव ह्यातील ८०% निधी म्हणजे ४९४ कोटी रूपये बेस्ट प्राधिकरणाला इलेक्ट्रीक बसेससाठी देण्यात आले आहेत. उरलेल्या २० % निधीमधून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध कामे हाती घेतली आहेत. ज्यामुळे मुंबईतील हवा प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

ह्याचप्रमाणे १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेला 'संवर्धन पुरवठा व जल व्यवस्थापन आणि घन कचरा व्यवस्थापन' (Conservation, Supply Management of Water Solid Waste Management) ह्या शिर्षकाखाली, भारत सरकारकडून वर्ष २०२०-२१ ते २०२२-२३ साठी एकूण अंदाजे रु.९८१ कोटी प्राप्त झाले आहेत. सदर निधी हा सूचिबद्ध आहे. त्या निधीच्या विनियोगासाठी भारत सरकारने पालिकेला घातलेल्या अटी, शर्तीला अनुसरून पेय जल, मलनि:स्सारण जल, घन कचरा ह्या संदर्भातील विविध कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेने निवडली आहेत व ती कामे सुरु आहेत.

ह्या व्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेने World Resources Institute (W.R.I.) ह्यांच्या मदतीने मुंबई हवामान कृती आराखडा तयार केला आहे. संपूर्ण भारतात बृहन्मुंबई महानगरपालिका ही सर्व प्रथम महानगरपालिका ठरली आहे. जिने आपल्या शहरासाठी अशा प्रकारचा कृती आराखडा तयार केला आहे. C-40 ह्या संस्थेबरोबर संलग्न होऊन Urban Flooding ह्याबाबत वेळीच योग्य उपाययोजना करून २०५० पर्यंत मुंबईला पुरापासून वाचवण्यासाठी काय प्रयत्न करायचे हे ठरवले जात आहे. त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेत एक Climate Cell निर्माण करण्यासाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे. ज्याअन्वये हवामान संदर्भातील विविध तज्ज्ञ बृहन्मुंबई महानगरपालिकेस मार्गदर्शन करतील.

ह्या वर्षी मुंबई शहराने बरेच दिवस अनुभवलेले हवा प्रदूषण बघता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सात सदस्यीय समिति स्थापन करुन तसेच I.I.T. मुंबई , NEERI ह्या संस्थांच्या तज्ज्ञांच्या सहाय्याने 'Mumbai Air Pollution Mitigation Plan तयार केला असून प्रत्येक विभाग कार्यालयास अंमलबजावणीकरिता पाठविण्यात आला असून त्यांनी याबाबत करत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच आणि वीस तारखेस अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प. उप.) ह्यांना सादर करण्याबाबत सूचित केले आहे. सदर आराखडा नागरिकांना अवलोकित करण्यासाठी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच प्रचंड प्रमाणात मुंबईत सुरू असलेल्या गृह निर्माण व विविध पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे मुंबईची हवा दूषित झाली होती. त्याची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेवर खटला दाखल केला. दूषित हवा सुधारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. २५.१०.२०२३ रोजी २५ मुद्दे नमूद केलेले परिपत्रक निर्गमित केले. प्रत्येक विभागात बांधकाम करत असलेल्या गृह निर्माण प्रकल्प तसेच पायाभूत सुविधा प्रकल्प यांच्याकडून सदर परिपत्रकातील मुद्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात आहे अथवा नाही याची तपासणी करण्याकरिता प्रत्येक विभागामध्ये ०२ ते ०४ गट तयार करून पाठपुरावा करण्यात आला. यामुळे बांधकाम करताना उडणा-या धूळीवर नियंत्रण आणण्यात महानगरपालिकेला यश आले. त्याचप्रमाणे 'डीप क्लिनिंग' पद्धतीचा अवलंब करून सर्व विभागांसाठी स्वछता मोहीम राबविण्यात आली. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

**१. ध्वनी प्रदूषण नियंत्रण :-**

जनहित याचिका क्र. १७३/२०१०, महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य या याचिकेमध्ये माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार पूर्तता करतेवेळी निरी (NEERI) या संशोधन संस्थेने मुंबई शहरात ५५ ठिकाणी ध्वनी परीक्षण आणि आलेखन केले. निरी या संस्थेने मुंबईसाठी बनविलेल्या आवाजाच्या आलेखन अहवालामध्ये, मुंबईतील ध्वनी प्रदूषण नियंत्रणात आणण्यास, अनेक सूचना / शिफारशी केल्या आहेत. तसेच ,त्या अनुषंगाने जबाबदार असलेल्या विविध सरकारी, निमसरकारी, प्राधिकरण संस्था यांच्या भूमिका ठरविल्या आहेत.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या आदेशान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने निरी या संशोधन संस्थेने त्यांच्या आवाजाच्या आलेखन अहवालामध्ये केलेल्या सूचना / शिफारशी त्वरित कार्यान्वित करण्यासाठी जबाबदार असलेल्या विविध सरकारी, निमसरकारी कार्यालये, प्राधिकरणे यांना सूचना केल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खाती व विभागांना कळविण्यात आले असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पाठवला जाईल. अशाप्रकारे पर्यावरण विभाग ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी समन्वयाची भूमिका पार पडत आहे. 'निरी' या संस्थेच्या अहवालातील सूचनेप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने शहर ध्वनीप्रदूषण नियंत्रण समिती गठीत केली आहे. जी शहरातील ध्वनी प्रदूषणावर देखरेख ठेवण्यासाठी व ध्वनी प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करील.

**२. शांतता क्षेत्र :-**

महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र असाधारण भाग ४ अ. क्र. १९ दि. ३० नोव्हेंबर १०१७ अन्वये बृहन्मुंबईकरिता पहिल्या टप्प्याच्या ११० शांतता क्षेत्रांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. पुढील टप्प्यातील शांतता क्षेत्रांची यादी सर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे पडताळणीकरिता पाठविण्यात आली आहे. ती परत प्राप्त झाल्यानंतर, ती घोषित करण्यासाठी व सूचित करण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविली जाईल.

**३. वायु प्रदूषण उपशमन शुल्क :-**

महानगरपालिकेने दि. ०१ एप्रिल १९७८ सालापासून कारखान्यांनी वापरलेल्या वीज अश्वशक्तीच्या आधारावर वायु प्रदूषण उपशमन शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे. विभाग कार्यालयांच्या सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) या खात्याकडून उपशमन शुल्क जमा केले जाते व सर्व विभागाचे शुल्क या खात्याच्या संबंधित अर्थसंकल्पीय शिर्षकांतर्गत जमा होते.

सदर शुल्कामध्ये २००९ पासून वाढ झालेली नाही. सदर वाढीचा प्रस्ताव तयार केलेला असून, प्रशासक (स्थायी समिती) यांचा दिनांक ०४ नोव्हेंबर २०२२ च्या ठराव क्र. १०२४ अन्वये वायू प्रदूषण उपशमन शुल्कामध्ये१८९% वाढ मंजूर करण्यात आलेली असून सन २०२२-२३ नंतर येणाऱ्या प्रत्येक आर्थिक वर्षात ०५% इतकी शुल्कवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस वार्षिक अंदाजे ०२ कोटी इतका वाढीव महसूल अपेक्षित आहे.

**ब) कायदेशीर बाजू :**

भारतीय घटनेमधील घटना दुरुस्ती क्र.७४ सन १९९२ अनुसूची १२ नुसार महाराष्ट्र शासनाने अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यात सन १९९४ मध्ये दुरुस्ती केली. त्यानुसार अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम ६१ (अ ब) नुसार पर्यावरण रक्षण व जीवसृष्टिचे संवर्धन करणे हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे. तसेच, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम ,१८८८ चे कलम ६३ ब अन्वये पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करुन दरवर्षी ३१जुलै पूर्वी महानगरपालिकेस सादर करण्यात येतो.

**उपविभाग : वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळा -**

वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळेमार्फत बृहन्मुंबई महानगर परिक्षेत्रात मानवचलित वायु सर्वेक्षण केंद्रे उभारलेली आहेत. सदर स्थिर वायु सर्वेक्षण केंद्रावर हाय व्हॉल्युम सॅम्पलर सयंत्राद्वारे (HVS) विविध प्रदुषकांचे नमुने गोळा केले जातात. उदा.सल्फरडाय ऑक्साईड ($SO_2$) नायट्रोजन डायऑक्साईड, ($NO_2$) अमोनिया ($NH_3$) व तरंगणारे धुलीकण(S.P.M.) तसेच दैनंदिन तापमान व सापेक्ष आर्द्रता अशा हवामानाच्या नोंदी सुद्धा घेतल्या जातात. प्रयोगशाळेमार्फत सर्वेक्षण केंद्रावर गोळा करण्यात आलेल्या नमुन्यांचे यु.व्ही.स्पेक्ट्रोफोटोमिटरद्वारे (U.V.Spectrophotometer) सविस्तर विश्लेषण केले जाते. गॅस क्रोमॅटोग्राफ (Gas Chromatograph) या संयंत्राद्वारे तरंगणाऱ्या धुलीकणातील Polynuclear Aromatic Hydrocarbons उदा. Phenanthrene, Anthracene, Fluoranthere, Pyrene, Benzo (α) anthracene, Chrysene Benzo (α) pyrene इ. प्रदुषकांचे विश्लेषण व मापन केले जाते. तसेच, अॅटोमिक अॅब्सॉर्प्शन स्पेक्ट्रोफोटोमिटर (Atomic Absorption Spectrophotometer) या संयंत्रावर वातावरणातील तरंगणाऱ्या

धुलीकणामधील जड धातू (Heavy Metals) Goe. Arsenic (AS), Cadmium (Cd), Chromium (Cr), Copper (Cu), Iron (Fe), Nickel (Ni) & Lead (Pb) या प्रदुषकांचे विश्लेषण व मोजमाप केले जाते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेप्रमाणे वायु सर्वेक्षणाची कामे केली जातात. त्याचबरोबर नागरीकांच्या प्रदूषण विषयक तक्रारीनुसार विशेष वायु सर्वेक्षण करुन संबंधितांना अहवाल सादर करण्यात येतो.

वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळेमार्फत सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात यु. व्ही. स्पेक्ट्रोफोटोमिटर -०१ व हाय व्हॉल्युम सॅम्पलर (H.V.S. / Dust Sampler) ०५ सयंत्रे खरेदी करण्याची मसुदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच सदर सयंत्रांच्या खरेदीसाठी कार्यादेश देण्यात येतील.

### १) फिरते प्रदूषण मापन वाहन :

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वडाळा व अंधेरी या वाहतूक नाक्यावर तसेच देवनार भराव भुमी व कांजूर क्षेपणभूमीवर फिरत्या प्रदूषण मापन वाहनामार्फत वायु सर्वेक्षण केले जाते. यामध्ये $SO_2$, $NO_2$, CO, $O_3$, $PM_{10}$, $PM_{2.5}$, Hydrocarbons इ. प्रदुषकांचा समावेश आहे. महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या प्रदुषणाच्या तक्रारी बाबत फिरत्या प्रदूषण वाहनाद्वारे सर्वेक्षण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधितांना देण्यात येतो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारीत केलेल्या मानकांबरोबर तुलना करुन मासिक व वार्षिक अहवाल उप प्रमुख अभियंता (स्थापत्य) पर्यावरण/प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन)/ विभाग प्रमुख, उरो औषध व पर्यावरण प्रदूषण तथा संशोधन केंद्र (के.ई.एम. रुग्णालय) यांना पाठविण्यात येतो.

### २) सफर-मुंबई :

सफर-मुंबई हा महत्वाकांक्षी प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका, भारतीय हवामानशास्त्र विभाग, मुंबई (I.M.D.) तसेच भारतीय उष्णकटीबंधीय हवामानशास्त्र संस्था, पुणे (I.I.T.M.) यांचा एकत्रित उपक्रम आहे. सफर प्रणालीद्वारे बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये हवेच्या दर्जाची सर्वेक्षण केंद्रे (A.Q.M.S.)-०९, स्वयंचलित हवामान केंद्रे (AWS)-१६ व एल.ई.डी. फलक (D.D.B.)-१३ अशी विविध केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळेमार्फत 'सफर-मुंबई'व्दारे उपलब्ध माहितीचे सविस्तर विश्लेषण करुन मासिक व वार्षिक अहवाल संबंधितांना सादर करण्यात येतो. यामध्ये $NO_2$ CO, $O_3$ $PM_{10}$ $PM_{2.5}$ या प्रदुषकांचा समावेश आहे. 'सफर-मुंबई' या उपक्रमामार्फत मुंबईच्या हवेच्या दर्जाची स्थिती, हवामान विषयक पूर्व अंदाज व वायु दर्जा निर्देशांक इ. माहिती मुंबईकरांना सफर एअर (मोबाईल ॲप) व्दारे उपलब्ध होते.

### ३) पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल :

वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळेमार्फत अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६३ ब अन्वये पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करुन दरवर्षी ३१ जुलै पूर्वी महानगरपालिकेस सादर करण्यात येतो. त्यानुसार वर्ष २०२२-२०२३ चा बृहन्मुंबई पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महानगरपालिकेला सादर करण्यात आलेला आहे. तसेच सन २०२३-२०२४ या वर्षीचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

वायु वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळेमार्फत सन२०२२-२०२३ या वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत ०५ ठिकाणी स्वयंचलित वातावरणीय वायु सर्वेक्षण केंद्रे कार्यान्वित झाली असून त्यामार्फत हवेच्या दर्जाची स्थिती, वायु गुणवत्ता निर्देशांक इ. माहिती मुंबईकरांना उपलब्ध होत आहे. सदर वायू गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडण्यात आलेली असून दैनंदिन वायु गुणवत्ता निर्देशांकाची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित केली जाते.

याव्यतिरिक्त प्रयोगशाळेमार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना/ संशोधकांना व शासनाला वेळोवेळी आवश्यक ती पर्यावरणासंबंधित माहिती उपलब्ध करुन देण्यात येते.

### क) स्थापत्य विभाग :

उप प्रमुख अभियंता (स्थापत्य) पर्यावरण या विभागातर्फे घन कचरा व्यवस्थापन कर्मचारी वसाहतींच्या दुरुस्तींची कामे हाती घेण्यात आली आहेत. मुंबई शहरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या ४६वसाहती असून त्यामध्ये सुमारे ५,५९२ सफाई कर्मचारी वास्तव्य करीत आहेत. सदर वसाहतींमधील इमारतींच्या आणि यानगृह-इमारतींच्या दुरूस्ती विषयक कामे त्याचप्रमाणे विद्युत कामे या विभागामार्फत केली जातात.

### ड)आश्रय योजना कक्ष :

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २७,९०० सफाई कर्मचा-यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरीता सद्यस्थितीत असलेल्या ३० वसाहतींचा कमाल ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन आश्रय योजनेअंतर्गत सफाई कामगारांना वाढीव क्षेत्रफळाची किमान ३०० चौ.फूट) सेवानिवासस्थाने देण्यासाठी महानगरपालिकेतर्फे पुनर्विकास करण्याचे नियोजिले आहे. आश्रय योजनेअंतर्गत शहर व उपनगरातील राजवाडकर स्ट्रीट, पलटन रोड, वालपखाडी, सिध्दार्थ नगर, माहिम, गौतमनगर, कासारवाडी यारी रोड, न्यु हसनाबाद लेन, पी. एल. लोखंडे मार्ग, लायन्स गार्डन येथे अशा एकूण ११ ठिकाणी संक्रमण शिबीरे मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली होती. तसेच सदर ११ ठिकाणांपैकी ०८ ठिकाणी संक्रमण शिबिरे पुनर्विकासादरम्यान तोडण्यात आली आहेत.

'ए' विभागातील कोचीन स्ट्रीट, 'ई' विभागातील सिध्दार्थनगर येथील प्रथम टप्प्यातील व 'आर / दक्षिण' विभागातील पॉवेलस लँड पुनर्विकासाचे काम पूर्ण झाले असून पुनर्विकास झालेली ठिकाणे मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. शहरातील 'ई' विभागातील टँकपखाडी, 'एफ / दक्षिण' विभागातील गौतमनगर तसेच पश्चिम उपनगरात 'एच / पश्चिम' विभागातील न्यु हसनाबाद लेन येथील वसाहतीच्या पुनर्विकासाचा टप्पा-१ मधील कामे प्रगती पथावर आहेत.

शहर, पूर्व तसेच पश्चिम उपनगरातील ३० सफाई कामगारांच्या वसाहतीच्या ठिकाणी ३०० चौ.फुटाच्या ११,५८३ व ६०० फुटाच्या ९५९ सेवानिवासस्थानांचा पुनर्विकास करण्यासाठी कंत्राटदाराची तसेच प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असून कामे प्रगतीपथावर आहेत. उपरोक्त ३० पैकी २३ ठिकाणी पुनर्विकासाची कामे हाती घेण्यात आली असून उर्वरित ०७ ठिकाणी सदनिकाधारकांना स्थलांतर करणे तसेच, विविध विभागांच्या / प्राधिकरणांच्या मंजूरी, ना-हरकत प्रमाणपत्रे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.

## ३. प्रमुख अभियंता ह्यांनी पार पाडावयाची कामे :

### १) प्रमुख अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या) :

मुंबईच्या पश्चिम बाजूला अरबी समुद्र असून विविध खाड्या शहरातून वाहतात. पर्जन्य जलवाहिन्या प्रणालीमधून पावसाचे पाणी समुद्रात सोडण्याच्या दृष्टीकोनातून भरती-ओहोटी हा महत्त्वाचा भाग आहे. बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये २७४ कि.मी.चे मोठे नाले, ६३७ कि.मी.चे छोटे नाले व २,१८१ कि.मी.चे रस्त्यालगतचे नाले आहेत. मुंबई शहर विभागातील पर्जन्य जलवाहिन्या १०० वर्षांपासून अस्तित्वात आहे. ह्या प्रणालीमध्ये जमिनीखालील वाहिन्या, रस्त्यांच्या बाजूने वाहणाऱ्या उघड्या वाहिन्या, लहान व मोठे नाले ह्यांचा समावेश आहे व ही प्रणाली त्या वेळच्या पावसाच्या तीव्रतेनुसार बांधलेली आहे. जुनी पर्जन्य जलवाहिनी प्रणाली पर्जन्य जलवहन सहगुणक ०.५ सह ओहोटीच्या वेळी ताशी २५ मि.मी. पावसाचे पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेची आहे. जर पाऊस ताशी २५ मि.मी. पेक्षा जास्त पडला आणि त्याच वेळी भरती आली तर मुंबईच्या काही सखल भागांमध्ये नेहमीच पाणी भरण्याची शक्यता असते.

प्रत्यक्षात या पर्जन्य जलवाहिन्या पावसाच्या पाण्याशिवाय सेप्टीक टाक्यातून बाहेर पडणारा मलप्रवाह तसेच, जमिनीवरील पाणी इ. सुध्दा वाहून नेतात. या पर्जन्य जल वाहिन्यांचे प्रचलन आणि परिरक्षण वेळोवेळी करण्यात येते. या उघड्या पर्जन्य जलवाहिन्यांतून वाहणारा प्रवाह मोऱ्या, गटारे, खाडी किंवा समुद्रात सोडला जातो. या उघड्या पर्जन्य जल वाहिन्यांमध्ये नागरिकांनी प्रामुख्याने झोपडपट्टी क्षेत्रामध्ये टाकलेला केरकचरा यामुळे त्यांची स्थिती दयनीय होते व त्यामुळे

अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण होते. याकरिता दरवर्षी नियमितपणे निविदा काढून नोंदणीकृत कंत्राटदारांमार्फत नालेसफाई केली जाते. यापूर्वी अस्तित्वात असलेल्या अपुऱ्या मलनिःसारण प्रणालीमुळे रस्त्याच्या बाजूकडील उघडया वाहिन्या तसेच, भूमीगत वाहिन्या (प.ज.वा) मल / मलमिश्रीत पाणी वाहून नेतात. पर्जन्य जल वाहिन्यांमध्ये मल / मलमिश्रीत पाण्याचा प्रतिबंध करण्याचा सल्ला सल्लागारांनी सुचविलेला आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. या भारत सरकारच्या कार्यक्रमांतर्गत मलनिःसारण प्रकल्प खात्यामार्फत पर्जन्य जल वाहिन्यांमधून मलप्रवाह वेगळा करण्याची स्वतंत्र योजना हाती घेण्यात आलेली आहे.

शहरात ८२ प्रमुख पातमुखांद्वारे अरबी समुद्रामध्ये तसेच ०९ पातमुखांद्वारे माहिमच्या खाडीमध्ये व ०७ पातमुखांद्वारे माहूल खाडीमध्ये व ०७ पातमुखांद्वारे ठाण्याच्या खाडीमध्ये पावसाचे पाणी सोडले जाते. पश्चिम उपनगरांतील ५१ पातमुखांद्वारे पावसाचे पाणी अरबी समुद्रात सोडले जाते. तसेच, १४ ठिकाणी मिठी नदीमध्ये पाणी सोडले जाते, जे शेवटी माहिम खाडीमधून समुद्राला मिळते. पूर्व उपनगरांत २५ पातमुखांद्वारे ठाण्याच्या खाडीत पाणी सोडले जाते व ०४ ठिकाणी माहूलच्या खाडीत सोडले जाते. उपनगरांत तसेच विस्तारीत उपनगरात रस्त्यांच्या दोन्ही बाजूला उघड्या पर्जन्य जलवाहिन्या (प.ज.वा.) बांधल्या आहेत.

जून १९८५ मध्ये शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होऊन पूरसदृष्य स्थिती निर्माण झाली व त्यामुळे रस्ते व रेल्वे वाहतूक विस्कळीत होऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले होते. म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहराच्या संपूर्ण जलवाहिन्या प्रणालीचा अभ्यास करण्याचे ठरविले आणि पावसाळी पाण्याचा लगेच निचरा होण्यासाठी व पूरसदृश्य परिस्थितीच्या घटना कमी होण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्याचे ठरविले. सन १९८९ मध्ये मे. वॅटसन हॉक्सले इंटरनॅशनल प्रा. लि. व त्यांची, मे. ए.आय.सी. ही भारतीय सहयोगी कंपनी ह्यांची सदर प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सल्लागारांनी विद्यमान वाहिन्या आणि नाल्यांच्या प्रणालीचे सर्वेक्षण करुन शहराची १२१ पाणलोट क्षेत्रांत विभागणी करुन त्यातील कमतरतेचा अभ्यास केला. तसेच, त्यातील साफसफाई व परिरक्षणात येणाऱ्या अडथळ्यांची नोंद केली. तसेच, त्यांच्या नकाशे बनविण्याच्या मापदंडांचा पुनर्अभ्यास केला व सन १९९३ मध्ये पर्जन्य जलवाहिन्या प्रणालीच्या आवर्धनाकरिता एक बृहत् आराखडा तयार केला, जो 'ब्रिमस्टोवॅड' अहवाल म्हणून ओळखला जातो. त्या अहवालानुसार पर्जन्य जलवाहिन्यांच्या प्रणालीची सुधारणा ताशी ५० मि.मी. इतक्या तीव्रतेच्या पावसाला अनुसरुन व पावसाचे पाणी वाहून नेण्याच्या सहगुणकामध्ये १.०० पर्यंत वाढ करावी असे सुचविले आहे.

भारत सरकारने त्यांना सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सन २००७ मध्ये ब्रिमस्टोवॅड प्रकल्प राबविण्याकरीता रु. १,२०० कोटी विशेष अनुदान देण्याचे मान्य केले. यापैकी आजमितीस रु. १००० कोटीची रक्कम प्राप्त झाली आहे.

सन २००५ मध्ये दि. २६ व २७ जुलै रोजी मुंबई शहराला अतिवृष्टीचा तडाखा बसून एका दिवसात ९४४ मि. मी. एवढ्या विक्रमी पावसाची नोंद होऊन मुंबई शहर व उपनगरामध्ये पूरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली. महाराष्ट्र शासनाने या घटनेची कारण मिमांसा करण्यासाठी तसेच, असे प्रसंग भविष्यात उद्‌भवू नयेत म्हणून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी 'सत्यशोधन समितीची' स्थापना केली, 'ब्रिमस्टोवॅड' अहवालानुसार तसेच, सत्यशोधन समितीच्या शिफारशीनुसार ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील कामे हाती घेण्यात आली आहेत.सत्यशोधन समितीच्या शिफारशी नुसार ब्रिमस्टोवॅड अहवालाचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे. एम. डब्ल्यू. एच. (इं) प्रा. लि. ह्या सल्लागाराची नियुक्ती केली आहे. सदर सल्लागाराने बृहत आराखडा तयार करुन दि.३०.०४.२०१८ रोजी महानगरपालिकेला सदर केला आहे.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये प्रस्तावित असून टप्पा १ मध्ये २० व टप्पा २ मध्ये ३८ कामे आहेत. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या कामांची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे:-

१. शहरामध्ये भूमिगत नाले, गटारे, पेटिका नाले यांचे आवर्धन व पुनर्वसन.

२. नवीन पर्जन्य जलवाहिनीचे आर. सी. सी. मध्ये बांधकाम.

३. आरसीसी एम-४० मध्ये अस्तित्त्वात असलेल्या नाल्याचे पुनर्बांधकाम.

४. नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करणे.

५. नाल्यालगत सेवा रस्त्याचे बांधकाम

६. पर्जन्य जल उदंचन केंद्रांचे बांधकाम.

**ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाची सद्यस्थिती :**

| तपशिल | टप्पा १ | | | | टप्पा २ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहर | पश्चिम उपनगरे | पूर्व उपनगरे | एकूण | शहर | पश्चिम उपनगरे | पूर्व उपनगरे | एकूण |
| कामांची संख्या | ०५ | ०७ | ०८ | **२०** | १६ | १० | १२ | **३८** |
| पूर्ण झालेली कामे | ०५ | ०७ | ०७ | **१९** | १४ | ०५ | ०७ | **२६** |
| प्रगतीपथावर असलेली कामे | ०० | ०० | ०१ | **०१** | ०१ | ०३ | ०४ | **०८** |
| प्रस्तावित कामांच्या निविदा | ०० | ०० | ०० | **००** | ०१ | ०२ | ०१ | **०४** |

**ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणा-या पर्जन्य जल उदंचन केंद्राच्या सद्यस्थितीची माहिती :**

| अनु.क्र | उदंचन केंद्र | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | हाजी अली | मे २०११ पासून कार्यान्वित झाले. |
| २ | इर्ला | मे २०११ पासून कार्यान्वित झाले. |
| ३ | क्लीव्हलँड | मे २०१५ पासून कार्यान्वित झाले. |
| ४ | लव्हग्रोव्ह | मे २०१५ पासून कार्यान्वित झाले. |
| ५ | ब्रिटानिया | जून २०१६ पासून कार्यान्वित झाले. |
| ६ | गझधरबंध | जून २०१९ पासून कार्यान्वित झाले. |
| ७ | मोगरा | ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. |
| ८ | माहूल | निविदा प्रक्रिया चालू आहे. |

आजमितीस ब्रिमस्टोवॅड प्रकल्पावरील एप्रिल २०२४ पर्यंतचा अंदाजित खर्च रु. २५४१.३७ कोटी इतका झाला आहे. तथापि, संकल्पचित्राच्या मानकांमध्ये झालेल्या बदलामुळे जलवाहिनीच्या रुंदी व खोली मध्ये झालेली वाढ प्रामुख्याने भरती-ओहोटीच्या क्षेत्रातील जलवाहिन्यांचे काम करण्यासाठी अपारंपारिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आणि कालौघातील विशेषकरून अतिक्रमण बाबींमुळे प्रकल्पाच्या एकूण आर्थिक गरजेमध्ये झालेली भरीव वाढ, यामुळे रु. २,७०० कोटीच्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे.

**पर्यावरणीय दृष्टीकोन :**

मुंबईमधील मोठ्या नाल्यांची साफसफाई दरवर्षी पावसाळ्यापूर्वी निविदा काढून नोंदणीकृत कंत्राटदारामार्फत करण्यात येते. नालेसफाईच्या कामाच्या व्याप्तीची विभागणी पावसाळयापूर्वी एकूण नालेसफाईच्या अंदाजीत मापनाच्या ७५ टक्के, पावसाळ्यात १५ टक्के व पावसाळ्यानंतर उर्वरीत काळात १० टक्के अशी केली जाते. तसेच, जलप्रवेशिकांची देखील साफसफाई केली जाते.

भूमीगत पर्जन्य जलवाहिन्या तसेच खोल चेंबर्स मध्ये जेथे मनुष्य प्रवेश करुन सफाई करता येणे शक्य नसते, अशा ठिकाणी नालेसफाई फायरेक्स, सक्शन, रीसायकलींग मशीन, जेटींग, सक्शन कम जेटींग मशीन अशी विविध यंत्रे वापरुन करण्यात येते. रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या रॉडींग व ड्रेजरर्स वापरुन साफ केल्या जातात. उपनगरातील मोठया नाल्यांची सफाई जे.सी.बी., पोकलेन इत्यादी यंत्रांद्वारे करण्यात येते.

भरती वेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे सखल भागात जमा होणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याकरिता उदंचन संचाची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यास मदत होते.

दहिसर, पोयसर आणि ओशिवरा नद्यांचे पुनरुज्जीवीकरण करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले असून दहिसर, पोईसर व ओशिवरा नद्यांचे पुनरुज्जीवीकरणाचे काम प्रगतिपथावर आहे.

नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामांमध्ये नद्यांचे रुंदीकरण करणे, नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारणे, नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातून नदीत होणारे प्रदूषण रोखणे, मलनिःसारण वाहिन्यांचे जाळे, मलजल प्रक्रियेसाठी पोहोच रस्ते बांधणे, नदी काठचे सौंदर्यीकरण करणे आणि मलजल प्रक्रिया उभारणे इत्यादी कामे अंतर्भूत आहेत.

**मिठी नदीचा विकास :**

मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी-३३०५/प्र. क्र.-१०९/नवि-७ दि. १९.०८.२००५ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली. सदर शासन निर्णयान्वये, एकूण १७ कि.मी. लांबीच्या नदीपैकी ११ कि.मी. लांबीची (फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला दरम्यान) विकास कामे मुंबई महानगरपालिकेमार्फत व उर्वरीत ०६ कि.मी. लांबीची (सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यान) विकास कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत, 'मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण' यांच्या मार्गदर्शनांतर्गत करण्यात आलेली आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या मिठी नदीचे कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल दरम्यानचा भाग वगळता उर्वरित नदीचे रुंदीकरण व खोलीकरण जवळपास पूर्ण झालेले आहे.

आजमितीस, १७ कि.मी. लांबीच्या मिठी नदीचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम ९२ टक्के आणि संरक्षक भिंत बांधण्याचे काम ९३.५ टक्के पूर्ण झाल्यामुळे मिठी नदीची धारण क्षमता दुपटीने आणि वहन क्षमता तीनपटीने वाढलेली आहे. मिठी नदीतील प्रदूषण नियंत्रणाकरीता मिठी नदी विकास अणि प्रदूषण नियंत्रणाचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. सदर आराखडयाची अंमलबजावणी चार पॅकेजेस मध्ये फिल्टरपाडा, पवई ते माहीम कॉजवे या ठिकाणी करण्यात येत आहे.

**२) प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) :**

प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) या खात्याची उप प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) नियोजन व संकल्प चित्रे आणि उप प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) बांधकामे अशा दोन विभागात विभागणी करण्यात आलेली आहे.

बृहन्मुंबईतील मलनिःसारण प्रणाली कुलाबा, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, भांडुप आणि घाटकोपर अशा सात प्रभागात विभागण्यात आली आहे. या प्रत्येक प्रभागात उदंचन केंद्राकडे आणि मलनिःसारण प्रक्रिया केंद्राकडे जाणाऱ्या मलनिःसारण वाहिन्या टाकण्याची कामे पारंपारिक खुला चर पध्दतीने (Open cut) तसेच, चरविरहीत तंत्राच्या (Trenchless) पध्दतीने केली जातात. मलनिःसारण वाहिन्या नसलेल्या ठिकाणी नविन मलनिःसारण वाहिन्या टाकणे व आवश्यकतेनुसार अस्तित्त्वात असलेल्या वाहिन्यांचे अवर्धन (Upsize) करणे ह्या कामांचे नियोजन व त्यांची संकल्प चित्रे तयार करणे, तसेच या कामांच्या निविदा मागविणे ही कामे उप प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) नियोजन व संकल्प चित्रे ह्यांच्या अधिपत्याखाली केली जातात. सदर मलनिःसारण वाहिन्या टाकण्याची कामे उप प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) बांधकामे यांच्या अधिपत्याखाली केली जातात.

मलनिःसारण प्रकल्प विभागातर्फे २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये प्रमुख अभियंता, मलनिःसारण प्रकल्प खात्याकरीता रु. ६००.०० कोटींची सुधारित तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु.३३६ कोटी रक्कम वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार पर्जन्य जलवाहिन्या खात्यास वर्ग करण्यात आली आहे.

अशाप्रकारे मलनिःसारण प्रकल्प खात्याकडे शिल्लक तरतूद रक्कम रु. २६४ कोटीपैंकी रु. २०४.३७ कोटी रक्कम चालु कामासाठी व पूर्ण झालेल्या कामांसाठी खर्च करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मलनिःसारण प्रकल्प खात्याकरीता रु. ७६५.०० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार त्यापैकी रु.३४२.७२ कोटी रक्कम प्रमुख अभियंता पर्जन्य जलवाहिन्या खात्यास वर्ग करण्यात येणार आहे.

### ३) प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) :

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मलनि:सारण प्रचालन खाते हे मुंबई शहराच्या सात परिमंडळातील मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे, मलनि:सारण उदंचन केंद्र, मलजल प्रक्रिया केंद्र आणि सांडपाणी प्रक्रिया सुविधा यांचे प्रचालन व परिरक्षण करते. मलजलाचे भूमिगत मलनि:सारण वाहिन्यांच्या जाळ्यातून वहन करुन अग्रीम (Satellite) उदंचन केंद्राद्वारे गोळा केले जात व त्यावर आठ विविध मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया केली जाऊन ते नजीकच्या समुद्र / खाडीमध्ये सोडले जाते.

अस्तित्त्वात असलेल्या मलनि:सारण वाहिन्यांची दुरुस्ती आणि पुनर्वसन करणे ही देखील या खात्याची जबाबदारी आहे. या खात्यामार्फत मलनि:सारण उदंचन केंद्राच्या आवारात मलजलाच्या पिण्याव्यतिरिक्त पुनर्वापराकरीता कमी क्षमतेचे मलजल प्रक्रिया संच बसविण्यात आले आहेत. हे खाते पाणीपुरवठा मलनि:सारण अंतर्गत खात्यांना परिवहन सेवा देखील उपलब्ध करुन देते.

### (१) मलनि:सारणाच्या पायाभूत सुविधा :

अ) मलनि:सारण प्रचालन खात्याच्या मलजल उपयोगिता व्यवस्थापन केंद्र येथे मुंबई शहरातील मलनि:सारण वाहिन्यांच्या जाळ्यावरील एकूण २,०५७ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या, ४,३३५ व्हेंट शाफ्ट व सुमारे ७६,५९१ मनुष्य प्रवेशिकांची जी. आय. एस. माहिती प्रणालीमध्ये सांख्यिकी नोंद करण्यात आलेली आहे.

ब) मुंबई शहरात एकूण ३,७९० एम.एल.डी. क्षमतेची दशलक्ष लिटर्स प्रतिदिन क्षमतेची ४० अग्रीम (Satellite) उदंचन केंद्रे व ६,८४२ एम.एल.डी. क्षमतेची ०८ अंतिम (Terminal) उदंचन केंद्रे असून सरासरी १,४४५ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन मलजलावर प्रक्रिया करून पुढे त्याची विल्हेवाट लावली जाते.

क) कुलाबा, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, चारकोप, भांडुप व घाटकोपर अशी एकूण ०८ (आठ) मलजल प्रक्रिया केंद्रे आहेत. कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्र, वरळी आणि वांद्रे सांडपाणी प्रक्रिया केंद्र येथून प्रक्रिया केलेले मलजल अरबी समुद्रात सागरी पातमुखांद्वारे सोडले जाते. वर्सोवा वातित तलावांतून व चारकोप मलजल प्रक्रिया केंद्रातून प्रक्रिया केलेले मलजल मालाड खाडीत तसेच, घाटकोपर व भांडुप येथील वातित तलावांतून प्रक्रिया केलेले मलजल ठाणे खाडीत सोडले जाते. मालाड येथील मलजल योग्य त्या प्राथमिक प्रक्रियेनंतर मालाड खाडीत सोडले जाते. मुंबई मलनि:सारण प्रकल्प खात्याने सध्या अस्तित्वात असलेले मलजल प्रक्रिया केंद्राची क्षमता वृध्दींगत करण्याची कामे हाती घेतली आहेत व ती सन २०२६-२७ या वर्षामध्ये पूर्ण होणार आहेत. सदर कामे पूर्ण होईपर्यंत व मान. राष्ट्रीय हरित लवादाने पारीत केलेल्या निकषांचे पालन होण्याकरिता घाटकोपर, भांडूप, वर्सोवा आणि मालाड या प्रक्रिया केंद्राद्वारे सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर बायोरेमेडीएशन तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येते व प्रक्रिया केलेले मलजल ठाणे व मालाड खाडीत सोडले जाते. बायोरेमेडीएशन तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात आलेल्या मलजलाचे राष्ट्रीय हरित लवादाने पारित केलेल्या निकषांची पूर्तता करीत आहे. या सोबतच मुंबई मलनि:सारण प्रकल्प विभागाने सुरु केलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या पुनर्रचनेची कामे कार्यान्वित होईपर्यंत वरळी व वांद्रे येथील मलजल प्रक्रिया केंद्रात तात्पुरती बायोरेमेडीएशन तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्याची कामे करणे करिता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

### (२) मलनि:सारण वाहिन्यांची पध्दतशीर सफाई करणे :

बृहन्मुंबई शहराच्या विविध मलजल वाहिन्याच्या जाळ्यांतील मलजलाचे वहन सुलभपणे होण्यासाठी आणि रस्त्यांवरील मलनि:सारण वाहिन्या अधिभारीत होणाच्या तक्रारी कमी होण्याच्या हेतूने मलनि:सारण प्रचालन खात्यामार्फत मलनि:सारण वाहिन्यांच्या पध्दतशीर आणि नियतकालीक सफाईचे काम नियमितपणे वार्षिक कार्यक्रमांतर्गत यांत्रिकी पध्दतीने केले जाते.

मलनि:सारण वाहिन्यांचे कार्य सुरळीत राखण्यासाठी पुर्वनियोजित पध्दतशीर सफाई कार्यक्रमांतर्गत नियमितपणे पाहणी, गाळ काढणे व सफाई इत्यादी कामे करण्यात येतात. संपूर्ण मलनि:सारण वाहिन्यांच्या स्वच्छतेच्या कामाचे पूर्णतः यांत्रिकीकरण झाले असून त्यासाठी रोडिंग मशीन्स, पॉवर बकेट सीवर सफाई मशीन्स, सक्शन मशीन्स, जेटींग मशीन्स, रिसायक्लर मशीन्स, ग्रॅब बकेट मशीन्स इत्यादी विविध प्रकारची सफाई यंत्रे वापरण्यात येतात. सध्या ह्या खात्याकडे १३ वाहनांवर बसवलेली मलवाहिनी सफाईसाठी संयंत्रे आहेत. तसेच १० शीघ्र प्रतिसाद वाहने आहेत.

मलजल प्रवेशिकांमधून काढण्यात येणारा गाळ सुकविणारी प्रणाली शहर विभागात दादर येथे तसेच, उपनगरात वर्सोवा व घाटकोपर येथे कार्यान्वित करण्यात आली आहे.

### (३) तक्रार निवारण प्रणाली :

या खात्यांतर्गत मुंबई शहर विभाग तसेच पूर्व आणि पश्चिम उपनगरांत प्रत्येकी एक याप्रमाणे ०३ मध्यवर्ती नियंत्रण कक्ष असून ते पॉवर रॉडींग मशीन्स व शीघ्र प्रतिसाद वाहनांसह सुसज्ज आहेत हे नियंत्रण कक्ष मलनिःसारण प्रणालीच्या तक्रारींची दखल घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी अहोरात्र २४ X ७ कार्यरत असतात. बहुतांश तक्रारींचे त्या प्राप्त झाल्यापासून २४ तासांच्या आत निवारण केले जाते.

### (४) कारखान्यांना मलजलाची पुनर्वापराकरिता विक्री :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई मलनिःसारण प्रणालीमधून मलजलाची विक्री मेसर्स. आर. सी. एफ. सारख्या कंपन्यांना त्यांच्या अंतर्गत वापराकरीता आवश्यक शुल्क भरुन करण्याकरीता परवानगी दिली आहे. त्यामुळे महानगरपालिकेला चांगला महसूल मिळतो आणि मौल्यवान अशा पिण्याच्या पाण्याची देखील बचत होते. मेसर्स राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टीलायझर्स् यांना शुध्द पाणी निर्मितीच्या २५ टक्के दराने देण्यास महानगरपालिकेने मान्यता दिली असून सुमारे ४५.४ दशलक्ष लिटर मलजलाचा पुरवठा केला जात आहे. मलजलाचा सध्याचा दर रु. ७.३८ प्रति किलो लिटर एवढा आहे.

### (५) मलजल पुनर्चक्रीकरण :

आधी नमूद केलेल्या मलजलाचे पुनर्चक्रीकरण आणि पुनर्वापर पिण्याव्यतिरिक्त कारणासाठी करण्याकरीता मलनिःसारण उदंचन केंद्राच्या आवारात कमी क्षमतेची मलजल प्रक्रिय केंद्रे खाली नमुद केल्याप्रमाणे विविध ठिकाणी उभारण्यात आणि कार्यान्वित करण्यात आली आहेत :-

१. महानगरपालिकेचे ०३ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे भूजैविक तंत्रज्ञानावर आधारित मलजल प्रक्रिया संयंत्र मलजलावर प्रक्रिया करण्यासाठी लव्ह ग्रोव्ह उदंचन केंद्र, वरळी येथे कार्यान्वित आहे. प्रक्रिया केलेले मलजल उदंचन केंद्राच्या परिसरातील उद्यानांसाठी वापरले जात आहे. तसेच, उर्वरीत पुनर्चक्रीत पाणी वेलींग्डन गोल्फ स्पोर्टस क्लबला व अमेचर रायडर्स क्लबला रु २०/- प्रती किलो लिटर ह्या दराने पुरविण्यात येते.

२. मलजलाच्या पुनर्वापरासाठी बाणगंगा उदंचन केंद्र येथे १.५ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित केले आहे. ह्या प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया केलेल्या मलजलाचा पुरवठा राजभवन येथील उद्यानांसाठी रु. ३.२७/- प्रति किलो लिटर दराने मागणीनुसार करण्यात येत आहे.

३. दादर उदंचन केंद्र ०.३ एम. एल. डी.क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले असून पुनर्चक्रीत पाण्याचा वापर उदंचन केंद्राच्या आवारातील प्रमोद महाजन कला पार्क उद्यानासाठी करण्यात येत आहे.

४. वांद्रे आय. पी. एस. येथे ० ५ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित असून त्यातील पुनर्चक्रीत पाण्याचा वापर उदंचन केंद्राच्या आवारातील उद्यानासाठी करण्यात येत आहे.

५. महानगरपालिकेने आर. एम. बी. आर. तंत्रज्ञानानुसार नवीन तृतीय स्तर ०६ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र चारकोप येथे उभारले आहे. त्यातील पुनर्चक्रीत पाण्याचा वापर नजीकच्या परिसरातील विविध उद्यानांसाठी व गोराई डंपिंग वरील उद्यानाकरिता करण्यात येतो.

६. महानगरपालिकेने नुकतेच एस. बी. आर. तंत्रज्ञानानुसार नवीन तृतीय स्तर प्रक्रियेचा ३७ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कुलाबा येथे उभारले आहे व ते एप्रिल २०२० पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यातील पुनर्चक्रीत पाण्याचा वापर ०३ एम.एल.डी. भारतीय नौदलास रु. १/- प्रती १,००० लिटर ह्या दराने देण्याचे प्रस्तावित आहे.

७. संत गाडगे महाराज उदंचन केंद्राच्या आवारात १५ के.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर प्रक्रिया केंद्राचे पुनर्चक्रीत पाणी संत गाडगे महाराज उद्यानासाठी वापर करण्यात येत आहे.

८. भांडुप उदंचन केंद्राच्या आवारात १० के.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर प्रक्रिया केंद्राचे पुनर्चक्रीत पाणी भांडुप उदंचन केंद्राच्या उद्यानासाठी वापर करण्यात येत आहे.

९. घाटकोपर उदंचन केंद्राच्या आवारात १५ के.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर प्रक्रिया केंद्राचे पुनर्चक्रीत पाणी भांडुप उदंचन केंद्राच्या उद्यानासाठी वापर करण्यात येत आहे.

१०. माहूल येथे १०.३ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र आहे. ह्या प्रक्रिया केंद्रातून पुनर्चक्रीत ०६ एम.एल.डी. पाणी एच.पी.सी.एल कंपनीला रु. ८.७२ प्रती किलो लिटर दराने देण्यात येते.

११. व्हिडिओकोन अतिथी येथे ०२ एम.एल.डी. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र आहे. ह्या प्रक्रिया केंद्रातून पुनर्चक्रीत ०.५ एम.एल.डी. पाणी एच.पी.सी.एल. ला दिले जाते.

**(६) मलवाहिन्यांचे पुनर्वसन :**

जीर्ण झालेल्या मलजल वाहिन्यांचे आणि उर्ध्वगामी मलजल वाहिन्यांचे आयुर्मान वाढविणे आणि मलनिःसारण जाळ्यांची कार्यक्षमता वाढविणे याकरीता त्यांचे चर रहीत तंत्रज्ञानाने पुनर्वसन करण्यात येत आहे. सद्यस्थितीत जवळपास १४ कि.मी. लांबीच्या मलजल वाहिन्यांचे पुनर्वसन पूर्ण झाले असून तसेच, सुमारे १७ कि.मी. लांबीच्या मलजल वाहिन्यांच्या पुनर्वसनाची कामे करण्याकरिता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.सदर कामे मे २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**(७) विकास कामे :**

१. विविध उदंचन केंद्रामध्ये वायू दुर्गंधी प्रदुषण नियंत्रण यंत्रणा उभारणीच्या कामाकरिता निविदा मागविलेली आहे.

२. कुत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने विविध उदंचन केंद्राची कार्यक्षमता वाढविण्याच्या कामाकरिता निविदा मागविलेली आहे.

३. मलवाहिन्यांचे परिरक्षण करण्याकरिता वाहन विरजित यंत्रणा P.P.P. Model अवलंबविण्याबाबत निविदा मागविली आहे.

४. कोरड्या हवामानात मलजल नाल्यामध्ये जाऊ नये ह्या करिता नवीन मलजल प्रक्रिया केंद्र व व्हॅक्यूम सीव्हरची प्रणाली बसविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे

**४) प्रमुख अभियंता (मुंबई मलनिःसारण विल्हेवाट प्रकल्प) :**

मुंबई शहराची मलनिःसारण प्रणाली (व्यवस्था) सुमारे १३० वर्षापासून अस्तित्वात आहे. सध्याच्या प्रणालीमध्ये मलजल गोळा करणे, त्याचे वहन, प्रक्रिया आणि विल्हेवाट अंतर्भूत आहेत. त्यासाठी २,०२६ कि.मी. च्या मल:निसारण वाहिन्या, ७४,६८२ मनुष्य प्रवेशिका, ४० सेटेलाईट उदंचन केंद्रे, ०७ टर्मिनल उदंचन केंद्रे आणि ०७ मलजल प्रक्रिया केंद्रे अस्तित्त्वात आहेत. शहरातील मलनिःसारण प्रणाली कुलाबा, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, भांडुप व घाटकोपर या सात परिमंडळांमध्ये विभागलेली आहे. कुलाबा येथे मलजलावर द्वितीय स्तरीय प्रक्रिया केली जाते आणि प्रक्रिया केलेले पाणी पातमुखाद्वारे खोल समुद्रात सोडले जाते. तसेच, तेथे तृतीय स्तरावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था देखील आहे. कुलाबा, वरळी आणि वांद्रे या मलजल परिमंडळामध्ये पूर्व प्राथमिक मलजल प्रक्रिया सुविधेची तरतूद असून मलजलाचा बहिर्गामी विसर्ग सागरी पातमुखाद्वारे खोल समुद्रात करण्यात येतो. वर्सोवा, भांडुप व घाटकोपर मलजल परिमंडळामध्ये पूर्व प्राथमिक प्रक्रिया आणि वातीत तलाव सुविधेची तरतूद असून मलजलाचा विसर्ग खाडीमध्ये करण्यात येतो. तसेच,मालाड येथील मलजलाचा बहिर्गामी विसर्ग पूर्व प्राथमिक प्रक्रियेनंतर मालाड खाडीमध्ये करण्यात येतो.

कुलाबा येथे ३७ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे अद्ययावत मलजल प्रक्रिया केंद्र एप्रिल- २०२० मध्ये कार्यान्वित झाले आहे. सध्या कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये १० द. ल. लि. प्रतिदिन मलजलावर प्रक्रिया करुन ते पिण्याव्यतिरिक्त पुनर्वापराकरिता उपलब्ध करण्यात आले आहे.

वरळी ५०० द.ल.लि. प्रति दिन , वांद्रे ३६० द.ल.लि. प्रति दिन , धारावी ४१८ द.ल.लि.प्रति दिन , वर्सोवा १८० द.ल.लि.प्रति दिन, भांडुप २१५ द.ल.लि.प्रति दिन , घाटकोपर ३३७ द.ल.लि.प्रति दिन आणि मालाड ४५४ द.ल.लि. प्रति

दिन या सर्व प्रस्तावित मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये प्राथमिक प्रक्रिया, द्वितीय स्तरीय जैविक प्रक्रिया आणि निर्जंतुकीकरण या सुविधा उपलब्ध असतील. प्रस्तावित मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये एकूण क्षमतेच्या ५०% मलजलावर तृतीय स्तरावरील प्रक्रीया करुन त्याचा पुनर्वापर करण्यासाठी तरतुद केली आहे. सदर कामे सुरु झाली असून प्रगतीपथावर आहेत. जानेवारी - २०२३ मध्ये मिठी नदी- पॅकेज १ अंतर्गत पवई येथे ०८ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र बांधून कार्यान्वित करण्यात आले आहे आणि त्याचे प्रचालन व परिरक्षण सुरु आहे.

या कामाव्यतिरिक्त खालील कामे प्रगतीपथावर आहेत :-

१. **वर्सोवा मलजल बोगदा** - जुने वर्सोवा पंपींग स्टेशन ते प्रगतीपथावर असलेले नवीन वर्सोवा अंतर्गामी उदंचन केंद्रापर्यंत २००० मि.मी. व्यासाच्या वर्सोवा मलजल बोगद्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर बोगद्याची लांबी ३.१ कि.मी. आहे. कामाची भौतिक प्रगती ९८ टक्के आहे.

२. **मिठी नदी मलजल बोगदा**- बापट नाला व सफेद पूल नाला येथून मिठी नदीमध्ये प्रवाहित होणारा बिगर पावसाळी प्रवाह वगळून प्रस्तावित धारावी मलजल प्रक्रिया केंद्रामध्ये वाहून नेण्यासाठी २६००मि.मी. व्यासाच्या व ६.७ किलोमीटर लांबीच्या मलजल बोगद्याच्या बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती ७० टक्के आहे.

३. **प्राध्यान्य मलजल बोगदा-१** - 'आर /मध्य' विभागातील डॉन बॉस्को शाळेपासून 'पी /उत्तर ' विभागातील प्रस्तावित मालाड अंतर्गामी उदंचन केंद्रापर्यंत ३२००मि.मी. व्यासाच्या व ५.९ किलोमीटर लांबीच्या मलजल बोगद्याचे सेंगमेंट पध्दतीने बांधकाम करणे हे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती ४२ टक्के आहे.

४. **प्राध्यान्य मलजल बोगदा-२** -गोरेगांव उदंचन केंद्रापासून प्रस्तावित मालाड अंतर्गामी उदंचन केंद्रापर्यंत २६०० मि.मी. व्यासाच्या व ४.८ किलोमीटर लांबीच्या मलजल बोगद्याचे सेंगमेंट पध्दतीने बांधकाम करणे हे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती १७ टक्के आहे.

५. **मालाड उदंचन केंद्र** - मालाड येथे १५८० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे अंतर्गामी उदंचन केंद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती ६० टक्के आहे.

६. **वर्सोवा उदंचन केंद्र** - वर्सोवा येथे ५४० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे अंतर्गामी उदंचन केंद्र बांधण्याचे काम देखील प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती ७३ टक्के आहे.

७. **भांडुप उदंचन केंद्र** - भांडुप उदंचन केंद्राच्या दर्जोन्नतीचे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती ६७ टक्के आहे.

८. **घाटकोपर उदंचन केंद्र** - घाटकोपर उदंचन केंद्राच्या दर्जोन्नतीचे काम प्रगतीपथावर आहे. कामाची भौतिक प्रगती १५ टक्के आहे.

सदर प्राधान्य मलजल बोगद्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर गोराई, चारकोप, शिंपोली, मालाड व गोरेगांव उदंचन केंद्रे बंद होतील, जेणेकरुन तेथील केंद्रावर होणाऱ्या प्रचलन व परिरक्षणाच्या खर्चाची कायमस्वरुपी बचत होईल. सदर मलजल बोगद्यास वरील उंदचन केंद्राचा मलप्रवाह जोडण्यात येईल, जेणेकरुन मलजल वाहून नेण्याची क्षमता वाढेल व बोरीवली ते गोरेगांव परिसरातील मलजल वाहिन्यांवरील ताण कमी होऊन त्यांची क्षमता वाढेल.

### ५) प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) :

### (१) रस्त्यांच्या सुधारणा :

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत साधारण २,०५० कि. मी. लांबीच्या रस्त्यांची देखभाल व परिरक्षण केले जाते. बृहन्मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी २,०५० कि. मी. असून त्यामध्ये शहर विभागातील ५४०.५८ कि.मी., पश्चिम उपनगरातील ९९९.४७ कि.मी. व पूर्व उपनगरातील ५०९.९५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली २०३४' च्या आराखडयानुसार जे रस्ते विकास रस्ते म्हणून दर्शविलेले आहेत, त्या रस्त्यांच्या जागेचे विकास नियोजन विभागाने हस्तांतरण करुन

घेतल्यानंतर, बांधकाम तातडीने केले जाते. तसेच अस्तित्वातील रस्त्यांवर वाढणारी वाहतूक लक्षात घेऊन विभाग कार्यालयांच्या शिफारीशीनुसार सदर रस्त्यांची रेषा वाढवून रस्ता रुंदीकरणाचे काम आवश्यकतेनुसार हाती घेण्यात येत आहे. पूर्वी रस्तेबांधणीसाठी पेव्हर ब्लॉक, अस्फाल्ट, मास्टिक अस्फाल्ट या सारख्या विविध सामग्रीचा वापर केला जात असे. परंतु मुंबईत कमी वेळेत जास्त प्रमाणात पडणारा पाऊस विविध प्रकारच्या वाहनांची वर्दळ, वाहतूक घनता, विविध उपयोगिता सेवांनी सेवा पुरविण्यासाठी खोदलेले चर अशा विविध कारणास्तव रस्त्यांची अवस्था बिकट होते. त्यामुळे आता सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे धोरण आखले आहे. सध्या मुंबईत साधारण १,२२४ कि.मी. रस्त्यांचे / बाजू पट्टयांचे सिमेंट काँक्रिटीकरण झालेले आहे. याव्यतिरिक्त आता एकूण ३२५ रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी एकूण ०४ निविदांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे . सदर कंत्राटात उपयोगिता सेवांच्या केबल टाकण्यासाठी उपयोगिता डक्ट (Utility Duct) टाकण्याचे काम अंतर्भूत आहे, जेणेकरून वारंवार चरी खोदण्याचे प्रमाण कमी करता येईल. पावसाच्या पाण्याचे संचयन योग्यरीतीने होण्यासाठी चेंबर्स बांधण्याचे प्रस्ताविलेले आहे. सिमेंट काँक्रिटीकरणामुळे वाहतूक सुरळीत व खड्डे मुक्त होईल, त्यामुळे वेळेत व वाहनाच्या इंधनात बचत होईल व प्रवाश्यांना वाहतुकीचा त्रास कमी झाल्यामुळे त्यांच्या आरोग्यात सुधारणा होईल.

या वर्षी पावसाळ्यात ०६ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कोल्ड मिक्सचा वापर केला जाईल. तसेच ०६ मीटर पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावरील खड्डे मास्टीक तंत्रज्ञानाने बुजविण्यात येतील.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग देखभाल व परिरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. महामार्गाच्या सदर पृष्ठभागांची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

### (२) सिमेंट काँक्रीट रस्ते :

शहर विभागामध्ये सन २०२३-२४ या कालावधीत सुमारे १७ कि.मी. रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले. शहर विभागाच्या 'ए' विभागातील नानाभाई मुस मार्ग आणि 'जी/दक्षिण' विभागातील सर पोचखानवाला मार्ग तसेच, शहर विभागातील इतर महत्त्वाच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आलेले आहे.

पश्चिम उपनगरामध्ये सन २०२३-२४ या कालावधीत सुमारे ७७ कि.मी.रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले. 'के/पूर्व ' विभागातील जोगेश्वरी विक्रोळी जोडरस्ता व इतर महत्त्वाच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले. तसेच, आरे वसाहत गोरेगांव (पूर्व) येथील रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे कार्य प्रगतीपथावर आहे.

पूर्व उपनगरामध्ये २०२३-२४ या कालावधीत सुमारे २८ रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले. 'एल ' विभागात (१) हॉल रोड पासून ए. एच. वाडिया मार्ग ते सहारा मेडीकल पर्यंत ५९० मी. (२) नारी सेवा सदन रोड ७४० मी. रस्ता व इतर रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहे.

तसेच, पी. सोमण मार्ग, विक्रोळी (पश्चिम) आणि विक्रोळी स्टेशन (पूर्व) येथील ५०० मीटर लांबीचा रस्ता व इतर रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

विक्रोळी स्टेशन (पूर्व) येथील स्लीप रस्ता व इतर रस्त्यांची कामे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्ण होतील.

## वाहतूक

### (१) वाहतूक अभियांत्रिकी :

वाहतूक नियोजन व वाहतूक समन्वय विभागाचे कामकाज, प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) यांच्या अधिपत्याखालील, उप प्रमुख अभियंता (वाहतूक) यांच्या नियंत्रणाखाली चालते. हा विभागाकडून खाजगी व शासकीय भुखंडावरील प्रस्तावित विकासासाठी आवश्यक असलेल्या वाहनतळ अभिन्यासाची मंजुरी ऑनलाईन प्रणालीव्दारे केली जाते. तसेच, वाहतूक बेटांची आखणी, रस्त्यांवर वाहतूक नियंत्रक उभारणे व त्यांचे परिरक्षण करणे, रस्ते नामफलक व दिशादर्शक फलक बसविणे, रस्त्यांवरील वाहतूक विषयक सुविधा पुरविणे, महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रस्ता

रुंदीकरणासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अंतर्गत नियमित रेषा व नवीन सार्वजनिक रस्ते विहित करुन आखणी करणे, सार्वजनिक वाहनतळ बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित झाल्यानंतर वाहनतळ कार्यान्वित करण्यासाठी निविदा मागविणे व रस्त्यांवरील सशुल्क वाहनतळांच्या तसेच, सुविधा वाहनतळांच्या निविदा मागविणे इत्यादी कामे पार पाडली जातात. वाहतूक नियंत्रकांच्या (सिग्नल) उभारणीसोबत वाहतूक नियंत्रकांचे परिरक्षणाचे काम पाहिले जाते.तसेच, या विभागामार्फत वाहतूक पोलीसांशी समन्वय साधून विविध प्रकारची वाहतूक सुरळीत होण्यासाठी उपयुक्त कामे करण्यात येतात.

या विभागामार्फत नवीन बांधलेल्या रस्त्यांवर पथदिव्यांची उभारणी करण्याकरीता, त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांमध्ये सुधारणा करण्याकरीता धोरणांची आखणी करणे तसेच, सर्व विभाग कार्यालयांशी समन्वय साधून पथदिव्यांबाबतची कामे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, अदानी इलेक्ट्रिसिटी व महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी या तीन विद्युत सेवा पुरवणाऱ्या कंपन्याद्वारे करण्यात येतात. या कामांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद वाहतूक विभागातर्फे करण्यात येते.

### (२) वाहनतळ धोरण :

रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे रस्त्यावरील व रस्त्यालगत वाहनतळे कार्यान्वीत करण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पाडून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येते. रस्त्यावरील एकूण ६९ ठिकाणांच्या सशुल्क वाहनतळांपैकी ६३ ठिकाणांच्या वाहनतळांसाठी ठेकेदारांची नियुक्ती करुन, ती कार्यान्वीत करण्यात आली आहेत. तसेच, विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या ३३(२४) आणि विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या ३३(१८) अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेल्या एकूण ३३ सार्वजनिक वाहनतळांपैकी ३२ ठिकाणी ठेकेदारांची नियुक्ती करुन ती कार्यान्वीत करण्यात आली आहेत. तसेच, महानगरपालिकेला एकूण २९ सुविधा वाहनतळे हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

### (३) बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळ :

'सी' विभागातील मुंबादेवी येथील ५४६ क्षमतेचे वाहनतळ (Robotic Parking), 'एफ/उत्तर' येथील सेंट्रल माटुंगा रेल्वे स्थानकाजवळ ४७५ क्षमतेचे यांत्रिकी वाहनतळ (Robotic Parking) व 'ए' विभागातील फ्लोरा फाऊंटन (हुतात्मा चौक) जवळील अप्सरा पेन शॉपजवळील जागेत १९४ क्षमतेचे वाहनतळाबाबतच्या सर्व प्रशासकीय मंजु-या प्राप्त झाल्या असून कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच, 'जी / दक्षिण' विभागातील वरळी अभियांत्रिकी केंद्र येथील जागेकरीता ६४० चार चाकी व ११२ दुचाकी वाहनांच्या जागेकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून कंत्राटदारास स्विकृती पत्र देण्यात आलेले आहे. या अन्वये भविष्यात जवळपास १,८५० वाहनांकरीता वाहनतळ उपलब्ध होईल.

### (४) एल.ई.डी. दिवे :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२३-२४ मध्ये रस्त्यावरील विद्यमान दिवे बदलून एल.ई.डी. दिवे बसविण्याच्या कामास सुरुवात केली आहे. बृहन्मुंबईमध्ये अंदाजे १,४१,१४५ सोडियम व्हेपर दिवे आहेत. त्यापैकी १,३६,३७९पारंपारिक दिवे बदलून त्याजागी एल.ई.डी. दिवे बसविण्यात आले आहेत. सन २०२४-२५ मध्ये, मुंबई शहरातील उर्वरीत ४,७६६ एल.ई.डी. दिवे बसविण्याचे काम पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे, विजेच्या देयकांमध्ये मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे. जस-जसे दिव्यांचे एल.ई.डी. दिव्यांमध्ये रुपांतर केले जाईल तस-तसे यामुळे उर्जेच्या बचतीमध्ये अधिक वाढ होईल.

### (५) वाहतूक फलक :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरांमध्ये वाहतूक फलक व अनुषंगिक कामांकरिता प्रत्येकी जवळपास ६० कोटी इतक्या रकमेच्या द्विवार्षिक कंत्राटदाराची नियुक्ती केली असून आधुनिक चिन्हांसह दर्जोन्नत वाहतूक फलक बसविण्यात येणार असून सदर काम प्रगतीपथावर आहेत.

## (६) रस्ता सुरक्षा आणि अपघात प्रवण क्षेत्रे (ब्लॅक स्पॉट) करिता पुढाकार :

वाहतूक पोलिसांनी कळविल्याप्रमाणे २०२२ मध्ये बृहन्मुंबईमध्ये २० अपघातप्रवण क्षेत्राची (ब्लॅक स्पॉट) नोंद आहे. सदर अपघातप्रवण क्षेत्रांकरीता उपाययोजना करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका मे. ब्लूमबर्ग फिलॉन्थ्रॉपीस या सेवाभावी संस्थेची सल्लागार म्हणून मदत घेत आहे. सदर अपघातप्रवण क्षेत्राबाबत अभियांत्रिकी आणि वाहतूक परिचलन अभ्यास करून तसेच, समुचित अभियांत्रिकी आणि नियोजन दृष्टीकोनातून हस्तक्षेप करून अपघातांची कारणे समुळ नष्ट करणे आणि जिवित व मालमत्तेचे होणारे संभावित नुकसान टाळणे हा उद्देश आहे. तद्नुषंगाने सदर सेवाभावी संस्थेकडून व त्यांच्या भागीदारांकडून अहवाल प्राप्त झालेला असून त्याबाबत पुढील कार्यवाही संबंधित उप प्रमुख अभियंता (रस्ते) विभाग आणि संबंधित विभाग कार्यालय यांच्या मार्फत करण्यात येत आहे. तसेच, सदर प्रकरणी वाहतूक पोलिसांनी अधिकच्या अपघात प्रवणक्षेत्रांची माहिती दिल्यास त्याबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

## (७) क्षेत्र वाहतूक नियंत्रण व्यवस्था (A.T.C.) :

बृहन्मुंबईतील २५८ वाहतूक सिग्नलचे क्षेत्र वाहतूक नियंत्रण (ए.टी.सी.) प्रणालीमध्ये अत्याधुनिकीकरण करण्यात आले असून ते व्यवस्थितरित्या कार्यरत आहेत. तसेच, बृहन्मुंबईतील ४१२ पारंपारिक पध्दतीच्या वाहतूक सिग्नल यंत्रणेचे तसेच, २०८ लुकलुकणाऱ्या दिपस्तंभांचे योग्यरित्या परिरक्षण करण्यात येते.

## ६) प्रमुख अभियंता (पूल) :

- बोरीवली - दहिसर नदीवरील श्रीकृष्ण नगर येथील पूलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- अंधेरी - गोपाळ कृष्ण गोखले पूल टप्पा -१चे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- लोअर परेल - डिलाईल रोड पूलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- अंधेरी (पूर्व) - तेली गल्ली येथील उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

## ७) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) ह्यांचे खाते :

प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) हे खाते, अर्थसंकल्प 'ग' अंतर्गतची खाती वगळता, महानगरपालिकेच्या वैद्यकीय संस्था, महानगरपालिकेची रुग्णालये, मालमत्ता, महानगरपालिका शाळा, उद्याने, खेळांची मैदाने, स्मशानभूमी या विविध खात्यांसाठी असलेली यांत्रिकी व विद्युत यंत्रे, संयंत्रे, साधन सामुग्री इत्यादींचे नियोजन, उभारणी, पर्यवेक्षण, देखभाल, परिरक्षण आणि दुरुस्ती करते. हयामध्ये उद्वाहने, गॅस शवदाहिनी, लाकडी चितेकरीता हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, वातानुकूल संयंत्राची उभारणी, व्यायामशाळेची उपकरणे, खेळाची साधने, आगप्रतिबंधक यंत्रणा, इपीएबीएक्स संयंत्रे, जलतरण तलावांतील पाणी गाळण्याची व शुद्धीकरणाची यंत्रे पुरविणे, इत्यादी कामांचा समावेश होतो. निरनिराळ्या वैद्यकीय संस्थांमध्ये बसविलेली अद्ययावत ऋणकणीय वैद्यकीय उपकरणे, पाण्याच्या पंपाचे संच, वातानुकूलित संयंत्रे व साहित्य, उव्दाहने, जैविक वैद्यकीय साहित्य, स्मशानभूमी व विद्युत/गॅस शवदाहिनी हयांची दुरुस्ती आणि परिरक्षणाची कामे देखील हे खाते पार पाडत आहे. या कामांव्यतिरिक्त वरळी डाटा सेंटरशी जोडणी उपलब्ध करुन देण्याकरिता विविध खात्यांकरिता स्थानिक क्षेत्र जोडणी करुन देण्याचे कामही करण्यात येते. तसेच, उर्जा बचतीच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारतर्फे प्रसृत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे उर्जा बचत, उर्जा परिक्षण, सौर ऊर्जेवर आधारीत दिवे आणि पाणी तापविण्याची संयंत्रे लावण्याची कामे देखील ह्या खात्यामार्फत हाती घेण्यात आली आहेत.

याशिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी सल्लामसलत करुन सर्व स्मशानभूमींमध्ये स्क्रबर, ब्लोअर, चिमणी इत्यादींचा समावेश असलेल्या वायू प्रदूषण नियंत्रण उपकरणांना, वर्धित / धुररहित प्रणालींमध्ये रुपांतरित करण्याचा प्रस्ताव आहे. मोठ्या रुग्णालयांमधील एलटीचे, एच.टी. नेटवर्कमध्ये सूचित करण्याचा प्रस्ताव आहे, असे केल्याने विजेच्या खर्चात बचत होईल. ग्रीन एनर्जी मिशनमध्ये योगदान देण्यासाठी आणि कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी महानगरपालिका शाळा / आस्थापनांच्या गच्चीवर पी.व्ही. (सौर) प्रकाश व्यवस्था पुरविणे प्रस्तावित आहे. विद्युत वाहनां (इलेक्ट्रीक

व्हेईकल्स) बाबत वाहतूक विभागाने तयार केलेल्या धोरणानुसार ई.व्ही. चार्जिंग पायाभूत सुविधा उभारण्यापूर्वी प्रमुख अभियंता (यां. व वि.) हे इलेक्ट्रिक सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का ह्याची पाहणी करतात आणि सेवा प्रदात्याने प्रमुख अभियंता (यां. व वि.) यांच्याकडून याबाबतचे 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त करणे आवश्यक आहे. महालक्ष्मी धोबीघाट परिसरात महानगर गॅस पाईपलाईन कनेक्शन करण्याचा प्रस्ताव आहे.

**८) घनकचरा व्यवस्थापन खाते :**

**स्वच्छ भारत अभियान २.० -**

❖ दि. ०१ ऑक्टोबर २०२१ रोजी माननीय पंतप्रधानांनी स्वच्छ भारत अभियान २.० 'कचरामुक्त' शहरांच्या संकल्पनेसह सुरु केले आहे.

❖ स्वच्छ भारत अभियान राबविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका ही एक महत्वाची प्रशासकीय यंत्रणा असल्याने राज्य आणि केंद्र सरकारच्या सहकार्याने शहरातील स्वच्छता राखण्यासाठी एकत्रित आणि संयुक्त प्रयत्न केले जात आहेत.

❖ मोहिमेअंतर्गत, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रयत्न आणि कार्यक्रम स्वच्छतेची आवश्यक पातळी गाठण्यासाठी सुधारित करण्यात आले आहेत.

❖ स्वच्छ भारत अभियान २.० कालावधी दि. ०१ ऑक्टोबर २०२१ ते दि. ०१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आहे. उद्दिष्टात प्रामुख्याने कचऱ्याचे घरगुती स्तरावर विलगीकरण, जुन्या जमा झालेल्या कचऱ्यावर (लीगसी वेस्ट), आकांक्षी शौचालये, १०० टक्के सांडपाणी व्यवस्थापन/ विल्हेवाट लावणे इ. यांचा समावेश आहे.

❖ स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत मुलुंड आणि देवनार येथील जून्या जमा झालेल्या कचऱ्यावर (लीगसी वेस्ट) प्रक्रिया करण्यासाठी रु. १,१६२ कोटी प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये महानगरपालिकेचा हिस्सा व्यतिरिक्त केंद्र सरकारचे रु. २९०.५५ (२५ टक्के) कोटी आणि राज्य सरकार रु. ४०६.७७ (३५ टक्के) कोटी एकूण रु. ६९७.३२ कोटींचा हिस्सा मिळणार आहे. आजमितीस रु. ६९७.३२ कोटी भागापैकी रु. १३९ कोटी मिळाले असून रु. ५६.५ कोटी मुलुंड क्षेपणभूमी येथील जुन्या जमा कचऱ्यावर प्रक्रियेसाठी वापरण्यात आले.

❖ स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत, मुंबई शहर स्वच्छता कृती आराखडा शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. ज्यामध्ये मुंबईत १५,००० सामुदायिक शौचकुपे, मुंबईत ये-जा करणाऱ्या लोकसंख्येसाठी ४०० आकांक्षी शौचकुपे, ४,६७२ वैयक्तिक घरगुती शौचालये आणि ५०० मुत्रालयांचा समावेश आहे.

**स्वच्छता पंधरवडा -**

❖ केंद्र सरकारच्या निर्देशानुसार 'भारतीय स्वच्छता लीग २.०', 'स्वच्छता सुरक्षा शिबिर' या सारखे विविध उपक्रम दि. १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत हाती घेण्यात आले. दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी मुंबईत समुद्रकिनारा स्वच्छ करण्याचा विशेष कार्यक्रम घेण्यात आला.

❖ दि. ०१ ऑक्टोबर रोजी 'एक घंटा एक तारीख' या कार्यक्रमात लोकांना सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत मुंबईत स्वच्छतेसाठी एक तास समर्पित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. १७८ ठिकाणी आणि विविध सरकारी संस्था, स्वंयसेवी संस्था, रहिवाशी संस्था इत्यादींनी सुमारे ३९,००० सहभागींना एकत्र आणून या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, सदस्य आदी मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांच्या सहभागाने सहभागींना प्रेरणा तर मिळालीच शिवाय नागरिकांपर्यंत स्वच्छतेचा संदेशही मोठ्या प्रमाणावर पोहोचला. बृहन्मुंबई महानगरपालिकेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाला.

❖ स्वच्छता सुरक्षा शिबिर उपक्रमांमध्ये सफाई कामगारांचे प्रशिक्षण, आरोग्य तपासणी शिबिर सत्रांचा समावेश होता. दि. ०२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त प्रभातफेरी, सफाई कामगारांचा सत्कार, रांगोळी, स्वच्छतेची प्रतिज्ञा असे कार्यक्रम हाती घेण्यात आले.

**क्षमता बांधणी -**

❖ स्वच्छ भारत अभियान २.० च्या मार्गदर्शक तत्वांनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना (U.L.B.) कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण सत्र / कार्यक्रम आखणे आवश्यक आहे.

❖ त्यानुसार स्वच्छ सर्वेक्षणामध्ये अव्वल असलेले इंदूर शहर मॉडेल चा आढावा घेण्यासाठी २५० कनिष्ठ पर्यवेक्षक (J.O.) आणि प्रभागात काम करणारे अभियंते यांना इंदूर येथे पाठविण्यात आले.

❖ इंदूर अभ्यास भेटींमध्ये निवासी भागात कचऱ्याचे संकलन / स्त्रोतावर कचऱ्याचे विलगीकरण, केंद्रीकृत प्रक्रिया सुविधा आणि नियंत्रण कक्ष इत्यादींचा समावेश होता.

**मृत जनावरे हलविणे** : मृत जनावरे हलविण्याकरिता संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त आणि घन कचरा व्यवस्थापन खात्यातील पुढील संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क साधून मृत जनावर जेथे आहे तेथील पत्ता व्यवस्थित देण्यात यावा :-

१) मुख्य पर्यवेक्षक, घन कचरा व्यवस्थापन कार्यालय, खटाव मार्केट बिल्डिंग, ४था मजला, अविष्कार सोसायटीच्या बाजूला, स्लेटर रोड, ग्रॅण्ट रोड स्टेशन जवळ, ग्रॅण्ट रोड (पश्चिम), मुंबई - ४००००८.

२) मा. व्यवस्थापक, कोराकेंद्र, शिंपोली रोड, बोरिवली (प.), मुंबई - ४०० ०९२. दू. ध्व. क्र. २८९८०७८२ व २८९८०९७२ आणि चिटणीस, खादी ग्रामोद्योग संस्था, खादी एम्पोरियम, २८६, दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१, दू. ध्व. क्र.४३४७४९९१-९९ फॅक्स क्र. ४३४७४९९१/४३४७४९९२/४३४७४९९३ ह्यांच्याशी देखील नागरीक मृत जनावरे हलविण्यासाठी संपर्क साधू शकतात.

**उपविधि :** घन कचऱ्याचे संकलन, वहन आणि विल्हेवाटीशी निगडीत सर्व बाबी आणि वस्तू नियमित करण्यासाठी व हे कार्य अधिक जोमाने व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ४६१ (ईई) अंतर्गत 'बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधि, २००६' तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधीस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली असून ते दि. १४ डिसेंबर २००६ रोजीच्या क्र. बीएमसी/ २३२६/४०७४/प्र.क्र.२३८/०६/नवि-२१ अंतर्गत राजपत्राद्वारे अधिसूचित केलेले आहेत. मुंबई शहर व उपनगरांतील परिसर स्वच्छ ठेवून नागरिकांचे आरोग्य अबाधित रहावे म्हणून महानगरपालिका सतत प्रयत्नशील असते. ह्यासाठी नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व विविध प्रसार माध्यमांद्वारे पटवून, त्यांच्यात जागृती निर्माण करुन विविध उपाययोजना, उपक्रम राबविण्यात येतात. ह्यासाठी नागरिकांचा, मान्यवर व्यक्तींचा, नगरसेवकांचा, विविध शासकीय/अशासकीय संस्थांचा सहभाग व सहकार्य घेतले जाते. जे नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करुन उपद्रव निर्माण करतात अशा उपद्रवकारकांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी उपद्रव शोधक पथकांची व सुरक्षा संस्थांद्वारे क्लिन-अप मार्शलची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे काम जास्त जोमाने व प्रभावीपणे पार पाडण्याकरिता बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधी, २००६ तयार करण्यात आले आहेत. ह्या उपविधितील नियमांचे प्रत्येक नागरिकाने पालन करणे अत्यावश्यक व अनिवार्य आहे.

ज्या नागरिकांकडून ह्या नियमांचे उल्लंघन होईल ते पुढे दिलेल्या सूचीप्रमाणे दंडास पात्र ठरतील :-

| अ.क्र. | उपविधि क्रमांक | उपविभाग तपशील | उपविधि उल्लंघन केल्यास दंडाची अंतिम रक्कम |
|---|---|---|---|
| **उपविधि क्र. ४.१ कचरा फेकणे, उपद्रव करणे व साफ आंगण** | | | |
| १ | ४.१ ते ४.४ | कचरा इतस्ततः फेकणे | रु. २००/- |
| २ | ४.५ | उपद्रव करणे, थुंकणे | रु. २००/- |
| ३ | | स्नान करणे | रु. १००/- |
| ४ | | लघवी करणे | रु. २००/- |
| ५ | | शौचास बसून घाण करणे | रु. १००/- |
| ६ | | निर्देशित न केलेल्या ठिकाणी प्राणी/पक्षी यांना अन्न खाऊ घालणे | रु. ५००/- |
| ७ | | रस्त्यावर वाहने धुणे /दुरुस्त करणे | रु. १,०००/- |
| ८ | | भांडी /कपडे/तत्सम बाबी धुणे | रु. २००/- |
| ९ | ४.६ | आपले अंगण स्वच्छ न ठेवणे | |
| | | अ) एकाच आवाराच्या मालकासाठी/भोगवटादारासाठी | रु. १,०००/- |
| | | ब) इतरांसाठी | रु. १०,०००/- |
| **उपविधि क्र. ५-कचरा विभक्तीकरण, साठवण, पुरवठा व संकलन** | | | |
| १० | ५.१ व ५.२ | कचरा विभक्तीकरण करुन न दिल्यास अथवा कचरा स्वतंत्र डब्यात न साठवल्यास | |
| | | अ) वैयक्तिक | रु. १००/- |
| | | ब) मोठे निर्माते | रु. ५००/- |
| ११ | ५.३ | निदेशाप्रमाणे ओला कचरा विभक्तीकरण करून न दिल्यास | रु. १००/- |
| १२ | ५.५ | धोकादायक कच-याचे निदेशित पध्दतीने विभक्तीकरण करुन पुरवठा न केल्यास | |
| | | वैयक्तिक | रु. १,०००/- |
| | | मोठया प्रमाणावर | रु. १०,०००/- |
| १३ | ५.६ | जैविक वैद्यकिय कचरा निदेशाप्रमाणे विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु. २०,०००/- |
| १४ | ५.७ | बांधकाम/पाडकाम कचरा निदेशाप्रमाणे विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु. २०,०००/- |
| १५ | ५.८ | निदेशाप्रमाणे सुका कचरा विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु. १००/- |
| १६ | ५.९ | निदेशाप्रमाणे झाडांच्या फांद्या अथवा बांधकाम कचरा विभक्त करुन न दिल्यास | रु. १००/- |
| १७ | ५.१० | कचरा जाळून निष्कासित केल्यास | रु. १००/- |

**उपविधि क्र. ७ विशिष्ट गट/प्रासंगिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | ७.२ | अनिवासी स्वरुपाचा कोंबडया/मासळी/ कत्तलीचा कचरा विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु. १०००/- |
| १९ | ७.३ | अ) विक्रेते/फेरीवाले ह्यांनी कचरा डबा न ठेवल्यास<br>ब) विक्रेते/फेरीवाल्याने कचरा विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु. ५००/-<br>रु. ५००/- |
| २० | ७.४ | घरगल्ली स्वच्छ न ठेवल्यास | रु. २००/- |
| २१ | ७.५ | पाळीव/मालकीच्या प्राण्यांनी कचरा केल्यास | रु. ५००/- |
| २२ | ७.६ | सार्वजनिक मेळावे व कार्यक्रमानंतर, २४ तासांत स्वच्छता न केल्यास | स्वच्छता अनामत रक्कम जप्त |
| २३ | ७.८ | रस्ते सफाईच्या वेळी वाहन रस्त्यावर उभे केल्यामुळे अस्वच्छता निर्माण होत असल्यास | रु. ५००/- |
| २४ | ७.१० | जाहिरात फलक लावणे | रु. ५००/- ते रु. ५,०००/- |

**देवनार क्षेपणभूमी :-**

देवनार क्षेपणभूमीचे परिरक्षण, उपाययोजना व विशेषतः सुरक्षितेच्या दृष्टीने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पाच सदस्यीय समितीची (MONITORING COMMITTEE) स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या मार्गदर्शनानुसार देवनार क्षेपणभूमी येथील दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन केले जाते.

सद्यस्थितीत देवनार क्षेपणभूमी येथे दररोज ५००-६०० मे.टन कचरा स्विकारण्यात येतो. तेथे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत एकुण निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी अंदाजे १० टक्के कचरा देवनार येथे स्विकारला जातो. देवनार क्षेपणभूमी येथे स्विकारण्यात येणाऱ्या कच-याची विल्हेवाट पारंपारिक पध्दतीने कचरा टाकून कचऱ्याचे सपाटीकरण केले जाते.

१. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देवनार क्षेपणभूमी येथे किटक, माशा व दुर्गंधी कमी करण्यासाठी संपूर्ण क्षेपणभूमी परिसरात ट्रॅक्टरवर फवारणी यंत्रणा बसवून त्यांचेमार्फत पाणीमिश्रीत दुर्गंधीनाशक द्रव्यांची फवारणी केली जाते. सदर उपाययोजनेमुळे सभोवतालच्या परिसरावर चांगले परिणाम दिसून येत आहेत. तसेच देवनार क्षेपणभूमी येथे निर्माण होणाऱ्या आगीवर व धुरावर नियंत्रण मिळवण्यासाठी, महानगरपालिकेने क्षेपणभूमीवर पाण्याचे टँकर्स उपलब्ध केलेले आहेत व आवश्यकतेनुसार त्या यंत्रणेचा वापर केला जातो. त्यामुळे सभोवतालच्या परिसरातील प्रदूषण कमी होण्यास मदत होते.

२. त्याचप्रमाणे क्षेपणभूमीमध्ये निर्माण होणाऱ्या लॅण्डफिल वायुंचे निर्गमन करण्यासाठी कचऱ्याच्या ढिगाऱ्यात विशिष्ट प्रकारचे पाईप रोवून त्याद्वारे सदर वायुंचे निर्गमन करण्यात येते.परिणामी क्षेपणभूमीत आगी लागण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे.

३. देवनार क्षेपणभूमी व सभोवतालच्या परिसरातील प्रदूषण पातळीचे मोजमाप करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील Air Quality Monitoring and Research Laboratory यांच्यातर्फे दरमहा सभोवतालच्या हवेतील वायुचे सर्वेक्षण केले जाते.

४. बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यामुळे देवनार परिसरातील हवेचे प्रदूषण कमी व दुर्गंधी कमी होण्यास मदत होत असून सदर परिसरातील नागरीकांना आरोग्यदायी वातावरणाचा लाभ होण्यास मदत होत आहे.

**कांजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार राज्य सरकारने कांजूर येथील १४१.७७ हेक्टर जागा दि. २४.१०.२००५ रोजी नागरी घन कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वाधीन केली. सदर १४१.७७ हेक्टर जागेपैकी २३.३६ हेक्टर कांदळवनांनी व्याप्त असलेली जागा महाराष्ट्र सरकारने दि. ०२.०४.२०१२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र शासनाकडेच ठेवली होती.

कांजूर स्थित नागरी घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील ६५.९६ हेक्टर सागर तटीय नियंत्रण क्षेत्राने बाधीत नसलेल्या जागेवर नागरी घन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता पर्यावरण विषयक मंजूरी राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांच्याकडून दि. ०५.१२.२०१४ रोजी प्राप्त झाली आहे.

तसेच, कांजूर नागरी घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील उर्वरित५२.४५ हेक्टर सागर तटीय नियंत्रण क्षेत्राने बाधीत असलेल्या जागेवर नागरी घन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता पर्यावरणविषयक मंजुरी राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांच्याकडून दि. २९.१०.२०१८ रोजी प्राप्त झाली आहे. तसेच, दि. २३.०८.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकार पत्राचे नूतनीकरण करण्यात आलेले आहे त्यामुळे एकूण ११८.४१ हेक्टर एवढी जमीन ही प्रकल्पासाठी उपलब्ध आहे.

सद्यस्थितीत कांजूर येथे दररोज स्विकारण्यात येणाऱ्या सुमारे ४,१०० मे. टन प्रति दिन नागरी घन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोरिएक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येते. तसेच १,००० मे.टन. प्रतिदिन नागरी घन कचऱ्यावर विंड्रोस खत निर्मिती तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येत आहे.

कांजूर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पामुळे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना दूर्गंधीचा त्रास होऊ नये म्हणून महानगरपालिकेतर्फे खालील उपाययोजना करण्यात येतात :-

१. भरावभूमीतून निर्माण होणारा वायू संकलित केला जातो व या वायूपासून वीज निर्मिती केली जाते. सदर वीज कांजूर प्रकल्पासाठी वापरण्यात येते. अतिरिक्त वायू फ्लेरींग सिस्टीमद्वारे पर्यावरणविषयक नियमानुसार जाळण्यात येतो.

२. नागरी घन कचऱ्याचा हवेशी संपर्क येऊ नये म्हणून कचऱ्यावर मातीचे आवरण टाकण्यात येते.

३. कांजूर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील कचऱ्यावर इंन्झाइम बेस (Enzyme Base) द्रव्याचा फवारा दिवसरात्र करण्यात येत आहे.

४. कांजूर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील कचरा स्विकारण्यात येणाऱ्या ठिकाणाच्या सभोवताली सुगंधी द्रव्याची सिस्टींगची व्यवस्था केली आहे.

५. तसेच प्रकल्पाच्या जागेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या भेटी दरम्यान त्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे अतिरिक्त उपाययोजना म्हणून पाच ठिकाणी सुगंधी द्रव्य फवारणीसाठी मिस्टिंग कॅननची उपाययोजना सुध्दा कार्यान्वित करण्यात आली आहे.

मुंबईत दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करण्यासाठी प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) नवीन प्रकल्प खात्याचा अहवाल व योजना खालीलप्रमाणे आहे :-

१. **देवनार येथील कच-यापासून उर्जा निर्मितीचा प्रकल्प (डब्ल्यू.टी.ई.)-** कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर प्रकल्पाचे काम कंत्राटदारास देण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये सुमारे ६०० टन प्रति दिन कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे व या प्रकल्पातून सुमारे ०७ MW प्रतिदिन ऊर्जा निर्मिती होईल. कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले असून प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर असून प्रकल्प दि. ०४.१०.२०२५ पासून कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

२. **मुलुंड क्षेपणभूमी येथे अस्तित्वात असलेल्या कच-यावर योग्य तंत्रज्ञानाचा वापर करुन जमीन पुनर्प्राप्त करणे-** मुलुंड क्षेपणभूमी येथील जमीन पुनर्प्राप्त करण्याचे काम कंत्राटदारास देण्यात आले आहे. आजमितीस (दि. ०१.०५.२०२४ पर्यंत) कंत्राटदाराने सुमारे ३४,७९,७७२ मे. टन कचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करुन विल्हेवाट लावलेली आहे व पुढील काम सुरु आहे. मे. मिटकॉन कन्सलटन्सी ऍन्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. **बांधकाम व निष्कासनामधून निर्माण होण्या-या कच-याचे संकलन वाहतूक प्रक्रिया व विल्हेवाट करण्यासाठीचा प्रकल्प-** बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे १,२०० मे.टन प्रति दिन बांधकाम व निष्कासन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याची योजना आखली आहे. बांधकाम व निष्कासनामधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन, वाहतूक, प्रक्रिया व विल्हेवाट यासाठीच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे आणि कंत्राटदारांना फेब्रुवारी २०२३ मध्ये स्वीकृती पत्र देण्यात आले आहे. सदर प्रकल्प हा जून २०२४ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

४. **तळोजाजवळील करवले गाव येथे कच-यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया व विल्हेवाट -** मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. २१७ सन २००१ अन्वये महाराष्ट्र शासनाने मौजे करवले, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे सुमारे ५२.१० हेक्टर जमीन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिली आहे. त्यापैकी सुमारे ३९.९० हेक्टर सरकारी जमीन असून, सुमारे १२.२० हेक्टर जमीन खाजगी जमीन आहे. सदर जमिनीमधून विरार-अलिबाग कॉरिडॉर व गेलची पाईपलाईन जात असल्यामुळे सुमारे ३५.८० हेक्टर जमीन (सुमारे २९.७१५ सरकारी जमीन व ६.१०५ हेक्टर खाजगी जमीन) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वापरण्यायोग्य आहे. सुमारे ३९.९० हेक्टर सरकारी जमीनीपैकी ३८.८१ हेक्टर जमीनीचा आगाऊ ताबा दि. १८.०१.२०१६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेला मिळाला आहे. तसेच १२ हेक्टर सरकारी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा दि. १६.०२.२०१९रोजी मिळालेला आहे. उर्वरित सरकारी जमीन व ६.१०५ हेक्टर खाजगी जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकारी, जिल्हा ठाणे यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे. करवले गाव येथील सरकारी जमीन व खाजगी जमीनीचा प्रत्यक्ष ताबा मिळाल्यानंतर शास्त्रोक्त पध्दतीने जमीन भरणा करण्याचे काम सुरु करण्यात येईल.

**डीप क्लिनिंग प्रोग्राम :-**

डिसेंबर २०२३ मध्ये सुरु झालेला 'डीप क्लिनिंग प्रोग्राम' याने प्रदूषणाला आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील एका प्रभागामध्ये सर्व यंत्रणा आणून सकल स्वच्छता करण्यात येते. तसेच रस्ते धुण्याचे कामही सुरु आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेला हा व्यापक कार्यक्रम एका विशिष्ट भागात स्वच्छता मोहिम राबवण्यावर भर देतो. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सक्रिय सहभागामुळे ही स्वच्छता मोहीम जनांदोलनात रुपांतरित झाली आहे. मार्च २०२४ अखेरपर्यंत ३२,००० पेक्षा अधिक नागरिक,स्वंयसेवी संस्थांचे कार्यकर्ते, विद्यार्थी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी यांनी 'डीप क्लिनिंग प्रोग्राम' मध्ये योगदान दिले आहे. या मोहिमेद्वारे ३,००० टनपेक्षा अधिक कचरा, ५०० टन पेक्षा जास्त टाकलेले सामान (जुने फर्निचर, खुर्च्या इत्यादी) आणि १,१०० टन कचरा साफ करण्यात आला आहे. जे.सी.बी., डंपर, कॉम्पेक्टर, कचरा गोळा करणारी वाहने, पाण्याचे टँकर अशी तब्बल २,८८० वाहने आणि फायरेक्स मशीन, मिस्टींग मशीन आणि अन्य अद्ययावत यंत्रणाही दिमतीला आहेत. 'डीप क्लिनिंग प्रोग्राम' ची महाराष्ट्र राज्यभर अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**वस्ती स्वच्छता कार्यक्रम:**

- वस्ती स्वच्छता कार्यक्रम हा जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्यातून सन १९९७ साली सुरु करण्यात आला असून घनकचरा व्यवस्थापन विभागाचा एक घटक आहे. सदर कार्यक्रमाचा मुख्य उद्देश झोपडपट्ट्यांमधील रहिवाश्यांना सुधारित व शाश्वत (Sustainable) शौचालयांची सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. तसेच, वस्ती स्वच्छता कार्यक्रम हा मागणी तत्वावर आधारित कार्यक्रम असून लोकांचा सहभाग हे या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

- सदर कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टीतील रहिवाशांना शौचालयाचे नियोजन, संकल्पचित्रे आणि बांधकाम या प्रक्रियेमध्ये सहभागी करुन बांधण्यात आलेल्या शौचालयांची दैनंदिन स्वच्छता व परिरक्षण, स्थानिक रहिवाशांनी लोकवर्गणीद्वारे करावी असे अभिप्रेत आहे. सदर कार्यक्रमातून बांधण्यात आलेली शौचालये, बांधून पूर्ण झाल्यावर झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाश्यांच्या नोंदणीकृत संस्थांना बृहन्मुंबई महानगरपालिका समजूतीच्या ज्ञापनाच्या (M.O.U.) पूर्ततेनंतर वापरासाठी हस्तांतरीत करते. लोक वर्गणीद्वारे जमा निधीचा वापर दैनंदिन स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याची देयके, किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच शौचालयाचे परिरक्षण व प्रचालन करणे ह्या कामासाठी अपेक्षित आहे. सदर कार्यक्रमातून बांधण्यात आलेली शौचालये आर.सी.सी. पध्दतीने बांधून त्यामध्ये ओव्हरहेड टँक, सक्शन टँक, लहान मुलांसाठी स्वच्छतागृहे, पुरुषांसाठी मुताऱ्या, अपंगांसाठी शौचकूप या सुविधा उपलब्ध

करुन देण्यात येतात. शौचालयात विद्युत पुरवठा आणि जेथे महानगरपालिकेचा पुरेसा पाणी पुरवठा नसेल तेथे विधंन विहिरीद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्यात येतो.

- तसेच जागेच्या उपलब्धतेनुसार मोडकळीस आलेली जुनी शौचालये तोडून त्याठिकाणी जास्त क्षमतेची दुमजली शौचालये बांधण्यात येतात. २० शौचकूपांपेक्षा कमी क्षमतेच्या शौचालयांचा बांधकामाचा कालावधी ०६ महिने तर २० ते ४० शौचकुपांपर्यंत क्षमतेच्या शौचालयांच्या बांधकामाचा कालावधी ०९ महिने गृहित धरला जातो. तर ४१ ते ६० व अधिक शौचकुपांपर्यंत क्षमतेच्या शोचालयांच्या बांधकामाचा कालावधी १२ महिने व अधिक गृहित धरला जातो. या दरम्यान रहिवाश्यांची गैरसोय होऊ नये म्हणून जुनी शौचालये तोडण्यापूर्वी तेथे तात्पुरती शौचालये बांधली जातात किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयामार्फत फिरती शौचालये उपलब्ध करुन देण्यात येतात.
- सन २०१८ मध्ये लॉट-११ (आर) करिता रु. १२० .७९ कोटी इतक्या रकमेची निविदा मागविण्यात आली. लॉट-११ (आर) कंत्राटांतर्गत एकूण १९,८०९ शौचकूपासह ८३२ शौचालये बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. सन २०२३-२४ पर्यंत १९,७६९ शौचकूपांसह ८३१ शौचालये बांधण्यात आली. त्यासाठी सन २०२३-२४ मध्ये रु ५५.१८ कोटी इतका निधी खर्च झाला व सद्यस्थितीत वरील सर्व शौचालये वापरात आहेत.
- सन २०२३-२४ मध्ये लॉट १२ अंतर्गत मुंबईच्या झोपडपट्टीत १४,१६६ शौचकुपांसह ५५९ सामुदायिक शौचालये बांधण्यासाठी २८ निविदा काढण्यात आल्या असून २८ कंत्राटदारांना नियुक्त करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कंत्राटदारांना १५३ ठिकाणचे कार्यादेश देऊन सामुदायिक शौचालयांचे निष्कासन व पुनर्बांधणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाचा एकूण खर्च रु ५४२.४२ कोटी इतका प्रस्तावित आहे. सन २०२४-२५ साठी रु. ६४ कोटी निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

### ९) विकास नियोजन :

**ऑनलाइन विकास हक्क प्रमाणपत्र :**

विकास नियोजन विभागाने दि. ०५ एप्रिल २०२१ पासून विकास हक्क प्रमाणपत्राच्या प्रस्तावांची छाननी ऑनलाईन करण्याची प्रणाली राबविली आहे. सदर प्रणालीमध्ये विकास हक्काच्या प्रस्तावाची छाननी, मंजुरी, विकास प्रमाणपत्र वितरित करणे व विकास हक्कांचा वापर करणे इ. सुविधा ऑनलाईन पध्दतीने विकासक/मालकास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**ऑनलाइन नगर रचना अभिप्राय :**

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नगर रचना योजनांमधील भूखंडांचे अभिप्राय ऑनलाइन पध्दतीने मिळण्याची तरतूद विकास नियोजन विभागाने मार्च २०२१ पासून लागू केली आहे. या प्रणालीमध्ये अर्जदारास विहित शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने केल्यास नगररचना योजनेचे अभिप्राय प्राप्त करता येतात.

**गोराई व मनोरी ऑनलाईन अभिप्राय :**

गोराई व मनोरी येथील एम.एम.आर.डी.ए. ने तयार केलेल्या व शासनाने मान्यता दिलेल्या विकास नियोजन आराखड्यामधील भूखंडांचे अभिप्राय ऑनलाइन उपलब्ध करुन देण्याची प्रणाली विकास नियोजन विभागाने माहे मार्च २०२१ पासून सुरु केली आहे.

**बिल्डिंग प्लॅन मंजुरी व्यवस्थापन प्रणाली आणि ऑटो डी.सी.आर. छाननी :**

इमारतींच्या प्रस्तावांना ऑनलाईन एक खिडकी (सिंगल विंडोच्या) सहाय्याने महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव खात्यामार्फत मंजुरी दिली जाते. इमारत प्रस्ताव ऑनलाईन स्वीकारले जातात आणि ऑनलाईन प्रक्रियेद्वारे ते मान्य केले जातात. स्वीकारलेले व मान्यता दिलेले प्रस्ताव ऑनलाईन पाहण्याची तरतूद सदर प्रणालीमध्ये आहे. तसेच सदर प्रस्ताव व त्यासोबत जोडलेले कागदपत्रे नागरिकांना ऑनलाईन जाऊन डाऊनलोड करण्याची तरतूद आहे. मंजुरीसह प्रस्ताव, कागदपत्रे इ. एक खिडकी मंजुरी प्रणालीच्या माध्यमातून इमारत नकाशे व आराखडा परवानगी देण्याकरिता जबाबदार असलेल्या खात्याकडे पाठविण्यात येतात. इमारत प्रस्ताव विभागाचे प्रस्ताव हे ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातात व त्यांना ऑनलाईन पध्दतीने मंजूरी देण्यात येते.

डिजीटल स्वाक्षरीने प्रमाणित करून देण्यात आलेली मंजूरी कागदपत्रे डाउनलोड व प्रिंट स्वरुपात प्राप्त करण्यात येतात.

ऑटो डी. सी. आर. प्रणाली विविध उपभोक्त्यांकरिता अद्ययावत करण्यात आली आहे. सदर प्रणाली महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाशी व महाखनिज विभागाशी जोडलेली आहे. त्यायोगे विकासकाला इमारत प्रस्तावांना आवश्यक असणारे ऑनलाईन नगर भुमापन नकाशे, मालमत्ता पत्रके मिळण्याची तसेच, विकासकाला खोदकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातून मिळणारे 'ना हरकत प्रमाणपत्र' ऑनलाईन प्राप्त करण्याची तरतूद आहे. सदर प्रणाली ही महानगरपालिका प्रमुख लेखापाल (वित्त) विभागाशी जोडलेली असून त्यायोगे इमारत प्रस्तावाशी निगडीत फाईल्स /कागदपत्रे ऑनलाइन तपासली जातात. तसेच, रस्त्यात चर घेण्याची परवानगी व कायमस्वरुपी नळ जोडणी मिळवणे इत्यादी परवानग्या हया ऑनलाईन पध्दतीने मिळविता येतात.

ऑटो डी.सी.आर. प्रणालीमध्ये मालमत्ता विभागासाठी वेगळे बदल करुन मक्ता व भाडे तत्वावरील मालमत्ता यांचा पुनर्विकास करणेकामी लागणारे मालमत्ता विभागाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' प्रणालीमधून देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**विकास नियोजन भौगोलिक माहिती प्रणाली (G. I. S.):**

'मंजुर पुनर्रचित विकास आराखडा १९९१' व 'विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली २०३४' हे मोबाईल ॲप (MCGM Development Plan) द्वारे पाहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये स्थान आधारित (लोकेशन बेस) विकास आराखडा पाहता येतो. तसेच, विकास आराखडा गुगल मॅप वर ओव्हर ले करुन पाहता येतो.

**उंच इमारती प्रस्ताव :**

महाराष्ट्र शासन ठराव क्र. टीपीबी-४३१७/६२९/सीआर ११८/२०१७/डीपी/यूडी - ११ दि. १२.११.२०१८ अन्वये 'विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली - २०३४' मंजूर केली आणि ती दि. १३.११.२०१८ पासून लागू झाली. नियमावली १९(२अ) नुसार, १२० मीटर्सपेक्षा जास्त उंची असलेल्या किंवा निमुळतेपणाचे गुणोत्तर ९ पेक्षा जास्त असलेल्या उंच इमारतींच्या मंजुरीबाबत सल्ल्यासाठी आयुक्त 'उंच इमारतींसाठी तांत्रिक समिती' गठित करतील.

त्यानुसार दि.२५ फेब्रुवारी २०१९ रोजी निवृत्त भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठीत करण्यात आली असून सदर समिति दि. १२ जानेवारी २०२३ रोजी पुनर्गठीत करण्यात आली आहे. सदर समितीद्वारे उत्तुंग इमारतींच्या प्रस्तावांबाबत उचित कार्यवाहीकरुन माननीय महानगरपालिका आयुक्तांच्या मान्यतेने मंजुरी 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात येते.

**१०) नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि नागरिकांना पायाभूत नागरी सोयीसुविधा पुरविण्याच्या दर्जात सुधारणा करण्याकरीता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांतील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्रामार्फत कर्मचाऱ्यांना तांत्रिक/ अतांत्रिक / संगणक, व्यक्तिमत्व विकास, कौशल्य विकास विषयक प्रशिक्षण देण्यात येते. नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र सन १९८६ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत अभिनव नगर, बोरिवली (पूर्व) येथील १३ एकर क्षेत्र जागेवर स्थापित करण्यात आलेले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असणाऱ्या अभियंत्यांना उजळणी वर्ग विविध खात्यांची कार्यपध्दती, गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्ता हमी, बांधकाम साहित्याच्या चाचण्या, काँक्रीट तंत्रज्ञान इत्यादींचे प्रशिक्षण तसेच महानगरपालिका अभियंत्यांना करार नियम, लवाद कार्यवाही व करार अटी, मानक निविदा करार व सामान्य करार अटी फिडीक सूट ऑफ कंडीशन्स, डी.पी. एन्ड न्यु डी.सी.पी.आर. ओवरव्यू, आर्बीट्रेशन व कॉन्ट्रॅक्ट कंडिशन, ट्राफिक मॅनेजमेंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट अँड डी.पी.आर., पब्लिक रिलेशन अँड रेडरेसल कम्पलेण्टस्, डी.पी.सी. आर. २०३४, एम.एम.सी. अँड एम.आर.टी.पी. ॲक्ट, अकोमोडेशन रिजर्वेशन, ट्रान्सफर ऑफ डेवलपमेंट राइट्स ॲण्ड ३३(१०), वॅल्यूएशन ऑफ लँड ॲण्ड बिल्डींग, ॲडवान्स इन कॉन्क्रीट कन्स्ट्रक्शन इ. तांत्रिक प्रशिक्षणे सुध्दा आयोजित करण्यात

येतात. बृहन्मुंबई  महानगरपालिकेमधील विविध विभागांच्या कामाची तोंडओळख होण्याकरिता नवनियुक्त महानगरपालिका अभियंत्यांकरिता अभिक्रम प्रशिक्षण (क्षेत्रभेटीसह) आयोजित केले जातात. विभागनिहाय उजळणी प्रशिक्षण व प्रसिध्द संस्था / प्रशिक्षकांमार्फत विशेष बाहय प्रशिक्षण बृहन्मुंबई  महानगरपालिका अभियंत्यांकरिता वेळोवेळी आयोजित करण्यात येतात.

तसेच, महानगरपालिका सेवा नियमावली, महानगरपालिका शिस्त व आचरण नियमावली, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, चौकशी कार्यपध्दती, मसुदापत्रलेखन, प्रशासकीय मराठी, बृहन्मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्प, आरक्षण (पदोन्नती व कार्यपध्दती) व सरळ सेवा भरती व पदोन्नती इ. प्रशासकीय विषयक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांचे कार्यस्थळ आनंदी व तणावमुक्त करण्यासाठी व्यक्तिमत्व विकास, योगा, ॲक्युप्रेशर,हस्तमुद्रेद्वारा ताणतणाव व्यवस्थापन , भावना तंत्र स्वातंत्र्य, ताणतणाव व्यवस्थापन (मनशक्ती), Time Management, Mindfulness, Ikigai/Kaizan, Cordial Relationship यांसारखी प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतात. तसेच, कार्यालयीन स्त्री कर्मचा-यांच्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण ) अधिनियम २०१३, निरोगी जीवनशैली त्याचप्रमाणे बहुआयामी व बहूमुखी व्यक्तिमत्त्व विकास, मानसिक आरोग्य जागृती, आर्थिक साक्षरता, ए टू झेड फायनान्स, फोटोग्राफी (Through the Lens) इ. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

कार्यालयांचे संगणकीकरण करण्याच्या महानगरपालिकेच्या सध्याच्या धोरणानुसार सॅप प्रणाली जोडणी असलेले प्रत्येकी २५ संगणकांनी युक्त असे दोन प्रशिक्षण वर्ग उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये प्राथमिक संगणक अभ्यासक्रम, इंटरनेट व माहितीशोध प्रक्रीया प्रणाली व सी.पी.डब्ल्यू.एम. मॉड्यूल्स इत्यादींचे संगणकीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच, विविध प्रकारचे युजर आय डी बनविणे, अतिरिक्त कार्यभार, युजर आय.डी. ब्लॉक करणे किंवा दुस-यांच्या नावावर ट्रान्सफर करणे या संबधीचे प्रशिक्षण, E- Tendering आणि H.R. संबंधीचे प्रशिक्षण S.A.P. MM, Libre Office Writer, Libre Office Calc वगैरे संबधीचे प्रशिक्षण कार्यक्रम नियमितपणे आयोजित करुन महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

कामगारांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे सुध्दा महत्वाचे आहे. तथापि, कार्यरत असलेल्या कामगारांची संख्या जास्त असल्यामुळे, सर्व कामगांराना एकत्रितपणे नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र कार्यालयात प्रशिक्षण देणे शक्य नाही. त्यामुळे संबंधित खात्यांच्या कनिष्ठ पर्यवेक्षक/मुकादम/ मलनि:सारण  सहाय्यक संवर्गातील कर्मचा-यांना /अधिका-यांना प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षक बनविण्यात येते. तद्नंतर सदर प्रशिक्षक आपापल्या खात्यातील संबंधीत कामगारांस प्रशिक्षण देतात.

यांत्रिकी व विद्युत प्रशिक्षणासंबंधी विशेष विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रम जसे की, एच.व्ही.ऐ.सी. सुविधा व त्याचे संकल्पचित्र, रुग्णालयात होणा-या वायुप्रदुषणाच्या अनुषंगाने प्रशिक्षण, 'वातानुकूलित यंत्रणा', ग्रीन एनर्जी (सोलर फोटोव्होल्टाईक सेल), रुग्णालयातील मेडिकल गॅस / ऑक्सिजन यंत्रणा, जलखाते व मल:निसारण खात्यातील वापरण्यात येणा-या अतिरिक्त उच्च दाब उपकरणांचे परिरक्षण, सांडपाणी प्रक्रिया संयंत्राची रचना व परिरक्षणाबाबतचे आधुनिक तंत्रज्ञान, अलवणीकरण यंत्रणा, विद्युतकामाचे अंदाजपत्रक, उदंचन केंद्राच्या परिरक्षणाच्या दृष्टीने घेतलेला आढावा, उदंचन केंद्रामधील उच्च दाब पॅनलचे परिरक्षण व प्रचालन, विविध प्रकारच्या उभारण्यांमध्ये S.C.A.D.A. प्रणालीचा वापर, विद्युत बिले व संयंत्रे, क्लोरीनेशन, मुंबईतील प्रमुख सांडपाणी प्रक्रिया यंत्रणाचे नियोजन व आराखडा, प्रवाहमापक व जलमापक, सांडपाणी यंत्रणांचे आधुनिक तंत्रज्ञान इ. विषयावर नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्रामार्फत प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. वरील विषयांव्यतिरिक्त, विविध विभागामार्फत प्राप्त झालेल्या प्रतिसादान्वये, प्रमुख अभियंता नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्रातर्फे पारंगत / तज्ज्ञ व्यक्तिमार्फत वातानुकुलित प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ह्या संस्थेत डी.एल.पी. प्रोजेक्टर ह्यांचा समावेश असेलेले प्रशिक्षण वर्ग/वातानुकूलित सभागृह, करमणूक केंद्र व भोजनगृहाची सोय असलेले वसतिगृह इत्यादी पायाभूत शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत.

सदर केंद्र हे प्रशिक्षण केंद्र असल्याने सदर केंद्राकरिता उपाहारगृहाची व्यवस्था असून प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षकांना चहा तसेच, जेवणाची सोय पुरवण्यात येत होती. पुढील पाच वर्षाकरिता नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने नवीन निविदा बनविण्यात आलेली असून सदर निविदेत प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक हे पनवेल, ठाणे, कल्याण व पालघर ठिकाणांहून येत असल्यामुळे नाश्ता, चहा, शाकाहारी व मांसाहारी भोजनाची व्यवस्था नवीन कंत्राटानुसार करण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ आर्थिक वर्षात सभागृह क्र.१२ च्या अत्याधुनिक पध्दतीचे नुतनीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा न देता पूर्ण करण्यात आले व सदर सभागृहाचे 'आर्यभट्ट' असे नामकरण करण्यात येऊन अनौपचारिक उद्घाटन सुध्दा करण्यात आले आहे.

नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्रातील १४ खोल्यांचे याच धर्तीवर प्रमुख अभियंता (इमारत व परिरक्षण) विभागाकडून दुरुस्तीचे काम सुरु असून ते काम दि. ०३.०९.२०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सध्याच्या अस्तित्वातील मोडकळीस आलेल्या प्रशिक्षण खोल्या व वसतीगृह यांचा पुनर्विकास प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास माननीय महानगरपालिका आयुक्तांची तत्वतः मंजूरी दि. १२.०९.२०२३ रोजी प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ विभागाकडून सुरु आहे.

वरील मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांच्या मागच्या परिसरात उद्यान विभागामार्फत मियावाकी पध्दतीने वृक्षरोपण करण्यात येत असून लवकरच घनदाट हिरवळ तयार होईल.

**११) मालमत्ता आणि भूमी व्यवस्थापन :**

सन १८९८ ते १९४८ च्या दरम्यान मुंबई सुधार विश्वस्त व त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकासासाठी काही सुधार योजना हाती घेतल्या होत्या. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूभागांच्या व्यवस्थापनाचे काम मालमत्ता विभागामार्फत केले जाते. साधारणतः ३५ विविध योजनांमध्ये विभागलेले अंदाजे ४,१७७ भूभाग ठराविक वापराकरिता विविध पक्षकारांना मक्त्याने दिलेले आहेत. सदर मालमत्तांचा मक्ता कालावधी पुढीलप्रमाणे आहे :-

| अनु.क्र. | मक्त्याचा कालावधी | मालमत्ता |
|---|---|---|
| १ | शाश्वत कालावधीकरिता | १,२४७ |
| २ | ९९९ वर्षे | २,१४८ |
| ३ | १२० वर्षे | ०१ |
| ४ | ९९ वर्षे | ५८४ |
| ५ | २५ ते ७० वर्षे | १९३ |
| ६ | १० वर्षे | ०४ |
| | **एकूण** | **४,१७७** |

मक्त्याने दिलेल्या भूभागांचे भुईभाडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने आणि मक्तेदार यांच्यामधील करारपत्राने निश्चित केलेले आहे. मक्त्याने दिलेल्या सर्व भूभागांचे अभिलेख तसेच मक्ता भूभागांची भुईभाडे वसुली, मक्ता भूभागांचे हस्तांतरण, विकास / पुनर्विकासास परवानगी व मक्ता भूभाग पोट मक्त्याने देणे, भूभागांचे नुतनीकरण इत्यादी कामे सुधार समिती / महानगरपालिका यांनी मंजुर केलेल्या धोरणानुसार या कार्यालयामार्फत केली जातात.

**१. मक्ता हक्क हस्तांतरण**

मक्त्याने दिलेल्या भूभागांचे मक्ता करार / मक्ता दस्तऐवजामधील अटी व शर्तीनुसार मक्त्याचे हस्तांतरण होत असताना, दस्तऐवजांची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता अभिलेखावर घेऊन अभिलेख अद्ययावत करणे आवश्यक आहे . सदर अभिलेख अद्ययावत करत असतांना पूर्वीच्या मक्तेदाराचे नाव अभिलेखावरून कमी करुन, नवीन मक्तेदाराचे नाव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखावर घेण्यात येते. त्रयस्थ पक्षकारास मालमत्तेच्या मक्त्याचे हस्तांतरण केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण अधिमूल्य/शुल्क वसुली करण्यात येते.

## २. मक्ता भूभाग पोट मक्त्याने देणे

सुधार समितीचा दि. ३० जुलै २०१४ चा ठराव क्रमांक २९ व महानगरपालिकेचा दि. ३० ऑक्टोबर २०१४ चा ठराव क्र. ६८९ अन्वये मंजूर झालेल्या धोरणानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या भूभागांपैकी ज्या भूभागांच्या मक्ता दस्तऐवजात 'मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२'च्या कलम १०८ (जे) मध्ये नियम नमूद केला आहे, अशा प्रकरणांमध्ये मक्तेदारांना भूभाग पोट मक्त्याने देण्यासाठी तसेच, पोट मक्ता नियमिततेसाठी धोरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिमूल्य / शुल्क आकारणी करुन परवानगी देण्यात येते.

## ३. मक्ता भूभागांचा विकास / पुनर्विकास

मक्ता भूभागांवरील इमारतींचा विकास / पुनर्विकास करताना त्याबाबतचे काम सुरु करण्याकरिता लागणारे प्रमाणपत्र (सी.सी.) तसेच भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) मिळविण्याकरिता विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम ३३(२), ३३(५), ३३(७), ३३(९), अन्वये मालमता विभागाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' देण्यात येते. यासाठी महानगरपालिकेने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार एकवेळ अधिमूल्य, शुल्क, आकार, दंडनीय शुल्क, भुईभाडे, अतिरिक्त भुईभाडे आकारण्यात येते.

'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४' नुसार फेरबदलांचा अंतर्भाव करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या भुभागांवरील पुनर्विकासात आकारले जाणारे एकवेळ अधिमुल्याचे परिगणन करण्याकरिता धोरणात बदल केले व बृहन्मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या भुभागांवरील जुन्या इमारतींच्या मंदावलेल्या पुनर्विकासास गती देण्याकरिता विकासकांवरील आर्थिक बोजा कमी केला.

## ४. मक्ता नूतनीकरण व नविन मक्ता करार

मक्ता भूभागांचा मक्ता कालावधी संपुष्टात आल्यानंतर, मक्त्यातील अटी व शर्तीसह बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठरविलेल्या नवीन अटी व शर्तीसह मक्ता कालावधीचे नूतनीकरण करण्यात येते. सुधार समितीचा दि. २४ डिसेंबर २००१ चा ठराव क्रमांक १७२ व महानगरपालिकेचा दि. ०९ जुलै २००२ चा ठराव क्र. ४३१, अन्वये मक्त्याने दिलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूभागांच्या मक्त्याचे नूतनीकरण करण्यासाठी, भुईभाडे ठरविण्याबाबत धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आली आहेत. मक्ता नूतनीकरणावेळी भूभागाचे मक्ता भूईभाडे वापरानुसार धोरणात नमूद केल्याप्रमाणे सिध्दगणक दराच्या प्रमाणात निश्चित करून त्यामध्ये दर १० वर्षांनी १० टक्के वाढ करण्यात येते.

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या अनुसूची 'डब्ल्यू' मध्ये विनिर्दिष्ट असलेल्या मालमत्तांच्या मक्त्यांचे नूतनीकरण करण्यासंदर्भात राज्य शासनाने दि. १५.०३.२०१७ चा शासन निर्णय क्रमांक बीएमसी २५१६/प्र.क्र. २८०/नवि-२१ अन्वये मक्ता नूतनीकरण धोरण पारित केलेले आहे. उपरोक्त धोरणानुसार मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते. सदर धोरणानुसार भूभागाचा मक्ता संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ३० वर्षाच्या कालावधीकरीता मक्ता नुतनीकरण करण्यात येते. तसेच, प्रतिवर्षीच्या सिध्दगणक दरानुसार भूभाडयाची आकारणी करण्यात येते . शासनाच्या धोरणानुसार महानगरपालिकेस अनूसूची 'डब्ल्यू' भूभागांच्या मक्ता नुतनीकरणानंतर प्राप्त होणा-या महसुलातील ७० टक्के हिस्सा शासनास प्रदान करणे क्रमप्राप्त आहे. मक्ता करार निष्पादित करताना पुर्तता करावयाच्या अनिवार्य बाबी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. १२५१/२०१४ व इतर याचिकांमध्ये न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे नविन मक्ता करार निष्पादित करण्याची कामे प्रलंबित आहेत.

मक्ता भुभागांच्या मक्ता भुईभाडे, विविध अधिमूल्ये व अनुक्रमे महानगरपालिका मालमत्तांच्या व मक्त्याने दिलेल्या भुभागांच्या पुनर्विकासातून भांडवली मूल्य / एकवेळ अधिमूल्य इत्यादी माध्यमांतून रु. ३९२/- कोटी इतका महसूल मिळाला आहे.

## ५. मक्ता भूभाडे/ अतिरिक्त भूईभाडयाची संगणकीय आर.ई. प्रणालीद्वारे मागणी व वसूली :

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) खात्यांतर्गत मक्त्याने दिलेल्या भूभागांची दिनांक ०१ एप्रिल २०२३ पासून भूभाडे/अतिरिक्त भुईभाडयाची मागणी व वसूली संगणकीय आर.ई. प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. तसेच, भविष्यात मक्तेदारांना ऑनलाईन भूभाडे/अतिरिक्त भूभाडयाचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## ६. सहकारी गृहनिर्माण संस्था

महानगरपालिकेच्या दि.३०.०९.१९६९ पूर्वीच्या भाडेतत्त्वावरील मालमत्तांचा 'विकास नियंत्रण नियमावली, १९९१' व 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४' च्या विनियम ३३(७) व ३३(९) अन्वये पुनर्विकास करण्यात येतो. आजपर्यंत १४८ प्रस्तावांना सुधार समिति / महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त झाली आहे. मंजूर १४८ प्रस्तावांपैकी ०७ प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत व ०१ प्रस्ताव रद्द करण्याची कार्यवाही प्रस्तवित आहे. ५४ प्रस्ताव पूर्ण होऊन पुनर्विकास योजनेतील भाडेकरुंचे नव्याने पुनर्विकसित इमारतीत पुनर्वसन करण्यात आलेल असून उर्वरित ८६ योजना विविध स्तरांवर कार्यान्वित आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेला अशा पुनर्विकास योजनेतून भांडवली मूल्यांच्या स्वरुपात महसूल प्राप्त होतो. आजमितीस एकूण रु. ११५९.१८ कोटी इतका महसूल प्राप्त झालेला आहे. प्रचलित धोरणानुसार वसूल करावयाचे बाकी असलेले भांडवली मूल्य प्रत्यक्षात भरणा करण्याच्या दिनांकास प्रचलित असलेल्या मुद्रांक शुल्क सिध्दगणक दरानुसार वसूल करण्यात येईल.

## ७.कर्मचारी निवासस्थाने

मालमत्ता खात्यामार्फत कर्मचारी निवासस्थाने परिरक्षित केली जात असून त्यांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रथम श्रेणी ते चतुर्थ श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाटप केले जाते.

दि. ०१.०१.२०१६ पासून (सातवा वेतन आयोग लागू झाल्यापासून) महानगरपालिका कर्मचाऱ्यांना, मालमत्ता खात्याच्या अखत्यारितील भाडे माफ निवासस्थान देऊन, त्याऐवजी शासन निर्णय क्रमांक घभाव-२०१०/प्र.क्र.०४/ सेवा-५, दि.१९.०४.२०११ व शासन निर्णय क्रमांक घभाव-२०२२/प्र.क्र.०७/२०२२ सेवा-५,दि.१९.०१.२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार, अनुज्ञप्ती शुल्क लागू करणेबाबत, माननीय महानगरपालिका आयुक्त यांची दि. ०९.०३.२०२४ रोजी आणि प्रशासक (स्थायी समिति) यांचा दि. १३.०३.२०२४ चा ठराव क्र. २६६१ आणि प्रशासक (महानगरपालिका) यांचा दि. १३-०३-२०२४ चा ठराव क्र. १७२१ अन्वये मान्यता प्राप्त करुन, त्या अनुषंगाने दि. २७.०३.२०२४ रोजी परिपत्रक क्रमांक ३५/२०२३-२४ पारीत करण्यात आलेले आहे.

## ८.रिक्त भूभाग

महानगरपालिकेच्या जागेवर एकूण ३,६६८ रिक्त भूभागधारक आहेत.

रिक्त भूभागाचे हस्तांतरण होत नाही. मात्र रिक्त भूभाग रद्द करुन महानगरपालिकेच्या सुधारित धोरणानुसार रिक्त भूगाग धारक / ताबेदारांना महानगरपालिकेच्या अभिलेखावर घेण्यात येते.

## ९. प्रकल्प बाधित व्यक्ती

'विकास नियंत्रण नियमावली, १९९१' व 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४' च्या विनियम ३३(१०) मधील ३.११ अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या पी.ए.पी. सदनिका अथवा इतर कोणत्याही प्राधिकरणामार्फत, खाजगी विकासकामार्फत प्राप्त होणाऱ्या सदनिका महानगरपालिकेच्या नागरी प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी महानगरपालिकेतर्फे संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने वाटप करण्यात येतात.

महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत अद्यापपर्यंत २५,०३० प्रकल्पग्रस्तांना पी.ए.पी. सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच, सदर प्रकल्पबाधितांना आर्थिक मोबदला देण्याचे धोरण आहे. जेणेकरुन धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारती, महानगरपालिका भाडेकरुंमार्फत रिक्त करण्यास होणारा विलंब व अत्यावश्यक सार्वजनिक प्रकल्प राबविण्यास होणारा विलंब टाळला जाईल, परिणामतः वाढणारी प्रकल्पाची किंमत टाळता येईल.

## १२) बृहन्मुंबई महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्र :

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विद्युत धुलाई केंद्र हे सन १९६५ मध्ये भोईवाडा, परेल येथे उभारलेले एकमेव धुलाई केंद्र असून ते शहरातील व उपनगरातील सर्व महापालिका रुग्णालये व व वैद्यकिय संस्थांना धुलाई सेवा पुरविते.

या विद्युत धुलाई केंद्राची सुमारे १६,००० मलीन कपडे प्रतिदिनी धुण्याची क्षमता असून, येथे शास्त्रोक्त पध्दतीने आधुनिक संयंत्रांच्या सहाय्याने वाफ आणि रसायनांनी मलिन कपडयांचे निर्जंतुकीकरण करुन रुग्णालयांना धुलाई सेवा पुरविली जाते.

# अग्निशमन दल





अग्निशमन दलाची सुसज्ज स्नॉर्किल



अग्निशमन दल कवायत

# अग्निशमन दल

**१. प्रस्तावना :**

आगीपासून तसेच, इतर दुर्घटनांमध्ये जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे एक बंधनकारक कर्तव्य आहे. अग्निशमन दलाच्या स्वरुपात संघटित अग्निसंरक्षण सेवा उपलब्ध नसल्यास कोणत्याही शहरातील जीवित व मालमत्ता सुरक्षित असणार नाही.

**२. उद्दिष्टे :**

आगीपासून जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे हे अग्निशमन दलाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. तसेच, इमारती कोसळणे, बुडणाऱ्यांना वाचविणे, मोटारींचे व आगगाड्यांचे अपघात, आम्लयुक्त पदार्थ, तेल आणि रासायनिक द्रव्ये इत्यादी सांडल्यामुळे होणारे अपघात, पूर व भूकंप ह्यांसारख्या नैसर्गिक आपत्ती तसेच, संकटात सापडलेले प्राणी व पक्षी ह्यांची सुटका करणे इत्यादी आणीबाणीसदृश्य प्रसंगी, तितक्याच तत्परतेने व निष्ठेने कर्तव्य बजाविणे हे देखील ह्या दलाचे कर्तव्य आहे. अग्निशमन दलाची सेवा मुंबईमध्ये अहोरात्र विनामूल्य उपलब्ध असते.

**३. अग्निशमन दलाला कसे पाचारण करावे :**

आणीबाणीच्या प्रसंगी खालील दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधून अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करता येते.

१) १०१

२) २३०८५९९१

३) २३०८५९९२

४) २३०८५९९४

तसेच, कोणतीही आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास, दूरध्वनी क्रमांक १०० वर पोलिस नियंत्रण कक्षाला व दुरध्वनी क्र. १९१६ वर महानगरपालिका आपात्कालीन नियंत्रण कक्षाला तत्संबंधातील माहिती कळविता येते. आपात्कालीन नियंत्रण कक्षामार्फत पोलिसांकडून नंतर त्याची वर्दी अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाकडे दिली जाते. त्याचप्रमाणे नागरिक नजीकच्या अग्निशमन केंद्रात व्यक्तीशः जाऊन माहिती कळवू शकतात.

**४. संघटनात्मक व्यवस्थापन :**

अग्निशमन दलाचे मुख्यालय भायखळा येथे असून एकूण ३५ अग्निशमन केंद्रे आहेत आणि एकूण १९ लघु अग्निशमन केंद्रे खालील प्रमाणे कार्यरत आहेत.

| | शहर | पूर्व उपनगरे | पश्चिम उपनगरे |
|---|---|---|---|
| अग्निशमन केंद्रे | १५ | ०७ | १३ |
| लघु अग्निशमन केंद्रे | ०४ | ०८ | ०७ |

तसेच, महानगरपालिकेच्या २२ विभाग कार्यालयात जलद प्रतिसाद वाहने देखील तैनात आहेत.

**५. प्रादेशिक समादेश केंद्रे :**

मुंबईच्या नागरिकांना अग्निशमन दलाची सेवा अधिक जलद व सक्षमपणे पुरविण्यासाठी त्याचप्रमाणे उत्कृष्ट प्रशासकीय व दुर्घटनास्थळी प्रत्यक्ष कार्यवाहीच्या परिणामकारक नियंत्रणासाठी एकूण ०६ प्रादेशिक समादेश केंद्रे निर्माण करुन खालीलप्रमाणे कार्यान्वित झालेली आहेत.

| शहर | पूर्व उपनगरे | पश्चिम उपनगरे |
|---|---|---|
| भायखळा | विक्रोळी | बोरीवली |
| वडाळा | मानखूर्द | मरोळ |

**६. संपर्क व परस्पर सहाय्य :**

बृहन्मुंबई महानगरपालिका आपात्कालीन कक्ष, मुंबई पोलिस, वायुसेना, नौदल, तटरक्षक दल, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण दल, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, अदाणी इलेक्ट्रीसिटी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि मुंबई बंदर विश्वस्त, कारखान्यांचे परस्पर मदत गट, इत्यादीं सारख्या अत्यावश्यक सेवांशी अग्निशमन दलाचा सतत समन्वय असतो.

**७. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा :**

मुंबई अग्निशमन दलाच्या ताफ्यातील वेगवेगळया प्रकारची अत्याधुनिक अग्निशमन आणि अग्निविमोचन वाहने तसेच, आधुनिक संदेशवहन यंत्रणा इत्यादींमार्फत अग्निशमन व अग्निविमोचनाचे काम चालते. मुंबई शहरातील अरुंद रस्त्यावरुन किंवा गल्ली बोळातून अग्निशमन वाहने नेणे सोयीचे व्हावे याकरीता **११ क्विक रिस्पॉन्स मल्टिपर्पज व्हेईकल** लघु अग्मिशमन केंद्रांमध्ये कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभाग स्तरावर आणखी २२ जलद प्रतिसाद वाहने देखील तैनात आहेत.

मुंबईतील नागरीकांना प्रभावीपणे अग्निशमन सेवा पुरविण्याकरीता नवीन विकास आराखडा २०३४ मध्ये अतिरिक्त २६ अग्निशमन केंद्रे प्रस्ताविण्यात आलेली आहेत. मुंबई अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाचे कामकाज अधिक प्रभावीरित्या होऊन मुंबईतील जनतेला अधिक सक्षमपणे सेवा देता यावी याकरिता नियंत्रण कक्षात **'इंटिग्रेटेड कमांड ऍ़ण्ड कंट्रोल सिस्टिम'** बसविण्यात आली आहे. आपात्कालीन प्रसंगांमध्ये बिनतारी संदेश प्रक्षेपीत करण्यासाठी मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन डिपार्टमेंट ऑफ टेलिकॉम वायरलेस कमिशन, नवी दिल्ली यांच्या धोरणांशी सुसंगत अशी अत्याधुनिक डिजीटल मोबाईल रेडिओ प्रणालीचा उपयोग करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वॉटर मिस्ट कार्यपध्दतीवर चालणारी अग्निशमन वाहने खरेदी करण्यात आली आहेत. आग विझविताना अग्निशामकास कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागते. तर काही प्रसंगी जीवावरही बेतू शकते. अशाप्रसंगी अत्याधुनिक रौबोटचा आग विझविण्याकरीता उपयोग होऊ शकतो. त्याकरीता दोन रोबोटची खरेदी करण्यात आलेली आहे. मुंबई अग्निशमन दलामार्फत मोबाईल वॉटर ट्रान्सपोर्ट सिस्टीम वाहने खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा उपयोग अग्निशमनाकरीता लागणारे पाणी जवळील ०३ कि. मी. अंतरावरील उपलब्ध साठयापासून लवकरात लवकर प्राप्त करण्याकरीता केला जातो. तसेच ५५ मी. उंचीचे वॉटर टॉवर वाहन देखील खरेदी करण्यात आले आहे. या वाहनाचा उपयोग उत्तुंग इमारतीतील आग विझविण्याकरीता त्याचप्रमाणे झोपडपट्टी परिसर व दाटीवाटीच्या परिसरात अग्निशमनाकरीता होत आहे. प्रतिसाद वेळ कमी करण्याच्या दृष्टिने व आग प्राथमिक अवस्थेत असतांना त्यावर त्वरीत नियंत्रण मिळविण्याकरीता मुंबई अग्निशमन दलामार्फत २४ फायर बाईक देखील घेण्यात आल्या आहेत. उत्तुंग इमारतींची वाढणारी संख्या लक्षात घेता, विशिष्ट प्रकारची हायराईझ फायर फायटिंग व्हेईकल घेण्यात आली आहेत. नवीन तंत्रज्ञानावर आधारित कम्बाईंड फायर फायटिंग कम रेस्क्यू व्हेईकल विथ हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म हे वाहन खरेदी करण्यात येत आहे. तसेच, श्वसन उपकरण वाहन विथ एअर कॉम्प्रेसर हे वाहन देखील खरेदी करण्यात आले आहे. जवानांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक स्वसंरक्षण उपकरण संच खरेदी करण्यात आले आहेत. महानगरपालिकेने मुंबईच्या सागरी किना-यावर असलेल्या सहा चौपाटयांवर नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी जीव रक्षक तसेच जेटस्की व बोटी देखील तैनात केलेल्या आहेत व अग्निशमन दल ही जबाबदारी देखील सांभाळत आहे.

**८. प्रशिक्षण :**

अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याचे कार्य वडाळा येथील प्रशिक्षण केंद्रामार्फत पार पाडले जाते. विविध आस्थापनांच्या खास विनंतीवरुन कारखाने, उपाहारगृहे, कार्यालये, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, उत्तुंग इमारती व विशेष इमारतींच्या आस्थापना यांच्या कर्मचाऱ्यांना अग्नि-प्रतिबंध आणि अग्निशमन ह्याबाबतचे प्राथमिक प्रशिक्षण मुंबई अग्निशमन दलातर्फे दिले जाते. नागपूर येथील राष्ट्रीय अग्निसेवा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकांचा समावेश असलेले प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिले जातात.

मुंबई अग्निशमन दलात श्वसन उपकरणांच्या सरावाकरिता बी. ए. गॅलरी उभारण्यात आली आहे. वडाळा येथील अग्निशमन केंद्रामध्ये अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले आहे व त्या ठिकाणी अधिकारी व जवान यांना उजळणी प्रशिक्षण दिले जाते. सन २०२३ मध्ये अग्निशामक पदासाठी महिला व पुरुष उमेदवारांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती व निवड झालेल्या ४६८ उमेदवारांचे सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण होऊन जानेवारी महिन्यात यशस्वी उमेदवारांना सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे व उर्वरीत २६८ उमेदवारांच्या तुकडीचे प्रशिक्षण सुरु असून सहा महिन्यांच्या कालावधी अंती त्यातील यशस्वी उमेदवारांना देखील सेवेत सामावले जाईल.

**९. अग्निशमन सेवा सप्ताह :**

दि.१४ एप्रिल १९४४ रोजी **'एस्. एस्. फोर्ट स्टिकीन'** ह्या जहाजावर स्फोट होऊन उसळलेल्या आगीत जे शूर अधिकारी आणि जवान धारातीर्थी पडले त्याचप्रमाणे, त्यानंतर आजतागायत या मुंबईकरांचे आग व अन्य आपत्ती पासून संरक्षण करण्याचे आपले कर्तव्य बजावित असताना शौर्य, आत्मसंयमन व त्यागाची परंपरा जोपासणारे मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी व जवान यांचे स्मरण व त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दरवर्षी दिनांक १४ एप्रिल रोजी प्रार्थना सभा आयोजित करुन **'अग्निशमन सेवा दिन'** पाळण्यात येतो. अग्निप्रतिबंधासंबंधी लोकशिक्षण देण्यासाठी, दिनांक १४ ते २० एप्रिल ह्या सप्ताहात निरनिराळ्या स्पर्धा, व्याख्याने, प्रात्यक्षिके तसेच आकाशवाणीवर व दूरदर्शनवर मुलाखती आणि इतर कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच, प्रत्येक विभागात प्रदर्शनेही आयोजित करण्यात येतात.

**१०. अग्निसुरक्षेबाबत जागृती :**

आगीमुळे होणारी वित्त व जीवित हानी टाळण्यासाठी लोकांमध्ये अग्निसुरक्षेविषयी जनजागृती करणे अत्यावश्यक आहे. या वर्षी प्रथमच अग्निसुरक्षेविषयी जनजागृती करणारी २,५०,००० भित्तिपत्रांची छपाई करण्यात आली असून विविध इमारती, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये या ठिकाणी लावण्यात येत आहेत. मुंबई अग्निशमन दलातर्फे नागरिकांना अग्निस्वयंसेवक प्रशिक्षण देण्यात येते. अग्निसुरक्षेत नागरिकांचा सहभाग देखील महत्त्वाचा असल्याने अनेक सामाजिक व स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून केवळ अग्निसुरक्षा सप्ताहच नाही, तर वर्षभर विविध प्रकारे अग्नीसुरक्षे संबंधी व्याख्याने, प्रात्याक्षिके, रॅली असे उपक्रम राबविण्यात येतात. मागील अनेक वर्षात नागरिकांसाठी विनामूल्य राबविण्यात आलेल्या **'अग्निरक्षक स्वयंसेवक '** या संकल्पनेतून आजमितीस ५००० पेक्षा जास्त स्वयंसेवक प्रशिक्षित करण्यात आलेले आहेत. हे अग्निरक्षक स्वयंसेवक केवळ अग्निशमनच नव्हे तर अग्निशमन दल प्रत्यक्ष दुर्घटनास्थळी पोहोचेपर्यंत प्राथमिक काळजी घेणे व तद्नंतर गर्दीचे नियंत्रण व नियोजन करणे या सारख्या बाबींमध्ये अग्निशमन दलास मदत करत असतात. एकुणच सर्वसामान्यांचा केवळ अग्निसुरक्षाच नव्हे, तर अनेकविध दुर्घटनांच्या संवेदनशील व गंभीर परिस्थितीतील असा प्रशिक्षीत प्रतिसाद ह्या दुर्घटनेची गंभिरता व व्याप्ती सिमीत ठेवण्यास अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

बृहन्मुंबईतील उंच इमारतींची वाढती संख्या व त्याचे धोके लक्षात घेता, नामनिर्देशित अधिकारी हे विविध अग्निशमन केंद्राच्या अखत्यारीतील उंच इमारती व अन्य व्यावसायिक आस्थापनांच्या इमारतीतील अग्निसुरक्षेच्या साधन सामुग्रीची अग्निसुरक्षेच्या दृष्टीकोनातून नियमित तपासणी करून **'महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६'** नुसार अधिनियमांची अंमलबजावणी करीत आहे. विविध प्रकारच्या आगी आणि इतर तत्सम

आपत्तींना समर्थपणे तोंड देण्याकरिता अग्निशमन दल विविध उपाययोजना अंगिकारुन स्वतःला सक्षम करीत आहे. सन २०१८ पासून महानगरपालिकेमध्ये अग्निसुरक्षापालन कक्षाची स्थापना संबंधित विभाग कार्यालयामध्ये सहाय्यक आयुक्त यांच्या अधिपत्याखाली करण्यात आलेली आहे. सदर कक्षामार्फत विविध आस्थापनांची दैनंदिन तपासणी करण्यात येते. या कक्षात संबंधित विभाग कार्यालयातील अधिकारी व मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी ह्यांच्यामार्फत संयुक्त तपासणी करून ज्या आस्थापनांनी अग्निसुरक्षेबाबत योग्य ती पूर्तता केलेली नाही, अशा आस्थापनांवर कारवाई केली जाते.

# आपत्कालीन नियंत्रण कक्ष





आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, महानगरपालिका मुख्यालय



आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्ष

# आपत्कालीन नियंत्रण

**आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभाग :-**

बृहन्मुंबईतील आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता सन १९९९ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली. अत्याधुनिक सेवासुविधांनी सुसज्ज हा विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर कार्यान्वित आहे.

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण :-**

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ (२००५ चा ५३) चे कलम २५ मधील (१), (२) आणि (४) या तरतुदीन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार आणि महाराष्ट्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियम २ नुसार वर्ष २०११ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महानगरपालिका आयुक्त यांची पदसिध्द अध्यक्ष म्हणून नियुक्ती करुन बृहन्मुंबई आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

सन २०१८ मध्ये माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार आणि शासन निर्णयान्वये मुंबई शहर व मुंबई उपनगरांसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ अतिरिक्त महापालिका आयुक्त यांची मुंबई शहर व मुंबई उपनगरांसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येते.

**आपत्कालीन व्यवस्थापन विभागाची मुख्य कार्ये :**

१) आपत्कालीन व्यवस्थापनाशी संबंधित सर्व बाबींसाठी एकाच ठिकाणाहून स्त्रोत.
२) धोक्यांची तीव्रता व जोखीम मूल्यमापन.
३) प्रतिबंध व सुसज्जता.
४) हानीची तीव्रता कमी व्हावी या दृष्टीने उपाययोजना करण्याकरिता संबंधीत यंत्रणांसमवेत समन्वय साधणे.
५) प्रतिसाद.
६) मदत व पुनर्वसन कामी संबधित यंत्रणांसमवेत समन्वय साधणे.
७) प्रशासन व स्थानिक कक्ष / क्षेत्रीय पथके यांच्या दरम्यान निर्देश आणि नियंत्रण संस्था म्हणून कार्य.
८) नागरिकांना पूर्वसूचना देण्याकरिता समन्वय साधणे.
९) आपत्कालीन परिस्थितीमध्ये अन्न व पाणी यांची व्यवस्था करण्याकरिता समन्वय साधणे.
१०) आपातग्रस्त अडकलेल्या आणि जखमी व्यक्तींना वाहून नेण्याची व्यवस्था करण्याकरिता समन्वय साधणे.
११) आपत्कालीन स्थितीत गंभीर जखमी व्यक्तींसाठी तातडीने वाहन व्यवस्था करण्याकरिता समन्वय साधणे.
१२) तात्पुरते निवारे उभारण्यासाठी समन्वय साधणे.
१३) अशासकिय सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत समन्वय साधणे.

**आपत्कालीन व्यवस्थापन विभागाची उद्दिष्टे :**

१) कौणत्याही आपत्ती दरम्यान जलद व प्रभावी प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने समन्वय साधणे.
२) प्रतिसाद देणा-या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय सुधारणे.
३) आपत्तीशी संबंधित माहिती नागरिकांना पुरविण्याकरिता समाजमाध्यमांचा वापर जनसंपर्क अधिकारी यांच्यामार्फत करणे.

४) सर्व स्तरांवरील सुसज्जतेकरिता प्रोत्साहन देणे.

५) आपत्कालीन परिस्थितीतील सर्व बाधितांना सहाय्य करण्याकरिता संबंधित यंत्रणांना प्रोत्साहित करणे.

६) आपत्ती व्यवस्थापनात कार्यरत विविध यंत्रणांच्या अधिका-यांना व नागरिकांना प्रशिक्षण देणे.

**आणीबाणी कृती केंद्र (E.O.C.):-**

आपत्कालीन व्यवस्थापन विभाग वर्षाचे ३६५ दिवस २४ तास कार्यरत असतो. सदर विभाग हा प्रशासन व स्थानिक यंत्रणा /क्षेत्रीय पथके यांच्या दरम्यान समादेशन आणि नियंत्रण यंत्रणा म्हणून कार्य करतो. आपत्कालीन व्यवस्थापनाशी संबंधित सर्व बाबी या एका ठिकाणाहून उपलब्ध होतात. आपत्ती दरम्यान जलद आणि प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी विविध यंत्रणांशी येथून समन्वय साधला जातो.

१. थेट संपर्क दूरध्वनी सुविधा.

२. अद्ययावत् घटनांच्या बातम्यांची माहिती असावी म्हणून प्रमुख वृत्तवाहिन्यांचे अवलोकन करण्यासाठी दूरचित्रवाणी संच.

३. उपलब्ध संदेशवहन व्यवस्था कोलमडल्यास हॅम रेडिओचा पर्यायी संदेशवहन यंत्रणा म्हणून वापर करण्यात येतो.

४. १९१६ या मदत सेवा क्रमांकाच्या ३० सेवा (हंटिंग सुविधेसह) नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. नागरिक मोठया अथवा किरकोळ दुर्घटना तसेच आग, भूकंप, बॉम्बस्फोट इत्यादींबाबत तक्रारी या क्रमांकावर करु शकतात.

५. २४ प्रशासकीय विभाग नियत्रंण कक्ष, पर्यायी नियंत्रण कक्ष, ३ मोठी व २ उपनगरीय रूग्णालये आणि २८ महत्वाच्या बाह्य यंत्रणा यांना जोडणाऱ्या ५८ हॉटलाईन्स. शहर व उपनगरातील सद्यपरिस्थितीविषयी अद्ययावत् माहितीचे या विविध यंत्रणांसोबत आदान प्रदान करण्यात येते.

६. आपत्ती व्यवस्थापन कृतींवर देखरेख करण्यासाठी ६,२०० मि. मी. लांब व १,७४४ मि. मी. उंचीची एक 'व्हिडीओ वॉल' उभारण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी बृहन्मुंबईत लावलेल्या १२,००० पेक्षा जास्त सी. सी. टी. व्ही. कॅमेरे यांच्यामार्फत होणारे थेट प्रक्षेपण या 'व्हिडीओ वॉलवर' पाहता येते.

७. आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत जानेवारी २०२२ मध्ये डिजीटल मोबाईल रेडीओ (डी.एम.आर.) ही प्रगत संप्रेषण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. ही प्रणाली २४ विभागीय नियंत्रण कक्ष, ३७ बाहय यंत्रणा आणि महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांच्या वाहनांवर प्रस्थापित करण्यात आली असून या अंतर्गत एकूण ३२६ डी.एम.आर. संच बसविण्यात आले आहेत. या प्रणालीमध्ये ब्रॉडकास्ट कॉल, इमर्जन्सी कॉल, प्री रेकॉर्डेड मेसेजेस, इंटेलिजेंट ऑडिओ, ब्लू टूथ /वाय-फाय, मॅन डाउन अँड लोन वर्कर, सुरक्षित एनक्रिप्टेड व्हॉईस कम्युनिकेशन, उत्तम स्पेक्ट्रम कार्यक्षमता, इंटिग्रेटेड व्हॉइस आणि डेटा (स्पीच टू टेक्स्ट आणि मजकूर ते भाषण), प्रति फ्रिक्वेन्सी स्पेक्ट्रम दुप्पट क्षमता, दीर्घकाळ चालणारी बॅटरी, ग्रुप कॉलची सुविधा, वैयक्तिक कॉल, डेटा ॲप्लिकेशन सक्षम करणे, उदा. डिस्पॅचर, जी.पी.एस. लोकेशन ट्रॅकिंग, जिओ फेन्सिंग, डेटा आणि व्हाईस लॉगर, ओव्हर द एअर प्रोग्रामिंग, टेक्स्ट मेसेजिंग इ. चा समावेश आहे.

**आपत्कालीन व्यवस्थापन विभागात खालील प्रकारच्या तक्रारींची नोंदणी केली जाते :**

३२ प्रकारच्या मुख्य विविध मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्ती ज्या मुंबई व उपनगरांस धोकादायक ठरु शकतात, अशा आपत्तींचे एकूण १०२ उप मुख्य आपत्तींमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये लहान मोठया दुर्घटना, दरड कोसळणे, झाडे पडणे किंवा अनधिकृत वृक्षतोड, पाणी तुंबणे, घर पडणे, शॉर्टसर्किट, पूरस्थिती, भूकंप, बॉम्बस्फोट इ.

समावेश आहे. सदर तक्रारींची नोंद केल्यानंतर योग्य त्या यंत्रणांकडे आवश्यक मदत कार्याकरिता कळविले जाते.

**स्वयंचलित हवामानदर्शक संयंत्र (Automatic Weather Stations) :**

- संपूर्ण मुंबई महानगरात विविध ठिकाणी १२०स्वयंचलित हवामान दर्शक संयंत्रे उभारण्यात आली आहेत.
- हवामानाची वास्तविक माहिती दर १५ मिनिटांनी संकेतस्थळ व ॲपवर अद्ययावत करुन नागरिकांना पुरविली जाते.
- या माहितीचे संनिरीक्षण, विश्लेषण केले जाते आणि त्या आधारे आवश्यकतेनुसार धोक्याचे इशारे दिले जातात.

**प्रवाह पातळी संवेदक (Flow Level Sensors) :-**

- नद्या आणि तलावांमधील पाण्याच्या पातळीची सद्यस्थिती प्राप्त व्हावी ह्याकरिता प्रवाह पातळी संवेदक (Flow Level Sensors) स्थापित करण्यात आले आहेत. ही संयंत्रे थेट आपत्ती नियंत्रण कक्षास अद्ययावत् वास्तविक माहिती पुरवतात.
- या संवेदकांमुळे परिसरातील सखल भागातून नागरिकांचे स्थलांतर वेळीच करणे सोपे जाते. प्रवाह पातळी संवेदक (Flow Level Sensors) दहिसर, पोईसर, वाकोला, मिठी, ओशिवरा या नद्या व पवई, विहार तलाव येथे स्थापित करण्यात आले आहेत.

**आपत्ती व्यवस्थापन संकेतस्थळ : -**

'dm.mcgm.gov.in' या संकेतस्थळावर पुढीलप्रमाणे माहिती दर्शविली जाते :-

भरती-ओहोटी वेळापत्रक, भारतीय हवामान खात्याकडून प्राप्त हवामान अंदाज, दर १५ मिनिटांनी थेट अद्ययावत होणारे हवामानाचे परिमाण, रस्ते वाहतुकीची सद्यस्थिती, उपनगरीय रेल्वे वाहतूक सद्यस्थिती, हवाई वाहतूक सद्यस्थिती. महत्त्वाचे संपर्क क्रमांक.

**आपत्ती व्यवस्थापन मोबाईल ॲप :-**

आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना आपत्तींमध्ये प्रतिसाद देण्यासाठी अँड्रॉइड व आय.ओ.एस. प्रणालीवर उपलब्ध असणारे **Diaster Management BMC** हे मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिले आहे. हे ॲप पावसाळी परिस्थितीची अद्ययावत् माहिती तसेच बाधीत व्यक्तीस ती ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणाच्या ५०० मीटरच्या परिसरातील उपलब्ध मदतीचे संपर्क क्रमांक प्राप्त करुन देते.

भ्रमणध्वनीधारक ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या ५०० मीटरच्या परिसरातील रुग्णालये, अग्निशमन केंद्र, पोलीस ठाणे तसेच, महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक त्यास उपलब्ध होणार असून, त्यावर क्लिक केल्यास संबंधित क्रमांकाशी त्वरीत संपर्क साधणे शक्य होणार आहे.

**आणीबाणी मदत कार्ये (यंत्रणा) (E.S.F.) :–**

- आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचा अविभाज्य भाग म्हणून 'आणीबाणी मदत कार्ये' (E.S.F.) या संकल्पनेअंतर्गत १४ आणीबाणी मदत यत्रंणा निश्चित करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीतील कार्यामध्ये पूर्वनियोजन व सुसज्जता, आपत्तीप्रसंगी प्रतिसाद व आपत्तीनंतर मदत व पुनर्वसन यांचा यात समावेश आहे.
- एखाद्या मोठया आपत्तीनंतर किंवा जिथे तात्काळ प्रतिसादाची आवश्यकता आहे, अशा आणीबाणीच्या परिस्थितीत, संबंधित प्रमुख यंत्रणा अशा प्रसंगातील प्राथमिक गरजा शोधून काढेल आणि इतर पूरक यंत्रणा व आणीबाणी मदत प्रतिनिधी यांच्या सहाय्याने कार्यवाही करुन मुंबईतील संबंधित बाधित परिसरात संसाधने तैनात केली जातील.
- सामान्य काळात प्रत्येक मदत यंत्रणा नियमितपणे गृहित नियोजनांचा आढावा घेऊन, रंगीत तालीम व 'टेबलटॉप' सराव करुन, सुनिश्चित कार्यप्रणालींची निश्चिती व पुनरावलोकन करुन योग्य नियोजन करते व आणीबाणी परिस्थितींसाठी नेहमी सुसज्ज राहते.

❋ पूर्वतयारी व नियोजन या दोन्ही कृती आवश्यक आहेत. ज्यामुळे योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होते. परिणामी आपत्ती काळातील धोका कमी करण्यासाठी योग्य दुवे शोधण्यास मदत होते.

**भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारीत समादेशन व नियंत्रण पध्दती (G.I.S.) :**

आपत्ती व्यवस्थापन प्रतिक्रियाशीलतेकडून आता सक्रियशील स्वरुप आणि दृष्टिकोनाचा अवलंब करण्याकडे वाटचाल करीत आहे. म्हणूनच आधुनिकीकरणाच्या दिवसात आपत्तीपूर्व जोखीम घट हा सुध्दा एक महत्त्वाचा पैलू आहे.

गतकाळातील आपत्तींनी अंदाज, पूर्वसूचना त्याचसोबत प्रतिबंध, उपशमन, सज्जता, नियोजन, मदत आणि पुनर्वसन यांची आपत्कालीन व्यवस्थापनातील भूमिका स्पष्ट केली आहे. अशी प्रणाली विकसित करण्याकरिता भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारीत तंत्रज्ञान सर्वोत्तम माध्यम प्रदान करते. भौगोलिक माहिती तसेच सामाजिक-आर्थिक माहिती यांचा एकत्रित विचार करुन योग्य निर्णय घेण्यासाठी व आपत्ती व्यवस्थापन कामामध्ये वैज्ञानिकदृष्ट्या आपत्ती निवारण्याकरीता मदत करणारी अशी ही प्रणाली आहे.

आपत्कालीन व्यवस्थापन विभागास खालील नमूद बाबींकरिता सहाय्य करणे हे भौगोलिक माहिती प्रणाली विकसित करण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे :-

१) अंदाज आणि पूर्व इशारा.

२) आपत्ती पूर्व जोखीम घट, नियोजन आणि सुसज्जता.

३) निर्णय सहाय्यक प्रणाली.

४) नुकसानीचे संकलन आणि मदत व्यवस्थापन.

भौगोलिक माहिती प्रणाली ही विविध बाबींवर वैविध्यपूर्ण माहिती एकत्र करुन निर्माण झालेल्या परिस्थितीत योग्य निर्णय घेण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभागाला मदत करते.

१) विविध धोक्यांमध्ये विविध स्तरापर्यंत किती हानी पोहोचू शकते, हे दर्शवणारे सुक्ष्म आणि स्थूल पातळी असे दोन्ही प्रकारचे नकाशे आपत्कालीन व्यवस्थापन विभागास तयार करणे शक्य होते.

२) अबाधित राहणारी ठिकाणे किंवा तुलनेने सुरक्षित ठिकाणे शोधली जाऊ शकतात.

३) भूपृष्ठावरील सामान्य संपर्कामध्ये अडचणींचे प्रसंग उद्‌भवल्यास, मदत शिबीरे आणि महत्त्वाची ठिकाणे यांच्यापर्यंत पोहेचण्यासाठी पर्यायी मार्ग शोधले जाऊ शकतात.

४) सुलभ अशा मदत व बचाव कार्याचे नियोजन योग्यरित्या करुन ते पार पाडता येऊ शकते.

**शहर आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र (C.I.D.M.) :**

महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षात काही समस्या उद्‌भवल्यास, समन्वय कार्य अबाधितपणे सुरु रहावे यासाठी पर्यायी नियंत्रण कक्ष (Backup Control Room) परळ येथील शहर आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीत कार्यरत करण्यात आला आहे. सदर पर्यायी नियंत्रण कक्ष मुख्य नियंत्रण कक्षाप्रमाणेच हॉट लाईन्स, बिनतारी यंत्रणा, हॅम रेडिओ, व्हिडीओ वॉल व आणीबाणी मदतकार्य यंत्रणा यांनी जोडलेला आहे. आपत्कालीन प्रसंगादरम्यान आपत्तींचे व्यवस्थापन शास्त्रोक्त सुनिश्चित अशा पध्दतीने व्हावे, आपत्कालीन परिस्थिती योग्यप्रकारे हाताळली जावी तसेच, आपत्कालीन व्यवस्थापनाची जनजागृती करुन समाजातील विविध घटकांना जसे की, महानगरपालिका, शासन, खाजगी कंपन्या, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, वैद्यकिय अधिकारी, पोलीस इत्यादींना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रथम प्रतिसादक म्हणून हया संस्थेतून नियमितपणे प्रशिक्षण दिले जाते.

आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त, आपत्तीविषयक थ्री-डी चित्रफिती दाखवता येतील असे थ्री-डी सभागृह, शैक्षणिक दालन हया संस्थेत विकसित करण्यात आले आहे. विविध

आपत्तीं संदर्भात सखोल माहिती देण्याकरिता आर्ट गॅलरीची उभारणी करण्यात आली असून यामध्ये विविध परस्पर संवादी प्रतिमा, प्रतिकृती, छायाचित्रे, भित्तीचित्रे इत्यादी प्रदर्शित करण्यात आले आहेत.

**आपत्ती, अग्निशमन व औद्योगिक सुरक्षा व्यवस्थापनाचा पदव्युत्तर पदविका पाठ्यक्रम (P.G.D.D.F.I.S.M.) :**

आपत्कालीन व्यवस्थापनाचे महत्त्व व भविष्यातील या विषयाची वाढत जाणारी व्याप्ती लक्षात घेता, नागरिक तसेच, शासकीय यंत्रणांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयाबाबतची अधिकाधिक माहिती व त्याबाबतचे योग्य प्रशिक्षण प्राप्त व्हावे, विविध औद्योगिक संस्थांमध्ये, कारखान्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन योग्यप्रकारे होऊन त्यायोगे नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीमुळे होणारी वित्त व जिवीत हानी कमीत कमी व्हावी याकरिता आपत्कालीन व्यवस्थापनाचा **'आपत्ती, अग्निशमन व औद्योगिक सुरक्षा व्यवस्थापनाचा पदव्युत्तर पदविका पाठ्यक्रम'** (P.G.D.D.F.I.S.M.) हा एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका पाठ्यक्रम बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली गरवारे इन्स्टिट्युट ऑफ करीअर एज्युकेशन अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट संस्था (G.I.C.E.D.) यांच्यामार्फत संयुक्तरित्या सुरु करण्यात आला आहे.

**शहर आपत्ती प्रतिसाद पथक (C.D.R.F.) :**


राष्ट्रीय पातळीवर आधारीत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक (N.D.R.F.) व राज्य पातळीवर आधारीत राज्य आपत्ती प्रतिसाद पथक (S.D.R.F.) याप्रमाणे बृहन्मुंबईकरिता शहर आपत्ती प्रतिसाद पथकाची (C.D.R.F.) निर्मिती करण्यात आली आहे. मुंबई शहर व उपनगरातील मोठ्या आगी, ढासळलेली बांधकामे, रासायनिक, जैविक, किरणोत्सर्गी आणि आण्विक (C.B.R.N.) आपत्तींमध्ये प्रतिसाद देण्यासाठी स्वयंक्षमता विकसित करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी / रुग्णसेवक, अग्निशमन अधिकारी, सुरक्षा रक्षक यात समाविष्ट करण्यात आले आहेत आणि त्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक (N.D.R.F.) यांच्याकडून प्रशिक्षित करण्यात आले आहे.

**मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभाग :**

नागरी तक्रारी नोंदविण्याकरिता ऑन-लाईन सॅप तक्रार कार्यप्रणाली (C.P.W.M. Module) सन २००० पासून सुरू करण्यात आली आहे. मध्यवर्ती तक्रार नोंदणी प्रणाली २४ तास कार्यरत असते. मध्यवर्ती तक्रार कक्षामधील १९१६ या मदतसेवा क्रमांकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित नागरी सेवा-सुविधांबाबतच्या तक्रारी नोंदविल्या जातात व सॅप तक्रार कार्यप्रणालीतून संबंधित खात्यास ऑनलाईन पाठविण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर नागरिक स्वतः ऑनलाईन तक्रारी नोंदवू शकतात.

ऑनलाईन (सॅप) तक्रार कार्यप्रणालीमध्ये विहीत वेळेत निराकरण न झालेल्या तक्रारी ठराविक काळानंतर स्वयंचलित पध्दतीने सह आयुक्त, उप आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त हया पुढील वरिष्ठ अधिका-यांपर्यंत पोहोचतात.

# परवाना नियंत्रण






भुलेश्वर येथील महानगरपालिका मंडई



भुलेश्वर येथील महानगरपालिका मंडई

# परवाना नियंत्रण

**१) अनुज्ञापन खाते :**

अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ६१ (जे) आणि (ओ) मध्ये समाविष्ट केलेल्या महानगरपालिकेच्या बंधनकारक कर्तव्याची पूर्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अनुज्ञापन खाते करीत आहे.

**(१) विविध व्यवसाय व सामुग्रीचे साठे बाळगण्यास परवाने देणे :**

परिशिष्ट 'एम' मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ३९४ च्या अंतर्गत येणारे अनुज्ञेय व्यवसाय व साठे यांच्यावर अनुज्ञापन खात्याचे नियंत्रण असते. अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ४७९ अन्वये महानगरपालिकेच्या अटी व शर्ती सापेक्ष व्यवसाय व साठ्यांना अनुज्ञापत्रे मंजूर केली जातात. अनधिकृतपणे व्यवसाय व साठे करणाऱ्या व्यक्तींविरुध्द अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम ,१८८८च्या कलम ४७१ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्याचप्रमाणे अनधिकृत व्यवसाय व साठे हे नागरिकांच्या जीविताला, मालमत्तेला धोकादायक असल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ३९४(४) अन्वये जप्तीची कारवाई करण्यात येते. तसेच, अनधिकृत ज्वालाग्राही, विषारी व धोकादायक रसायनांच्या उत्पादनावर व साठ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येते. प्रसंगी अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ५१६ अअ अन्वये अशा उत्पादन व साठ्यांविरुध्द पंचनामा करुन संबंधित व्यक्तीस अटक करण्याची व साठा जप्तीची कारवाई करण्यात येते.

दि. ०१ एप्रिल २००७ पासून महानगरपालिकेत संगणकीय सॅप प्रणाली अस्तित्वात आल्याने अशा प्रकारची अनुज्ञापत्रे देण्यासाठी आता संगणक प्रणालीत छाननी यादी देण्यात आली आहे. सदर छाननी यादीत विहित करण्यात आलेल्या कागदपत्रांची अर्जदाराने पूर्तता केल्यावर नवीन अनुज्ञापत्रे अर्जदारास वितरित करण्यात येतात. तसेच देण्यात आलेल्या अनुज्ञापत्रांचे वार्षिक तत्वावर नूतनीकरण करण्यात येते.अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ३९४, अन्वये देण्यात येणारे नवीन अनुज्ञापत्र व अनुज्ञापत्रांचे नुतनीकरण या सेवा online करण्यात आलेल्या आहेत आणि 'आपले सरकार' या शासनाच्या पोर्टलसह संलग्नित करण्यात आलेल्या आहेत.

**(२) दुकानांच्या अवकानांवर (प्रोजेक्शन्सवर) नियंत्रण ठेवणे :**

अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३१३ (१) (ब) (क) अन्वये, मुंबई महानगरपालिकेच्या पदपथ व रस्ते लगतच्या खाजगी जागेवरील दुकानांसाठी, दुकानफळी, दर्शक कपाट इत्यादी अवकानांवर अनुज्ञापन खाते नियंत्रण ठेवते. ह्या संदर्भात दुकान मालकाने दुकानाच्या जागेचे व त्याच्या मालकी हक्काचे कागदोपत्री पुरावे सादर केल्यास त्याला त्याच्या दुकानालगतच्या रस्ते / पदपाथावर दुकानफळी, दर्शक कपाटे, सरक ढापणी, लोंबती छते, झडपा (वेदर फ्रेम) इत्यादींना परवानगी देण्यात येते. तसेच त्यांचे वार्षिक तत्त्वावर नूतनीकरण करण्यात येते. अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ३१३ (१) (ब) (क) अन्वये देण्यात येणारे नवीन अनुज्ञापत्र व अनुज्ञापत्रांचे नुतनीकरण या सेवा online करण्यात आलेल्या आहेत आणि 'आपले सरकार' या शासनाच्या पोर्टलसह संलग्नित करण्यात आलेल्या आहेत.

**(३) बैठ्या व फिरत्या अनधिकृत पथ विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवणे :**

केंद्र सरकारद्वारा दि. ०१ मे २०१४ रोजी 'पथविक्रेता (उपजिविका संरक्षण आणि पथ विक्री विनियमन) अधिनियम - २०१४' लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दि. ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने पथविक्रेता (उपजिविका

संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना - २०१७ दि. ०९ जानेवारी २०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन ६५२/२०१७ मध्ये दि. ०१ नोव्हेंबर २०१७ रोजी सदर योजना मार्गदर्शिका म्हणून वापर करण्याबाबत निर्देशित केले आहे.

सद्यस्थितीत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये महानगरपालिका पदपथ /रस्ते यांवरील अनुज्ञापत्रधारक वगळता १ मीटर X १ मीटर आकारमानापेक्षा जास्त जागा व्यापणारे पदपथ तसेच रस्त्यांवरील दुकानांच्या आणि सदनिकांच्या वहिवाटीचा प्रवेशमार्ग अडवून व्यवसाय करणारे तसेच, महानगरपालिका पदपथ / रस्त्यावर अन्नपदार्थ शिजवून विक्री व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

## (४) जाहिराती :

मुंबई शहराचे सौंदर्यीकरण करण्याच्या दृष्टीने अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३२८/३२८अ अन्वये आकाशचिन्हे व जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी परवानगी देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे दि. १० जानेवारी २००८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रसृत केली होती. त्यातील सुधारणा दि. ०२.१२.२०२२ रोजी प्रसृत करण्यात आल्या आहेत. त्यानुसार गच्चीवरील नवीन जाहिरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही. तसेच २ जाहिरात फलकांमधील कमीत कमी अंतर १०० मीटर ऐवजी ७० मीटर पर्यंत करण्यात आले आहे. विकास नियंत्रण नियमावली नियम ४८ (३) अन्वये यापुढे पुरातत्व हद्दीतील क्षेत्र याठिकाणी नवीन जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही. तसेच नविन एल.ई.डी. जाहिरात फलकांना परवानगी देण्यात आली आहे.

सर्व २४ विभागांकरीता जाहिरात फलकांच्या प्रमाणित आकारमानाबाबतच्या क्षेत्रीय मर्यादा काढून टाकण्यात आलेल्या असून जागेच्या उपलब्धेनुसार जाहिरात फलकांचे प्रमाणित आकारमानास संमती दिलेली आहे. निवासी जागेच्या कुंपणावर कमाल १०X ४० फूट आकारमानाचे जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आकाशमार्गिका (स्कायवॉक), पादचारी पूल, उड्डाणपूल इत्यादींवर आकारमान मर्यादित राहून परवानगी देण्यात येणार आहे. विद्युत खांबावर जाहिरातीस परवानगी देण्यात येणार आहे. जाहिरात फलकांची जमिनीपासूनची उंचीची मर्यादा १२० फूटापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. विशेष नविन बाब म्हणून ड्रोन / पाण्यावर तरंगती बोट यांच्यावर जाहिराती करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. तथापि, पुढील जाहिरातीबाबत परवानगी देण्यात येणार नाहीत. उदा. १. कॅन्टिलिव्हर २. गॅन्ट्री ३. दुचाकी सायकल / तीनचाकी सायकल.

महानगरपालिकेच्या मालमत्तेवर जाहिरात फलक उभारुन प्रदर्शित करण्याकरिता परवानगी ही ई-निविदा / ई-लिलाव ह्या माध्यमातूनच देण्यात येईल. महानगरपालिका मालकीच्या सार्वजनिक सुविधा / सेवा यांच्यावर जाहिरातीस परवानगी देताना, सदर सेवांचे दुरुस्ती व परिरक्षण तसेच, ई-निविदा /ई-लिलाव ह्या अटीसापेक्ष व कोणतेही जाहिरात शुल्क न आकारता परवानगी देण्यात येणार आहे. शासकीय / निमशासकीय संस्थांना महानगरपालिकेच्या पूर्व संमतीनेच त्यांच्या मालमत्तेवर जाहिरात परवानगी देण्याबाबतच्या निविदा काढण्याची मुभा देण्यात आली आहे व त्याबाबत त्यांना प्राप्त होणाऱ्या महसुलाचा वाटा महानगरपालिकेस देण्याचे बंधनकारक असेल. नवीन बाब म्हणून व्यावसायिक जागेवर त्या व्यवसायाशी निगडित नसलेल्या सेवा / व्यापार व्यावसायिक इतर जाहिरातीस परवानगी देता येणार आहे. जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासन किंवा महानगरपालिका परवाना प्राप्त बांधकाम अभियंत्यांनी छाननी नंतर दिलेल्या संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्राशिवाय आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्याशिवाय कुठल्याही नवीन जाहिरात फलकास परवानगी दिली जाणार नाही किंवा त्यांचे नुतनीकरण होणार नाही.

राजकीय तसेच कोणत्याही पक्षकारांकडून वाढदिवसाचे अभिष्टचिंतन, पदाधिका-यांचे नियुक्तीचे अभिनंदन, धार्मिक सणानिमित्त शुभेच्छा इत्यादी जाहिरात प्रदर्शित करण्यास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत पदपथ / रस्त्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तसेच बृहन्मुंबई शहरातील अनधिकृतपणे प्रदर्शित केलेल्या बॅनर्स, बोर्ड, फलक, इ. अनधिकृत जाहिरातींविरुध्द अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या जाहिरात निरीक्षकांच्या मदतीने निष्कासनाची कारवाई केली जाते.

## २) दुकाने व आस्थापना विभाग :

दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपाहारगृहे, खाद्यगृहे, चित्रपटगृहे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील कामाच्या व नोकरीच्या शर्तीचे विनियमन करण्यासाठी 'महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७' अधिनियमित करण्यात आलेला आहे. तसेच, सदर अधिनियमाची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात करण्यात आली असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दि. १९ डिसेंबर २०१७ पासून सोपविण्यात आले आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत दुकाने व आस्थापना खात्याकडून केली जाते. 'बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६' ची अंमलबजावणी करण्याचे काम देखील दि. २९ ऑगस्ट १९९७ पासून हया खात्याकडे सोपविण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि.२३.०३.२०१८ च्या अधिसूचनेनुसार व 'महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६' नुसार प्रमुख अधिकारी (दुकाने व आस्थापना) यांच्या अधिपत्त्याखालील अधिकारी व सुविधाकारांना महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक) अधिसूचना २०१८नुसार 'महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम २००६' च्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यासाठी कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत. महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशान्वये दुकाने व आस्थापना खाते, सहाय्यक आयुक्त (बाजार), अनुज्ञापन अधिक्षक यांनी उपरोक्त अधिसूचना व केंद्र सरकारच्या प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन (सुधारणा) नियम, २०२१ नुसार कारवाई करून दि. ०१.०४.२०२३ ते दि. ३१.०३.२०२४ या कालावधीत ३,४०१.९७१ कि.ग्रॅ. प्लॅस्टिक जप्त करून रु. ८७,०५,०००/- एवढा दंड वसूल केलेला आहे.

'महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६' च्या कलम १२ अन्वये, प्रतिबंधित प्लॅस्टिक पिशव्यांचा (कॅरी बॅग्ज) संग्रह, वितरण व विक्री करणा-यांविरुध्द कारवाई करण्यासाठी सुविधाकार दुकाने व आस्थापना विभाग, बाजार व अनुज्ञापन खात्यातील निरीक्षक व त्यांचे पर्यवेक्षकीय वरिष्ठ अधिकारी तसेच, सर्व विभागीय सहाय्यक आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रतिबंधित प्लॅस्टिक पिशव्यांच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून प्रथम गुन्ह्यासाठी रु.५,०००/- तसेच दुसऱ्या गुन्ह्यासाठी रु.१०,०००/- इतके शुल्क म्हणून आकारण्यासाठी महानगरपालिकेच्या दि.२१ जून २०१२ च्या ठराव क्र. ४५८ अन्वये, प्राधिकार देण्यात आलेले आहेत.

## ३) बृहन्मुंबई महानगरपालिका बाजार विभाग :-

**मंडया:**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या अखत्यारित एकूण ९२ किरकोळ मंडया आणि १०८ समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या मंडया तसेच, १६ खाजगी मंडया असून या सर्व मंडयांमध्ये एकूण १९,०६३ अनुज्ञापत्रधारक आहेत. मंडईच्या परिचलनाचे काम सहाय्यक आयुक्त (बाजार) यांच्यामार्फत होत असते. तसेच, सर्व मंडयांची किरकोळ दुरुस्ती संबंधित विभाग कार्यालयामार्फत केली जाते.

अद्ययावत् सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ४१० (१), ४११, ४१२, ४१५, ४१६, ४१७, ४७६ अब अन्वये बाजार खात्यामध्ये 'विशेष दक्षता पथक' द्वारे विभागनिहाय २४ विभाग कार्यालयांच्या मदतीने जनावरांच्या अनधिकृत कत्तलीच्या व्यवसायाच्या जागी धाडी टाकणे व प्राप्त तक्रारींनुसार जनावरे व त्यांचे मांस जप्त करणे, ही कामे पार पाडली जातात. जप्त केलेल्या कोंबड्या व मांसळी यांचा लिलाव केला जातो व जप्त केलेली जनावरे कंत्राटदारांच्या ताब्यात देण्यासाठी महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह यांच्या ताब्यात दिली जातात. बाजार विभागातर्फे बाह्य मटण, चिकन, बीफ, वराह दुकानांना विहित अटी व शर्तीनुसार अनुज्ञापत्र दिले जाते.

**बृहन्मुंबई महानगरपालिका मंडयांचा पुनर्विकास :**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने संमत केलेल्या पुनर्विकास 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४' मधील, विनियम ३३ (२१) (ए) अन्वये बाजार विभागामार्फत २१ मंड्यांचा पुनर्विकास प्रस्तावित असून, त्यापैकी ०४ मंड्यांचे पुनर्विकासाचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच, महात्मा ज्योतिबा फुले मंडई - ३५%, बाबु गेनू मंडईचे पुनर्विकासाचे काम ८०%, शिरोडकर मंडईचे पुनर्विकासाचे काम २०% व टोपीवालामंडईचे पुनर्विकासाचे काम १५% काम पूर्ण झाले आहे. तसेच जे. बी. शाह मंडई, डोंगरी मंडई, फोर्ट मंडई, लक्ष्मणराव यादव मंडई, लाल बहादूर शास्त्री मंडई व हॉकर्स प्लाझा मंडई यांची व्यापक संरचनात्मक दुरुस्तीची कामे इमारत परिरक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच, क्रांती सिंह नाना पाटील मंडईच्या पारंपारिक रुपाचे जतन करुन त्याची सर्वंकष दुरुस्तीचे काम इमारत परिरक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच, ज्या मंड्यांना यापूर्वी वैध परिशिष्ट-२ व इरादापत्र देण्यात आले आहे, अशा २० मंड्यांचा पुनर्विकास मंडई असोसिएशने नेमलेल्या खाजगी विकासकामार्फत 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४' मधील, विनियम ३३ (२१) (सी) अन्वये करण्यात येत आहे. ऐरोली जकात नाका येथील अशंतः भुखंडावर सेंद्रीय कचरा प्रक्रिया (Organic Waste Converter) यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

**प्रकल्पबाधित व्यक्तींना पर्यायी अनिवासी गाळे वाटप करण्याबाबत:**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांतर्गत बाधित होणाऱ्या अनिवासी प्रकल्पबाधितांना पर्यायी जागा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता बाजार विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. तसेच, समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त होणाऱ्या विविध मंड्यांमध्ये प्रकल्पबाधितांना पर्यायी जागा देण्यात येते. लवकरच संगणकीय माध्यमातून पर्यायी गाळ्यांचे वाटप करण्याकरीता महानगरपालिका बाजार विभागामार्फत व्यवस्था सुरु होणार आहे.

प्रकल्पबाधितांना पर्यायी जागा देण्याऐवजी आर्थिक नुकसान भरपाई देण्याविषयीचे धोरण मंजूर करण्यात आले असून, संबंधित विभाग कार्यालयामार्फत सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनुज्ञापन शुल्क व गाळा भाडे शुल्काचे संकलन ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे.

**४) पशुवैद्यकीय आरोग्य खाते :**

बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.८७ दि. ०४-०५-२०१८ अन्वये शहरातील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उपलब्ध पशुवैद्यकीय सेवांचे सुसुत्रिकरण करुन, स्वतंत्र पशुवैद्यकीय आरोग्य खाते निर्माण करण्यात आले आहे. पशुवैद्यकीय आरोग्य खाते अंतर्गत देवनार पशुवधगृह, परिमंडळीय पशुवैद्यकीय सेवा, श्वान नियंत्रण विभाग व गुरे कोंडवाडा विभाग, खार येथील महानगरपालिका पशुवैद्यकीय दवाखाना या सेवांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. सदर विभागाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :-

**(१) देवनार पशुवधगृह -**

अद्ययावत् सुधारीत बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६१(ह) नुसार मुंबईतील नागरिकांकरिता पशुवधगृहाची उभारणी व त्याचे विनियमन करणे ही महानगरपालिकेची अनिवार्य जबाबदारी आहे.

महानगरपालिकेने पशुवधगृह बांधण्याची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे :-

१. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना स्वच्छ, निरोगी व ताज्या मांसाचा पुरवठा करणे.

२. जनावरांच्या वधानंतर निर्माण होणा-या कच-याची पर्यावरण दृष्टीकोनातून शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे.

३. वधासाठी येणाऱ्या जनावरांसाठी बाजाराची सोय करणे.

देवनार पशुवधगृहाचा परिसर एकूण ६४ एकरचा असून त्याचे ०३ भागात विभाजन करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. प्रत्यक्ष पशुवधगृह | - | २१ एकर |
| २. निवारा शेड | - | १९ एकर |
| ३. जनावरांना चरण्यासाठी मैदान | - | २४ एकर |

देवनार पशुवधगृहामध्ये मुख्यत्वे शेजारील राज्यातील म्हणजे गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थान या राज्यातील तसेच, महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हयांतून शेळ्या-मेंढ्या वधाकरीता येतात. शेळ्या-मेंढ्यांचा देवनार पशुवधगृहात प्रवेश झाल्यावर तात्काळ त्यांची पशुवैद्यकीय अधिका-यामार्फत वधपूर्व तपासणी केली जाते. वधपूर्व तपासणी नंतर प्राण्यांना पुरेसे खाद्य, पाण्याची सोय केली जाते. तद्‌नंतर देवनार पशुवधगृहातील बाजार विभागात शेळ्या-मेंढ्यांची खरेदी-विक्री होते. व्यापा-यांनी खरेदी केलेल्या शेळ्या-मेंढया वध विभागात वधाकरीता आणल्या जातात.

शास्त्रीय पध्दतीने वध केल्यानंतर जनावरांच्या मांसांची पशुवैद्यकीय अधिका-यांमार्फत वधोत्तर तपासणी केली जाते आणि तपासणी झालेले जनावरांचे मांस नंतर मुंबईतील संबंधीत मटण दुकानात पाठविण्यात येते.

**देवनार पशुवधगृहामध्ये उपलब्ध असलेल्या इतर सुविधा -**

१. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका व भाभा अणुसंशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १५ मे. टन एवढया क्षमतेचा बायोमिथेनेशन प्रकल्प कार्यान्वित झालेला असून वधाद्वारे निर्माण होणारा ७-८ मे.टन एवढा जैविक कचरा या प्लांटमध्ये सध्या वापरण्यात येत आहे. या जैविक कच-यापासून सुमारे ४००ते ४५० घनमिटर मिथेन गॅस तयार होत आहे. या गॅसच्या आधारे ६५.५ केव्हीए क्षमतेचे जनित्र वापरुन ४० युनिट्स विजेची प्रतिदिन निर्मिती होत आहे.

२. देवनार पशुवधगृहामध्ये सांडपाणी प्रक्रिया सुविधा असून जनावरांच्या वधानंतर निर्माण होणा-या रक्तमिश्रीत पाण्यावर सांडपाणी प्रक्रिया केली जाते. स्वतंत्र प्रक्रिया केलेले पाणी देवनार पशुवधगृहातील रस्ते धुण्याकरिता व बागांकरिता वापरले जाते.

३. वराह विभागाकरिता सोलार बाष्पक बसविण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्युत बचत होणार आहे.

स्थानिक पुरवठ्या व्यतिरिक्त पशुवधगृहाची अतिरिक्त क्षमता निर्यात हेतू शेळ्या-मेंढ्यांचा वध करण्यासाठी वापरली जाते व त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण देखील मोठे आहे.

**बकरी ईद व्यवस्था**

दैनंदिन पशुवधाव्यतिरिक्त देवनार पशुवधगृहामार्फत बकरी ईद या धार्मिक सणाचे व्यवस्थापन देखील पाहिले जाते. बकरी ईद निमित्त दरवर्षी अंदाजे २ ते २.५० लाख बकरे अंदाजे १०,००० ते १२,००० म्हैसवर्गीय जनावरे विक्रीसाठी देवनार पशुवधगृहामध्ये येत असतात. अशा जनावरांना निवाऱ्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या वाडे, अतिरिक्त पाणी पुरवठा तसेच, विजेची सोय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविली जाते. जनावरांच्या विक्रीकरीता येणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी शौचालय, पिण्याचे पाणी तसेच, विश्रामगृहाची सोय महानगरपालिकेतर्फे पुरविली जाते. बकरी ईद सणापूर्वी जवळ जवळ १० ते १५ दिवस अगोदर पासून जनावरांची आवक सुरु होते. तदनुषंगाने उपरोक्त नमुद केलेल्या सोयी पुरविल्या जातात. ह्याव्यतिरिक्त कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तसेच अतिरिक्त सुरक्षारक्षकांची नेमणूक केली जाते. पूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्याकरिता ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची सोय केली जाते. देवनार पशुवधगृहामध्ये जनावरे खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांकरिता तात्पुरत्या उपाहारगृहांची सुविधा केली जाते. बकरी ईदच्या १५ दिवसांच्या कालावधीत ७०-७५ मेट्रीक टन इतक्या प्रमाणात कचऱ्याची निर्मिती होत असते. त्याकरीता कंत्राटदारांमार्फत कचरा उचलण्याची सेवा अहोरात्र पुरविली जाते.बकरी ईद निमित्त देवनार पशुवधगृहामध्ये

विक्रीसाठी येणाऱ्या जनावरांच्या उपचाराकरिता मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या मदतीने अतिरिक्त पशुवैद्यकांची नेमणूक करण्यात येते. बकरी ईद सणानिमित्त संपूर्ण परिसराच्या स्वच्छतेकरिता नियमित साफसफाई कामगारांव्यतिरिक्त अशासकीय संघटनांची सेवा देखील पुरविली जाते.

धार्मिक कार्याकरिता खरेदी केलेल्या शेळ्या-मेंढ्या अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४०३(२)(ई) अंतर्गत घरी घेऊन जाण्याकरिता परवानगी देण्यात येते. म्हैसवर्गीय जनावरांची धार्मिक कार्यासाठी खरेदी करुन त्यांचा वध देवनार पशुवधगृहामध्येच करणे बंधनकारक आहे व त्यासाठी बकरी ईद व त्यानंतरचे २ दिवस वधासाठी आवश्यक व्यवस्था प्रशासनामार्फत केली जाते.

**वधशुल्क-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्थानिक शेळया-मेंढया | - | रु. ४०/- |
| २. | निर्यात शेळया-मेंढया | - | रु. ७५/- |
| ३. | उपनगरे/मध्यरात्र शेळया-मेंढया | - | रु. २५/- |
| ४. | म्हैसवर्गीय जनावरे वाहनाशिवाय | - | रु. १४५/- |
| ५. | म्हैसवर्गीय जनावरे वाहनासकट | - | रु. २७०/- |
| ६. | वराह जनावरे | - | रु. ५५/- |

### (२) श्वान नियंत्रण विभाग :

भटक्या श्वानांच्या तक्रारी आणि प्राणी जनन नियंत्रण कार्यक्रम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्वान नियंत्रण विभागामार्फत करण्यात येतात. श्वान अनुज्ञाप्ती आस्थापनेची चार कार्यालये आहेत.

| | |
|---|---|
| १. महालक्ष्मी श्वान नियंत्रण कार्यालय | : ९९८७७९८४३६ |
| २. मालाड श्वान नियंत्रण कार्यालय | : ९०७६२०२२०८ |
| ३. बांद्रा श्वान नियंत्रण कार्यालय | : ९०७६२०२२०८ |
| ४. मुलुंड श्वान नियंत्रण कार्यालय | : (०२२-२५६१८०००)/(०२२-२५६१८००१) |

सन २०२३-२४ मध्ये एकूण १६,८९२ श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले. दि. २८ सप्टेंबर २०२३ रोजी जागतिक रेबिज दिनाचे औचित्य साधून एकूण ४५,९१८ भटक्या श्वानांचे व ४७४६ भटक्या मांजराचे लसीकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रभागात श्वान नियंत्रण विभागाच्या माध्यमातून करण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये रेबिज व लेप्टोस्पायरोसीस या आजारांविषयी जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. दि. २३ जुलै २०१८ पासून सुरू झालेल्या हया कार्यक्रमात आजपर्यंत १९४ विविध शाळांचा (४२५ सत्र) समावेश आहे.

### (३) कोंडवाडा विभाग :

भटक्या जनावरांविरुध्द अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम ,१८८८ च्या कलम ४४१ (क) ते (ग) अंतर्गत कारवाई केली जाते. सन २०२३-२४ या काळात (आर्थिक वर्षात) एकूण ३२८ भटकी जनावरे पकडण्यात आली असून एकूण रुपये ११,३०,०१४/- महसुल प्राप्त झाला आहे.

### (४) परिमंडळीय पशुवैद्यकीय सेवा :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने परिमंडळीय पशुवैदयकीय सेवा उपलब्ध केल्या आहेत. सदर पशुवैद्यकीय सेवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ०७ परिमंडळामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर सेवांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करणे, रेबीज लसीकरण करणे , भटक्या शृंगी जनावरांवर कारवाई करणे, पाळीव श्वानांना परवाना देणे इत्यादी कामे पार पाडली जात आहेत.

**(५) ऑनलाईन श्वान परवाना :**

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अंतर्गत कलम १९१ (अ) नुसार पाळीव श्वानांना परवाना देण्याची प्रक्रिया एप्रिल २०१८ पासून ऑनलाईन करण्यात आली आहे.बृहन्मुंबई महानगरपालिका वेब पोर्टल mcgm.gov.in या संकेतस्थळावर श्वानांच्या परवान्याचे नविन अर्ज व नूतनीकरण उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(६) खार पशुवैदयकिय दवाखाना :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खार येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पाळीव प्राण्यांना नाममात्र सेवा शुल्क आकारून उपचार करण्यात येतात.

**पशुवैद्यकीय आरोग्य खात्याचे आगामी प्रकल्प :**

**१) देवनार पशुवधगृहाचे आधुनिकीकरण व दर्जोन्नती :**

देवनार पशुवधगृहाच्या आधुनिकीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम संरक्षक भिंत बांधणे, निवारे वाडे दुरुस्ती व पर्जन्यजलवाहिनी नाला बाहय वळण इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत. पुढील टप्प्यातील कामांमध्ये प्रत्यक्ष देवनार पशुवधगृह बांधणे, व्यवस्थापन व देखभाल करण्याच्या कामांचा समावेश असून याकरीता प्रकल्पाच्या व्यवहार्यता तपासणी व पशुवधगृहातील प्राप्त होणा-या संभाव्य महसूल स्त्रोतांची माहिती घेण्यासाठी यासंदर्भातील तज्ज्ञ सल्लागाराकडून सर्वेक्षण व विस्तृत प्रकल्प अहवाल मागविण्यासाठी प्रक्रिया सुरु आहे.

**२) पशुवैद्यकीय रुग्णालय, महालक्ष्मी :**

मुंबईतील भटके व पाळीव प्राण्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महालक्ष्मी येथे टाटा टस्ट्रच्या सहकार्याने बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा (बीओटी) या तत्वावर पशुवैद्यकीय रुग्णालयाची उभारणी केली आहे. अत्याधुनिक सुविधायुक्त, सदर रुग्णालयाची सेवा व लोकार्पण माहे जून २०२४ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**३) प्राण्यांसाठी पीएनजी गॅस आधारित दहनभट्टी :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे P.N.G. वर आधारित ५० किलो/प्रति तास क्षमतेची प्राणी दहनभट्टी मालाड (पश्चिम ) येथे जून २०२३ पासून सुरु केली आहे. या धर्तीवर महालक्ष्मी (शहर) व देवनार (पूर्व उपनगरे) या ठिकाणी अनुक्रमे ५० किलो/तास व ५०० किलो/तास प्राणी दहनभट्टी उभारण्याचे काम सुरु असून, सदर प्राणी दहनभट्टी डिसेंबर २०२४ पर्यंत कार्यान्वित करण्यात येतील.


**४) खार येथे पशुवैद्यकीय आरोग्य खाते (मुख्य कार्यालय) :**

पशुवैद्यकीय आरोग्य खात्याचे मुख्यालय खार येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या जागेत बांधण्यात येत असून सदर जागेत पशुवैद्यकीय आरोग्य खात्याच्या मुख्यालयासह अत्याधुनिक सुविधांनी सज्ज महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय दवाखाना व प्राण्यांपासून मानवांना होणा-या रोगांचे (Zoonotic Disease ) निदान करण्याकरिता प्रयोगशाळा उभारण्यात येत आहे. सदर काम महानगरपालिकेच्या पायाभूत आरोग्य सुविधा कक्ष (H.I.C.) विभागामार्फत पार पाडण्यात येत आहे.

**५) मालाड स्थित गुरे कोंडवाडा विभागाचे नुतनीकरण :**

मालाड स्थित गुरे कोंडवाडा विभागाचे नुतनीकरणाचे काम उप प्रमुख अभियंता इमारत बांधकाम (पश्चिम उपनगरे) या विभागामार्फत पार पाडण्यात येत असून, कंत्राटदारामार्फत काम सुरु करण्यात आले आहे. बैल, गाय व वासरे यांच्यासाठी स्वतंत्र निवारावाडे, जनावाराच्या उपचारासाठी पशुवैद्यकीय सुविधा गुरे कोंडवाडा मालाड येथे पुरविण्यात येणार आहे.

# मनोरंजनपर सुविधा





किलाचंद महानगरपालिका उद्यान, मलबार हिल.



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, महानगरपालिका उद्यान

# मनोरंजनपर सुविधा

**१. उद्याने आणि प्राणि संग्रहालय :-**

**वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय, भायखळा :-**

वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय हे देशातील जुन्या प्राणिसंग्रहालयांपैकी एक असून सदर प्राणिसंग्रहालयाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५३ एकर आहे. ह्या उद्यान व प्राणिसंग्रहालयास **'पुरातन वास्तू श्रेणी -२ (ब)'** म्हणून घोषित करण्यात आले आहे. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांजकडून या उद्यान व प्राणिसंग्रहालयास २५ डिसेंबर २०२५ पर्यंत 'मध्यम प्राणिसंग्रहालय' म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

**वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाची सद्यस्थिती आणि अभ्यागतांचा तपशील व महसूल :-**

- वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय (बुधवार वगळता) संपूर्ण वर्षभर सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पर्यटकांकरिता खुले ठेवण्यात येते.
- दि. ३१ मार्च २०२४ अखेर या उद्यान व प्राणिसंग्रहालयात एकूण ११ जातींचे ६९ सस्तन प्राणी, १५ जातींचे २२३ पक्षी व ०६ जातींचे २२ सरपटणारे तसेच, जलचर प्राणी असे एकूण ३१४ प्राणी/पक्षी अस्तित्त्वात आहेत.

| आर्थिक वर्ष | अभ्यागतांची संख्या | उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|
| २०२२-२३ | २८,५५,४१८ | ११,१७,३७,३८६/- |
| २०२३-२४ | ३०,१६,८२७ | ११,९८,३७,१७१/- |

**वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाचा आधुनिकीकरण प्रकल्प -**

- बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतलेल्या या उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या आधुनिकीकरण प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात वर्ष २०२३-२४ मध्ये बहुतांश प्राणी प्रदर्शनी बांधून पूर्ण झाल्या असून तिसऱ्या टप्प्यातील विकासकामे करण्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया करण्यात येत आहे.
- प्राणी संग्रहालयामध्ये ऑनलाईन तिकिट सुविधा पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आली असून त्याअंतर्गत प्राणिसंग्रहालयाच्या प्रवेशद्वाराजवळ पर्यटकांच्या वापरासाठी सेल्फ तिकिट किऑस्क ठेवण्यात आले आहेत.
- वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय हे 'प्लास्टिक मुक्त क्षेत्र' असून एकल वापराच्या प्लास्टिकच्या वस्तू प्राणिसंग्रहालयात आणण्यास माहे ऑक्टोबर २०२३ पासून पूर्णपणे बंदी घालण्यात आलेली आहे. पर्यटकांकडून गोळा केलेल्या एकल वापराच्या प्लास्टिक बाटल्यांचा पुनर्वापर करुन आसन व्यवस्था तयार करण्यात आल्या आहेत. ह्या आसन व्यवस्था पर्यटकांच्या सोयीसाठी प्राणिसंग्रहालयात बसविण्यात आल्या आहेत.

**२. डॉ. भाऊ दाजी लाड (मुंबई शहर) वस्तु संग्रहालय :-**

दि. ०१ डिसेंबर २०२३ पासून संग्रहालयाच्या प्रांगणातील सुविधा कोणत्याही प्रवेश शुल्काशिवाय खुल्या करण्याचा निर्णय घेतला गेला. सन २०२३-२४ दरम्यान संग्रहालय न्यासाने सुमारे १५० शैक्षणिक सत्रे आणि बहिःशाला उपक्रमांचे आयोजन मराठी तसेच, हिंदी भाषेतूनही केले. त्यात २०,००० हून अधिक लोकांनी सहभाग नोंदवला. याअंतर्गत आभासी मंचावरुन आयोजित सदरे, शाळा आणि ना - नफा तत्त्वावर काम करणाऱ्या संस्थांसाठी प्रत्यक्ष सदरे, कार्यशाळा, चित्रपट प्रदर्शनाचे कार्यक्रम, व्याख्याने, कथाकथनाची सत्रे आणि प्रदर्शनाचे माहिती दौरे आयोजित केले गेले.

स्टोरी एक्सप्रेसच्या सहयोगाने केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा आणि ना-नफा तत्वावर काम करणाऱ्या संस्थांसाठी फेब्रुवारी २०२४ मध्ये कथकथनाच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ज्यात २५० विद्यार्थी सहभागी झाले. संग्रहालयात विद्यार्थ्यांना बोलावणे शक्य नसल्यामुळे, संग्रहालय न्यासाने भायखळा परिसरातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांत जाऊन विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या. जानेवारी २०२४ मध्ये, भारतीय राज्यघटनेचे ७५ वे वर्ष साजरे करण्यासाठी, संग्रहालय न्यासाने संग्रहालयाच्या उपाहारगृहात बालदोस्तांसाठी छोटेखानी वाचनालय सुरु केले. मराठी तसेच इग्रंजी भाषेतील १०० हून अधिक पुस्तके मुलांना आता इथे मोफत वाचता येणार आहेत.

संग्रहालय न्यासाने दि. ०१ डिसेंबर २०२३ रोजी संग्रहालयाचे प्रांगण लोकांसाठी पुन्हा एकदा खुले केल्यानंतर डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान विशेष प्रकल्प दालनात दोन प्रदर्शनांचे आयोजन केले. टी. व्ही. संतोष ह्या प्रख्यात कलाकाराच्या कलाकृतीचे प्रदर्शन : इतिहासाची प्रयोगशाळा आणि प्रफुल्ला डहाणूकर कला प्रतिष्ठानाच्या सहयोगाने भारतातील उदयोन्मुख कलाकारांना समर्थन देणारे प्रदर्शन : कलानंद संग्रहालय न्यासाने विशेष प्रकल्प दालनातील चालू प्रदर्शनाचे अनेक माहितीदौरे आयोजित केले. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या नामवंत व्यक्तींमध्ये अमेरिकन दूतावासाचे प्रमुख श्री. माईक हॅन्की, व्हिएतनामच्या दूतावासाच्या प्रमुख श्रीमती एम माय आणि केंब्रिज येथील फिट्झविलियम संग्रहालयाचे संचालक श्री. ल्यूक सायसन यांचा समावेश होता. डॉ. भाऊ दाजी लाड वस्तु संग्रहालय न्यासाने आयोजित केलेल्या प्रदर्शने, शिक्षण तसेच बहि:शाला उपक्रमांना, जमनालल बजाज प्रतिष्ठान तसेच, इतर देणगीदारांचे सहाय्य लाभले.

रोटरी क्लब ऑफ मुंबईतर्फे व्यवस्थापकीय विश्वस्तांना मार्च २०२४ मध्ये प्रतिष्ठित रोटरी शक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला. व्यवस्थापकीय विश्वस्तांना अनेक परिसंवादांसाठी आमंत्रित केले गेले. ज्यात भारतातील पहिल्या म्युझियम एक्स्पोत 'सर्वांसाठी मांडणी' ह्या शिर्षकाअंतर्गत आयोजित चर्चासत्राचा, तसेच 'सांस्कृतिक संगम : भविष्यातील सर्जनशील उद्योगांचे सशक्तीकरण' ह्या भारतातील जी-२० संस्थानांतर्गत सांस्कृतिक वर्तुळात कार्यरत व्यक्तींसोबत आयोजित परिसंवादाचा समावेश होतो.

**३. महानगरपालिकेचे जलतरण तलाव :**

**१) महात्मा गांधी स्मारक ऑलिम्पिक जलतरण तलाव, दादर.**

महात्मा गांधी स्मारक ऑलिम्पिक जलतरण तलाव, दादर हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा असून, पुनर्विकासानंतर तो सभासदांसाठी दि. ०१ ऑक्टोबर २०११ पासून खुला करण्यात आला आहे. सदर जलतरण तलाव दादर (पश्चिम), शिवाजी पार्कसारख्या मध्यवर्ती ठिकाणी असून, तेथे वार्षिक सभासदत्व शुल्क आकारुन सभासदांना ऑलिम्पिक दर्जाची पोहोण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. महात्मा गांधी स्मारक ऑलिम्पिक जलतरण तलाव, दादर येथे दि. २५ ऑगस्ट २०२२ पासून सभासदत्वाची नोंदणी ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे चालू करण्यात आलेली आहे. सदर जलतरण तलाव हा महानगरपालिकेचा मानबिंदू आहे.

**२) सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलाव, कांदिवली (पश्चिम).**

सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलाव, महात्मा गांधी क्रास रोड क्र. २, कांदिवली (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेचा जलतरण तलाव पुनर्विकासानंतर सभासदांसाठी दि. ०१ मार्च २०२२ पासून खुला करण्यात आला आहे. सदर ठिकाणी ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव, बेबी पूल, उपाहारगृह, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, व्यायामशाळा इत्यादी सुविधांसह क्रिडा संकुल उभारण्यात आलेले आहे. नागरिकांसाठी जलतरण तलावाचे सभासदत्व प्राप्त करण्याकरिता https://swimmingpool.mcgm.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**३) घाटकोपर लायन्स महानगरपालिका जलतरण तलाव, घाटकोपर (पूर्व).**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यरितील, घाटकोपर जलतरण तलाव दि. २८ मार्च १९७१ पासून सुरु करण्यात आला. प्रतिवर्षी सुमारे ४,००० सभासद सदर तरणतलावाच्या सुविधेचा लाभ घेत होते. तरणतलावाच्या आवारातील

उपाहारगृह व छोटे मैदान लहान कार्यक्रमांकरिता भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देण्यात येत होते. सदर तरणतलावातून पाण्याचा मोठ्या प्रमाणात होत असलेल्या गळतीमुळे दि. ३० जानेवारी २०१९ पासून पोहण्यास बंद ठेवण्यात आला आहे. सदर तरणतलावाच्या पुनर्विकासाचे काम उप प्रमुख अभियंता (इमारत बांधकाम) पूर्व उपनगरे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

सदर जागेवर ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव व इतर विविध क्रिडा प्रकारांनी व सर्व सोयींनी युक्त असे सुसज्ज क्रिडासंकुल उभारण्यात येऊन नागरिकांकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल.

### ४) जनरल अरुणकुमार वैद्य जलतरण तलाव, चेंबूर.

जनरल अरुणकुमार वैद्य तरण तलाव हा महानगरपालिकेच्या 'एम/पश्चिम' विभाग कार्यालयाजवळ, चेंबूर (पूर्व) येथे स्थित आहे. सदर तरण तलावाचे पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्यानंतर सभासदांसाठी दि. ११ सप्टेंबर २०१८ पासून सुरु करण्यात आला आहे. सदर तरण तलाव ऑलिम्पिक दर्जाचा असून त्याचा आकार २५ X ५० मीटर असा आहे. तसेच, डायव्हिंग पूलाचा आकार १८.१० X १२ मीटर असा आहे. लहान मुलांसाठी बांधण्यात आलेला किड्स पूल १६ X ८ मीटर आकाराचा आहे. दि. २४ ऑगस्ट २०२२ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सर्व जलतरणतलावांचे सभासदत्व घेण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. (लिंक https://swimmingpool.mcgm.gov.in) परिणामस्वरुप जास्तीत जास्त नागरिक पोहण्याच्या सुविधेचा लाभ घेत आहेत. तरणतलावाची सुविधा सकाळी ६.०० ते ११.०० आणि सायंकाळी ०६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत सर्वांसाठी व फक्त महिलांसाठी सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० आणि सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत मंगळवार ते रविवार पूर्ण दिवस याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येते. सद्यस्थितीत, सदर तरणतलावाचे सुमारे ५,२०० वार्षिक सभासद आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत, उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे दुपारी १२.३० ते ४.३० या वेळेत विविध सत्रांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत.

### ५) ओझोन ऑलिम्पिक जलतरण तलाव, गोरेगांव (पश्चिम).

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा निरलॉन जलतरण तलाव एप्रिल २००४ साली स्पर्धात्मक बोली सर्वोत्कृष्ट ठरल्यामुळे 'प्रबोधन गोरेगांव' या संस्थेकडे दुरुस्ती व देखभालीकरिता सुपूर्द करण्यात आला. सदर तलावाच्या दुरुस्तीचे काम महानगरपालिकेने घालून दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करून तो जनतेच्या सेवेसाठी जानेवारी २००५ मध्ये केवळ ०६ महिन्यांच्या मुदतीत खुला करण्यात आला.

महानगरपालिका, बेस्ट प्राधिकरण व पोलिस विभागात सेवा करणा-या कर्मचा-यांना सवलतीच्या दरात वार्षिक सभासदत्त्व देण्यात येते. पुनर्बांधणी करताना या प्रकल्पात एक वैशिष्टय वाढविण्यात आले. जसे की, या जलतरण तलावाचे ओझोन वायूने जलशुध्दीकरण करण्यात येते. 'क्लोरीन' पावडर वापरुन जलशुध्दीकरण होणा-या तलावांत पोहोणा-यांना जळजळ, तीव्र वास, त्वचा काळी पडणे, दात-केस खराब होणे असे त्रास जाणवतात. ओझोन प्रक्रियेने पाणी शुध्द होत असल्यामुळे अशा विकारांपासून मुक्तता मिळून पोहण्याचा आनंद द्विगुणीत होतो. ओझोन जलतरण तलावाच्या पाण्याची स्वच्छता अत्यंत काळजीपूर्वक केली जाते. ज्यामुळे पाणी अतिशय स्वच्छ होते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरणपटू ओझोन जलतरण तलावात निर्माण व्हावे, असा संस्थेचा मानस आहे. जलतरणपटूंना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा पुरविताना चांगले जलतरणपटू सुविधेअभावी महाराष्ट्राबाहेर जाऊ नयेत, यासाठीही संस्था प्रयत्नशील राहणार आहे.

सोमवारी ओझोन जलतरण तलाव बंद ठेवण्यात येतो. त्या दिवशी विशेष परिरक्षणाची कामे केली जातात.

### ६) श्री मुरबाळीदेवी जलतरण तलाव आणि व्यायामशाळा दहीसर (पूर्व) :

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे दहीसर (पूर्व) येथे श्री मुरबाळीदेवी जलतरण तलाव आणि व्यायामशाळेची सुविधा २०१६-२०१७ साली सुरु करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी २५ मी. X १५ मी. लांबीचा एक जलतरण तलाव तसेच अत्याधुनिक उपकरणे असलेली व्यायामशाळा आहे. सदर जलतरण तलाव आणि व्यायामशाळेस परिसरातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून दररोज सरासरी १,५०० ते २,००० सभासद जलतरणाचा आनंद घेतात. सदर ठिकाणी गाळणीयंत्रणेचे परिरक्षण, सुरक्षा तसेच, साफसफाई इ. कामे /सेवा निविदेतील अटी व शर्तींनुसार खाजगी कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येत आहेत. तसेच आस्थापनेच्या व्यवस्थापनाची आणि प्रशासकीय कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत केली जात आहेत.

## ४) क्रीडा संकुले :-

### (१) शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल, जयप्रकाश मार्ग, अंधेरी (पश्चिम) :

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील नागरिकांना विविध क्रीडा व सांस्कृतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अंधेरी (पश्चिम) येथे सन १९८८ साली महानगरपालिकेने 'शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल' बांधले असून सदर क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन व परिरक्षण 'बृहन्मुंबई क्रीडा आणि ललितकला प्रतिष्ठान' या स्वतंत्र सार्वजनिक न्यासाकडे सोपविण्यात आले आहे. ह्या न्यासाचे कामकाज पाहण्यासाठी विश्वस्त मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. माननीय महापौर व माननीय महानगरपालिका आयुक्त हे सदर प्रतिष्ठानचे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष असून महानगरपालिकेचे विविध पदाधिकारी हे सभासद म्हणून तसेच, क्रीडा व ललितकला क्षेत्रातील नामांकित व्यक्ती सदर प्रतिष्ठानचे सभासद म्हणून काम पाहतात.

**क्रीडा संकुलात एकूण ०३ महत्त्वाचे विभाग आहेत.**

### १) क्रीडा प्रशिक्षण केंद्र :-

संकुलात सुसज्ज असे क्रिडा प्रशिक्षण केंद्र असून तेथे बॅडमिंटन, टेबल टेनिस इत्यादी क्रिडा सुविधा आहेत. सदर क्रिडा सुविधांच्या बरोबरीनेच स्विमिंग, कराटे, योगा, ॲरोबिक्स,स्केटिंग, नृत्य, चित्रकला या खेळांची देखील दिवाळी तसेच, उन्हाळी शिबिरे क्रीडा संकुलामार्फत आयोजित करण्यात येतात. क्रीडा प्रशिक्षण इमारतीमध्ये गेम्स हॉल असून तेथे बुध्दिबळ, कॅरम, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग इत्यादींचे  जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन वेळोवेळी होत असते. तसेच, महापौर चषकाचे आयोजन देखील होत असते. २०५ आसन क्षमता व व्यासपीठ असलेल्या सभागृहात (लेक्चर हॉल) व इतर ०३ सभागृहांमध्ये विविध समारंभ, परिषदा, बक्षीस समारंभ इ. कार्यक्रमांचे विविध संस्थांकडून आयोजन केले जाते.

त्याचप्रमाणे क्रीडा प्रशिक्षण केंद्र येथे ५६ वसतिगृह खोल्या असून त्यापैकी २८  खोल्या वातानुकूलित आहेत. विशेष म्हणजे एन.डी.आर.एफ जवानांच्या निवासाची व्यवस्था याठिकाणी करण्यात आली आहे.  सभासदांकरिता क्रीडा संकुलात सुसज्ज उपाहारगृह आहे.

### २) जलतरण तलाव :

या संकुलातील जलतरण तलाव हा ऑलिम्पिक दर्जाचा असून येथील प्रशिक्षित शिक्षकांनी आजपर्यंत हजारो नागरिकांना पोहण्याची कला अवगत करून दिली आहे. तसेच राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरणपटू निर्माण केले आहेत.  जलतरणतलाव येथे प्रगत प्रशिक्षण वर्ग, उन्हाळी शिबिर इत्यादींचे आयोजन करण्यात येते. जलतरण तलाव येथे जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्पर्धा, अपंगांच्या स्पर्धा इत्यदिचे आयोजन होत असते. जलतरण तलावास लागून पश्चिम उपनगरातील होतकरु कलावंतांसाठी त्यांच्या कलेचे प्रदर्शन वाजवी दरात भरविण्याकरिता जहांगीर आर्ट गॅलरीच्या धर्तीवर **'चित्रकार दिनानाथ दलाल कलादालन'** सुरु करण्यात आले आहे.

### ३) मुंबई फुटबॉल अरेना :

मुंबई फुटबॉल अरेना येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नैसर्गिक गवत असलेले फूटबॉल मैदान असून सदर मैदानाच्या अनुषंगाने प्लेअर्स चेन्जींग रुम, मेडिकल रुम, प्रसाधनालये, कार्यालय, रेफ्री रुम, ॲन्टी डोपींग रुम, हायमास्ट, स्टोअर रुम, मॅच कमिशनर रुम, प्रेस कॉन्फरन्स रुम इत्यादी तयार करण्यात आले आहे. सदर मैदानावर इंडियन सुपर लीग व मुंबई फुटबॉल लीग ह्या मानांकित स्पर्धा भरविल्या जातात तसेच, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सामन्यांचे आयोजन करण्यात येते. नैसर्गिक गवताच्या फूटबॉल मैदानाच्या बरोबरीनेच आर्टीफिशियल टर्फ असणारे खुले मैदान देखील आहे. तसेच, जॉगींग करणाऱ्या सभासदांकरिता स्वतंत्र व्यवस्था आहे. भविष्यात क्रीडा संकुलामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

जे नागरिक आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत व खाजगी क्लबचे शुल्क भरु शकत नाही अशा ज्येष्ठ नागरिक तसेच, शालेय विद्यार्थ्यांकरिता प्रतिष्ठानामार्फत चालविण्यात येणाऱ्या सुविधांच्या शुल्कात ५० % सवलत दिली जाते. संकुलामध्ये सभासदांना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत वृत्तपत्रे वाचण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

### (२) प्रियदर्शिनी इंदिरा गांधी क्रीडा संकुल, मुलुंड (पश्चिम)

मुंबईच्या पूर्व उपनगरातील नागरिकांना विविध क्रीडाविषयक व सांस्कृतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुलुंड (पश्चिम) येथे महानगरपालिकेने १९८८ साली 'प्रियदर्शिनी इंदिरा गांधी क्रीडा संकुल' बांधले असून, सदर क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन व देखभाल 'बृहन्मुंबई क्रीडा आणि ललितकला प्रतिष्ठान' ह्या स्वतंत्र सार्वजनिक न्यासाकडे सोपविण्यात आले आहे.

या न्यासाचे कामकाज पाहण्यासाठी विश्वस्त मंडळाची स्थापना करण्यात आली असून माननीय महापौर हे अध्यक्ष तर, माननीय महानगरपालिका आयुक्त हे उपाध्यक्ष म्हणून काम पाहतात. तसेच, क्रीडा व ललितकला क्षेत्रातील नामांकित व्यक्ती प्रतिष्ठानचे सभासद म्हणून काम पाहतात.

या संकुलात ऑलिम्पिक प्रमाणकांनुसार बांधण्यात आलेला जलतरण तलाव असून येथील निर्देशकांनी आजपर्यंत हजारो नागरिकांना पोहण्याची कला अवगत करून दिली असून पट्टीचे जलतरणपटू तयार केले आहेत.

क्रीडा प्रशिक्षण संकुलात बॅडमिंटन, टेबल टेनिस, योगा, कराटे, अद्ययावत अशी व्यायामशाळा इ. क्रीडा सुविधा तसेच विविध प्रकारच्या व्यायामांसाठी व्यायामशाळाही उपलब्ध आहे. दिवाळी व उन्हाळी सुट्टीमध्ये खास करून मुलांसाठी जलतरण, बॅडमिंटन, क्रिकेट, ॲरोबीक्स, योगा, कराटे, स्केटिंग, नृत्य, चित्रकला इ. क्रीडा व कलांचे आयोजन करण्यात येते.

या संकुलामध्ये तिरंदाजी, बास्केटबॉल या सारख्या क्रीडा सुविधा नव्याने सुरु करण्यात आलेल्या आहेत. तसेच, ज्येष्ठ नागरीकांकरिता वाचनालय व 'ज्येष्ठ नागरीक कट्टा' देखील सुरु करण्यात आलेला आहे.

या क्रीडा संकुलात १,३१३ आसनक्षमता असलेले मुंबईतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे वातानुकुलित 'महाकवी कालिदास नाट्यमंदिर' असून तेथे मुख्यत्वे मराठी नाटकांचे व इतर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

येथे सभासदांसाठी लॉन टेनिस, जिम्नॅस्टिक्स व स्क्वॅश या क्रीडा सुविधा सुद्धा सुरु करण्यात आलेल्या आहेत. संकुलातील मोकळ्या जागेत लग्न समारंभ, सभा, सत्संग आणि इतर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. संकुलाच्या सभासदांसाठी व विविध कार्यक्रमांच्यावेळी संकुलात येणाऱ्या लोकांसाठी सुसज्ज उपाहारगृहाची सोय करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त लग्न व मोठ्या समारंभासाठी मोकळे मैदान व दोन मोठे हॉल, वातानुकुलीत सुविधेसह भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येतात.

संकुलामध्ये लवकरच स्कुबा डायव्हिंग ही सुविधा सुरु करण्यात येणार असून सर्व सभासदांना व ज्येष्ठ नागरिकांकरिता मोफत वाचनालय सुरु करण्यात आलेले आहे.

प्रियदर्शिनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलात नव्याने उच्च दर्जाच्या सुविधा उदा. आर्टीफिशियल फूटबॉल, लॉन टेनिस, क्रिकेट , तिरंदाजी , बहुउद्देशिय क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा संकुलातील जलतरणतलाव, बॅडमिंटन, जिमनॅस्टिक खेळाच्या सभासदांनी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर नेत्रदिपक कामगिरी केली आहे. याशिवाय संकुलातील मोकळ्या मैदानामध्ये फुटबॉल क्रीडा सुविधादेखील सुरु आहे. जलतरणतलावाचे नूतनीकरण करण्याकरिता प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे.

## ५. महानगरपालिकेची नाट्यगृहे :-

### (१) प्रबोधनकार ठाकरे खुला रंगमंच, शिवडी :

प्रबोधनकार ठाकरे रंगमंच हा एक खुला रंगमंच असून येथील खुल्या मैदानाची सुमारे २,५०० प्रेक्षक बसतील इतकी क्षमता आहे. नाट्यप्रयोग, नाटकांचे सेट आणि सामाजिक तसेच, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी येथील रंगमंचाचे विहीत शुल्कासापेक्ष आरक्षण करता येते.

तसेच, येथील दोन सभागृहे विवाह सोहळा, धार्मिक कार्यक्रम, तसेच, बिगर-राजकीय सभा इत्यादीकरिता विहीत शुल्कासापेक्ष आरक्षित करता येतात.

होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास करता यावा यासाठी अभ्यासिकेची सुविधा विनाशुल्क उपलब्ध आहे.

**(२) मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (पूर्व) :**

कै. नटवर्य दत्ता भट मार्ग, विलेपार्ले (पूर्व) येथे महानगरपालिकेचे मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, सन १९७८ मध्ये बांधण्यात आले असून, ते स्वतंत्र रंगपट आणि तालिम कक्ष असलेले ९१६ आसन क्षमतेचे संपूर्णतः वातानुकूलित असे प्रेक्षागृह आहे. प्रेक्षागृहात स्वयंचलित विद्युत व्यवस्था आहे. नाटक सांस्कृतिक कार्यक्रम, वाद्यवृंदांचे कार्यक्रम, इत्यादींकरीता विहित अनामत रक्कम व भाडे आगाऊ भरून या प्रेक्षागृहाचे आरक्षण करता येते. नाटके, वाद्यवृंद इत्यादींच्या तालमींकरिता विहित अनामत रक्कम आणि भाडे भरुन वातानुकूलित तालीम कक्षाचे आरक्षण करता येते. या व्यतिरिक्त दोन छोट्या वातानुकूलित सभागृहांचे म्हणजेच चर्चासत्र सभागृह व बैठक सभागृहांचे विहित अनामत रक्कम व भाडे भरुन आरक्षण करता येते. तसेच, नाट्यनिर्मात्यांना त्यांच्या कार्यक्रमासंबंधातील साहित्य वाचनाकरिता विहित भाडे रकमेवर वातानुकूलित वाचनालय कक्षही उपलब्ध आहे.

**(३) प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे नाट्यमंदिर, बोरीवली (पश्चिम) :**

प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे नाट्यमंदिर हे सोडावाला लेन, बोरीवली (पश्चिम) येथे आहे. संकुलात मुख्य नाट्यगृह (१०२६ आसने), लघुनाट्यगृह (२११ आसने), तालीम कक्ष, निवासी खोल्या, कलादालन, परिषद सभागृह, समाजमंदिर सभागृह व २ बहुउद्देशीय सभागृहे, लघुकक्ष हे, सर्व उपक्रम वातानुकूलित असून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येतात. त्यापैकी समाजमंदिर व दोन्ही बहुउद्देशीय सभागृहे वातानुकूलीत तसेच, विनावातानुकूलीत सुविधेसह आरक्षण करण्याची सुविधा आहे. मुख्य नाट्यगृह व लघुनाट्यगृह अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणेने आणि ध्वनी यंत्रणेने सुसज्ज आहेत. मुख्य सभागृहात लहान मुलांसाठी क्रायरुमचीही सुविधा आहे. विद्युत पुरवठा काही कारणास्तव खंडीत झाल्यास विद्युत पुरवठा करण्यासाठी डिझेलवर चालणारे विद्युत जनित्र आहे. लग्न, सभा, समारंभ, चर्चासत्रे इत्यादी कार्यक्रमांसाठी दोन बहुउद्देशीय सभागृहे व वातानुकूलित समाजमंदिर सभागृह वाजवी शुल्क आकारून भाड्याने देण्यात येतात. संकुलात येणाऱ्या अभ्यागतांच्या /प्रेक्षकांच्या वाहनांकरिता सुमारे १०० वाहने उभी करण्याची क्षमता असलेल्या सशुल्क वाहनतळाची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, संकुलाच्या सुरक्षेसाठी महानगरपालिकेच्या सुरक्षा व्यवस्थेबरोबर निमशासकीय सुरक्षारक्षक बोर्डाची यंत्रणा कार्यरत आहे. परिषद सभागृह वस्तूंच्या विक्री व प्रदर्शनासाठी तसेच, सभांसाठी भाडेतत्वावर दिले जाते. संकुलामध्ये दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई, बोरीवली शाखा व अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, बोरीवली शाखा, यांची कार्यालये तसेच, बोरीवली सांस्कृतिक केंद्र संचालित ज्ञान विहार ग्रंथालय यांनाही संकुलात भाडे तत्त्वावर जागा देण्यात आली आहे. तसेच, मॅजेस्टीक प्रकाशन यांना देखील सवलतीच्या दरात पुस्तक प्रदर्शन / विक्रीकरीता संकुलात भाडे तत्त्वावर जागा देण्यात आली आहे. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, बोरीवली शाखा देखील तात्पुरत्या स्वरूपात संकुलात स्थानांतरीत करण्यात आली आहे. संकुलात सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

**(४) अण्णाभाऊ साठे नाटयगृह , भायखळा (पूर्व) :**

भायखळा (पूर्व ) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानातील अण्णाभाऊ साठे खुल्या नाटयगृहाचा पुनर्विकास करुन तेथे अद्ययावत प्रकाशयोजना तसेच, ध्वनीक्षेपण यंत्रणेसह ७६१ आसनक्षमतेचे वातानुकूलित बंदिस्त नाटयगृह उभारण्यात आले आहे. नाटयगृहात क्रायरुमची सुविधा उपलब्ध आहे. तसेच, विद्युत पुरवठा काही कारणास्तव खंडीत झाल्यास विद्युत पुरवठा करण्यासाठी डिझेलवर चालणाऱ्या विद्युत जनित्राची देखील सुविधा आहे. संकुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वत्र सी. सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले असून अत्याधुनिक अग्निशमक यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. नाटयगृहाच्या तळघरात सुमारे ३२ वाहने उभी करण्याची क्षमता असलेल्या यांत्रिकी वाहनतळाची सुविधा सशुल्क उपलब्ध आहे. सदर नाटयगृहाची सुविधा दि. ०१ एप्रिल २०२३ पासून सुरु करण्यात आली आहे. प्रेक्षकांसाठी उपाहारगृहाची सुविधा करण्यात येत आहे.

नाटयगृहाचे अंतर्बाह्य स्वरुप अतिशय आकर्षक असून नाटयगृहाची सुविधा प्रामुख्याने नाटके, वाद्यवृंद, संमेलने तसेच, विविध वाहिन्यांच्या चित्रीकरणासाठी उपलब्ध आहे.

लोकोपयुक्त सेवाकार्ये





विजेवर चालणारी दुमजली वातानुकुलित बस



बेस्ट इलेक्ट्रीक हाऊस

# लोकोपयुक्त सेवाकार्ये

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**

**(बृहन्मुंबई महानगरपालिका)**

**वाहतूक विभाग – २०२३ – २०२४**

बृहन्मुंबई महानगरपालिका अंगिकृत असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या वतीने बृहन्मुंबई हद्द आणि मुंबई लगतच्या नवी मुंबई, ठाणे आणि मिरा-भाईंदर या शहरांमधील काही प्रमुख ठिकाणांदरम्यान ' परिवहन सेवा ' कार्यान्वित करण्यात येते. तसेच, मुंबईतील सायन आणि माहिमपर्यंतच्या विभागामध्ये ' विद्युत पुरवठा ' सेवा देखील पुरविण्यात येते. सुरुवातीला उपक्रमाचे बस प्रवर्तन बृहन्मुंबई हद्दीकरीता मर्यादित होते. परंतु लगतच्या शहरांमधील रहिवाश्यांकडून सुचना प्राप्त झाल्यानंतर सन १९८४ पासून उपक्रमाचे बस प्रवर्तन नवी मुंबई, ठाणे आणि मिरा-भाईंदर या शहरांमधील काही प्रमुख ठिकाणांदरम्यान विस्तारित करण्यात आले.

**बस प्रर्वतनाची वैशिष्टे -**

**१. बसताफा :-**

बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यात स्वःमालकीच्या बसगाड्यांसह भाडेतत्त्वावरील बसगाड्यांचा समावेश असून वेगवेगळ्या प्रकारच्या बसगाड्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. (दि. ३१-०३-२०२४ रोजी)

| तपशील | विना-वातानुकूलित | | | वातानुकूलित | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकमजली | मिडी | विद्युत | मिडी | मिनी | विद्युत | | | |
| | | | | | | एकमजली | मिडी | दुमजली | |
| स्वः मालकीच्या | ७३२ | ३३५ | ०६ | २५ | ०० | ०० | ०० | ०० | १,०९८ |
| भाडेतत्त्वावर | ४७९ | ०० | २० | ६२५ | २८० | २४२ | २२० | ४९ | १,९१५ |
| एकूण | १,२११ | ३३५ | २६ | ६५० | २८० | २४२ | २२० | ४९ | ३,०१३ |

**२. बसमार्ग :-**

बेस्ट उपक्रमाचे बस प्रवर्तन संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत कार्यान्वित करण्यात आलेले असून नवी मुंबई, ठाणे आणि मिरा-भाईंदर या शहरामधील काही प्रमुख ठिकाणांदरम्यान बस प्रवर्तनाचा विस्तार करण्यात आलेला आहे. बेस्ट उपक्रमाचे बस प्रवर्तन प्रामुख्याने उपनगरीय रेल्वेला पुरक म्हणून कार्यान्वित करण्यात येते. या अनुषंगाने रेल्वे स्थानक आणि निवासी संकुल तसेच, रेल्वे स्थानक आणि व्यापारी संकुल दरम्यान कमी अंतराचे बसमार्ग मोठ्या प्रमाणावर कार्यान्वित करण्यात येतात. बेस्ट उपक्रमाचे बस प्रवर्तन सर्वसाधारण सेवा, मर्यादित सेवा, जलद कॉरिडॉर सेवा, आणि वातानुकूलित सेवा असे वेगवेगळ्या प्रकारात कार्यान्वित करण्यात येते.

**बसमार्गाचा तपशील (दि. ३१-०३-२०२४ रोजी) -**

| तपशील | सर्वसाधारण | मर्यादित | कॉरीडॉर | वातानुकूलित | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| स्वःमालकीचे | १३१ | ४३ | १३ | ०३ | १९० |
| भाडेतत्वावर | ३३ | १० | ०५ | १८७ | २३५ |
| एकूण | १६४ | ५३ | १८ | १९० | ४२५ |

### ३. पर्यावरणस्नेही बसप्रवर्तन :-

प्रदूषण ही सद्यस्थितीत अतिशय धोकादायक अशी जागतिक समस्या आहे. प्रदूषणामुळे येऊ घातलेले संकट थांबविण्याकरीता पर्यावरण सुरक्षित आणि निरोगी ठेवणे आवश्यक असून यासाठी काही उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे आहे. प्रदूषणाच्या विविध प्रकारांपैकी वायु प्रदूषण हा एक प्रकार असून यामध्ये वाहनांमधील धुरामुळे वातावरण प्रदूषित होते.

मुंबईतील प्रदूषण कमी करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने आपल्या बसताफ्यात पर्यावरणस्नेही विजेवर चालणाऱ्या बसगाड्यांचा समावेश करण्यास सुरूवात केलेली आहे. सद्यस्थितीत उपक्रमाकडे ५३७ विजेवर चालणाऱ्या बसगाड्या आहेत. तसेच, संपिडीत नैसर्गिक वायू (सी.एन.जी.) या प्रदुषणमुक्त इंधनावर प्रवर्तित होणाऱ्या बसगाड्या देखील उपक्रमाच्या ताफ्यात आहेत.

**वेगवेगळया इंधनावर प्रवर्तित होणाऱ्या बसगाड्यांचा तपशील - (दि. ३१-०३-२०२४ रोजी)**

| तपशील | डिझेल | सीएनजी | विद्युत | एकूण |
|---|---|---|---|---|
| स्व:मालकीच्या | २४५ | ८४७ | ०६ | १,०९८ |
| भाडेतत्वावरील | २८० | १,१०४ | ५३१ | १,९१५ |
| एकूण | ५२५ | १,९५१ | ५३७ | ३,०१३ |

### ४. Premium बससेवा :-

प्रवाशांचे प्राधान्य नेहमीच अद्ययावत् आणि आरामदायी सेवांना असते, ही बाब विचारात घेऊन बेस्ट उपक्रम अशा आव्हानांना तोंड देण्यासाठी नेहमीच सज्ज असतो. प्रवाशांची आरामदायी बससेवेची मागणी विचारात घेऊन बेस्ट उपक्रमाने 'चलो मोबिलिटी प्रा. लि.' या व्यवसाय संस्थेच्या सहकार्याने 'बेस्ट चलो ॲप' वर आधारीत वातानुकूलित Premium बससेवा सन २०२२ पासून सुरु केलेली आहे. या बससेवांना प्रवाशांचा उत्साही प्रतिसाद आहे.

### ५. 'ई-स्कुटर' सेवा :-

प्रवाशांना प्रवासाच्या अन्य माध्यमांवर अवलंबून न राहता निवासस्थान ते कार्यालय थेट परिवहन सेवा उपलब्ध करणे, हा बेस्ट उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. या अनुषंगाने उपक्रमाने डिसेंबर २०२२ पासून 'मे. वोगो ऑटोमोटीव्ह प्रा. लि.' या व्यवसाय संस्थेच्या माध्यमातून ई-स्कुटर सेवा सुरु केलेली आहे.

### ६. बेस्ट उपक्रमाची शहरी पर्यटन सेवा :-

मुंबई शहरामध्ये सार्वजनिक परिवहन सेवा पुरविणे हा उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. परंतु उपक्रमाच्यावतीने पर्यटन सेवादेखील कार्यान्वित करण्यात येते. ही पर्यटन सेवा दक्षिण मुंबईमध्ये कार्यान्वित करण्यात येते. सुरुवातीला ही पर्यटन सेवा दुमजली ओपन डेक बसगाडीमधून कार्यान्वित करण्यात येत असे. परंतु उपक्रमाच्या दुमजली ओपन डेक बसगाड्यांचे आयुर्मान संपल्यामुळे निष्कासित करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत ही पर्यटन सेवा इलेक्ट्रीक दुमजली वातानुकूलित बसगाडीतून कार्यान्वित करण्यात येते. या पर्यटन सेवमध्ये नरिमन पॉईंट येथील समुद्रकिनारा, गिरगांव चौपाटी आणि दक्षिण मुंबईतील विद्युत रोषणाई केलेल्या प्राचीन इमारतींची भेट घडविण्यात येते.

### ७. आरक्षित बसगाड्या : -

उपक्रमाच्या वतीने लग्न समारंभ, वाढदिवस, प्रदर्शन, खेळांचे प्रकार अशा विविध प्रसंगांकरीता बसगाड्या आरक्षण तत्वावर उपलब्ध करण्यात येतात. बेस्ट उपक्रमाचे आरक्षण आकार परवडणारे असल्यामुळे तसेच, उपक्रमाच्या बसगाड्यांची सेवा समाधानकारक असल्यामुळे या बसगाड्यांना समाधानकारक प्रतिसाद आहे.

### ८. बस आश्रयस्थानांचे सुशोभिकरण :-

बसगाडयांच्या प्रतिक्षेत बसथांब्यावर थांबणाऱ्या प्रवाशांना आरामदायी सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून बस आश्रयस्थानांचे नुतनीकरण करण्यात येत आहे. यामध्ये प्रवाशांना आसन सुविधेसह त्यांच्या इच्छित बसमार्गावरील बसगाडीची माहिती, मोबाईल फोन चार्जिंग करीता सुविधा अशा विविध अतिरिक्त सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. विशेष बस थांब्याच्या जागेवर बस आश्रयस्थाने उभारण्यात येत आहेत.

### ९. पे ॲण्ड पार्क योजना :-

उपक्रमाच्या उत्पनाचे स्त्रोत वाढविण्याच्या दृष्टिकोनातून परविओम टेक्नोलॉजिक प्रा. लि. या व्यवसाय संस्थेच्या समन्वयाने बेस्ट उपक्रमाने पे ॲण्ड पार्क योजना सुरु केलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने दिवसा, उपक्रमाच्या बसगाड्या बसमार्गावर प्रवर्तित झाल्यानंतर बस आगार आणि बसस्थानकांमधील रिक्त झालेल्या जागांचा वापर खाजगी वाहनांच्या पार्किंगकरीता करण्यात आलेला आहे.

### १०. महिलांकरीता विशेष बससेवा : -

महाराष्ट्र शासनाच्या 'तेजस्विनी' योजनेअंतर्गत ३७ बसगाड्या बेस्ट उपक्रमाला प्राप्त झालेल्या आहेत. या बसगाड्या सकाळी व संध्याकाळी गर्दीच्या वेळी वेगवेगळ्या बसमार्गावर प्राधान्याने महिला प्रवाशांकरीता प्रवर्तित करण्यात येतात. तसेच, गर्दीच्या वेळी महिलांकरीता विशेष बसगाड्या अनेक गर्दीच्या ठिकाणी प्रवर्तित करण्यात येत आहेत.

### ११. दिव्यांग, ज्येष्ठ नागरीक आणि महिला प्रवाशांची विशेष काळजी :-

दिव्यांग प्रवासी, ज्येष्ठ नागरीक, शालेय विद्यार्थी आणि महिला प्रवाशांची नेहमीच विशेष काळजी घेण्यात येते. तसेच दिव्यांग प्रवासी, ज्येष्ठ नागरीक आणि महिला प्रवाशांकरीता बसगाड्यांमध्ये काही आसने आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. संकटकालीन परिस्थितिमध्ये या प्रवाशांना मदत करण्याकरीता चालक, वाहक तसेच, पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येते. अशाप्रसंगी तात्काळ मदतीकरीता S.O.S. ही सुविधा बेस्ट मोबाईल ॲपमध्ये देण्यात आलेली आहे.

### १२. इलेक्ट्रॉनिक्स टिकीट इश्युइंग मशीन (ETIM):-

बेस्ट उपक्रमाद्वारे बसभाडे संकलन प्रणालीचे पूर्णतः संगणकीकरण करताना प्रवाशांना देण्यात येणारी टिकीटे इलेक्ट्रॉनिक्स टिकीट इश्युइंग मशीन (ETIM) देण्यात येतात. या मशिनच्या आधारे बसवाहकाने दिवसभरातील वितरीत केलेल्या टिकीटांचा तपशील, म्हणजेच संपूर्ण प्रवासी तपशील उपलब्ध होतो. तसेच, सदर मशिनद्वारे फेऱ्यांचा तपशील, मशीन वापरणाऱ्या बसवाहकाचा तपशील इ. माहितीचा साठा करण्यात येतो. सदर माहितीचा उपयोग एकूण बसप्रवर्तन आणि बसमार्गावरील प्रवासी आणि उत्पन्नाच्या विश्लेषणासाठी करण्यात येतो.

### १३. मोबाईल ॲप व त्याची वैशिष्टे :-

बेस्ट उपक्रमाद्वारे प्रवाशांच्या सुविधेकरीता 'चलो (CHALO) मोबाईल ॲप' सुरु करण्यात आले आहे. या मोबाईल ॲपद्वारे प्रवाशांना त्यांच्या इच्छित गंतव्यस्थानी जाणाऱ्या बसमार्गावरील बसगाड्यांची माहिती, तसेच सदर ॲपमध्ये रोख रक्कमेऐवजी डिजिटल प्रणालीद्वारे प्रवास भाडे अदा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या ॲपवर सर्व बसपासेस देखील उपलब्ध आहेत. त्याचप्रभाणे उपक्रमाच्या बसमार्गाबाबतची सर्वसमावेशक माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे.

### १४. NCMC स्मार्ट कार्ड - विविध सुविधा : -

केंद्र शासनाच्या 'One Nation One Card' - या धोरणाअंतर्गत बेस्ट उपक्रमाने **'National Common Mobility Card - NCMC'** चा अवलंब सुरु केलेला आहे. प्राधान्याने **N.C.M.C.** योजनेची अंमलबजावणी करण्यात

येत असलेल्या सार्वजनिक उपक्रमांच्या बससेवा, मेट्रो सेवा तसेच रेल्वेमध्ये प्रवासी प्राधान्याने या **N.C.M.C.** कार्डचा वापर करु शकतील. भविष्यात सदर स्मार्टकार्ड हे सार्वत्रिकपणे स्विकारले जाईल.

### १५. TAP-IN आणि TAP-OUT योजना :-

या योजनेअंतर्गत बसगाड्यांमध्ये दोन्ही प्रवेशद्वारांवर E.T.I.M. बसविण्यात आलेली आहेत. प्रवाशांनी बसगाडीत प्रवेश करताना तसेच बसगाडीतून उतरताना प्रवेशद्वारांवरील E.T.I.M.च्या संपर्कात आपले स्मार्टकार्ड अथवा मोबाईल आणणे अनिवार्य आहे. सदर प्रक्रीयेत प्रवाशांच्या स्मार्ट कार्ड अथवा मोबाईल मधील 'ई पर्स' मधून प्रवासभाडे वजा होईल किंवा 'बसपास' असल्यास 'फेरी' वजा होईल.

### १६. I.T.M.S. - बससेवेचे आधुनिकीकरण :-

'Intelligent Transport Management System' ही अभिनव संगणकीकृत प्रणाली उपक्रमाच्या बसप्रवर्तनाकरीता राबविण्यात येत आहे. या प्रणालीमुळे बेस्ट उपक्रमाच्या बसमार्गांवरील कोणत्याही बसगाडीचे निश्चित ठिकाण माहित होते. प्रवाशांना देखील त्यांच्या इच्छित बसमार्गावरील बसगाडी किती वेळात उपलब्ध होऊ शकेल, ही माहिती त्यांच्या भ्रमणध्वनीवर Mobile App च्या माध्यमातून उपलब्ध होते. तसेच, बसथांब्यावर बसमार्गांवरील बसगाड्यांचा अपेक्षित आगमन कालावधीची माहिती प्रदर्शित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

### १७. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा :-

महाराष्ट्र शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांची बेस्ट उपक्रमासह मुंबई शहरातील अन्य शासकीय यंत्रणांचा सहभाग असलेली 'आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा' अस्तित्वात आहे. आपत्कालीन प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार आपत्तीत अडकलेल्या प्रवाशांना तातडीने आणि जलदगतीने बससेवा उपलब्ध करुन देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी 'बेस्ट' उपक्रमाची असते. या संपूर्ण व्यवस्थापनाचे नियंत्रण बेस्ट उपक्रमाच्या वडाळा आगारातील Command Control Centre येथून करण्यात येते. याच Command Control Centre मधून उपक्रमाच्या संपूर्ण बसप्रवर्तनाचे नियंत्रण देखील करण्यात येते.

### १८. बसगाडयांची देखभाल :-

'बेस्ट' उपक्रमामध्ये बसगाड्यांची दैनंदिन देखभाल विविध आगारातील परिवहन अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. मोठया प्रमाणावर असलेले दुरुस्तीचे काम दादर येथील मध्यवर्ती कार्यशाळेत करण्यात येते. वेटलिज बसगाड्यांची देखभाल संबंधित कंत्राटदारांमार्फत करण्यात येते.

### १९. कर्मचारी / अधिकारी प्रशिक्षण केंद्र :-

बसगाडीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सुरक्षितता ही उपक्रमाकरिता अतिशय महत्त्वपूर्ण बाब असल्याने बेस्ट उपक्रमाने कर्मचारी व अधिकारी यांना त्यांच्या सेवेत दाखल करतेवेळी प्रशिक्षण देण्याकरीता दिंडोशी बसआगार येथे सुसज्ज असे प्रशिक्षण केंद्र विकसित केलेले आहे. तसेच, या प्रशिक्षण केंद्रामध्ये बसचालक, बसवाहक व अधिकाऱ्यांकरीता उजळणी अभ्यास वर्गाचे आयोजन देखील करण्यात येते.

### २०. टोल फ्री हेल्पलाईन :-

बेस्ट उपक्रमाने दि. १५ ऑक्टोबर २००९ पासून मोफत दुरध्वनी सेवा क्र. १८००-२२७ ५५० सुरु केलेली आहे. ही सेवा दिवसाचे २४ तास उपलब्ध आहे. प्रवाशांना उपक्रमाच्या बससेवेची सर्वसमावेशक माहिती या हेल्पलाईनवर कर्मचारी व अधिकारी वर्गाद्वारे पुरविली जाते.

## २१. प्रवासभाडे आकारणी :-

### २१.१- दि. ०१.०७.२०१९ पासून कार्यान्वित असलेली प्रवासभाडे सारणी

| कि.मी. | सर्वसाधारण/मर्यादित/जलद (रु.) | वातानुकुलीत (रु.) |
|---|---|---|
| ५ | ५.०० | ६.०० |
| १० | १०.०० | १३.०० |
| १५ | १५.०० | १९.०० |
| १५ कि.मी. च्या पुढे | २०.०० | २५.०० |

- **सामान भाडे -** सर्वसाधारण / मर्यादित / जलद बससेवेकरीता जास्तीत जास्त रु. २०/- आणि वातानुकूलित बससेवेकरीता रु.२५/- या दराच्या अनुषंगाने प्रौढ भाडयाच्या समतुल्य, सामान भाडे आकारण्यात येते.
- **वस्तु आणि सेवाकर** – GST - ५ % (CGST - २.५ % आणि SGST - २.५%) - वातानुकूलित बससेवांवर ५% वस्तू आणि सेवाकर समाविष्ट आहे.

### २१.२. प्रवास भाड्यात सवलत :-

- पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह सर्व शैक्षणिक क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. २००/- मूल्यवर्गाचा सवलतीच्या दरातील मासिक बसपास उपलब्ध करण्यात आलेला आहे.
- ज्येष्ठ नागरीकांना वातानुकूलित बससेवांसह सर्व बससेवांवर मासिक बसपासमध्ये रु.५०/- सवलत देण्यात आलेली आहे.
- बेस्ट आणि बृहन्मुंबई महानगरपालिका बैठकांचे तसेच उपक्रमाशी आणि महानगरपालिकेशी संबंधित इतर कार्यक्रमांचे वार्तांकन करणाऱ्या अधिस्विकृतीधारक पत्रकारांना वार्षिक रु.३६५/- मुल्यवर्गाच्या सवलतीच्या दरातील बसपास देण्यात आलेले आहेत.
- उपक्रमाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रु. ९००/- मूल्यवर्गाचा वार्षिक सवलतीचा बसपास देण्यात येतो.

### २१.३. मोफत प्रवासाची सुविधा :-

- स्वातंत्र्य सैनिक, नगरसेवक, नामनिर्देशित सदस्य, बेस्ट समिति सदस्य, शिक्षण समिति सदस्य , महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, न्यायालयात बेस्ट उपक्रमाचे प्रतिनिधित्व करणारे वकील यांना मोफत बस प्रवासाची सुविधा आहे.
- महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्य (महाराष्ट्र सरकारकडून उपक्रमाला ठराविक रक्कम प्राप्त होते) आमदारांबरोबर एका व्यक्तीला मोफत प्रवासाची सुविधा असते.
- महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षण घेणारे गणवेषधारक विद्यार्थी (मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिपूर्ती करण्यात येते.) यांना मोफत प्रवासाची सुविधा आहे.
- ४०% व त्यापेक्षा अधिक कायमस्वरुपी दिव्यांग व्यक्ति (बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिपूर्ती करण्यात येते.) यांना मोफत प्रवासाची सुविधा आहे.
- बेस्ट कर्मचाऱ्यांना मोफत प्रवासाची सुविधा आहे.

### २१.४. दैनंदिन बसपास (रु. ६०/-) : (दि. ०१-०३-२०२४ पासून सुधारित)

- हा बसपास वातानुकूलित आणि विना - वातानुकूलित बससेवांवर वैध आहे. या बसपासच्या सहाय्याने प्रवासी संपूर्ण दिवस उपक्रमाच्या सर्व प्रकारच्या बसगाड्यांवर त्यांच्या इच्छेनुसार प्रवास करु शकतात. प्रवासाचे अंतर तसेच बस फेऱ्यांवर कोणत्याही प्रकारची मर्यादा नाही.

**२१.५. मासिक बसपास (रु. ९००/-) : (दि. ०१-०३-२०२४ पासून सुधारित)**

- दैनंदिन बसपासाप्रमाणेच वातानुकूलित आणि विना - वातानुकूलित बससेवांवर अमर्याद प्रवासाकरीता वैध असणारा मासिक बसपास देखील उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**२१.६. अंतरावर आधारीत बसपास :(दि. ०१-०३-२०२४ पासून सुधारित)**

- हे बसपास वातानुकूलित बससेवांसह विना - वातानुकूलित बससेवांवर देखील वैध राहतील. प्रवास भाडे मर्यादेमध्ये प्रवासी त्यांच्या इच्छितस्थळी प्रवास करु शकतात.
- प्रवाशांना त्यांच्या इच्छेप्रमाणे वेगवेगळ्या अंतराचे, बसफेऱ्यांचे व कालमर्यादेचे बसपास उपलब्ध आहेत.

| तपशील | | साप्ताहिक | मासिक | | | सार्वत्रिक बसपास | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बसफेऱ्या | संख्या | १५ | ६० | १०० | १५० | अमर्याद | |
| वैध कालावधी | (दिवस) | ०७ | २८ | २८ | २८ | ०१ | ३० |
| रु. ६/- प्रवासभाडे | रुपये | ७० | ३०० | ४५० | ६०० | ६० | ९०० |
| रु. १३/- प्रवासभाडे | रुपये | १७५ | ७०० | १,००० | १,४०० | | |
| रु.१९/- प्रवासभाडे | रुपये | २६५ | १,०५० | १,६५० | २,१०० | | |
| रु. २५/- प्रवासभाडे | रुपये | ३५० | १,३५० | २,२०० | २,७०० | | |

# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

## विद्युत पुरवठा विभाग

जुन्या मुंबई शहराच्या हद्दीमध्ये वीज वितरण करण्यासाठी 'बेस्ट' उपक्रम परवानाधारक आहे. वितरण क्षेत्राची व्याप्ती सुमारे ७२ चौ. कि. मी. असून ती कुलाबा ते सायन आणि माहिम पर्यंत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये मुंबई शहराची कमाल वीज मागणी ९४६ मेगावॅट व खरेदी केलेली ऊर्जा ४,९३७ दशलक्ष युनिट इतकी होती. सदर विजेच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रामुख्याने टाटा पॉवर कंपनी द्विपक्षीय करार, पॉवर एक्सचेंज व पर्यावरण पूरक नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोतातून वीज खरेदी करण्यात आली. उपक्रमाची सुमारे दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत ६५ संग्राही उपकेंद्रे, २,५३८ वितरण उपकेंद्रे, १२५४ वितरण स्तंभ, ७८,५१२ संधारणा स्थापन केली आहे आणि मुंबईतील ४४,२९४ पथदिव्यांची देखभाल करीत आहे. विद्युत पुरवठयाची विश्वासार्हता ९९.९८% आहे

'बेस्ट' उपक्रमाचे सुमारे १०.५३ लाख वीजग्राहक आहेत. त्यापैकी सुमारे ७३% निवासी ग्राहक आहेत. बेस्ट उपक्रमामार्फत स्मार्ट मीटरद्वारे १००% प्रीपेड मीटरिंग प्रणाली लागू करण्याचे प्रस्तावित आहे. ह्याद्वारे उपक्रमाला आगाऊ महसूल प्राप्त होऊन थकबाकी दूर करणे शक्य होईल. हया प्रणालीद्वारे ग्राहक आगाऊ रक्कम भरुन २% पर्यंत सूट घेऊ शकतात. स्मार्ट मीटर्सद्वारे अचूक वीज बिले वितरीत होऊन ग्राहकांना वीज बिलासापेक्ष त्यांनी कधी आणि किती वीजेचा वापर केला याचा मागोवा घेणे शक्य होईल. तसेच, ग्राहकांना वीज वापरावर अधिक तपशिलवार माहिती मिळून विजेचे बिल कमी करण्यासाठी त्यांचे वीज वापराचे नियोजन करणे शक्य होईल.

बेस्टच्या ग्राहकांना त्यांचे वीज बिल भरण्याकरीता १३३ ठिकाणी वीज देयके भरणा काऊंटर (ज्यामध्ये विविध पोस्ट ऑफिस व बँकांच्या शाखा समाविष्ट आहेत) उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त ई.सी.एस. सुविधा, क्रेडिट / डेबिट कार्ड, एन.ई.एफ.टी. / आर.टी.जी.एस. अशा अनेक सेवा प्रदात्यांचे विविध आऊटलेट्स आणि मोबाईल ॲपद्वारे (MiBEST) वीज देयक भरणा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी वीज बिलांवर डायनॅमिक QR कोड तरतूद आणि भारत बिल पेमेंट इंटरफेस (B.B.P.I.) ची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच, विद्युत पुरवठ्यामध्ये बिघाड झाल्यास तो दुरुस्त करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी 'बेस्ट' उपक्रमाचे विविध विभाग कार्यरत आहेत. या सर्व विभागांचा समन्वय साधणे व नियत्रंण राखण्यासाठी ०२ पर्यवेक्षकीय केंद्रे, ०५ दोष निवारण केंद्रे व ०८ वितळतार नियंत्रण केंद्रे अहोरात्र कार्यरत असतात.

विद्युत पुरवठा विभागाच्या वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबाबत बेस्ट उपक्रमाला 'सर्वोत्कृष्ट वितरण कंपनी' म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. अध्यक्ष, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (C.E.A.) व सचिव, भारत सरकार यांच्या हस्ते आय.पी.पी.ए. पुरस्कार २०२४ सोहळ्यात 'उत्कृष्ट कामगिरी' साठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

बेस्ट उपक्रमाने हाती घेतलेल्या विविध सुधारणा उपायांमध्ये सक्रिय भूमिका घेतल्याबद्दल तसेच, मुंबई शहरासाठी भविष्यात मोठ्या प्रमाणात सौर उर्जा मिळवण्याचा करार केल्याबद्दल राज्याचे राज्यपाल, यांच्या हस्ते बेस्टला 'मुंबई सस्टेनेबिलीटी अवार्ड' ने सन्मानित करण्यात आले आहे.

भारत सरकारच्या ऊर्जा बचत धोरणानुसार मुंबई शहरातील बहुतांश विद्यमान एच.पी.एस.व्ही. / एम. एच. दिवे हे ऊर्जा कार्यक्षम एलईडी दिव्यांनी बदलण्यात आले आहे. विद्यमान एच.पी.एस.व्ही. / एम. एच. दिवे हे ऊर्जा कार्यक्षम एल.ई.डी. दिव्यांनी बदलल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रभागात एकूण ४७% वीज बचत झाली.

NS631MS-BMPP-69249-2024-25-30 Copies.




गिरगाव येथील शहीद तुकाराम ओंबळे ह्यांचा पुतळा

# बृहन्मुंबई महानगरपालिका




- ७ धरणं, २७ सेवा जलाशये व पाणीपुरवठा करणाऱ्या १४ जल बोगद्यांमधून २५४ वितरण विभागांमार्फत मुंबईकरांना पाणीपुरवठा केला जातो.
- ७००० किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांद्वारे दररोज ३८५० दशलक्ष लिटर्स पाणी पुरविले जाते.

# चला पाणी वाचवू या !